२८ म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

संग्रहालय क्रमांक २८

लेखक नरहर विनायक शास्त्री ओक

पुस्तकाचें नांव हिंदुस्थानचा इतिहास भाग २

सन ३८८०

२८

काव्य

PUBLISHED FOR THE EDUCATIONAL DEPARTMENT.

# A MARATHI VERSION

OF

MURRAY'S HISTORY OF BRITISH INDIA

BY

TRANSLATION EXHIBITIONERS.

**PART THE SECOND;**

BY

NARSINH VINÁYAK SHÁSTRÍ OK.

PUBLISHED BY ORDER OF THE DIRECTOR OF
PUBLIC INSTRUCTION

REGISTERED UNDER ACT XX OF 1847.

BOMBAY,

PRINTED AT GANPAT CRUSHNÁJÍ'S PRESS.

1860.

Price Fourteen Annas.

# हिंदुस्थानाचा इतिहास.

हें पुस्तक इंग्लिश भाषेंत मरे साहेब ह्यांनीं केलें,

त्याचें मराठी भाषांतर

ट्रान्सलेशन् एक्जिबिशनर ह्यांनीं केलें, त्याचा

## भाग दुसरा

नरसिंह विनायक शास्त्री ओक

माजी ट्रान्सलेशन् एक्जिबिशनर

ह्यांनीं केला. तो

मेहेरबान डैरेक्तर आफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन् ह्यांच्या

हुकुमावरून

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी ह्यांचे छापखान्यांत छापिला.

इ० स० १८६०

शके १७८२.

किंमत चौदा आणे.

२९८५

३.८२

# सूचना.

पहिल्या भागाची जी प्रस्तावना तीच ह्या दुसऱ्या भागास लागू आहे. विशेष इतकाच कीं प्रकरण ६ पासून प्रकरण ९ पावेतों चार प्रकरणांचा हा दुसरा भाग केला आहे. ह्या भागांत मुसलमान लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून हिंदुस्थान जिंकून त्यांत आपली राज्यसत्ता कशी स्थापिली व ती पुढें कशी चालविली ह्या गोष्टींचें वर्णन केलें आहे.

# NOTICE.

This book has not received European revision; but it has been carefully revised by the translator and also looked over by the Pandit of the Maràthí Translator in the Educational Department.

This Second part comprises four chapters (6—9) of the original English work, embracing The early Mahommadan conquests in India; The Pathàn or Afghàn Dynasty; The Mogal Dynasty to Aurangzeb; The reign of Aurangzeb and the decline of the Mogal Dynasty.

# ब्रिटिशलोकांच्या अमलांतील हिंदुस्थानाचा इतिहास.

## प्रकरण ६

### हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचे प्राचीन काळीं झालेले जय.

मुसलमान लोकांच्या सत्तेचा आरंभ—मध्यआशियेंतील जय—स्यामिनी वंश—अबिस्त्याजी—सबक्तगीन—गिजनींचा महमूद—हिंदुस्थानांत त्याच्या बारा स्वाऱ्या—लाहोरचा जय—भीमगड येथील लागोपाठ झालेले जय—स्थानेश्वर—कनोज—मथुरा—सोमनाथ—महमुदाचा मृत्यु—त्याचेगुण—त्याच्या गोष्टी—गिजनीच्या दरबारच्या विद्वान लोकांची विद्या—फर्दुसी—उन्सरी—अबुरिहाम—गिजनीच्या घराण्याची उतरती पाहिरी—गोरी वंशांतला राजा—तें घराणें बुडविलें—महंमदगोरी—हिंदुस्थानांत त्याचे जय—कुतुबुद्दीन ह्यानें दिल्ली घेऊन ती आपली राजधानी केली.

---

प्रकरण. ६
इ. स. ६४०
मुसलमान लोकांच्या सत्तेचा आरंभ.

अरब लोक (ह्यांस सहरसन असेंही ह्मणतात.) ह्यांनीं महंमदाच्या धर्माचा प्रसार आपल्या शस्त्राच्या सामर्थ्यानें करून आशियाखंडांत अतिशयित विस्मय होण्याजोगा राज्यामध्यें फेरफार केला, आणि त्याखंडांत रोमन लोकांचा झेंडा ज्या मु-

प्रकरण. ६ लुखापर्यंत लागला होता त्यांन्याही पलीकडे
इ० स० ते गेले. त्यांचा पैगंबर महंमद मरण पावल्यानं-
६४० तर थोड्याच काळाच्या आंत त्यांचे बोडे वि-
जयी होऊन एकेच वेळेस यूरोपांतील तेगस आणि नै-
जर व आशियेंतील जक्सार्तीस ह्या नद्यांचें पाणी प्याले
व भूतळावरील त्यावेळच्या सर्व राज्यांहून मोठ्या रा-
ज्याची राजधानी बगदाद शहर झालें. तेथील दरबार
अतिशयित शोभिवंत होतें व लोक आचार संपन्न होते.
जेव्हां अज्ञान रूप अंधकार चहूंकडे पसरला होता त्या-
काळीं सर्व विद्येचा प्रकाश तेथेंच होता.

मध्य आशियेंत झालेले लाभ.

स्वतंत्र तार्तार देशांत ज्यांतून आक्सस व ज-क्सार्तीस ह्या महानद्या वाहतात असा मेवार अलूनाहार ह्मणून एक मोठा वि-स्तृत प्रांत आहे त्यास मुसलमान लोकांच्या विजयापासून व धर्माच्या प्रसारापासून जसा लाभ झाला तसा कोणत्या ही दुसऱ्या देशास झाला नाहीं. जरी ईश्वर कृपेनें तेथील जमीन सुपीक आहे व तो देश आशियेंतील अत्युत्तम हवेच्या दे-शांपैकींच आहे तरी प्राचीनकाळच्या सर्व लेखांमध्यें तो देश केवळ सिथिया देशाप्रमाणें आहे असें सांगित-लें आहे. तेथें धनगर व लढाऊ लोक ह्यांच्या हिकडे तिकडे भटक्यामारीत फिरणाऱ्या टोळ्या चहूंकडे पस-रल्या होत्या. ते लोक तंबू देऊन राहत आणि आप-ल्या कळपांतील मेंढ्यांच्या दुधावर उपजीविका करीत. अरब लोकांच्या अमलांत त्या प्रांतांत व्यवस्थित राज्य स्थापित होऊन तेव्हांपासून पुढें तें तसेंच चालत आलें आहे, व लागवड चांगली झाली आहे, आणि मोठाली

शहरें वसून त्यांत वस्ती दाट झाली आ- प्रकरण६.
हे. तरी पैगंबराच्या राज्यांतून जे प्रांत इ० स०
निराळे झाले त्यांत प्रथमतः हा प्रांत निराळा ६४०
झाला. त्या राज्यांत सुभेदार राजधानीपासून दूर असत म्हणून ते होत होत स्वतंत्र राजाप्रमाणें वागूं लागले. त्यांनीं प्रथम खुरासान प्रांतापर्यंत आपला अंमल वाढविला. नंतर इराणांतील मध्यभागीं अंमल बसविला. आणि शेवटीं बगदादांत मात्र पैगंबराचा अंमल राहिला. पृथ्वीवरील ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत लोक त्यांचें नांव ऐकून थरथर कांपत असत. पण त्याच नांवास पुढें कोणी विचारीनासें झालें.

इसवी सनाच्या ८७३वे वर्षीं म्हणजे हिजरी शकाच्या दोनशें अठावन्नावे वर्षीं बोखारा इस्माईल
एथील इस्माईल स्यामिनी हा आपणास स्यामिनी.
राजा असें म्हणवूं लागला. आणि स्यामिनी वंशांत जेजे राजे पुढें झाले त्यांनीं विस्तीर्ण देशांत सुमारें शंभर वर्षे राज्य केलें. तेव्हां त्यांनीं न्याय आणि लोकोपकार ह्यांविषयीं फार कीर्ति मिळविली. शेवटीं सर्व देशांत स्वेच्छाचारी राजांचा ऱ्हासकाळ येतो त्याप्रमाणेंच त्या घराण्याचा ऱ्हासकाळ आला. त्या राज्याच्या गादीवर कोणी बसावें ह्याविषयीं वाद पडल्यामुळें तें राज्य अधिक दुर्बळ झालें. तेव्हां अबिस्ताजी नामें खुरासान ह्या मोठ्या सेमितार्तार प्रांताचा सुभेदार होता त्यानें बंड केलें, त्यांत त्याचा जय झाला. तो स्वतंत्र राजा झाल्यावर त्यानें काबूल आणि कंधार हे पहाडी देश आपल्या

प्रकरण ६.
इ० स०
८७३

राज्याखालीं आणले. तो प्रदेश हिंदु कुश नांवाचे पर्वत आणि त्यांच्या शेंकडों अंगभूत शाखा ह्यांच्या मधील खोल खोऱ्यांत व उतरणीच्या प्रदेशांत किंवा शिखरावर आहे. तेथें अफगाण लोक राहत. शेतकी करणारे, लढाऊ आणि मेंढरे राखणे असून हाल काढण्याविषयीं सत्राण असत. त्यांनीं आपल्या राजाची सत्ता आसपासच्या प्रदेशांत पुष्कळ वेळ वाढविली. येथें अबिस्ताजी ह्यानें गिजनी शहर आपली राजधानी केली. त्याचा अम्मल पुष्कळ दिवसपर्यंत आशियाखंडांत होता.

काबुलांत स्थापलेलें स्वतंत्र राज्य.

सन ९७७ रांत त्याच्या मागून त्याचा सेनापति सबक्तगीन राज्यावर बसला, कारण त्याचा मुलगा लहानपणीं मेला होता. सबक्तगीन हा सेनेंतील लोकांच्या मतानेंच गादीवर बसला. त्यानें ह्या नवीन राज्याचा चांगला बंदोबस्त केला आणि त्याचें घराणें पुढें मोठें पराक्रमी झालें. प्रामाणिकपणा साधेपणा आणि सौम्यपणा ह्या गुणांविषयीं त्याची मोठी कीर्ति आहे. इकडील लोक मोठ्या आवडीनें त्याविषयीं एक गोष्ट सांगतात, तीवरून त्याच्या स्वभावाविषयीं त्यांची समजूत कशी होती ती स्पष्ट कळून येते. त्यानें जीं क्रूरकृत्यें केलीं तीं व त्याचा निर्दय स्वभाव ह्यांचा विचार करितां ती गोष्ट अगदीं उलटी आहे. एके दिवशीं सबक्तगीन अरण्यांत शिकार करीत असतां एक पाडस आपल्या आईबरोबर उड्या

इस्माईल स्यामिनी.

राजाची भूतदया.

मारतांना त्यानें दुरून पाहिलें. तें त्यानें धरिलें आणि पाय बांधून त्यास घोड्यावर टाकिलें. परंतु मागें पाहतो तों त्या पाडसाची आई दीन वदन करून मागें येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या अंतःकरणास द्रव सुटला. मग लागलेंच त्यानें तें पाडस सोडून आपल्या आईकडे त्यास जाऊं दिलें. मग तिनें रानांत परत जातांना डोळ्यांत आसवें आणून मागें पाहिलें. ह्यावरून तिची कृतज्ञता दिसून आली. ह्या गोष्टीविषयीं त्याचे मनांत चमत्कारिक विचार आले व त्या गोष्टीकडे त्याचें चित्त फार लागल्यामुळें त्यास रात्रीं स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत तुझ्या दयाळूपणाचें बक्षीस म्हणून तुला राज्य देतों असें त्यास कोणीं येऊन सांगितलें. तो भिजाशी नव्हता, केवळ साधा होता. ह्याचें उदाहरण असें सांगतात कीं त्याच्या महमूदनामें पुत्रानें एक मोठा शोभिवंत तंबू उभारून त्यास आंत नेलें. तेव्हां त्यानें आपल्या पुत्रास सांगितलें कीं ही वस्तू केवळ पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें नश्वर आहे असें मानून हिचा त्वां तिरस्कार करावा आणि चिरकाळ राहणारी जी कीर्ति ती संपादण्याविषयीं झटावें.

महमुदास राज्याचा अधिकार वास्तविक असतां त्याचा भाऊ इस्माईल ह्यानें कांहीं दिवस राज्य बळकावलें होतें, परंतु थोड्याच दिवसांनीं महमुदानें त्यास जिंकून जन्मभर कैदेंत मात्र ठेविलें. आणि मग सन ९९७ वावें वर्षीं

त्याच्या पाठीमागें महमूद गादीवर बसला.

प्रकरण ६. इ० स० ९९७

सबक्तगीन ह्याच्या पाठीमागें आपण त्या गादीवर बसला. आणि आशियेमध्यें जेजे महापराक्रमी राजे झाले त्यांच्या मध्यें गणण्याजोगा तो निघाला. बोखारा येथील बादशाहानें जेव्हां त्यावर हल्ला केला, तेव्हां पूज्य स्वामिनी वंशाच्या गादीवर राज्य करणाराशीं आपण युद्ध करूं नये असें त्यास वाटलें असावें किंवा त्यानें बाह्यात्कारीं बोलून दाखविलें, परंतु त्या बादशाहाचे दोन सेनापति होते त्यांनीं त्यास मारून त्याची गादी घेतल्यानंतर तें राज्य घ्यावें न घ्यावें म्हणून जी महमुदास दिक्कत होती ती गेली. नंतर त्यानें अग्नेक्स लोकांच्या राजास मिळून बोखारा एथील बादशाही बुडविली, व मेवार अलनाहार म्हणून जें चांगलें संस्थान होतें तें आपणास घेतलें. त्यावेळेस ह्या संस्थानाखालीं क्यास्पियन समुद्रापासून सिंधुनदापर्यंत आशिया खंडाचा सारा प्रदेश मोडत होता.

महमुदाच्या गुणांचें व दोषांचें वर्णन.

आशिया खंडांतील इतिहासांमध्यें महमुदाच्या कीर्तीप्रमाणें चमत्कारिक तऱ्हेची कीर्ति कोणाचीही नाहीं. न्यायाविषयीं तर त्याची इतकी प्रसिद्धि आहे कीं इकडील इतिहास कर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणें पाहूं गेलें असतां लांडगा व कोंकरूं हीं एक्या झऱ्यावर पाणी पीत असत. तरी ज्यांमध्यें विलक्षण अन्याय व जुलूम स्पष्ट दिसून येतो अशीं त्याच्या वर्तणुकीचीं उदाहरणें कमी आहेत असें नाहीं. तो मोठा धार्मिक होता अशीः त्याची मोठी ख्याति आहे. परंतु तीविषयीं ही तसाच संशय आहे. फेरिस्ता नामें इतिहासकर्ता लि-

होतो कीं तो अल्प वयांत असतां सर्व गोष्टींविषयीं त्यास संशय असे. परस्पर अगदीं भिन्न अशा दोन गोष्टींविषयीं त्यास संशय होता, ह्यामुळें त्याचें मन व्याकुळ होतें. त्या गोष्टी अशा कीं परलोक आहे किंवा नाहीं, व आपण सबक्तगिनाचा मुलगा आहों किंवा नाहीं. कां तर त्याच्या आईची साधारण चाल पाहिली असतां दुसरी गोष्ट वादग्रस्त आहे असें दिसतें. त्यास स्वप्न पडलें त्यांत महंमद पैगंबरानें येऊन ह्या त्याच्या दोन्ही शंकांचें निराकरण करून त्याचें मन स्वस्थ केलें, तेव्हांपासून तो बादशाह धर्मनिष्ठपणाचा बाणा बाळगूं लागला. तरी त्यानें धर्माच्या आवेशानें जीं कृत्यें केलीं त्यांच्या योगानें त्याची संपत्ति व सत्ता इतकी वाढली कीं तीवरून, ईश्वरभक्तीच्या योगानें आपण भूपति होऊं म्हणूनच तो भक्ति कशावरून करीत नसेल ह्याविषयीं लोकांस संशय आला. हिंदुस्थानांतील देवस्थानांत संपत्ति पुष्कळ सांठविलेली आहे, ह्या बातमीनेंच विशेषतः त्याचा उत्साह वाढला. व इकडची संपत्ति नेऊन गिजनी येथील राजवाडे सुशोभित करण्याविषयीं कांहीं तजवीज करी तोंपर्यंत त्याचें मन त्यास नेहमी खात असे.

प्रकरण. ६
इ.स. ९९७

त्याचा धर्म.

अरबस्थानांत, मुसलमान लोकांचें राज्य स्थापित झाल्यामुळें हिंदुस्थानांत पुष्कळ गोष्टी घडून आल्या. येथें त्या लोकांनीं शेंकडों वर्षें राज्य करावें असा ईश्वरी संकेत होता. तथापि त्याचें राज्य स्थापित झाल्यापासून चारशें वर्षेंपर्यंत त्यांस हिंदु-

हिंदुस्थानांत मुसलमानांच्या धर्माचा परिणाम.

प्रकरण. ६ स्थानांत येण्यास मार्ग सांपडला नाहीं

इ० स० १००० पण जेव्हां ह्या देशाच्या सरहद्दीवर त्यांचें मोठें प्रबल राज्य स्थापित झालें, तेव्हां अर्थातच हिंदुस्थानाच्या निर्भयपणास धक्का बसल्याप्रमाणें झालें. सबक्तगीन ह्यानें मुलतान व लाहोर ह्यांवर दोन वेळ स्वाऱ्या केल्या आणि दोन्ही वेळां लाहोरचा राजा जयपाळ ह्याचा पराजय केला. त्यानें पेशावर नामें उत्तम प्रांत गिजनीच्या ताब्यांत आणून सिंधुनदापर्यंत आपली सत्ता वाढविली. महमूद ह्यानें त्या स्वाऱ्यांत लहानपणीं आपलें शौर्य दाखविलेंच होतें आणि पुढें तो लवकरच सिंधुनदाच्या आलीकडे येऊन युद्ध प्रसंग करूं लागला. त्याच्या ताब्यांतील दूरदूरच्या देशांत बंडें उठत तेव्हां, आणि तार्तार लोकांच्या हल्ल्याचें जेव्हां कधीं त्यास भय पडे तेव्हां मात्र परत जाई. इतिहासकर्ते, त्या पराक्रमी राजानें हिंदुस्थानांवर बारा स्वाऱ्या केल्या असें वर्णितात. तितक्याही वेळां तो विजयी होऊन पुष्कळ लूट घेऊन परत गेला.

पहिल्या स्वारींत तो सिंधुनद उतरून मात्र आला व दुसरी स्वारी त्यानें लाहोरच्या जयपाळ राजावर केली. कारण, तो पुनः स्वतंत्रपणानें वागूं लागला होता. ह्या देशांत डोंगर व अरण्यें असून

लाहोरचा राजा जयपाळ

मध्यें मध्यें फार सुपीक असेही प्रदेश आहेत. आणि शिकंदर बादशाहाच्या वेळेपासून ह्या वेळपर्यंत येथें लढाऊच लोक उत्पन्न होत गेले. ते पश्चिमेकडून ह्या देशावर हल्ला होऊं देत नसत.

प्रकरण ६ इ० स० १००१

जयपाळ राजानें मोठें सैन्य दुसऱ्यानें जमा केलें होतें, पण त्याचा पराजय होऊन तो कैदी झाला. त्याच्या व त्याच्या बरोबरच्या पंधरा असामी सरदारांच्या गळ्यांमध्यें मोठ्या किमतीच्यां रत्नांच्या कंठ्या होत्या. आपण दोन वेळ युद्धांत कैदी झालों व आतां आपली अब्रू गेली ती पुनः येणार नाहीं असें त्यास वाटल्यामुळें व त्याच्यां देशच्या लोकांच्या वेडपणाच्या अभिमानामुळें त्या हतभाग्य राजानें चिता तयार करून अग्नींत उडी घातली. त्याचा मुलगा आनंदपाळ ह्यानें आपलें संस्थान गिजनीच्या ताब्यांतलें आहे असें मान्य केलें.

सिंधु नदाच्या आलीकडे केलेल्या मोठमोठ्या स्वाऱ्या

महमुदानें पुढें तीन स्वाऱ्या केल्या त्यांत त्याचा उद्देश असा होता कीं कोठें कोठें बंडें झालीं होतीं तीं मोडावीं आणि करभार घ्यावा. संन १००९ वांत आनंद पाळानें हल्ला केल्यावरून महमुदानें पांचवी स्वारी आरंभिली. आनंद पाळानें दिल्ली, उज्जनी, ग्वालेर, कालिंजर आणि अजमीर ह्या ठिकणच्या मोठमोठ्या राजांशीं, आपण परस्परांस मदत करावी असा संकेत ठरवून इतकें मोठें सैन्य जमा केलें कीं तेवढें सैन्य त्या प्रदेशांत जमलेलें शेंकडों वर्षेंपर्यंत कोणीं पाहिलें नव्हतें. तें सिंधुनद उतरून पेशावराच्या मैदानांत शिरलें तेथें शत्रूचें सैन्य फारच मोठें पाहून समरांगणांत मुसलमानांस समोर युद्ध करण्याची भीति वाटली. तेव्हां त्यांनीं खंदक खणण्यास आरंभ केला. दोन्ही दळें चाळीस दिवस समोरासमोर पडून राहिलीं होतीं. शेवटीं

प्रकरण ६ इ० स० १००९

गिकर ( गाइकवाड ) नामें लोक हिंदूंच्या सैन्यांत होते त्यांनीं युद्धास आरंभ केला. ते लोक बहुत करून अगदीं अडाणी व लाहोरच्या उत्तरेकडील पहाडी देशांतील राहणारे होते. त्या लोकांच्या बाणांनीं बरेंच काम केलें. तथापि राजाच्या मुख्य सैन्याची महमुदाच्या खंदक खणून बळकटीनें राहिलेल्या शूर सैन्यावर छाप बसली नाहीं. त्या युद्धांत हिंदूंच्या सैन्यांतील पुष्कळ लोक पडले. शेवटीं ज्या हत्तीवर लाहोरचा राजा बसला होता तो हत्ती तोफेच्या अवाजास भिऊन पळाला आणि त्यानें रणभूमिकेच्या बाहेर राजास नेलें. तेव्हां आपल्या धन्यानें आपणांस सोडिलें असें त्याच्या सैनिकांस वाटून त्यांच्या पोटांत मोठें भय उत्पन्न झालें.

हिंदूंच्या सैन्यास भय.

आणि त्यांच्या मोठ्या समुदायाचा इतका घोंटाळा झाला कीं तो कोणाच्यानें आंवरेना. शेवटीं ते पळून गेले. असल्या क्षुल्लक कारणावर चहूंकडे एकदम हूल झाली. ह्यावरून आपण असें अनुमान करावें कीं ह्या प्रसंगीं महमुदानें ज्यांशीं युद्ध केलें ते धैर्याचे, लढाऊ आणि निभावलेले असे शिपाई नव्हते, तर जरकुसीज बादशाहानें ग्रीस देशांत जें सैन्य नेलें होतें त्याप्रमाणेंच अगदीं भितरे, नामर्द आणि अव्यवस्थित होते. शत्रूंनीं

भयंकर कत्तल.

पाठलाग करून त्यांपैकीं २०००० मारले आणि खजिन्यानें लादलेले त्यांचे हजारों हत्ती धरून नेले. त्याविजयी पुरुषानें शत्रूंच्या सैन्याचा प्रतिबंध आपणास आतां नाहीं असें

पाहून भीमगड किल्ल्यांवर नीट चाल केली. तो किल्ला बहुत करून अजिंक असे समजून भोंवतालच्या देवळांतील पुजाऱ्यांनीं देवांची सर्व संपत्ति त्या किल्ल्यांत एके ठिकाणीं आणून ठेवली होती. त्यावेळेस हिंदुराजे आपणास जय मिळेलच अशा खात्रीनें पुढें चालून गेले होते व आपल्या सेनेस कुमक व्हावी म्हणून त्यांनीं गडकरी लोक बरोबर नेले होते. तेव्हां देवळें व देवळांतील संपत्ति राखण्यास ब्राह्मण मात्र राहिले होते. ते संरक्षक ब्राह्मण लागलेच किल्ल्याचे दरवाजे उघडून त्या विजयी राजास शरण गेले. फेरिस्तानामक इतिहास कर्ता असें लिहितो कीं सोनें रुपें आणि रत्नें त्या भीमकिल्ल्यांत जितकीं होतीं तितकीं पृथ्वीवर कोणत्याही राजाजवळ नसतील. तें सर्व द्रव्य महमुदाच्या हातीं लागलें. तथापि मेजर मैस ह्याचे लेख व त्या इतिहास कर्त्याचे देखील लेख करनेल ब्रिकसाहेबानें जपून विचार पूर्वक पाहिले त्यांवरून तो असा सिद्धांत करितो कीं तें सर्व द्रव्य तीसलाख रोख रुपये व कदाचित् तितक्यापेक्षां कांहीं जाजती रुपयांचे हिरे व इतर जवाहीर होतें. महमुदानें ही सर्व संपत्ति गिजनींतील डोंगरावर राहणाऱ्या लोकांस कित्तीएक दिवस पर्यंत दाखविली. तेव्हां ते लोक ती संपत्ति टक लावून पाहत व आश्चर्य करीत. तो तमाशा संपतेवेळेस महमुदानें गरिबांस व काजी लोकांस पुष्कळ देणग्या दिल्या.

(प्रकरण ६. इ० स० १०..)

(भीमगड येथील खजीना.)

प्रकरण. ६
इ० स०
१००९

हिंदुराजांनीं लढाईची त्वरा केली म्हणून कांहीं फळ न होतां त्यांची अशक्तता गुप्त होती ती उघाडीस आली. त्यामुळेंनाश फार झाला व त्यांच्या राज्यांतील मोठ मोठ्या खजिन्यांचीही मुसलमानांस माहिती झाली. ह्या गोष्टी त्यास कळतांच त्यानें आपला फायदा करून घेण्यास विलंब केला नाहीं. त्याला स्थानेश्वराची बातमी लागली. तें देवस्थान विलक्षण पवित्र असून तेथें संपत्ति फार होती. महाभारतामध्यें जी मोठी लढाई वर्णिली आहे ती ज्या जाग्यावर झाली त्या जाग्याजवळ हें क्षेत्र आहे. लाहोरच्या संस्थानांतून तो सैन्य घेऊन चालला तेव्हां आनंद पाळानें त्यास विनंती केली कीं अनेक देवालयांतील संपत्ति भीमगड येथें ठेविली होती ती आपण सर्व लुटून नेली तर हिंदूंचें स्थानेश्वर हें पूज्य क्षेत्र तरी ठेवावें. परंतु महमुदानें सांगितलें कीं मूर्तिपूजेचा लेश देखील ठेवूं नये असा माझा खचीत उद्देश आहे. दिल्लीच्या राजानें तें देऊळ राखण्याकरितां साह्य पाठविण्याच्या अगोदरच तो स्थानेश्वरास जाऊन पोहोंचला आणि कांहीं अडथळा न येतां शेंकडों वर्षें पर्यंत जो खजिना तेथें सांठविला होता तो त्याचे हातीं लागला. त्यानें संपूर्ण मूर्ति फोडून त्यांचे तुकडे तुकडे करून भर रस्त्यावर टाकून दिले. त्यांत एक मोठी अवाढव्य आकाराची मूर्ति होती तेवढी मात्र ठेविली. त्या मूर्तीस

मुसलमानांची पुढील स्वारी

स्थानेश्वरचे खजीने.

मराठी ग्रंथ संग्रहालय

जगसूम* असें नांव होतें. ती मूर्त्ति त्यानें गिजनीस नेली आणि तेथें तिचीं शकलें केलीं. त्या विजयी पुरुषानें दिल्ली घेतली आणि तो चांगला मुलूख आपल्या ताब्यांत आणावा असाही बेत केला. पण पुढें विचारकरून पाहतां त्यास वाटलें कीं जेथें लोक शूर आहेत व ज्याचा बंदोबस्त चांगला असा लाहोरचा मुलूख मध्यें आहे तोंपर्यंत दिल्ली आणि गिजनी ह्यांच्यामध्यें नीट संबंध राहणें अशक्य आहे. तेव्हां अर्थातच आनंदपाळास जिकावें ही गोष्ट प्रथमतः करणें आवश्यक होतें. पण तो राजा इतक्या शहाणपणानें वागत होता व महमुदास राग येण्याचा प्रसंगच येऊं न देण्याविषयीं इतका जपत होता कीं महमुदास त्याशीं लढाई करण्याविषयीं कांहीं निमित्तच सांपडेना. व लढाई करावी अशी इच्छा होण्यासही कांहीं कारण घडेना. म्हणून हिंदुस्थान जिंकून तें हस्तगत करण्याविषयीं त्यानें यत्न केला नाहीं. तो केव्हां केव्हां काकेसस पर्वतांवर बर्फांतील आपल्या राहण्याच्या घरांतून गरुडाप्रमाणें झडप घालून आपलें भक्ष्य घेई आणि तो पुनः आपल्या पहाडी मुलखांत जाई.

प्रकरण.६ इ० स० १०१७

महमुदानें काश्मीरचा सुंदर देश जिंकण्यांत उन्हाळा घालविला. मग तो देश हातीं आल्यावर हिंदुस्थानाच्या आंतील प्रांतीं जाण्यास त्याला मार्ग सांपडला. व लाहोरच्या राजास विचारिलें असतां तो भिडेनें जा म्हणें,

काश्मीर देश जिंकला.

---

* हें नांव कदाचित् जगत्स्वामी असेल.

प्रकरण. ६ मनापासून जा म्हणत नसे. तें विचार-
स० इ० ण्याचीही त्यास गरज राहिली नाहीं.
१०१७ संन १०१७ रांत त्यानें तार्तार देशांतील लोक आपल्या सैन्यांत भरले आणि एकलक्ष घोडेस्वार व तीस हजार पायदळ घेऊन महानद्यांच्या उगमानेंच कनोजावर स्वारी केली. तें शहर त्यावेळेस हिंदुस्थानांतील सर्व राजधान्यांमध्यें फारच शोभिवंत होतें. इकडील ग्रंथकर्त्यांनीं मोठमोठे गौरवाचे शब्द घालून त्याच्या शोभेचें व महत्वाचें वर्णन केलें आहे. तेथील इमारती व गोपुरें गगनचुंबी होतीं. व तेथें तांबोळ्याचीं दुकानें तीस हजार होतीं व वाजंत्री लोक ६००० होते. ह्याप्रमाणें त्या संस्थानांतील लोक ऐष आरामांत निमग्न झाले होते. म्हणून अफगानिस्थानांतून जे कसाले काढणारे लोक आले त्यांशीं तोंड देऊन युद्ध करण्यास त्यांची चांगली तयारी नव्हती. तेथील राजानें कांहींच अडथळा केला नाहीं. त्यानें पुढें जाऊन मी आपलाच आहें असें महमुदास सांगितलें. तेव्हां अर्थातच कनोज येथें तो सौम्यपणानें वागला. व तीन दिवसमात्र तेथें होता. दुसरीं कित्तीएक ठिकाणें घेतल्यानंतर त्याला एका शहराविषयीं अशी बातमी लागली कीं, तेथें पाहिजे तितकें द्रव्य लुटावयास सांपडून धर्मकार्यही होईल. तें शहर मथुरा होय तें कृष्णाचें स्थान असून तेथें ह्या अतिशयित संपन्न देशांतील देखील देवळांस लाजवणारीं अशीं देवालयें आहेत. तो मुसलमान राजा लोकांपासून प्रतिबंध न पावतां तेथें शिरला, तेव्हां पूर्वीं कधीं पाहिलीं नव्हतीं अशीं देवालयें तेथें त्याच्या दृष्टीस पडलीं. व तीं शुद्ध

सोन्याच्या मोठमोठ्या मूर्तींनीं भरलीं होतीं. त्या मूर्त्तींचे नेत्र हि-याचे व माणकांचे होते. एके मूर्तींत तर विलक्षण मोठा नीळ बसविला होता. त्याविजयी पुरुषानें मूर्त्तिपूजकांच्या पूज्य मूर्त्तींचें सोनें वगैरे पदार्थ सर्व निरनिराळे केले. सोनें व रत्नें हीं निरनिराळीं काढल्यावर त्यांचे उंट पुष्कळ भरून स्वदेशास पाठविले. त्यानें एकदा देवळेंही पाडण्याचा बेत केला होता असें म्हणतात. परंतु त्या मूर्त्तींच्या सौंदर्यानें दिपून तो परावृत्त झाला. पुढें तें काम धर्माभिमानी औरंगजेब ह्यानें केलें. दुसरीं कित्येक शहरें घेतलीं तेव्हां लढाई मोठी निकराची झाली. व तेथें इतर ठिकाणच्या पेक्षां कमी लूट मिळाली. नंतर तो लाहोरच्या वाटेनें गिजनीस परत गेला. तेव्हां जी लूट आणली होती ती सर्वांस दाखविली. ती स्थानेश्वरच्या लुटीपेक्षां देखील फारच मोठी होती. तींत पांच लाख नाणें होतें व रत्नें आणि मोत्यें ह्यांची तर गणतीच नव्हती. ह्याशिवाय त्रेपन्न हजार माणसें युद्धांत जिंकलेलीं आणलीं होतीं. त्याच्या भरण्यामुळें इतकी किंमत उतरली कीं एक्या मनुष्याचे विकरीमध्यें अडीच रुपये येण्यास मोठी जिकीर पडे. राजा बरोबरचे शिपाई लोक व गृहस्थ लोक होते त्यांनीं जी संपत्ति आणली ती राजाच्या इतकी होती.

प्रकरण ६ इ० स० १०१७

कृष्णाचीं देवालयें लुटलीं.

मोठाले खजिनें.

हाकाळपर्यंत गिजनी शहर, जरी तेथें पुष्कळ संपत्ति नेली होती, तरी देशांतर करणाऱ्या मेंढक्यांचें तळ देण्याचें स्थान होतें त्यापेक्षां विशेष शोभा देत

प्रकरण. ६
इ० स०
१०१७

नव्हतें. परंतु महमूद कनोज व मथुरा एथील शोभा पाहून भुलून गेल्यामुळें त्यानें निश्चय केला कीं, आतां इमारती बांधून जिचें सर्व लोक आश्चर्य करीत राहतील अशी आपली राजधानी सुशोभित करावी. त्यानें एक मशीद संगमरवरी दगडांची बांधली. तीवर रत्नें वगैरे उत्तम प्रकारच्या वस्तू लाविल्या होत्या, व नवीन अलंकार नेहमी जडवीत असे. शेवटीं ती राजधानी एशियाखंडभर स्वर्ग कन्या ह्या नांवानें विख्यात झाली. त्याचे बडे लोक आपल्या राजाची ती आवड पाहून आपणही पुष्कळ पैसा खर्च करून इमारती बांधण्याचा चढ करूं लागले. शेवटीं गिजनीशहरास इतकी शोभा आली कीं तशी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या शहरासही नव्हती.

गिजनी मुसलमान लोकांची राजधानी शोभूं लागली.

इतक्यांत महमुद्दास असें वर्तमान कळलें कीं कनोजच्या राजानें आपणास वश होऊन साह्य केलें ह्यामुळें तो आपल्या प्राणास मुकला. ह्यांत आपला मानभंग झाला असें त्यास वाटलें. कनोजचा राजानें हिंदूंचा पक्ष सोडला म्हणून कालिंगर येथील नंदराजास राग येऊन त्यानें शेजारच्या राजांच्या साह्यानें त्याशीं घोर युद्ध आरंभिलें. त्यांत कनोजच्या राजाचा पराजय होऊन तो प्राणास मुकला, व त्याची राजधानी त्यांच्या हातीं लागली. पुढें गिजनीचा राजा महमूद तें वर्तमान ऐकून इतक्या दूर अंतरावर असतां जितकी त्वरा करवली तितकी करून आला.

महमुद्दानें आपल्या साह्यकरणाऱ्याचा पक्ष धरला.

त्यानें यमुनेंतून वाट काढली आणि पुढें पाहतो तों विजयी नंदराजा मोठा खंदक खणून बंदोबस्तानें जसें कांहीं आपल्या हल्ल्याची वाटच पाहत आहे असें त्यास दिसलें; परंतु बरोबर विचार केल्यावर त्या हिंदू राजानें काढतें घेतलें. मग तो देश महमुदास उद्ध्वस्त करायास सांपडला. असा कीं कनोजचें संस्थान व तें शहर हीं पहिल्याप्रमाणें शोभेस पुढें कधींही आलीं नाहींत. प्रकरण ६ स० इ० १०१७

जरी लाहोर प्रांत गिजनीच्या राज्याच्या अगदीं लगत होता तरी महमुदाच्या कारकिर्दीत तीस वर्षेंपर्यंत तो स्वतंत्रच राहिला होता. पुढें तो देश जिंकला असतां हिंदुस्थानांत जाण्यास मार्ग सांपडतो ह्मणून आनंदपाल मेल्यानंतर तो घेण्याकरितां झटून प्रयत्न करावयाचा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें तो मोठें सैन्य जमवून त्या राजधानीवर चालून आला. तेथील अल्पवयी राजास त्या मोठ्या सैन्याशीं लढण्याचें सामर्थ्य नव्हतें म्हणून आपलें शहर व शेजारचा मुलूख सोडून तो अजमीर येथें पळून गेला. ह्याप्रमाणें लाहोरचें राज्य गिजनीच्या राजाच्या हातीं लागलें. त्यानें लाहोर घेतलें

कितीएक लहान लहान स्वाऱ्या हिंदुस्थानांत केल्यानंतर त्या विजयी राजानें शेवटली व सर्वांत मोठी स्वारी १०२४ सांत केली. तेव्हां त्याचा रोंख कांहींसा निराळ्याच दिशेकडे होता. हिंदुमहासागराच्या कांठीं गुजराथ प्रांतांत सोमनाथाचें देवालय आहे तें जीं जीं देवस्थानें आजपर्यंत लुटलीं त्या सर्वांत पवित्र व उत्तम महमुदाची शेवटली स्वारी.

प्रकरण. ६
इ० स०
१०२४

संपत्तिमान होतें. त्या देवाकडे दोन हजार गांवांची नेमणूक होती ह्याखेरीज भोंवतालच्या सर्व प्रांतांतून देवास नजराणे येत असत. मेलेल्या मनुष्यांचा न्याय करणारा असें त्या देवास मानीत. व शुद्ध सुवर्णाच्या त्याच्या मूर्तीस नित्य प्रातःकाळीं ५०० कोसांवरून गंगोदक आणून त्यास स्नान घालीत. त्याच्या सेवेस दोन हजार ब्राह्मण होते व पांचशें कल्ळवांतिणी होत्या व तीनशें वाद्यें वाजविणारे व तितकेच दिवट्या धरणारे नापिक लोक होते. सोमनाथाच्या पूजकांस असें वाटलें कीं, महमुदाच्यानें आपणांस काय करवणार आहे ? आपणांस कांहीं बिलकूल उपद्रव होणार नाहीं. पण असें त्यांनीं मानल्यामुळें त्यास फारच

मुसलमान लोकांचें धर्मवेड

आवेश आला. दिल्ली व कनोज येथें पातक फार झालें म्हणून तीं शहरें बुडालीं. परंतु आपण तर फार पवित्र आहों. असें समजून त्या अधार्मिक मुसलमानास तुझ्यानें जें करवेल तें कर असें सांगावेंसें त्यांस वाटलें. मग त्यांची खात्री करावी ह्या इच्छेनें आपली सर्व सेना जमाकरून त्यानें मुलतानांत नेली. मग पश्चिमेकडच्या मोठ्या घोर अरण्यांतून धान्य वगैरे पार नेण्याकरितां त्यानें वीस हजार उंट कामास लाविले. तो अजमीर शहराजवळ गेला. तेव्हां तेथील लोक तें शहर सोडून निघून गेले. तेथील किल्ला इतका बळकट होता कीं त्यास त्यावर हल्ला करवेना. गुजराथेंतील राजधानी नहरवाला नामें शहर होतें त्याची ही तशीच दशा झाली. दुसरें एका अरण्यांतून गेल्यानंतर सोमनाथाचें स्थान गिजनीच्या

राजाच्या दृष्टीस पडूं लागलें. तें स्थान बहुतकरून चोहों बाजूंस समुद्रानें वेष्टित होतें व एके ठिकाणीं समुद्र नव्हता त्या ठिकाणीं बळकट भिंती असून तेथें हजारों लोक रक्षणास उभे होते. अशा प्रकारचा तो किल्ला होता. त्यांनीं आपल्या वकिलाकडून असें सांगून पाठविलें कीं मुसलमानांनीं जे जे देव आपल्या कुऱ्हाडीनें फोडले त्यांबद्दल त्यांचा सूड उगवावा म्हणून आमच्या प्रभूनें तुम्हांस इकडे आणिलें आहे. तेव्हां मुसलमान लोकांनीं येण्याविषयीं जी त्वरा केली ती पाहून हिंदू तर चकित झाले व देवा पुढें साष्टांग नमस्कार घालून रडूं लागले. मग मुसलमानांनीं किल्ल्यास शिड्या लाविल्या हें पाहून ते जिवावर उदार होऊन मोठ्या क्रोधानें किल्ल्याच्या रक्षणार्थ पुढें सरसावले. त्यांचें तें भयंकर तुमुल युद्ध एक दिवसभर चाललें होतें. शेवटीं मुसलमान लोक थकले आणि त्यादिवशीं त्यांस परत जावें लागलें. दुसरे दिवशीं सकाळीं पुनः हल्ला चालू झाला. पण त्याचाही परिणाम पहिल्या सारखाच झाला.

प्रकरण. ६
इ.स० १०२४
हिंदुची बढाई

तिसरे दिवशीं सोमनाथाच्या साह्यास मोठें सैन्य चालून येत आहे असें मुसलमान लोकांनीं पाहिलें. तत्क्षणींच महमूद आपलें सैन्य घेऊन युद्धास गेला. परंतु हिंदुस्थानाच्या ह्या भागांत लोक शूर कसाले काढणारे व लढाऊ असेच होत आले म्हणून हें युद्ध मोठें घोर झालें. तरी जयपराजयाचा कांहींच निश्चय होईना. इतक्यांत भाईराम देव, व दाबिसालिम ह्यानांवाचे दोन मुख्य संस्थानी गुजराथेंत होते ते आपलें

वेढा घातलेल्या लोकांस साहाय्य.

प्रकरण. ६ इ० स० १०२४

बलाढ्य सैन्य घेऊन कुमकेस आले. त्यामुळें हिंदूच्या मंडळीस मोठा जोर आला. तेव्हां तें युद्ध खरोखरी भयंकर झालें व कोणाचा जय होतो ह्याचा अगदींच निश्चय होईना. व हिंदुस्थानांत आपला पराजय होतो असा धोका महमुदास प्रथम ज्यावेळेस वाटला. त्यावेळेस आतां आपल्या धर्मास स्मरून काय करणें तें करा, असें त्यानें आपल्या सैनिकांस सांगितलें. आणि नमस्कार घालून ह्याधर्माच्या लढाईत परमेश्वरा मला साह्य कर अशी देवाची प्रार्थना केली; आणि आपल्या सरदारांस मोठ्या उत्कंठेनें सांगितलें कीं पुढें चला, विजयी व्हा, किंवा धर्मासाठीं प्राण अर्पिले असें तरी नांव मिळवा. शेवटीं मुसलमानांचा जय झाला व त्या किल्लेकरी लोकांस जें सैन्य आपणास ह्या संकटांतून सोडवील असा पक्का भरंवसा होता, त्याच सैन्यानें पळ काढला. हें त्यांनीं पाहिलें. तेव्हां त्यांस फार धाक पडून त्यांनीं ती जागा सोडून दिली. मग तो विजयी राजा त्या किल्ल्यांत शिरला तेव्हां त्यास देवळाकडे नेलें. तें देऊळ मोठें विस्तीर्ण व त्याची बांधणी प्राचीन चालीची होती. त्यांत एक मोठा शोभिवंत मंडप होता त्याला छपन्न खांब होते. त्या भोंवतीं सुवर्णाच्या मूर्ति ठेविल्या होत्या. सोमनाथाच्या मूर्तीच्या मोठेपणाविषयीं अनेक प्रकारचीं बोलणीं आहेत; त्याची मूर्ति सर्वांत फार उंच होती. महमुदानें ती मूर्ति पाहतांच क्रोधावेशानें लाल होऊन तिचें नाक छेदलें. आणि तिचे तुकडे तुकडे करण्याविषयीं हुकूम केला. पुजारी

महमुदाचा जय झाला.

मूर्तीचा नाश.

वगैरे ब्राम्हणांनीं पाहिलें कीं आपलें पूज्य देवस्थान भ्रष्ट केलें. तेव्हां ते पायांपडून म्हणूं लागले कीं जें अवशेष राहिलें आहे तें राखाल तर आम्ही तुम्हांस लाखोंरुपये देतों. तेव्हां महमुदाच्या उमरावांनीं त्यास बुद्धिवाद सांगितली कीं खंडणी स्वीकारणें ही शहाणपणाची गोष्ट आहे. परंतु राजास राग येऊन त्यानें मूर्ति विकत्या होण्याच्या गोष्टीचा तिरस्कार करून मूर्ति फोडण्याचें काम पुढें चालविलें. तेव्हां फोडीत फोडीत आंतल्या भागापर्यंत गेले तों आंत हिरे, माणकें, आणि मोत्यें ह्यांचा खजीना दृष्टीस पडला. तो केवढा होता ह्याविषयीं कल्पना करणें बहुत करून कठीण. त्यांनीं मूर्ति सोडवावी म्हणून जी विलक्षण रकम देऊं केली होती तिच्यापेक्षां पुष्कळपट द्रव्य मूर्तीच्या पोटांत सांपडलें. तें द्रव्य अमूकच होतें हें सांगणें कठीण आहे. तरी महमुदानें ह्यापूर्वीं ज्या लुटी मिळविल्या त्यांपैकीं कोणतीही लूट येवढी नव्हती. असें सर्व म्हणतात.

प्रकरण ६ इ० स० १०२४

मोठाखजीना.

गुजराथ देश पाहून महमुदास इतका संतोष झाला कीं आपल्या राज्याची राजधानी तेथें करावी, किंवा तो देश निदान आपल्या ताब्यांत राखावा असा तो विचार करूं लागला. परंतु गिजनीपासून तो देश फार दूर व जाण्यायेण्याच्या वगैरे कामास फार कठीण असें मनांत आणून त्यानें तो विचार सोडून दिला. तरी त्या उत्तम देशावर आपली सत्ता राखावी म्हणून त्यानें हलक्या कुळांतील एक ब्राम्हण

गुजराथ पाहून आनंद व आश्चर्य.

प्रकरण. ६ इ०स० १०३०

तेथचा राजा केला. पण तो त्या देशांतून निघून गेल्यावर लवकरच तेथील लोक आपल्या प्राचीन राजांच्या वंशजांची पुनः सत्ता मानूं लागले. ह्या गोष्टीच्या पोटांतलीं कित्येक अद्भुत व कांहींशीं विरुद्ध कलमें आहेत तीं आम्ही येथें लिहीत नाहीं. कारण, महमुदानें गुजराथेंत जो राजा स्थापिला होता त्यास काढून टाकण्याची कांहीं सबब महमुदास, सांगण्याकरितां बहुधा रचलीं होतीं.

जाट लोकांवर स्वारी.

गिजनीस परत जातेवेळेस वाटेनें मोठ्या अरण्यांतून जातांना महमुदास फार क्लेश पडले. आणि जाट ह्मणून एका जातीच्या मुलतानांतल्या लोकांनींही त्यास मनस्वी त्रास दिला. त्या लोकांनीं आपल्या लढाऊपणाच्या जोरावर सिंधुनदांतून सफरी वगैरे करणें आपल्या हातीं ठेविलें होतें. ह्यामुळें महमुदास क्रोध येऊन त्यानें दुसरे वर्षी त्या लोकांवर स्वारी करण्याचा बेत केला आणि लोखंडाच्या खिळ्यांनीं मजबूत अशीं पुष्कळ लाहान लाहान जहाजें तयार करवून त्यांशीं लढाई केली. ती लढाई मोठी निकराची झाली. नंतर महमुदानें त्यांचा अगदीं मोड करून त्यांपैकीं बहुतेकांस ठार मारलें व बाकीच्यास कैदी केलें.

महमुदाचा मृत्यु.

पुढें खुरासान प्रांतांत त्यानें स्वारी केली तेथून १०३०सांत परत आल्यावर दुखणें लागून तो आपल्या वयाच्या त्रेसष्टावे वर्षी मरण पावला.

एशियाखंडाच्या इतिहासांत ज्या पुरुषांचें वर्णन केलें आहे त्यांमध्यें महमुदाच्या गुणांविषयीं जसा

संशय आहे तसा दुसऱ्या थोड्यांच्याच गुणांविषयीं आहे. कित्येकांनीं त्याची अशी स्तुति केली आहे कीं उत्तम राज्याच्या ठिकाणीं जितके गुण असावे तितके त्याच्या ठिकाणीं होते व दुसरे कित्येक त्यास असा दोष लावितात कीं तो मोठा लोभी व अन्यायी, व अपहार करणारा असा दुष्ट होता. त्याच्या ठिकाणीं हे विरुद्ध गुण जमले होते हे मोठेंच चमत्कारिक दिसतें. त्यानें जीं अत्युत्तम कृत्यें केलीं त्यांमध्यें देखील त्याचा छांदिष्टपणा दिसून येतो. राज्यसंबंधीं पुष्कळ कामें त्यानें जपून केलीं. व पर्वताच्या आश्रयानें मोठ्या दुर्गम ठिकाणीं राहणारे लुटारू लोक स्वाऱ्या करून व्यापारी लोकांस व शेतकरी लोकांस त्रास देत, सबब त्यानें मोठी मेहनत करून त्यांपासून त्यांचें रक्षण केलें. पाहिजे त्याची दाद त्यापाशीं लागत होती. एकदा इराणच्या एका दूरच्या प्रांतांतून एक स्त्री त्याच्या दरबारांत आली आणि तिनें फिर्याद केली कीं दरवडेखोर लोकांनीं माझा मुलगा मारला, आणि माझें सर्वस्व नेलें. तेव्हां राजानें उत्तर केलें कीं तो देश आमच्या ताब्यांत आहे खरा पण तो फार दूर पडल्यामुळें तेथें जी कांहीं अव्यवस्था होते ती बंद करणें अशक्य आहे. तें ऐकून ती स्त्री रागानें ह्मणाली कीं, महाराज ज्याचें रक्षण तुमच्यानें करवत नाहीं वज्यांचें रक्षण मीं केलें असतां तुम्हांस ईश्वरापाशीं जाब देतां येणार नाहीं, अशीं राज्यें घेतां तरी कशाला? त्या स्त्रीच्यानें त्याशीं असें कठीण भाषण करवलें हें त्यास लहान भूषण आहे असें नाहीं. व तिच्या त्या भाषणा-

प्रकरण. ६
इ.स. १०३०
त्याचे लक्षांत धरण्या जोगे गुण.

प्रकरण. ६ इ० स० १०२

वरून त्यानें आपल्या राज्यांतील दूरदूरच्या देखील प्रांतांत बंदोबस्त केला. हें तर त्यास मोठेंच भूषण आहे. ह्याहीपेक्षां महत्वाचें असें एक त्याचें न्याय करण्याचें कृत्य लिहिलें आहे. तें असें कीं, गिजनींतील एका मनुष्यानें त्याच्या कानावर घातले कीं आपल्या दरबारांतला एक सरदार माझ्या बायकोशीं लुब्ध होऊन रात्रीं माझ्या घरीं आला आणि त्यानें माझ्याच घरांतून मला ढकलून देऊन बलात्कारानें माझें काम आपणच केलें महमुदास हें ऐकून अत्यंत क्रोध आला आणि त्यानें त्या मनुष्यास सांगितलें कीं, असें जुलमाचें कृत्य पुनः त्यानें केलें तर लागलेंच आह्मांस कळवावं. त्या मनुष्यानें तीन दिवस गेल्यावर ती बातमी येऊन कळविली. तेव्हां तो राजा शिपायांचा पाहरा बराबर घेऊन त्या घराकडे त्वरेनें गेला. मग दिवे मालविण्याचा हुकूम करून, हातांत शस्त्र घेऊन त्यानें आंधारांत जाऊन त्या अपराध्यास धरिलें आणि एका घावानें त्याचा शिरच्छेद केला. मग दिवा आणवून तें प्रेत पाहिल्यानंतर त्यानें गुडघे टेकून देवाची प्रार्थना केली. ह्या सर्व कृत्याचा अर्थ काय? असें त्यास कोणी विचारिलें. तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, नजाणो कदाचित् अपराधी मनुष्य माझा आवडता असेल, आणि त्यास पाहून माझा निश्चय ढळेल, म्हणून मी दिवे मालवावयास सांगितलें, आणि ती माझी भीति दूर झाली म्हणून मी ईश्वराचा आभार मानून त्याची प्रार्थना केली.

न्यायाविषयीं प्रीति.

ह्या प्रमाणें महमुदानें गिजनीच्या लोकांत अन्याय

नाहींसा केला, परंतु त्याच्या हातून जीं अन्यायाचीं व जुलुमाचीं कृत्यें पुष्कळ वेळ घडत असत तीं त्याच्या कपाळचीं चुकलीं नव्हतीं. निशापूरच्या एका पैकेकरी मनुष्याविषयीं असें सांगितलें आहे कीं, महमुदानें त्यावर ढोंगीपणाचा व अधार्मिकपणाचा आरोप घेतला. तेव्हां तो म्हणाला, महाराज, मी आपला धर्म सोडला नाहीं व मी मूर्तिपूजकही नाहीं. माझ्यापाशीं संपत्ति आहे ती पाहिजे तर घ्या. पण संपत्ति व नांवलौकिक ह्या दोन्ही गोष्टींनीं मला अन्यायानें नाडूं नका. मग त्या लुटारू राजानें निर्लज्जपणानें ती गोष्ट मान्य केली आणि त्या मनुष्याची सर्व जिनगी घेतली आणि त्याच्या धार्मिकपणाविषयीं त्यास मानपत्र दिलें.

प्रकरण ६ इ० स० १०३०

त्याचा जुलूम.

महमुद आपणास धर्माची उत्कंठा आहे असें बोलून दाखवीत होता इतकेंच नाहीं, तर त्याच्या सर्व कृत्यांस ती कोणत्या तरी रीतीनें कारण असे. तथापि पूर्वीं आम्ही सांगितलेंच आहे कीं त्या अभिमानाच्या योगानें इहलोकीं त्यास पुष्कळ लाभ झाला व तो इतका झाला कीं त्याच्या ठिकाणीं वास्तविकच इतकी धर्मबुद्धि होती किंवा कसें ह्याविषयीं कांहीं शंका येते. तथापि मनुष्याच्या ठिकाणीं स्वहितवासना असूनही धर्मश्रद्धा असते ह्याकरितां स्वार्थबुद्धि असली म्हणजे धार्मिकपणा खोटा असें होत नाहीं. मुसलमानांच्या धर्मांत असें एक मुख्य मत आहे कीं त्या धर्माखेरीज मुक्तीचा मार्ग कोठेंही नाहीं. म्हणून शस्त्रसाह्यानें त्या धर्माचा

धर्माविषयीं उत्कंठा.

प्रकरण. ६ इ० स० १०३० प्रसार करावा. आतां ह्या राजाच्या लोभीपणास व महत्वाकांक्षेस हें मत फारच अनुकूळ पडल्यामुळें त्यानें ह्याविषयीं इतकी उत्कंठा बाळगली होती ह्यांत मोठें नवल नाहीं. तरी त्याच्या मरणाच्या अगोदर एक गोष्ट झाली तीवरून लोकांनीं आपणास मोठें म्हणावें अशी इच्छा त्यावेळेस देखील किती होती हें दिसून येतें. आपल्या ऐश्वर्याचा व आपला लवकरच वियोग होईल हें जाणून आपल्या नेत्रांची पूर्ण तृप्ति करावी म्हणून शेकडों देशांतून आणलेलें जवाहीर, मोत्यें, व सुवर्णाचे अलंकार हें सर्व त्यानें मरणाच्या पूर्वी दोन दिवस आपल्या पुढें पसरविलें. त्यानें आपले हत्ती थाटानें उभे केले होते त्यांसुद्धां आपल्या सेनेची कवाईत शेवटली पाहिली. तेव्हां त्या मरणोन्मुख शूर पुरुषास फार दुःख झालें. ह्याविषयीं आपणास सहज वाईट वाटेल.

त्यानें दिलेल्या विद्येस आश्रय.

महमुदाचा उदयकाळ झाल्यापासून व संपत्ति वाढल्यापासून कविता, व विद्या, ह्यांस आश्रय देणारा असा त्याचा लौकिक असे. आणि त्याच्या कारकिर्दीत गिजनी शहर हें आशियाखंडामध्यें विद्यांचें स्थान झालें. ह्या शहरांत प्रथमतः बगदाद शहरांतून विद्या आली हें खरें आहे; बगदाद शहराची राजकीय सत्ता अगदीं गेली होती, तरी ज्या देशांत लोक अरबीभाषा बोलत होते व कुराण पढत होते त्यांमध्यें ज्ञानाविषयीं ह्याचें महत्व होतें. तथापि महमुदाच्या दरबारचें ऐश्वर्य व त्याच्या कारकिर्दीत झालेल्या मोठमोठाल्या

गोष्टी ह्यांच्या योगानें हरोम आणि अलमभान ह्यांच्या दरबारांतल्या पेक्षांही तेथें कवी लोक फार मोठे मोठे झाले. ह्याच्या पदरीं फर्दुसी नामें एक कवि होता. त्यानें शाहानामा नांमक ग्रंथांत आपल्या यजमानाच्या पराक्रमाचें वर्णन केलें आहे. हा कवि आशियेंतील कविमालेंतील दुसरा आहे. गिजनीच्या राज्यांत विद्येची वृद्धि वगैरे कशी झाली ह्याचा इतिहास लिहिण्यास साधनें फारच थोडीं आहेत तथापि हा मोठा कवि त्या दरबारच्या आश्रयास व वैभवास भुलला होता खरा, पण मोठ्या गुणिजनास जीं दुःखें चुकत नाहींत, तीं दुःखें त्यास हीं चुकलीं नाहींत व त्याचा बाहेरून डामडौल फार होता तरीं तो सुखी नव्हता अशी शंका आपल्या मनांत येण्यास प्रसिद्ध कारणें पुष्कळ आहेत. असें सांगतात कीं, आपला ग्रंथ संपविल्यावर त्याचें बक्षीस आपणांस साठ हजार दिनार* मिळावे हें योग्य आहे असें मानून त्याविषयीं पुष्कळ यत्न केला. परंतु दीनार व दिरहम ह्या शब्दांचें साम्य पाहून राजानें बुध्द्या तो दिरहम हाच शब्द समजून, तितकेच ते त्यास दिलें. ही रक्कम त्या कवीस पाहिजे होती तिच्या दशांशापेक्षांही अधिक नव्हती. ह्या बुद्धिवान पुरुषास स्वकष्टार्जित फळ न मिळावें म्हणून त्या राजानें हा क्षुद्रश्लेष काढला. त्या दरबारीं आपला असा मानभंग झाला म्हणून त्या कवीस राग येऊन तो दूरदेशीं निघून गेला. तेथून त्यानें आपल्या पूर्वीच्या यजमानाच्या उपहासा-

प्रकरण. ६
इ० स० १०३०

आशियेंतील कवि.

---

* दीनार म्हणून एक प्रकारचें नाणें होतें.

प्रकरण. ६ इ० स० १०३० चे काहीं पोंवाडे करून प्रसिद्ध केले. डीहरबेलाट साहेबानें त्या पोंवाड्यांतील एकाचें भाषांतर मासल्याकरितां केलें आहे. तें असें " गिजनी दरबार हा एक समुद्र आहे, ह्मास तळ व तीर हीं नाहींत. मी पुष्कळ दिवसपर्यंत झटलों पण त्यांतील माझ्या हातीं एकही मोतीं लागलें नाहीं. " असें सांगतात कीं मग महमुदास आपली फजिती झाली असें वाटून त्यानें त्या कवीस तुम्ही परत याल तर तुम्हांस अमुक, देऊं, तमुक, देऊं, म्हणून पुष्कळ सांगून पाहिलें परंतु त्या कवीचें मन दुखवलें होतें त्यामुळें तेथें परत जावेंसें त्यास वाटलें नाहीं.

उन्सरी कवि. गिजनी शहरांतील विद्वान लोकांत शिरोमणी उन्सरी म्हणून होता तो मोठा पंडित व तसाच कवि अशी त्याची प्रसिद्धि आहे. महमुदानें आपण घातलेल्या शाळांवर तो मुख्य नेमिला आणि त्याच्या हाताखालीं ४०० शें विद्वान लोक होते त्यांवर त्याचा इतका अधिकार होता कीं कोणताही ग्रंथ त्यानें पसंत करून सही केल्याशिवाय राजाकडे जात नसे. ह्यापुरुषाची वास्तविक योग्यता बरोबर युरोपांत समजण्यास कांहीं साधन आम्हांपाशीं आजून नाहीं; तरी त्याच्या मागून जे लोक झाले त्यांत फर्दुसीच्या कीर्तीपुढें ह्याची कीर्ति लपून गेली व हा जिवंत असतां फर्दुसीपेक्षां त्याला मोठा मानीत, ह्या गोष्टीचा विचार करून पाहतां हा राजाच्या दरबारीं आर्जव करून होता व मोठ्या पदवीस चढलेल्या विद्वान लोकांस बहुतकरून गर्व असतो व त्यापासून त्यांचा तो-

टा होतो तो ह्याचे ठिकाणीं वसत. न-व्हता, म्हणून ह्याची प्रतिष्ठा इतकी हो-तीं किंवा कसें असा संशय येतो. त्या-वर इतकी कृपा होण्याचें एक कारण असें होतें कीं राजाच्या पंक्तीस ह्यास भोजनाची परवानगी असे. इकडील ग्रंथकर्ते असें लिहितात कीं एकदा त्या राजानें मद्याच्या अमलांत आपल्या वल्लभेच्या केशांच्या कांहीं बटा कापिल्या. त्याचे दुसरे दिवशीं त्यास अत्यंत दुःख झालें तेव्हां उन्सरी कवीनें त्याचवेळेस कांहीं कवनकरून गायलें आणि राजास इतकें संतोषीं केलें कीं, त्यानें त्या कवीचें तोंड तीनवेळ रत्नांनीं भरून तीं त्यास बक्षीस दिलीं.

प्रकरण.६ इ० स० १०३०

गिजनींत जे विद्वान राहत होते त्यांमध्यें अबूरिहन नामें एक प्रसिद्ध होता. त्यास बगदादांतून अलममन ह्यानें पाठविलें होतें. तेथें त्याचा मान अविसीना ह्याच्या बरोबरीचा होता. परंतु वेदांतशास्त्र व न्यायशास्त्र ह्यांखेरीज तो मंत्रविद्या शिकला होता त्यामुळें त्याची मुख्यत्वेंकरून प्रतिष्ठा झाली होती. डीहरबला ह्यानें अबुरिहान ह्याविषयीं एक चमत्कारिक गोष्ट लिहिली आहे. ती अशी कीं, महमुदानें एके दिवशीं त्यास बोलावणें पाठविलें. त्यावेळेस तो राजा दिवाणखान्यांत बसला होता. तो आल्यावर त्यानें त्यास आज्ञा केली कीं मी दिवाणखान्यांतून कोणच्या रीतीनें निघून जाईन हें एका कागदांत लिहून तो तिसऱ्यापाशीं दे. त्याप्रमाणें त्यानें कागद लिहून ठेविल्यावर राजा दिवाणखान्यास पुष्कळ दारें होतीं त्यांतून न जातां भिंतीस भोंक पाडवू-

जादुगिरी.

प्रकरण. ६
इ० स०
१०३०

न त्यांतून निघून गेला. पण कागद वाचून पाहतां त्यांत जेथून तो बाहेर पडला होता त्या स्थळाचा बरोबर उल्लेख केला होता. हें पाहिल्यावर त्यास फारच आश्चर्य वाटलें. नंतर राजास मोठा राग येऊन त्यानें ह्या विद्वानास चेटक्या असें म्हणून त्याला खिडकींतून बाहेर टाकावें अशी क्रूरपणानें आज्ञा केली. त्या हुकुमाप्रमाणें लागलीच तजवीज झाली. पण खालीं गाद्या वगैरे ठेवण्याची तजवीज केली होती म्हणून तो विद्वान मनुष्य खालीं पडला तेव्हां त्याचें अंग दुखावलें नाहीं. नंतर अबुरिहानास राजाकडे बोलावून आणून ज्या विद्येचा तूं बाणा बाळगतोस त्या विद्येनें आज ज्या गोष्टी झाल्या त्या होणार असें तुला पूर्वीं समजलें होतें कीं नाहीं तें सांग असें त्यास विचारिलें. त्या विद्वानानें सांगितलें कीं ह्यावेळेस माझें पत्रक आणवा. मग तें पत्रक आणून पाहिलें तों तें सर्व कृत्य इत्थंभूत लिहिलें होतें. ह्या गोष्टीवरून गिजनीच्या दरबारांतील लोकांचें शहाणपण किंवा बुद्धि फार मोठी होती असें वाटत नाहीं हें आम्हांस कबूल केलें पाहिजे.

महमुदाच्या मागें थोड्याच दिवसांनीं मसाऊद गादीवर बसला. तोही त्यासारखाच शूर व अचाट कामें करणारा होता. परंतु दैव प्रतिकूळ असल्यामुळें त्यास फार यातायात पडली. आशियेमधल्या प्रांतांतून कित्येक लोकांचा भरणा इकडे आपली वस्ती करावी म्हणून आला. अशा गोष्टींनीं ह्या देशांत वारंवार फेरफार

महमुदाच्या नंतर झालेला राजा.

प्रकरण ६. इ० स० १०२१.

झाले आहेत. तुर्कस्थानांतील सलजूक नामें पुरुषाच्या वंशजांनीं खुरासान देशावर स्वाऱ्या केल्या होत्या. त्याच घराण्यांतले हे लोक होते. वर सांगितलेल्या मुख्य पुरुषाच्या वंशजांच्या अमलांत तुर्कांच्या राज्याची सत्ता इतकी वाढली होती कीं, एशियेंतील सर्व राज्यें त्यापुढें दिपून गेलीं. सोग्रल म्हणून एक राजा होता त्यानें बगदादची बादशाही बुडविली व कान्स्तंतिनोपलचें राज्य त्याच्या धाकानें कांपत असे व अल्प आरस्लन ह्या राजानें मेरू येथें आपल्या थडग्यावर असें लिहून ठेविलें होतें कीं, लोक हो ! तुम्ही माझें वैभव इंद्राप्रमाणें पाहिलें. तोच मी ह्या थडग्यांत मातीस मिळालों आहें हें पहा. ह्या दोघां महा योद्ध्यांशीं महमुदाच्या पराक्रमी वंशजांसही युद्ध करून यश आलें नाहीं. ह्या शेवटल्या राजांच्या हातून खुरासान, इराण, व बाल्क हे सुंदर देश गेले. व त्यांचें राज्य काकेसस पर्वतांच्या आंत राहिलें. तरी पूर्वेकडेस लाहोर देश त्यांच्या हातीं राहिला होता. व हिंदुस्थानांतील मुलुखांवर आपली सत्ता स्थापण्याकरितां त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले पण त्यांचा कोठें कोठें मात्र अंमल बसला व तोही फार दिवस टिकला नाहीं.

तुर्क लोकांच्या राज्याचा उद्भव.

गिजनीचें घराणें.

दोनशें वर्षेपर्यंत तुर्की लोकांच्या स्वारीनें गिजनीच्या घराण्याची सत्ता कमी झाली होती तरी त्यांची वर सांगितलेल्या मर्यादेच्या आंतल्या मुलखावर सत्ता होती. आल्प अरस्लन ह्याचा पुत्र मालकशाहा व पहिला

प्रकरण ६.
इ० स०
१०३१

इब्राहिम ह्यांचा शरीरसंबंध देखील झाला. हें घराणें बुडण्याचें कारण त्यांच्याचमध्यें झालें. गोरी हा एक उखर वाखर प्रांत काकेसस ( हिंदु कुश ) पर्वताच्या एका अति उंच फांट्यावर तिबेट व तुर्कस्थान ह्यांच्या लगत आहे. तेथील राजांच्या अमलांतले लोक डोंगरी, व कसाले काढणारे होते म्हणून गिजनी सरकारापासून ते राजे होत होत बहुतकरून स्वतंत्र झाले. आणि तार्तार आणि खुरासान ह्या देशांतलाही कांहीं मुलुख त्यांनीं घेतला. ह्यावरून बैरम म्हणून जो सन १११५ रांत गिजनीच्या गादीवर बसला होता त्याच्या मनांत इतका मत्सर उत्पन्न झाला कीं त्यानें गोरीच्या महमुदास आपल्या अमलांत आणून ठार मारिलें. ही गोष्ट त्याच्या फारच पश्चात्तापास कारण झाली. सीफ आलदीन म्हणून महमुदाचा भाऊ होता त्यानें आपली सेना लवकर जमा केली. ते लोक आपला मुख्य मारला ह्याबद्दल सूड उगवावा म्हणून उत्सुक होते. बैरामास त्यांशीं तोंड देऊन युद्ध करण्याचें सामर्थ्य नव्हतें म्हणून तो आपली राजधानी सोडून गेला. परंतु पुनः आपलें सैन्य जमा करून नंतर त्यानें लागलीच आपलें गिजनी शहर घेऊन शत्रूस युद्धांमध्यें कैदी करून त्याची निर्भत्सना केली,

राज्याचा विभाग.

मोठ्या क्रौर्यानें त्याचे हाल हाल केले, त्यास बैलावर बसवून शहरांतून त्याची धिंड काढली तेव्हां लोकांनीं त्याची विटंबना केली. नंतर बैरामानें त्यास मोठ्या यातना देऊन त्याचा शिरच्छेद केला. आणि त्याचा प्रधान जिवंत सुळीं दिला

ह्या राजा इतर गोर्हीविषयीं संभावित प्रकरण. ६
व सौम्य असतां त्यानें हें घोर कर्म इ० स०
केलें ह्यामुळें त्याच्या घराण्याचा नाश ११५२
होणार होता त्या गोष्टीचें पुष्टीकरण झालें. अल्ला-उद्दी म्हणून सैफ उद्दीनाचा भाऊ होता त्यानें आपला नाश करणारा बैराम ह्यास शिक्षा करण्यासाठीं, गोरी घराण्यांतील शूर लोकांस बोलाविलें. बैराम त्यावर चालून गेला. व त्याच्या सेनेंत लोक अधिक होते ह्यामुळें त्यांच्यानें पर्वतावर राहणारे धैर्यवान पण अडाणी अशा त्या लोकांशीं मोठी निकराची लढाई करविली. पण शेवटीं तो जेरीस येऊन कांहीं येथें, कांहीं तेथें असे जे लोक पसरले होते त्यांस घेऊन हिंदुस्थानाकडे पळून आला व पुढें तेथें तो शोकानें लवकरच मरण पावला. तो विजयी पुरुष सन ११५२ नांत गिजनीवर चालून आला आणि आशियेंतील विजयी राज्यांच्या चालीप्रमाणें ज्या दुष्टकर्मांची शिक्षा करण्याकरितां तो आला त्यापेक्षां त्यानें अधिक दुष्टकर्म केलें. तें सुंदर शहर लुटण्याची परवानगी दिली व तेथील लोकांवर शस्त्रें टाकण्यास आपल्या घोरी लोकांस आज्ञा केली. सातांदिवसांनीं तें शहर अगदीं नाहींसें झालें. तेथील राजवाडे हिंदुस्थान जिंकून नेलेल्या संपत्तीनें अतिशयें सुंदर व भूषित दिसत होते ते जमीनदोस्त झाले. ह्याप्रमाणें तो प्रदेश भयंकर व ओसाड केला असतां धर्मबुद्धीनें कांहीं कबरी मात्र ठेविल्या. पुढें थोड्याच वेळानें ती घोरी येथील राजांची राजधानी पूर्वी प्रमाणें झाली हें खरें; परंतु पुनः तें बुडालें आणि आतां तेथें

आशियाखंडांतील राजांचीं दुष्ट कर्में.

प्रकरण ६. पडक्या इमारती मात्र कांहीं राहिल्या आ-
इ० स० हेत व महमुदाची मोठी कबर राहिली आ-
११७४ हे. तींत कितीएक मुल्लाजी कुराण नेहमी
पढत असतात. आशियेंतील त्या महान् पराक्रमी रा-
ज्याची जेथें एकदां राजधानी होती ती पैकीं हा वरी-
ल भागच शिलक राहिला आहे.

गिजनीच्या घराण्यांतील पुरुषांची कमी झालेली सत्ता त्यांजकडेस कांहीं दिवस तशीच चालली होती. परंतु अल्ला उद्दीनाच्या मागून महंमदगोरी राज्यावर बसला त्यानें तें घराणें निर्मूळ केलें. ह्या पराक्रमी घरा-

महंमदाच्या घराण्यांतील शेवटचा पुरुष.

ण्यांतील खुसरू म्हणून शेवटला राजा झाला. त्याची महंमदानें लाहोरपर्यंत पाठलाग केली. परंतु त्या हतभाग्य राजानें लाहोरांत जिवावर उदार होऊन त्याशीं अशी लढाई केली कीं, त्याला दोन वेळ परत जावें लागलें. शेवटीं त्यानें मित्रभाव दाखवून, बाहेर येऊन लढाई करावी ह्याविषयीं आपल्या शत्रूचें मन वळविलें आणि मग तो गैरहुशार म्हणून बाहेर आला आणि नीट मार्गानें न येतां गरक्याच्या रस्त्यानें जाऊन लाहोरापासून दूर अंतरावर घालवून त्याच्या लहानशा सैन्यास वेढा घातला तेव्हां त्यास वश होणें भाग पडलें. प्रथमतः अल्लानें त्याविषयीं मोठी दया दाखविली आणि त्यास एका किल्ल्यांत मात्र ठेविलें होतें परंतु शेवटीं कोणें एका दैवज्ञानें भविष्य सांगितलें कीं ह्या घराण्यापासून तुझा नाश होईल, अशा निमित्तानें आपल्या बचावाकरितां इ० स० ११८६ शांत त्याचा कुलक्षय केला.

महंमद गोरी ह्यानें गिजनीचें राज्य इ० स० ११७४

रांत मिळवून ३२ वर्षेपर्यंत आपल्या भावा- प्रकरण ६.
च्या नांवानें व आपल्या नांवानें त्यांच्याच इ० स०
नांवाचे जे त्याचे पूर्वज होते त्यांच्या प्रमा- ११७४.
णेंच मोठ्याशौर्यानें व दैवशालीपणानें राज्य केलें. लाहो-
रच्या सरहद्दीवरचा मुलूख पहिल्यानें घे- महमदगोरी
ऊन हिंदुस्थानांत आपली सत्ता वाढवावी
ह्मणून त्यानें मनांत मुख्य उद्देश धरला. मग तो आपलें
सर्व सैन्य जमवून अजमीर प्रांतावर चालून आ-
ला. तो प्रांत प्रथमतः त्याच्या हातीं लागला. पण
दिल्लीचा राजा शेजारच्या कित्येक राजांशीं एकमेकास
साह्य करण्याचा संकेत ठरवून दोनलक्ष पायदळ व ती-
नहजार हत्ती घेऊन तो प्रांत सोडवण्यास आला. म-
हंमद आपल्या पहाडी लोकांच्या धैर्याचा भरंवसा धरून
हल्ला करण्याकारितां निर्भयपणानें पुढें सरसावला. प-
ण ती असंख्य सेना आपणास गराडा घालण्यासाठीं
भोंवताली येत आहे व त्यांचे हत्ती फरा धरून उभे
राहिले आहेत असें पाहून त्या अडाणी लोकांच्या पो-
टांत मोठी दहशत उत्पन्न झाली. शत्रू कडली सेना पु-
ष्कळ वाढली होती तिच्या गराड्यांत महंमद सांपडला
होता त्यास तसाच सोडून त्याचे पुष्कळ सरदार आपा-
पले लोक घेऊन पळून गेले. महंमद घोड्यावर बस-
ला होता व दिल्लीचा राजा आपल्या लढाऊ हत्तीवर
बसला होता त्या उभयतांचे दोन हात झाले. तेव्हां
गोरी राजा जिवावर उदार होऊन लढत असतां त्याच्या
बाहूस जखम लागून तो भुईवर पडला. तो पळाला.
तेव्हां त्याचे जे विश्वासू लोक जवळ होते
ते त्यास मोठ्या संकटानें तेथून घेऊन गेले. त्यांची अगदीं

प्रकरण ६ इ० स० ११७४.

दाणादाण होऊन ते पळून गेले आणि शत्रूंनीं त्यांचा चाळीस मैलपर्यंत पाठलाग केला.

दिल्लीच्या बादशाहानें ह्या भयंकर अरिष्टापासून ज्या गोष्टींचा खराबा झाला होता त्या पूर्वस्थितीवर आणण्याकरितां व नवीन स्वारीची तयारी करण्याकरितां एक वर्ष घालविलें. प्रथमतः त्यानें जे उमराव पळाले होते त्यांच्या गळ्यांत जव भरलेले तोबरे बांधून त्यांस शहराभोंवतीं फिरविलें. असा त्यांचा मानभंग करून त्यांस नीच पदवीस आणलें. परंतु जेव्हां दुसऱ्या स्वारीस गेला तेव्हां त्यास विदित झालें कीं त्या कारणानें पदरचे निवडक असे पुष्कळ योद्धे राहिले. नंतर त्यांनीं पुनः आपला लौकिक मिळवावा म्हणून त्यानें त्यांचीं त्यांस पदें दिलीं.

हिंदुस्थानावर पुनः स्वारी केली.

महमदानें आपली सर्व फौज जमवून हिंदुस्थानाकडे कूच केलें. तेथें मागले वर्षीं ज्या सैन्यानें त्याचा पराजय केला होता त्यापेक्षां मोठ्या सैन्याशीं त्यास युद्ध करण्याचा प्रसंग आला. ह्या लढाईंत आम्हीं जय मिळवूं किंवा मरून जाऊं अशी त्या सैन्यांतील लोकांनीं गंगेची शपथ वाहिली होती. हिंदुस्थानांतील राजे जय होईलच अशा पूर्ण भरंवशानें आले होते तेव्हां त्यांनीं महमदाचे कान उघडण्याकरितां स्नेह भावानें त्यास सांगून पाठविलें कीं, तुला जरी आपल्या जिवाचा कंटाळा आला असला तरी तूं जे लोक घेऊन आला आहेस ते आपल्या जिवास मुकतील ह्याची तरी तुला कांहीं दया येऊं दे. अद्यापि तुला परत जाण्याचें असल्यास जा. तुझी बुद्धि विपरीत झाल्यामुळें चालून येशील तर आ-

म्हीं देवाची शपथ वाहिली आहे त्या- प्रकरण ६
पक्षीं सेनेची फळी फोडणारे असे हत्ती, इ० स०
व युद्धांत तुडवणारे घोडे, व नरडीचा ११७४
घोट घेणारे शिपाई हे सर्व मिळून आम्ही प्रातः-
काळीं तुझ्या सेनेस मारूं. मग त्या
सेनेच्या मुख्यानें आपण भ्यालों आहों मुख्याचें चातुर्य.
असें दाखवून उत्तर पाठविलें कीं मीं आ-
पल्या भावाच्या आज्ञेवरून लढाई चालविली आहे त्या-
पक्षीं त्याच्या आज्ञेखेरीज मला परत जातां येत नाहीं,
परंतु त्याचा हुकूम येई तोंपर्यंत तह ठरविण्यास खुषी
आहें. असें गरिबीचें उत्तर ऐकून त्या हिंदू लोकांनीं
आपणास मनांत शंकान धरतां निर्भय मानून त्यादिव-
साची रात्र नाच तमाशे इत्यादि करून घालविली. म-
हंमदानें त्यावेळेची बातमी राखून ते लोक बे सावध
असतां त्यांवर अंधारांत हल्ला करून किती एक मोठा-
ल्या टोळ्यांचा पराजयकरून त्या पळवून लावल्या.
तथापि, त्यांच्या लष्कराचा घेर इतका मोठा होता कीं,
दुसरे दिवशीं सकाळीं सेना जमली तेव्हां ती महंमदा-
च्या सर्व सेनेचा चुराडा करून टाकण्याजोगी मोठी
दिसली. मग त्या मुसलमानानें, सिथिया देशच्या ल-
ढाईच्या जुन्यारीतीप्रमाणें लढाई चालविली. तो आप-
ल्या घोडे स्वारांच्या टोळ्या घेऊन हल्ला करी आणि
पुनः माघारा परते, ह्याप्रमाणें त्यानें संध्याकाळपर्यंत
चालविलें. तेव्हां, शत्रू अगदीं बेजार झाले असें पा-
हून त्यानें कवच घातलेल्या स्वारांची निवडक टोळी
घेऊन त्यांवर हल्ला केला आणि त्यांचें सर्व सैन्य दाणा-
दाण करून पिटून लावलें. त्यावेळेस दिल्लीचा राजा

प्रकरण.६ इ० स० ११७४

पडला. तेव्हां त्या विजयी पुरुषाच्या हातीं पुष्कळ लूट लागली. नंतर त्याचे राजधानींत गेला तेव्हां ती लुटूंनये म्हणून तींतील लोकांनीं खंडणी दिली ती त्यानें मान्य केली; परंतु कुतुबनामें आपला प्रतिनिधी ह्यास, तेथें आपली सत्ता राखण्याकरितां, मोठी सेना देऊन ठेविलें. नंतर लागलेंच त्या अधिकाऱ्यानें मोठें सैन्य जमाकरून दिल्लीचें पहिलें राज्य बुडविलें, आणि महंमदाचा प्रतिनिधी म्हणवून राज्य केलें. ह्याप्रमाणें मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानाच्या मध्यभागीं व मोठ्या शहरीं प्रथमच स्थापित झाली.

दिल्लीच्या राजाचा पराजय.

थोडाच काळ गेल्या नंतर महंमदानें हिंदुस्थानांत दुसरी स्वारी केली. त्यानें कुत्तुबास कुमकेस घेऊन कनोजच्या राजाचा अगदीं पराजय केल्यावर काशीवर चालून जाऊन तेथील हजारों देवळांतील मूर्ति फोडल्या आणि त्या क्षेत्रांतील संपत्ति लुटून चारहजार उंट भरले. त्यानें गिजनीच्या महमुदाप्रमाणें क्रम चालवून हिंदुस्थानांत नऊ स्वाऱ्या केल्या आणि त्याच्या खजिन्याच्या बरोबरीचा खजिना जमविला. परंतु हा त्याच्या विजयाचा डौल एका क्षणांत नाहींसा झाला. कारण तो लाहोराहून गिजनीस परत जात असतां सिंधु नदाच्या किंवा त्याच्या एके शाखेच्या तिरीं रात्रीं मुक्काम करण्याकरितां तंबू देऊन राहिला. गाइकवाड म्हणून पहाडी देशांत राहणारे कांहीं लोक होते. त्यांचे पुष्कळ नातलग महंमदा बराबर लढाई करून पडले होते.

हिंदुस्थानांस स्वारी.

म्हणून त्यांतील कांहीं लोकांनीं, कसेंही होवो, पण महंमदाचा सूड घेऊं अशी प्रतिज्ञा केली. ते दिवस उन्हाळ्याचे होते म्हणून वारा यावा ह्याकरितां महंमदाच्या तंबूच्या कनाती लावलेल्या नव्हत्या. ही संधि साधून वीस असामी चोरून, नकळत आंत शिरले आणि पहाऱ्यावरच्या शिपायांच्या उरांत कटारा खुपसून त्यांस मारलें आणि बाकीच्या लोकांचें लक्ष्य दुसऱ्या गोष्टीकडे गुंतवून राजाच्या बिचोव्यांत शिरले. तेव्हां तो राजा निजला होता आणि दोन गुलाम पंख्यानें त्यास वारा घालीत होते. त्यांनीं एकाएकींच जाऊन त्याच्या उरांत बर्च्या खुपसल्या. त्या इतक्या असामींचे हात त्यावर पडल्यामुळें त्यास बेवीस घांव लागून तो अगदीं अचेतन होऊन पडला.

प्रकरण. ६
स० इ० ११७४

महंमदास दग्यानें मारलें.

ह्याप्रमाणें ह्या विजयी पुरुषाचा काळ झाला. ह्याचें राज्य बहुतकरून गिजनीच्या महमुदाच्या राज्या एवढेंच मोठें होतें. फेरिस्ताच्या लेखाप्रमाणें म्हटलें असतां हा राजा महमुदाप्रमाणें सद्गुणशून्य नव्हता, तथापि त्याच्यापेक्षां ह्याची मागें दुष्कीर्ति फार राहिली, परंतु त्यानें जीं दयेचीं कृत्यें केलीं व शिष्ट संप्रदाय घातले त्या योगानें त्याचा कांहीं लौकिक राहिला. त्याच्याच वेळेस गोरीवंशाचा उदय झाला व बरोबरच त्याची समाप्तिही झाली. त्याच्या राज्यांत बंदोबस्त नव्हता, व असें तें राज्य संभाळण्यास समर्थ त्याच्या

प्रकरण. ६ पाठीमागें त्याच्या वंशांत कोणी राहिला
इ.स. ११७४ नव्हता. पहाडी संस्थानांमध्यें इल देक
राज्याचा वि- ज नामें प्रतिनिधि होता व कुतुबनामें
भाग. एक हिंदुस्थानांत होता ते दोघे लवकरच
स्वतंत्र झाले.

सहावें प्रकरण समाप्त.

# प्रकरण ७.

## पठाण म्हणजे अफगान लोक ह्यांचें घराणे.

पठाणी घराण्याचा मूळपुरुष कुतुब उद्दीन—अल्तमश—सुलताना रजिया—दुसरा महंमद—त्याची विरक्त वृत्ति—बालिन—विद्या आणि कला ह्यांस चांगला आश्रय—किकोबाद आणि करा—पहिला अल्ला—त्याचें शूरपणाचें व भयंकर राज्य—दक्षिणहिंदुस्थान जिंकलें—कमलादेवी व देवलदेवी ह्यांचें वर्णन—स्वामीनाहींसा झाला—कित्येक लहान राज्यें—तिसरा महंमद—त्याचें क्रूर कर्म—तिसरा फिरोज—लहान राज्यें व साधारण अव्यवस्था—तैमूर—त्याचे गुण—हिंदुस्थानावर स्वारी—दिल्ली घेतली आणि भयंकर कत्तल—तो परत आला—बादशाहाची माळिका—बेबराची स्वारी—पठाणी वंश समाप्त.

हिंदुस्थानांत ज्या पठाणी बादशाहांनीं राज्य केलें त्यांचा मूळपुरुष कुतुब उद्दीन नामें हलक्या कुळांतला होता. ह्याच्यापूर्वीं मुसलमान लोकांचे राज्य येथें नव्हतें. त्या घराण्याचा मूळ पुरुष गुलाम होता अशी

इ०स०१२०६
अफगान लोकांचें घराणें.

देखील लोक त्या घराण्याची निंदा करीत. तुर्कस्थानांतून त्यास युद्धदास करून आणिलें होतें. त्यास निशापूरच्या एका गृहस्थानें विकत घेतलें होतें. पुढें त्यानें त्याची बुद्धि चांगली पाहून त्यास विद्या व कला शिकविल्या. तो यजमान मेल्यावर त्याची मालमत्ता विकली गेली; तीबरोबर ह्यासही विकलें, तेव्हां महंमदानें ह्यास विकत घेतलें. तो बुद्धिमान व बोलण्यांत चतुर

प्रकरण. ७ इ० स० १२१० होता म्हणून लवकरच तो त्याचा मुख्य हुजऱ्या झाला. त्यावर त्याला लष्करामध्यें अमलाची जागा मिळाली. नंतर तो लवकरच सेनेचा मुख्य अमलदार झाला. बादशाहाचा त्यावर फार भरंवसा होता ह्यामुळें तो हिंदुस्थानांतून स्वदेशास परत जाऊं लागला तेव्हां इकडच्या जिंकलेल्या मुलुखावर प्रतिनिधी करून ठेवण्यास हाच लायक आहे असें त्यास वाटलें. कुतुब हा आपल्या धन्याशीं इमानानें वागला. तरी तो दूर होता म्हणून आपला यजमान जिवंत असतां त्यानें बहुतकरून यथेच्छ राज्य केलें. तो बादशाहाच्या मागें चार वर्षें होता, व महंमदाच्या मागून जो बादशाह झाला तो कुतुबास स्वतंत्र राजा असें प्रसिद्धपणानें म्हणूं लागला. तो शूर, न्यायी, आणि दयाशील होता अशी त्याची कीर्ति आहे. आणि त्याचें औदार्य इतकें विलक्षण होतें कीं हिंदुस्थानांत कोणाचें औदार्य वर्णायाचें झाल्यास तो कुतुबाप्रमाणें उदार आहे अशी म्हणण्याची रूढि पडली आहे. त्यानें शेजारच्या

त्या घराण्यांतील मूळ पुरुषाचा उदार स्वभाव.

राजांशीं लढाई केली. तींत त्यास यश आलें. परंतु रजपूत लोकांशीं त्याची एक लढाई झाली तींत त्याचा अगदीं पराभव झाला. तथापि त्याच्या कारकिर्दीच्या शेवटीं शेवटीं तो अगदीं आळशी आणि विलासी झाला. तेव्हां त्याचा प्रतिस्पर्धी एक एइलूदेकज म्हणून होता त्यानें हिंदुस्थानाच्या हद्दीवरचा कांहीं मुलूख घेतला. इतक्यांत कुतुब सन १२१० हामध्यें मरण पावला.

अलूतमश हा तार्तार देशांतला राहणारा व मोठ्या

कुलांतला होता, तरी त्याला कुतुबाप्र- प्रकरण ७
माणें विकलें होतें. त्याला कुतुबानें इ० स०
विकत घेऊन गुलाम केलें होतें. तो १२१०
आपल्या शौर्यामुळें सेनापतीच्या पदवी- अल्तमश.
स चढला. आणि पुढें बादशाहाचा जांवई
झाला. आणि पुढें राज्याचा वास्तविक वारस अरम म्हणून होता त्यास जिंकून आपण गादीवर बसला. त्याच्यापूर्वी कुतुब ह्याच्या वार्धक्यामुळें उणें पडून जीं संकटें उत्पन्न झालीं होतीं त्या सर्वांचें त्यानें निवारण केलें. त्यानें एद्दल देकज ह्यास जिंकून बंदांत ठेविलें. तो बंगाला आणि बहार ह्या संस्थानापासून प्रथमतः खंडणी घेऊं लागला आणि पुढें त्यानें तीं खालसांत करून तेथें आपले मुलगे प्रतिनिधि नेमिले. ह्याप्रमाणें त्यानें प्रत्येक दिशेस आपलें राज्य वाढविलें. हिंदूंच्या सत्तेचें मुख्य रक्षणस्थान ग्वालेरचा किल्ला असें मानीत असत. तोही किल्ला त्यानें पुष्कळ दिवस वेढा घालून घेतला. हा किल्ला, ज्याच्या बाजूस कडे तुटले आहेत अशा डोंगरावर बांधला आहे. व रक्षणाकरितां तटबंदीवगैरे मोठ मोठीं कामें केलीं आहेत. व आंत पाण्याचाही पुरावा चांगला केला आहे. म्हणून तो कोणाच्यानें घेववणार नाहीं असें मानीत होते. त्यानें माळवा देशही जिंकला व उज्जनी घेऊन विक्रमाची मूर्ति फोडली अशीही त्याची कीर्ति आहे. सर्व गोष्टींचा विचार करून पाहतां तो चांगला आणि शहाणा राजा होता. अशी त्याची ख्याति आहे.

ह्यावेळेच्या सुमारास हिंदुस्थानावर मोठा अनर्थ

प्रकरण. ७ इ० स० १२३६

गुदरणार होता, परंतु दैवयोगें इकडील सुपीक मांतांवर न गुदरतां तो दुसरे देशावर गेला. जंघिसखानानें पासिफिक् समुद्रापासून क्यास्पियन समुद्रापर्यंत आशिया खंड लुटून व हजारों राज्यें आपल्या अमलांत आणून अफगानच्या राजावर हल्ला केला. आणि त्याला सिंधु नदाच्या आलीकडे हांकून लाविलें. अल्तमश ह्यानें त्यास आश्रय दिला नाहीं, मग जंघिसखानाची सेना दक्षिणेकडील संपत्तिमान मुलूख सोडून दुसरेकडे गेली. त्याच्या स्वारांस तातरी आणि इराण एथील मैदानांतून मात्र चालण्याची संवय होती म्हणून काकेसस पर्वतांवरील उंच सखल कड्यांतून पराक्रमानें युद्ध करवणार नाहीं असें कदाचित् वाटून ते तिकडे गेले असावे.

जंघिसखानानें हिंदुस्थानावर हल्ला केला.

इसवी सनाचे १२३६ वे वर्षीं अल्तमश मरण पावला. त्याच्या मागून पुष्कळ राजे झाले त्यांपैकीं बहुतेकांनीं थोडेच दिवसपर्यंत राज्य केलें व त्याविषयीं भांडणें फार झालीं. परंतु त्या राजांच्या वेळेस राज्याचा सांगण्याजोगा कांहीं फेर फार झाला नाहीं. व जवळच्या संस्थानांशीं पूर्वीं जो संबंध होता तोच राहिला. तथापि त्या राजांमध्यें कांहीं राजे सांगण्याजोगे मसिद्ध होऊन गेले.

मुसलमान लोकांत राज्य करणारी अशी राणी रजिया बेगम नामें मात्र झाली होती असें वाटतें. ती अल्पवयी असतां, राज्यकारभार करण्यामध्यें अशी शहाणी दिसली

रजिया बेगमराणी.

कीं, तिचा बाप अल्तमश हा ग्वाले-
गीवर स्वारी करण्यास गेला तेव्हां
आपल्या कोणत्याही पुत्रास राज्य-
कारभार झेंपणार नाहीं, म्हणून त्या कामास योग्य आपली कन्या आहे असें मानून त्यानें सर्व राज्यकारभार तिच्या स्वाधीन केला. आणि फिरोज अल्तमशाच्या मागून गादीवर बसला तो योग्य नाहीं म्हणून मुख्य सरदारांनीं त्याला पदच्युत करून सर्व संमतानें तें सर्व राज्य तिच्याच स्वाधीन केलें. ती फार गुणी होती, व ती बादशाहीचीं वस्त्रें घेऊन सिंहासनावर बसली, आणि निष्पक्षपातानें बरोबर कायद्याप्रमाणें तिनें कारभार चालविला. स्त्रियांचें राज्य दुर्बल असें मानून ज्यांनीं तिचा नाश करण्याविषयीं प्रयत्न केले त्यांचें तिनें मोठ्या शौर्यानें कांहीं चालूं दिलें नाहीं. तथापि शेवटीं ती स्त्रीजातीच्या दुर्बळपणास वश झाली; आणि हबशी लोकांपैकीं एक जमाल नामें दास होता त्यावर फारच लंपट झाली. त्याला तिनें एकाएकीं अतिशय मोठ्या पदवीस चढविलें तें तेथील उमराव व बडे लोक ह्यांस साहीनासें झालें. त्यांचा असंतोष झाल्यामुळें लवकरच पुढें त्यांनीं बंड उठविलें. तें बंड प्रथमतः जरी अगदीं दबलें गेलें तरी राणीचा भाऊ बेरम झाला तिजपेक्षां राज्याचा वास्तविक हक्क होता म्हणून तो त्या बंडाचा पुढारी झाला तेव्हां त्या बंडास मोठा जोर आला. शेवटीं त्या राणीचा पराभव करून तिला बंदींत ठेविलें आणि इकडे नेहमीची चालच होती ती प्रमाणें पुढें तीस मारून टाकिलें.

प्रकरण ७ स० इ० १२३६

अल्तमशाचा धाकटा मुलगा दुसरा महंमद ह्यास

प्रकरण. ७ इ० स० १२५० नहोतां गादीवर बसला. तथापि हक्कावांचून जो राज्य बळकावतो त्यास कांहीं घोर कर्म करावें लागल्यावांचून राज्य प्राप्त होतें अशी गोष्ट फार विरळ. ज्या चाळीस तुर्क सरदारांनीं बादशाह मेल्यावर राज्य वांटून घेण्याचा ठराव केला होता त्यांतच बालिन हा एक होता. परंतु परस्परांमध्यें मत्सर उत्पन्न होऊन हा त्यांचा कट अगदीं मोडून गेला होता. पण त्या प्रधानानें आपण निर्भय व्हावें ह्मणून त्यांना शस्त्रानें किंवा विषप्रयोगानें मारण्याचा निश्चय केला. हें दुष्ट कर्म केल्यानंतर तो निर्भय झाला आणि मग त्यानें असें काम पुनः केलें असें कधीं झालें नाहीं. तो असा वागला कीं न्यायिता, सौम्यता, आणि लोकप्रीति ह्यां विषयीं त्याच्या बरोबरीचा, हिंदुस्थानांत जे पुष्कळ नामांकित राजे होऊन गेले त्यांमध्यें देखील क्वचित् सांपडेल. बालिन हा प्रथमतः गुलाम असून जे पुढें बादशाह झाले त्यांतलाच होता. मोंगल लोकांनीं ह्यास युद्धांत कैद करून बगदाद येथें नेलें आणि बसोरा येथील व्यापाऱ्याला विकलें. त्या व्यापाऱ्यास हा अल्तमश ह्याचा नातलग आहे असें कळल्यावर त्यानें त्याला दिल्लीस नेलें आणि तेथील बादशाहापासून पुष्कळ पैसा घेऊन त्याला विकलें, तो मोठा बुद्धिमान् होता म्हणून त्याला सेनेमध्यें लवकरच अधिकार प्राप्त झाला. आणि बैरमाचा उघडपणें पक्ष धरून रजिया राणीचा मोड केला त्यामध्यें हा एक मुख्य पुढारी होता. महंमदाचे मागें हा राज्यावर बसला तेव्हां

राज्यापहार करणारांचीं दुष्ट कर्मं.

दरबारचीअग दीं बदलणूक.

त्यानें महंमदानें जो पूर्वी दरबारचा डामडौ-ल अथवा शोभेचीं चिन्हें मोडून टाकलीं हो-तीं तीं सर्व पहिल्याप्रमाणें केलीं. ह्या रीतीनें त्यानें दरबारांत बाहिरील फेर फार केला. तो चौघांत येई तेव्हां आशिया खंडांत देखील फार पाहण्यांत नाहीं असा डामडौल करी. त्याविषयीं त्याला विचारिलें असतां तो असें स्पष्टपणीं कबूल करी कीं लोकांनीं मला मान द्यावा म्हणूनच मी असें करतों. कितीएक राजे जंधिसखानानें व त्याच्या मागून जे राजे झाले त्यांनीं पदच्युत करून पळवून लावले, त्यांमध्यें आशिया खंडांतील मोठाले राजे सुद्धां होते. त्यांशीं हा दयाळुपणानें व उदारपणानें वागला. व असें करण्यांत त्यानें डौलही केला असेल. ते पदच्युत झालेले क्यालिफाचे दोन मुलगे सुद्धां पंधरा राजांस राहण्यास मोठाल्या जागा व जें दुःख त्यांस दैवानें भोगणें प्राप्त झालें तें ते विसरतील अशा सर्व गोष्टींचा बंदोबस्त करून त्यानें सोयी केल्या होत्या. तो ज्या दिवशीं मोठें दरबार भरण्याचा प्रसंग येई तेवेळेस ज्यांची जशी योग्यता असे त्याप्रमाणें त्यांना सिंहासनाजवळ बसवी. त्यांनीं आपणा बरोबर पुष्कळ स्तुतिपाठक कल्पक व चतुर असे लोक आणले होते. जे पूर्वी त्या राजांच्या दरबारास भूषणच होते. त्या सर्वांस बादशाहानें उदार आश्रय दिला, तसा आजपर्यंत कोणी दिला नसेल. आशिया खंडाच्या दूरदूरच्या प्रदेशापासून विद्वान पुरुष कवि, आणि कारागीर ह्या लोकांस तो आपल्या दरबारीं बोलावीत असे. इराणचें सादीनामें कविरत्न आपल्या दरबारीं

प्रकरण ७ इ० स० १२६०

त्याचा पाहुणचार.

प्रकरण. ७ इ० स० १२८६

शिराज सोडून यावें म्हणून हरतऱ्हा करून पाहिली परंतु व्यर्थ. शेहिद आणि करा असे राजाचे दोन पुत्र होते ते त्याबरोबर हिंदुस्थानांतील दरबार सर्व जगामध्यें विद्या व सभ्यसांप्रदाय ह्यांविषयीं उत्तम करण्याकरितां चढाओढीनें यत्न करूं लागले. शेहिद हा आपल्या वाड्यांत धर्मोपदेष्टे, तत्वज्ञानी ( पंडित ) कवि ह्यांची सभा रात्रीस भरी, त्या सर्वांत खुसरू नामें कवि प्रमुख होता. धाकटा मुलगा करा हा दुसऱ्या ठिकाणीं वाद्यें वाजिवणारे, नाटकी, गोष्टी सांगणारे व असे हलके गुण ज्यांच्या आंगीं होते असे लोक जमवी. ह्या सुंदर उद्योगांत असतां देश जिकण्याची प्रतिष्ठा मिळवावी असें बालिनास वाटलें नाहीं. त्यानें आपलें राज्य वाढविण्याजोगा प्रसंग आला असतांही तसें केलें नाहीं. तरी कोणी अगळीक काढली असतां तो त्याचा पराक्रमानें पराभव करी. मेवाड येथील रजपूत लोकांनीं लुटण्याकरितां स्वाऱ्याकरून त्या देशाचा विस्तीर्ण प्रदेश बहुत करून राहण्याच्या उपयोगीं नाहींसाकरून टाकला होता, त्यालोकांची कत्तल उडवून त्यानें त्यांचा पराजय केला. यद्यपि त्या अरण्यांतील कसाले काढणाऱ्या लोकांस त्याच्यानें अगदीं जिकवलें नाहीं. तथापि ज्या रानांत ते जाऊन राहत असत तें मोठें रान त्यानें तोडून टाकलें आणि किल्ल्यांची रांग बांधून देशांत इतका बंदोबस्त केला कीं तेथें लवकरच जिकडे तिकडे चांगली लागवड झाली.

इसवी संन १२८६ त बालिन मरण पावला. त्या-

चा वडील व गुणी पुत्र शाहजादा हा पूर्वींच मरण पावला होता, व करा हा बंगाल्यांत होता. म्हणून किकूबाद नांवाच्या त्याच्या पुत्रास गादीवर बसविलें, ती गादी थोडावेळ देखील रिकामी ठेवतां येईना. प्रथम तो राजपुत्र मोठा होतकरू असा वाटला होता, कारण त्याच्या घराण्यांतल्या पुरुषांप्रमाणें विद्यादिकांची अभिरुचि त्यास चांगली होती. पण तो गादीवर बसल्यावर ते गुण सोडून तो विषयी व दुर्व्यसनी झाला, मग त्यानें राज्य कारभार निजाम नामें चाकराच्या स्वाधीन केला, तो अयोग्य होता तरी त्यावर राजाचा फार लोभ असे. तो लोकांवर जुलूम करी व त्याच्या जुलुमास ज्यांनीं अडथळा केला त्यांचीं त्यानें डोकीं मारलीं. इतक्यांत बंगालचें राज्य घेऊन करा हा तृप्त झाला होता. त्यानें आपल्या पुत्राच्या वर्तणुकीचा मजकूर ऐकला आणि खेद पावून व राज्यकारभार आपल्याच हातीं घ्यावा अशा कदाचित् बेतानें तो मोठें सैन्य जमवून बहार प्रांतावर चालून आला. बादशाहाची व त्याची सैन्यासुद्धां गांठ गोग्रानदीच्या कांठीं पडली. तेव्हां करा ह्याच्या पोटांत ममता उत्पन्न होऊन त्यानें निरोप पाठविला कीं हें प्रकरण कोणत्याही थरास जाण्याच्या पूर्वीं तुझें माझें बोलणें व्हावें अशी मला उत्कंठा आहे तर ही प्रार्थना ऐक. त्याप्रमाणें उभयतांच्या भेटीचा बेत झाला. परंतु मुलगा गर्वानें फुगून मोठ्या डामडौलानें तक्तावर बसला होता आणि बापास तर सिंहासनाजवळ येतांना तीन ठिका-

प्रकरण ७.
इ० स० १२८६.

बालिनाच्या मागलाराजा

कराची स्वारी

प्रकरण ७ इ० स० १२९०.

र्णी लवून भुईला हात लावून खुरनिशात करीत येणें प्राप्त झालें. चोपदार ओरडताहेत. "जगताचा राजा ह्मास मुजरा करीत आहे. आपला असा अपमान झाला हें पाहून त्या वृद्ध राजास रडें कोसळलें. हें पाहतांच एका एकीं मुलास गहिंवर आला आणि त्यानें सिंहासनावरून उडी टाकून बापाच्या चरणावर मस्तक ठेविलें आणि त्याची क्षमा मागितली. ते दोघेही बापलेंक एकानेकांच्या गळ्यांस मिठ्या मारून रडले. नंतर त्यांचें सख्य होऊन वीस दिवसपर्यंत त्यांचें येणें जाणें चाललें होतें. तेव्हां ज्याचा त्यानें मुलूख संभाळून स्वस्थ असावें असें ठरलें. परंतु बापानें मुलास प्रार्थना करून सांगितलें कीं तूं आपली ही वाईट चाल सोडून दे, निजामावर विश्वास ठेवूं नको, बदफैलीची संवय टाक. राज्याचा कारभार चांगला करण्याकडे लाग. किकूबाद सांगितल्याप्रमाणें करतों म्हणून गोड गोड बोलला आणि तसें करण्याचा निश्चय करून दिल्लीस चालता झाला. तेथें गेल्यावर कांहीं काळपर्यंत

कराची उत्तम वर्तणूक.

तो आपल्या निश्चयाप्रमाणें चालला. पण त्याच्या वजिरानें पुरुषास भुलविणाऱ्या अशा चहूंकडच्या रूपवती स्त्रिया जमविल्या व त्यां मधली एक तर केवळ अप्सराच होती असें सांगतात. असें करून त्या वजिरानें बादशाहास पुनः विषयलंपट केलें. नंतर बादशाहाचें शरीर मोडावलें, आणि लोक त्याचा धिक्कार करूं लागले. शेवटीं फिरोज म्हणून एक अफगाणी सरदार

किकूबाद ह्याचा स्त्री वशपणा.

होता त्यानें त्यास व त्याचा एक मुल- प्रकरण ७.
गा होता त्यासही मारून टाकिलें; आ- इ० स०
णि त्याच्या तक्तावर आपण बसला. १२९०
पूर्वीं चाल पडली होती तीप्रमाणें त्यानें घोर कर्म करून राज्य मिळविलें. परंतु त्यानें अति सौम्यपणानें अम्मल केला असा लोक त्यास दोष लावतात.

अल्ला.

अल्ला म्हणून फिरोजाचा पुतण्या होता तो इसवी सन १२९५ त आपला चुलता फिरोज ह्यास मारून राजा झाला. तो हिंदुस्थानांतील सर्व राजांमध्यें मोठा खरमरीत आणि जबरा होऊन गेला असें वाटतें. फिरोजाचें शीर तोडून काठीवर बसवून सर्व शहरांत फिरविवलें, तेव्हां त्या राजाविषयीं लोकांस मनापासून वाईट वाटलें. पूर्वीच्या राजास मारून गादीवर बसण्याचा धोपट मार्ग पूर्वीपासून चालत आला होता व त्याचें उदाहरण फिरोजानें स्वतः दाखविलें होतें. परंतु ह्या नवीन राजानें फिरोजास व त्याच्या सर्व कुटुंबांतील माणसांस ज्या रीतीनें मारलें त्या रीतींतच विलक्षण अघोरपणा होता.

नवीन राजाचा दुष्टपणा.

फेरिस्तानामें इतिहास कर्ता असें लिहितो कीं, त्यानें दुष्ट कर्मानें आरंभ केला इतकेंच नाहीं, तर शेवटपर्यंत तशींच क्रूर कर्मे केलीं. असें असतांही तो इतका विषयासक्त झाला कीं, त्या गोष्टींत त्याला धरबंध राहिला नाहीं, आणि उमराव लोकांची आपणावर भीति बसावी म्हणून त्यांनीं यथेच्छ विषयभोग करावा अशी ह्याच्या कडून मोकळीक असे. तथापि त्याची लढाऊपणामध्यें पहिली मत असे अशी कीर्ति आहे. तक्तावर बसण्याच्या

प्रकरण ७. इ० स० १२९५. पूर्वीं अल्ला ह्यानें आठ हजार लोक घेऊन औरंगाबादच्या राजाची मुख्य राजधानी दौलताबाद ( देवगड ) ह्या शहरावर प्रथमच स्वारी केली. ते लोक, सेनेची केवळ आघाडी आहे. असें भासवून अल्लानें लोकांस भिववलें. तेव्हां तेथील लोकांनीं त्याच्या स्वाधीन शहर केलें, आणि त्या शहरच्या रक्षणाकरितां जें सैन्य जमा झालें होतें तें सर्व पळविलें. शेंकडों वर्षांपासून जो पैसा सांठवून ठेवला होता तो घेऊन अल्ला परत गेला. नंतर अल्लानें कर्नाटक व इतर दक्षिणेकडील राज्यें काबीज करण्याकरितां आपला वजीर काफूर ह्याला पाठविलें. त्या कामांत त्याला यश आलें. व त्याला त्यांत लूट मिळाली ती १,०००,०००,००० एक अर्ब होती असें सांगतात. परंतु ह्यांत कांहीं अतिशयोक्ति आहे असें खचीत वाटतें.

मोंगललोकांची स्वारी. मोंगलांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां त्यांना हटवून लावण्याचा प्रसंग न्यायतःच ह्याच्याकडे आला. ते लोक जंघिसखानाचे वंशज असून त्यांनीं मवार अलूनहर येथें राज्य स्थापिलें होतें. त्यांची प्रथम जी सेना आली तिची गांठ लाहोर येथें पडून एलिच नामें बादशाहाचा भाऊ होता त्यानें तिचा अगदीं पराजय केला. नंतर दोन वर्षांनीं दोन लक्ष सेना मोंगलांनीं हिंदुस्थानांत पुनः पाठवली. येवढ्या सेनेनें सर्व हिंदुस्थान ताब्यांत आणूं असें मोठ्या बढाईनें ते बोलत. त्या सैन्यापुढें कोणाचाही टिकाव न लागतां तें सैन्य दिल्लीपर्यंत येऊन पोहोंचलें. तेथें ह्या रानटी लोकांच्या भि-

तीमुळें हजारों लोक येऊन राहिले होते. त्यामुळें दाटी फार झाली होती. अल्ला आपलें सैन्य जमाकरून लढाई करण्यास चालला. त्याच्या सरदारांत जिफर म्हणून एक फारच मोठा सरदार होता, तो सैन्याच्या उजव्या बाजूस हत्तींच्यापुढें होता, त्यानें अशा सपाट्यानें तोफांचा भडिमार शत्रूंवर चालवला कीं, त्यांची फाटाफूट होऊन त्यांस पळविलें व पुष्कळ कोशपर्यंत पाठलाग केला. तेव्हां जिफर ह्यास जसें मागून साह्य मिळावें तसें न मिळाल्यामुळें शत्रु दबा धरून राहिले होते तेथें तो सांपडला. तेव्हां चहूंकडून वेढा पडून तो मारला गेला. तथापि मोंगल लोकांचा फारच नाश झाला होता म्हणून ते पुनः हल्ला नकरतां तत्क्षणींच पश्चिमेकडे परत गेले. ह्या शूर सरदारास त्याच्या लोकांनीं सोडलें ह्यांत अल्लाचें आंग होतें व हा पडला म्हणून शत्रूच्या पराजयाप्रमाणेंच त्यास आनंद झाला, असा वहीम त्यावर आहे. व ही गोष्ट अल्लाच्या आचरणास जुळण्याजोगीच आहे.

प्रकरण. ७
इ० स० १२९८

मोंगल लोकांचा पराजय.

बादशाहास जय झाला म्हणून धुंदी येऊन तो फारच विलक्षण बेत करूं लागला. त्याच्या मनांत घोळत असत असे मुख्यत्वेंकरून दोन बेत होते. महंमद आणि सिकंदर हीं नावें सर्वांपेक्षां आशियाखंडांत प्रसिद्ध आहेत; त्यांप्रमाणें धर्म व राज्य ह्या दोन्ही गोष्टींविषयीं आपली कीर्ति असावी असें त्याला वाटलें. जरी तो इतका अज्ञानी होता कीं, त्याला लिहितां वांचतां येत नव्हतें,

बादशाहाचे बेत.

प्रकरण ७.
इ० स०
१२९८

तरी ब्रम्होपासक ( ब्राम्हण ) व मुसलमानी धर्माचे लोक ह्या उभयतांनीं एके ठिकाणीं भजन पूजन करावें असा मनुष्यमात्रास नवीन धर्माचा मार्ग काढण्याचे कामास लागला. दुसरा बेत असा कीं हिंदुस्थानचें राज्य करण्याकारितां प्रतिनिधि ठेवून आपण पृथ्वी जिंकण्याकरितां म्यासिदोनिया येथील राजा सिकंदर ह्याप्रमाणें निघावें असें योजलें. हे त्याचे बेत पाहून आर्जवी लोकांनीं त्याची वाहवा केली, व शहाणे लोक त्याचे रागीट स्वभावास भिऊन मागें सरून उगीच बसले. शेवटीं दिल्लीचा कोतवाल वृद्ध व मोठा संभावित

अल्ला उल्मुलुक.

अल्लाउल्मुलुक नामें होता त्यानें निश्चय केला कीं, जें होईल तें होवो, एकदा ह्या भयंकर राजाच्या कानावर वास्तविक गोष्ट घातली पाहिजे. मग त्याला बोलावणें येऊन राजवाड्यांत तो गेला तेव्हां त्या दोन अयुक्तिक बेताविषयीं त्यानें बादशाहाशीं बोलणें चालविलें. त्यानें प्रथम वेदांताविषयीं बोलण्यास आरंभ केला. तेव्हां तो मुसलमान असतां तें बोलणें ऐकून त्याच्या आंगावर रोमांच उठले. तेव्हां अल्लाच्यानें तें काम करवणार नाहीं ह्याविषयीं तो कांहीं बोलला नाहीं, परंतु अशा गोष्टींविषयीं लोकांच्या मनाचा अवरोध करणें असंभाव्य आहे, असें त्यानें सांगितलें. मुसलमान लोकांचा तुला भरंवसा आहे, पण अशा गोष्टीनें त्याच्यामध्यें फाटाफूट मात्र होईल व हिंदु लोकांनीं, पुष्कळ आजपर्यंत असे राजे येऊन गेले, त्यांचें कांहीं चालूं दिले नाहीं. ते आपला धर्म सोडून हा धर्म स्वीकारतील ह्याची आशा धरूं नको.

त्याच्या दुसऱ्या बेताविषयीं त्यानें बादशाहास सांगितलें कीं हिंदुस्थानचेंच तुझे राज्याचा चांगला बंदोबस्त झाला नाहीं. अजून पुष्कळ प्रांत जिकावयाचे राहिले आहेत. व तुझ्या हाताखालच्या संस्थानांतही कज्जाचीं कारणें अनेक आहेत. इतकेंच नाहीं, तर तूं येथून गेलास असतां इकडे फंदफितूर होऊन किंवा परचक्र येऊन तुझें राज्य जाईल असें वाटतें. व त्याबद्दल दुसरें मिळण्याचीं तर भ्रांतिच आहे. बादशाह स्वभावतः फार शहाणा होता, त्यानें ह्या गोष्टीचा विचार केला. तो त्या कोतवालाचें डोकें उडवील असें लोकांस वाटलें होतें. पण तसें न करतां त्यास म्हणाला तूं सांगितलें हें न्याय्य आहे. त्यानें अप्रयोजक जे बेत केले होते ते सोडून दिले. ह्याप्रमाणें बादशाहाचें कांहीं शहाणपण दिसून आलें. तरी त्याचा राज्यकारभार एकाच नियमानें चालविण्याची रीति नसे व ती फारच ढिली असे. त्याच्या कारकिर्दींत वारंवार बंडें उठत व त्यांतील एके बंडांत तर ह्याचा प्राणच जाण्याचा प्रसंग आला होता. त्या गोष्टीनें त्याचे मनास इतकें वाईट वाटलें कीं त्यानें राज्यकारभाराची रीति अगदीं बदलून चांगली करण्याचा निश्चय केला. त्यानें बडे लोकांचा यथेच्छ व्यवहार बंद केला व न्याय करण्याची तर अशी खरी चाल घातली कीं व्यापारी लोकांस लुटी वगैरे उपद्रव होत असत ते न होतां बंगाल्यापासून काबुलपर्यंत व कुमारिका भूशलाकेपासून काश्मीरापर्यंत निर्भ-

प्रकरण. ७
इ० स० १२९९

बादशाहाचा शहाणपणा.

चमत्कारिक सुधारणूक.

प्रकरण. ७
इ० स०
१२९९

यपणानें ते जाऊं येऊं लागले. त्यानें मद्यपान वर्ज्य केलें व कोठारामध्यें जी दारू होती ती सर्व रस्त्यांत ओतून टाकली व त्याप्रमाणें उमरावांकडूनही करविलें. त्यामुळें दिल्ली शहराच्या रस्त्यांत कितीएक दिवसपर्यंत मद्याचे प्रवाह चालले होते. वसूल जमा करणारे कामदार लोक पुष्कळ पैसा मिळवीत असत. तें बंद करून खावयास पुरे न पुरे इतकें त्यांनीं घ्यावें असें केलें तथापि पूर्वीं यथेच्छ राज्यकारभार चालला होता त्यावेळेच्या पुष्कळ जुलमाच्या गोष्टी, ही उत्तम रीति चालू केली तरी अवशेष राहिल्याहोत्या. त्यानें चार म्हणजे गुप्त बातमीदार, लोकांच्या घरांतील व दूरदूरच्या प्रांतांतील गुप्तगुप्त गोष्टी कळण्याकरितां, नेमले होते. उमराव लोकांस राजाचा लेखी हुकूम घेतल्यावांचून लग्नकरण्यास व मेजवानी करण्यास मोकळीक नसे. त्यानें जे बडे लोक डोइजड झाले होते त्यांपासून कितीएक कारणांवरून दंड घेऊन व त्यांच्या जहागिरी वगैरे जप्त करून त्यांस धूळीस मिळविलें. त्यानें सैन्याचा मुशारा कमी केला व त्यामुळें शिपायी लोकांचें नुकसान न व्हावें म्हणून त्याप्रमाणेंच धान्याचे व इतर आवश्यक पदार्थांचे दर उतरवले आणि ह्याविषयीं हुकूम पाठविले व तसें व्हावें म्हणून जुलूमही केला. त्यांपासून फळ झालें नाहीं हें खरें, परंतु अडचण व जुलूम मात्र फार झाले असावे. घोड्यांची किंमत उतरावी म्हणून कांहीं दिवसांपुढें ते मालकांनीं ठेवूं नयेत अशी सर्वांची बंदी केली. व कित्येक गरीब व्यापारी

दूत ठेवण्याची रीति.

लोकांस ह्या यथेच्छ केलेल्या कायद्यांस आड आल्याचा दोष ठेवून जेरबंद मारले. किती एकांस ठार मारलें. असा सर्वत्र जुलूम चालला असतांही त्याच्या राज्यांत न्याय कारभार खरा चालला असे व उमराव लोकांची यथेच्छ वर्तणूक होती ती बंद केली. ह्यामुळें त्या वेळेस सर्व लोक तें राज्य ईश्वराची देणगीच आहे असें मानीत असत. विद्येपासून कीर्त्ति प्राप्त होते ती फार उत्तम. ती आपणास मिळावी असें देखील अल्लाच्या मनांत आलें. मग त्यानें आपल्या दरबारीं मोठमोठे शहाणे लोक बोलावले त्यांत कासिमुलाना, कोरमी, क्यूजिवियाना हे होते. असे शहाणे लोक त्या कालीं होते म्हणून तो काळ मुसलमान लोकांच्या विद्येचा एक शकच मानला होता. बादशाह ह्यास जातीनें आपण अगदीं अक्षरशत्रू आहों ह्याविषयीं लाज वाटून तो मूळ अक्षरें शिकावयास इतक्या झपाट्यानें लागला कीं, त्यास फारशी भाषेचीं पुस्तकें लवकरच वांचतां येऊं लागलीं. बादशाहास कांहींच समजत नाहीं असें न वाटू देतां त्याजपासीं संभाषण करणें हें त्या शहाण्या लोकांस मोठें नाजूक काम करावें लागे. महंमदाचे कायद्याचें विवरण करणें तर ह्यापेक्षांही नाजूक काम होतें. त्याच्या नियमांत आणि बादशाहाच्या आचरणांत पुष्कळ गोष्टींविषयीं जमीन अस्मानाचें अंतर होतें, असें असतांही जरी ते भिऊन थरथरां कांपत होते, तरी त्यांनीं त्यांचें विवरण वास्तविक होतें तसें केलें.

प्रकरण ७
इ० स० १३००.

त्याच्या कारकिर्दीचें साधारण वर्णन.

प्रकरण ७. इ० स० १३००.

अल्लाच्या इतिहासांत स्त्रियांकरितां ज्या स्वाऱ्या केल्या त्यांविषयीं वर्णन आहे. ह्यावरून बादशाहानें ह्या गोष्टीविषयीं काय व्यवस्था केली होती तीं दिसून येईल.

स्त्रियांकरितां उद्योग.

गुजराथेंत नहरवाला म्हणून राजधानी होती ती बादशाहानें घेतली. तेव्हां तेथील हतभाग्य राजाचा खजीना व बायका त्याच्या हातीं लागल्या. त्या स्त्रियांमध्यें कमलादेवी म्हणून एक स्त्री होती

कमळादेवी.

तिला साऱ्या हिंदुस्थानांत रूपानें अप्रतिम मानीत होते. तिचे गुण, सौंदर्य, व रसिकभाषण पाहून बादशाह तिला इतका भुलला कीं त्यानें आपले दुसरे सर्व संबंध एकीकडे ठेवून तीच आपली राणी केली. ती स्थिति तिला वाईट वाटली असें दिसत नाहीं. कारण पुढें तिनें आपली मुलगी देवलदेवी त्यावेळेस तेरा वर्षांची होती तिला मजकडे आणा अशी बादशाहास इच्छा दर्शविली. ह्या देशांत ती आईच्या प्रमाणेंच अनुपमेय रूपवती होती असा तिचा नांव लौकिक आहे. अल्लानें तिचा मनोरथ पूर्ण करण्याकरितां आलीपनामें आपल्या सरदारास त्या तरुण राजकन्येस, दिल्लीस तिची किंवा तिच्या बापाची इच्छा नसली तरी, आणण्याकरितां बरोबर मोठें सैन्य देऊन पाठविलें. ते लोक भलत्याच वाटेनें जात होते कां तर दक्षिणचा राजा सिंगलदेव होता, त्याच्याशीं विवाह करण्याकरितां देवल देवीला घेऊन दुसरे लोक चालले होते. अलीपानें मला अल्लाशीं गांठ आहे, तो कोणतीही सबब ऐकणार नाहीं, असें समजून इतकी

त्वरा केली कीं, राजकन्येस घेऊन जे लोक चालले होते त्यांस गांठून त्यांचा अगदीं पराजय केला. मग ते डोंगरांत पळून गेले. परंतु बादशाहाच्या सेनेच्या टोळीची गांठ पडून लढाई झाली. तेव्हां त्या युद्धांत राजकन्याही होती. तिच्या घोड्याला बाण लागला तेव्हां ती पडली असती, परंतु तिच्या दासी ओरडल्या कीं, राजकन्या आहे. तेव्हां बादशाहाचे लोक थांबले आणि तिचा मोठा सत्कार केला. मग लागलेच तिच्या आईकडे तिला दिल्लीस घेऊन गेले. तेथें बादशाहाचा पुत्र चिजर नामें होता. तो तिला फार मोहित झाला. त्या उभयतांची प्रीति फार चांगली होती असें म्हणतात व खुसरू नामक कवीनें त्या उभयतांच्या प्रीतीचें कवितेंत वाक्चातुर्यकरून फार वर्णन केलें आहे.

प्रकरण ७. इ० स० १३००

ह्याचप्रमाणें आपली विषयवासना पूर्ण करण्याकरितां अल्लानें दुसरा प्रयत्न केला. परंतु पहिल्याप्रमाणें यश आलें नाहीं. रजपूत लोकांच्या राज्यांमध्यें चितोरचा राजा मोठा पराक्रमी होता. त्याचा अल्लानें पराजय करून त्यास दास केलें. आणि तो म्हणाला कीं, जर तूं आपली कन्या मला देशील तर मी तुला मोकळें करीन. ती त्याकालीं फारच सुंदर व गुणी ज्या राजकन्या होत्या त्यांपैकीं एक होती असा तिचा लौकिक होता. राजानें संकटानें व्याकुळ होऊन मोठ्या जुलमानें होय म्हटलें. परंतु त्या राजकन्येस ती गोष्ट कळली तेव्हां तींत आपली अतिशय अप्रतिष्ठा आहे असें वाटून तिनें आपल्या बापाचें रक्षण करण्या-

चितोरच्या राजाच्या कन्येचा राग.

प्रकरण ७ इ० स० १३१६

करितां कांहीं एक युक्ति योजली होती. ती करून पहावी म्हणून त्यापासून परवानगी मागून घेतली. मग तिनें, मी लग्नास सिद्ध आहें, असें सांगितलें; आणि बादशाहाच्या दरबारची परवानगीची चिठी घेऊन ज्यांत अगदीं वारासुद्धां फिरण्यास वाट नव्हती अशा तऱ्हेच्या पडदे लावलेल्या पालख्या सिद्ध केल्या. त्यांत एक अतिसुंदर होती तींत, ती राजकन्या बसणार आणि बाकीच्यांत तिच्या सख्या बसणार असें जाहीर केलें होतें. तो समाज दिल्लीकडे चालला आणि तेथें पोंचल्यावर राजकन्येनें विनंती केली कीं, आतां विलंब न होतां माझ्या बापाची भेट घेण्यास मला परवानगी मिळावी असी माझी फार उत्कंठा आहे, हा तिचा अर्ज सयुक्तिक वाटून बादशाहानें तो तात्काळ कबूल केला आणि तो सर्व समाज तुरंगांत जाऊं दिला. मग पालख्यांचे पडदे उघडल्यावर पाहतात तों तिच्या सख्या आंत नव्हत्या. परंतु ट्राय शहर घेतलें तेव्हां तेथें ग्रीक लोकांच्या घोड्यांतून शिपाई निघाले त्यांप्रमाणें पालख्यांतून लढाऊ लोक चिलखतें आंगावर घालून सज्ज असे पुष्कळ निघाले. त्यांनीं तत्क्षणींच पाहरेकरी लोकांचे तुकडे तुकडे करून राजास घेऊन जलद चालणाऱ्या घोड्यांवर बसवून पाठलाग होण्यास अवकाश न सांपडे इतक्या लवकर पळून गेले.

अल्ला आपल्या अंतकाळाच्या अगोदर पुनः विषयलंपट झाला. काफूर म्हणून त्याचे लोभांतला व त्या कर्मांतलाच सोबती होता. त्यानें त्याला विष घातलें असें म्हणतात.

अल्लाच्या कारकिर्दीची समाप्ति.

त्यानंतर लागलीच स्विजर आणि साही म्हणून बादशाहाचे पुत्र होते त्यांचे डोळे काढून ओमर म्हणून एक बाळक होतें त्याच्या नांवानें आपण राज्यकारभार चालवूं लागला. परंतु त्यालाही लवकरच मारेकऱ्यांनीं मारलें. तेव्हां सन १३१६त पहिला मुबरिक म्हणून बादशाहाचा पुत्र होता त्याला राज्यपद मिळालें.

प्रकरण ७
इ० स० १३१६

पठाणी बादशाहाच्या वंशांत आजपर्यंत वंशपरंपरागत राजकीय चांगल्या नियमांचे उल्लंघन, वाईट पुरुष देखील राज्यपद मिळविण्याकरितां प्रथम कांहीं दुष्ट कर्में केल्यानंतर बहुतकरून, करीत नसत, असें दिसतें. तो क्रम अल्लानें मोडला आणि त्याच्या वाईट वर्तणुकी प्रमाणें इतर बादशाहांनींही वर्तणूक केली. मुबरिक ह्यानें तीन वर्षें राज्य केलें त्यांत अतिशय बदफैलीपणामुळें नीरो आणि हेलियो गोबलस ह्या पुरुषांच्या नांवाची जशी अपकीर्ति चिरकाल झाली आहे त्यांच्या प्रमाणें ह्यानें ही दुर्व्यसनानें आपली अपकीर्ति करून घेतली. शेवटीं खुसरू म्हणून दरबारी मनुष्य घालवून दिलेला होता त्यानें मारेकरी घेऊन बादशाहाच्या रंगमहलांत शिरून, शेंडी धरली तेव्हां दोघांची मोठी झोंबी लागली. बादशाहा मोठा बलाढ्य होता ह्यामुळें त्याचा परिणाम काय होता ह्याविषयीं संशय येता, परंतु एक्या मारेकऱ्यानें जंब्यानें त्याचें शीर उडविलें. मग तो दुष्ट खुसरू राज्य करण्याविषयीं प्रयत्न करूं लागला, परंतु ज्यास अधिकार नाहीं अशा पुरुषाचें राज्य चालावें इतकी वाईट

पहिला मुबरिक.

मारेकऱ्यांनीं मारलें.

प्रकरण. ७. हिंदुस्थानाची स्थिति झाली नव्हती.
म० इ० १३१६
मग लागलेंच बंड झालें आणि ह्या दुष्ट पुरुषास त्याच्या पक्षांतील सर्व लोकांनीं सोडिलें, तेव्हां तो एका मशिदींत पळाला, तेथें त्याला मारलें. त्या धांदलींत जिट म्हणून हिंदुस्थानच्या सीमेवर लढाऊ लोक होते त्यांचा

तघलख.

तघलख नामें गुलाम होता तो ती संधी साधून राज्यावर बसला. त्यानें आपल्या नीच कुळांतील राजाप्रमाणें शहाणपणानें राज्य चांगलें केलें. चार वर्षांच्या शेवटीं अकस्मात् तंबू पडून तो मरण पावला. ही गोष्ट त्या राज्याला फार वाईट झाली.

तिसरा महंमद.

तघलख ह्याच्या पाठीमागून जोना नामें त्याचा मुलगा गादीवर बसला. तो आपणास तिसरा महंमद म्हणवूं लागला. परंतु बापाच्या कित्याप्रमाणें न वागतां त्याच्या पूर्वीं जे दुष्ट कर्म करणारे राजे होऊन गेले त्यांच्याहीपेक्षां ह्यानें फार दुष्ट कर्में केलीं. ह्यानें सत्तावीस वर्षें राज्य केलें तोंपर्यंत हिंदुस्थानास ग्रहपीडाच होती. मुबारिक हा दुर्व्यसनाचें घर होतें आणि महंमद हा क्रूर कर्मांचें घर होतें. सीजर म्हणून जे रोमन लोकांचे बादशाह झाले त्यांच्यांतील जे अगदीं वाईट होते त्यांच्याहीवर घोर

विलक्षण क्रूरकर्म.

कर्मांविषयीं ह्याची तान होती. एकदां कांहीं लोकांवर तो रागावला होता तेव्हां त्यानें शिकारीकरितां म्हणून आपले लढाऊ लोक जमा करून त्यांस सांगितलें कीं जनावरांची शिकार करावयाची नाहीं, मनुष्यांची करावयाची आहे. मग ज्या प्रांताचा त्याच्या मनांत नाश करावयाचा

होता त्या प्रांतावर लढाऊ लोक पाठवून त्यांचा फार नाश केला व लोकांची कत्तल उडविली. त्यांचे डोळे काढले व डोकीं तोडून दिल्लीस नेलीं आणि किल्याच्या तटावर ओळीनेंच टांगून ठेविलीं. त्यानें कांहीं हलक्या प्रतीचे जुलूम केले त्यांपैकीं एक शेतकरी लोकांपासून विलक्षण कर घेऊन त्यांस गांजलें व भेसळ घालून धातूचीं नाणीं पाडलीं. जेव्हां अशा गोष्टीमुळें कुणबावा करणाऱ्या पुष्कळ लोकांनीं आपलीं शेतें सोडून दिलीं, तेव्हां त्यास मोठा राग येऊन पुन्हा त्यांवर शिकार केली. असें असतांही तो राजा धर्माचा अभिमानी व विद्वानांचा पालक असें आपणास म्हणवीत असे. तो हुशार, आहार विहार ह्यांविषयीं बेत राखणारा, लक्ष लावून उद्योग करणारा, असा होता. त्यानें आपल्या क्रूरकर्मामुळें जीं बंडें झालीं तीं पराक्रमानें मोडलीं आणि मरेतोंपर्यंत हिंदुस्थानांत जुलूम चालविला होता.

प्रकरण. ७
म० इ०
१३२३

जुलूम.

ह्या राजानें पुष्कळ गोष्टींविषयीं अल्लाचीं वाईट उदाहरणें घेऊन तशी वर्तणूक केली. असें दिसतें. त्यानें संपूर्ण जग जिंकावें असें मनांत मात्र आणलें, परंतु शहाणपणानें तो बेत सोडून दिला. आणि हा तसें करण्यास प्रवृत्त झाला. त्यानें चीन देशांत एक लाख सेना प्रथम पाठविली, परंतु हिमालयाच्या उभ्या कड्यांच्या मधून व खिंडींतून जाण्याची त्या सेनेची अगदीं तयारी नव्हती असें दिसतें. त्यामुळें त्या शिपाई लोकांचा इतका नाश झाला कीं त्यांपैकीं बहुतेक मरण पावले

देश जिंकण्याविषयीं बेत.

प्रकरण. ७ इ० स० १३२३

आणि थोडेच दिल्लीस परत आले. त्यानें समरकंद आणि बोखारा ह्या मुलखांसुद्धां खुरासन आणि मेवार अलूनेहार हे देश जिकण्याकरितांही पुष्कळच सेना तयार केली. परंतु स्वराज्यांत बंड झालें अशी बातमी लागल्यावर त्यानें तो वेड्याप्रमाणें प्रयत्न सोडून दिला. त्याच्या भोंवतीं जिकडे तिकडे बंडें उठलीं. त्यामुळें सर्व प्रांत अगदीं हलून गेले. तरी त्याची हुशारी, लष्करी कामांत कौशल्य, आणि कडकपणा ह्यांच्या योगानें तीं बंडें त्यानें मोडलीं. आणि आपला कडकडीत अंमल राखिला. दक्षिणेचें मोठें व दूरचें राज्य अल्लानें जिकलें होतें, तें मात्र रक्षिण्यास त्याचा सर्व प्रयत्न निष्फळ झाला. हें राज्य रक्षावें म्हणून त्याची अशी उत्कंठा होती कीं एकें समयीं त्यानें दिल्ली शहरांतील बादशाही वैभव टाकून देवगड येथें आपल्या दरबारासुद्धां राहण्याची जागा केली; तें शहर लहानशी राजधानी होती. त्यास दौलताबाद म्हणजे लक्ष्मीचें स्थान असें नांव त्यानें ठेविलें. तथापि पुढें राज्य कारणामुळें त्याला आपल्या नेहेमीं राहण्याच्या ठिकाणीं म्हणजे दिल्लीस जाणें भाग पडलें. आणि शेवटीं तो असतां दक्षिणेंत निराळें स्वतंत्र राज्य झालें. हसन केको म्हणून मोंगलांचा सरदार होता त्यानें पहिला अल्ला असें आपणास नांव ठेवून दक्षिणेंत राज्य स्थापिलें व त्याच्या वंशांत पुढें पराक्रमी राजे झाले. शेवटीं असें दिसतें कीं महंमदानें सौम्य प्रकारानें राज्यकारभार चालविण्याचा निश्चय केला, परंतु त्या बेताप्रमाणें करणार तों

त्याची मोठेपणा मिळविण्याची इच्छा.

पूर्वींच तो मरण पावला. त्यामुळें तें तसेंच राहिलें. आणि सन तेराशें एकावन्न ह्या वर्षी हिंदुस्थान त्यांच्या दुष्ट व भयंकर कारकिर्दीपासून मुक्त झालें. प्रकरण. ७ इ० स० १३५१

तिसरा फिरोज

ह्या राजाच्या मागून त्याचा चुलत भाऊ तिसरा फिरोज हा गादीवर बसला. त्याचा स्वभाव अगदीं निराळा होता ही गोष्ट फार चांगली झाली. त्याच्या कारकिर्दीत जिकडेतिकडे बंदोबस्त राहण्याच्या युक्ति पुष्कळ झाल्या व मनुष्यांचे हक्कांकडेस त्याचें लक्ष्य पोहोंचत असे. त्यानें पाण्याचे नळ नेण्याकरितां तीस उसवास बांधिले, व शंभर पूल चाळीस मशिदी, तीस विद्यालयें व उपयोगाचीं आणि शोभेचीं अशीं इतर पुष्कळ कामें केलीं असें ह्मणतात. तो लढाईच्या कामांत भित्रा असे असा त्यास कोणी दोष लावितात, तरी त्याच्या कारकिर्दीत जीं कांहीं बंडें उत्पन्न झालीं तीं मोडण्यांत त्यानें पराक्रम दाखविला नाहीं असें झालें नाहीं. एक्या कामांत त्यानें फारच कडकपणा केला असाही दोष त्यावर ठेवितात. त्यानें दक्षिणचें राज्य जें त्या वेळेस दुसऱ्या पराक्रमी राजाच्या अगदीं ताब्यांत गेलें होतें तें जिकून परत घेण्याविषयीं यत्न केला नाहीं, ही गोष्ट लोकांच्या व त्याच्या हिताची व शहाणपणाची झाली असा संभव दिसतो. त्यानें अडतीस वर्षें राज्य केलें, त्यांत हिंदुस्थानास पूर्वींचे राज्यांतील पुष्कळ दुःखें झालीं नाहींत, व उद्योगानें डोकें वरती

त्याची शहाणपणाची व पराक्रमाची कारकीर्द

प्रकरण. ७ काढलें होतें इतक्यांत राजा मेला. नंतर
इ० स० १३९७ त्या देशास नवीन अनर्थ प्राप्त झाले.

दुसरा तघलख दुसरा तघलख, अबूबीकर आणि चौथा महंमद ह्यांनीं थोडेच दिवस राज्यें केलीं, त्यांत आशिया खंडांतील राजांची सत्ता एकसारखी राहत नाहीं असें दिसोन आलें. तिसरा महंमद अल्पवयी होता ह्मणून तिसरा फिरोज ह्याचा नातू नजरीद नामें होता त्यानें राज्याविषयीं कलह केला, व बहुतकरून सर्व प्रांत स्वतंत्र म्हणवूं लागले. इतक्यांत सन १३९७ त हिंदुस्थानावर एक्या शत्रूनें स्वारी केली, व तो तसाच राहता तर त्यास तेथील सर्व सैन्य व मोठे मोठे पराक्रमी राजे ह्यांच्यानें बहुशा घालवलें नसतें.

तैमूर तैमूर हा आशियाखंडांत जेजे मोठे विख्यात विजयी राजे झाले त्यांपैकींच होता. जरी जंगीसखानाप्रमाणें ह्यानें चीन व मंस्कवी ह्या देशांवर स्वारी केली नाहीं तरी हिंदुस्थान, इराण व तुर्कलोकांचें राज्य हीं बुडवून ह्यानें यश मिळविलें त्यामुळें युरोपांत हा मोठ्या प्रसिद्धीस आला. त्याची न्यायशीलता आणि भूतदया फार मोठी होती अशी आशिया खंडांत त्याची फार स्तुति करितात, आणि त्याच्या घराण्यांत जे पुढें पुष्कळ राजे झाले त्यांनींही झटून हे गुण आपलेठायीं संपादिले. तैमूर ह्यानें एक कायद्याचें नवें पुस्तक केलें. तें त्यानें स्वतां लिहिलेलें नसलें तरी त्याच्या अनुमतानें लिहिलेलें खरें. त्यांत राजधर्म कोणते हें वास्तविक सांगितलें आहे व त्याच्या एक्या संभाषण रूप ग्रंथांत मीच त्या धर्माप्रमाणें वागलों असें त्यानें दाखविलें आहे. तथापि त्या धर्मांतच

मोठाले देश जिकणें, शस्त्राच्या योगानें मुसलमानी धर्माचा प्रसार करणें, आणि राज्य चालविण्याचे यथेच्छ नियम कडक रीतीनें चालविणें ह्या गोष्टींची राजधर्मांत गणना केली आहे. जर एकाद्या राजानें कांहीं गोष्टीविषयीं आज्ञा केली आणि ती गोष्ट वाईट असें जरी त्याचे ध्यानांत मागून आलें तरी तो हुकूम चालवण्याविषयीं त्यानें अनमान करूंनये, असें लिहिलें आहे. कारण नजाणों त्याचा अधिकार लोक कमी मानतील. ह्याकरितां केलेला नियम चालवावाच असेंही तो ह्मणतो. प्रकरण. ७ इ० स० १३९७

त्याच्या पक्षाचे लोक बढाईनें सांगतात कीं जे शत्रू त्याला नमून होते त्याविषयीं त्यास भूतदया असे, परंतु तो एकदम आणि सर्वस्वीं शरण आला पाहिजे. परंतु ज्या देशावर यथेच्छ रीतीनें स्वारी केली तो देश केव्हांही तशा प्रकारें शरण येईल असें होणें फार विरळ. देश जिकला असतां लागलीच तेथील लोकांस जे अनर्थ होणार त्यांपासून रक्षण करण्याविषयीं देश जिकणारा तैमूर ह्यास दया क्वचित् येई, आणि त्याचा जय झाला म्हणजे विचार न करितां तो शत्रूंची कत्तल करी आणि शिरें तोडून मोठ्या पिरामिदा (मनोरे) प्रमाणें रची; हीं त्याच्या जयाचीं चिन्हें असत. सर्व देशांचा संहार करीत पृथ्वी प्रदक्षिणा करणें आणि तोंडानें दयेचें भाषण करणें हें जेन्सेरिक आणि अटिला ह्यांनीं रानटीपणानें व अविचारानें जे नाश केले त्यांपेक्षां देखील अधिक दुष्टकर्म असें दिसतें. तैमुराच्या ताब्यांत जे देश होते त्यांत तो न्याय करण्याचा बंदोबस्त चांगला करिता आणि लो- त्याचा दयेचा प्रकार.

प्रकरण.७ इ० स० १३९७

कांचा भरभराट व्हावा म्हणून हीं झटता असेंही खचित मानावें, कां तर आशिया खंडांतील इतिहासांत अशा गोष्टी ज्याच्या महत्वाकांक्षेस पार नाहीं अशा अडाणी पुष्कळ राजांनीं केल्या आहेत. तथापि क्लाविजो म्हणून स्पेन देशचा वकील होता तो समरकंद येथील दरबारीं गेला होता, त्यानें तेथील अडाणी रीतीच्या डामडौलाचें वर्णन केलें आहे त्यावरून दिसतें कीं त्याची राज्य करण्याची रीति अगदीं यथेच्छ असे, ह्यास उदाहरण. त्यानें एके दिवशीं आपल्या शहरचे सुभेदारास बोलावणें पाठिवलें आणि जें काम त्याच्या स्वाधीन होतें त्यांत कांहीं तक्षीर केली असा दोष ठेवून एक क्षण न लावतां त्याचें डोकें उडविलें आणि ज्या दोन सरदारांनीं धीट होऊन त्या सुभेदाराविषयीं मध्यस्थी केली त्यांचीही त्याच्या प्रमाणें दशा केली. एकदां त्यानें असा हुकूम केला होता कीं वीस दिवसांत एक मोठा रस्ता बांधून तयार करावा. तेव्हां कामगार लोक इतक्या घाईनें कामास लागले कीं वाटेंत जीं जीं घरें होतीं तीं मालकांस आपली मोलाची चीजबस्त दुसरेकडे नेण्यास अवकाश न देतां पाडून टाकिलीं. त्यांनीं नम्रपणानें विनंती केली कीं आमचें नुकसान थोडेसें तरी सरकारानें भरून द्यावें. तेव्हां त्यानें निष्ठुरपणानें उत्तर केलें कीं सारें समरकंद माझें आहे. जेव्हां त्याचे हलकारे मुकाम करण्यास उतरत तेव्हां ते चहूंकडून वेठीस माणसें चाबूक मारून पाहिजेत तितकीं लागलीच आणीत, आणि जर त्यांस पाहिजे तसा घोडा

त्याचा राज्य करण्याचा प्रकार.

रस्त्यांत आढळला तर ते तत्क्षणींच त्यास धरीत आणि त्याच्या धन्यानें कांहीं अडथळा केल्यास त्याचें डोकें उडवीत. प्रकरण. ७ इ० स० १३९८

हिंदुस्थानावर स्वारी.

तैमूर ह्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्याची कांहीं सबब नव्हती. परंतु तो देश आपल्या ताब्यांत असावा व तेथें जो तो आपल्याकडे तो मुलूख घ्यावयाच्या बेतांत आहे, म्हणून आपला जय होईल अशा आशेनें मात्र त्यानें स्वारी केली. सन तेराशें सत्याण्णवांत तो आपल्या राजधानीपासून निघाला आणि बाक्त्रिया देशचे मोठे मैदानांतून सहज पार झाला. परंतु हिंदुकुश ( इंडियनकाकेसस ) म्हणून जो मोठा भयंकर पर्वत आहे, त्याचे उंच आणि उखर वाखर घाट आहेत त्या वाटेनें सिथियेंतील स्वार जाण्यास अगदींच अयोग्य होते. व त्यानें तेथील लोक लढाऊ आणि क्रूर होते त्यांशीं सख्य करण्याचा तिरस्कार केला. म्हणून ते लोक दर पावलीं अडथळा करीत आणि जरी त्यांच्यानें त्याचें पुढें जाणें अगदींच बंद करवलें नाहीं तरी त्यांनीं त्याचा पुष्कळ नाश केला. तथापि वाटेनें कांहीं ठिकाणें त्यास अशीं लागलीं कीं त्यांवरून दोर लावून त्याला उतरावें लागलें. पण असें म्हणणें अतिशयोक्तीचें आहे असें दिसतें. कां कीं त्याच्या घोडेस्वारांच्यानें अशा देशांत चालवतेंना व तसल्या युक्ती तेथें लागू नपडत्या. जर त्यास जाण्यास चांगला रस्ता असता तर त्याच रस्त्यानें तो पायीं जाता. शेवटीं सिंधुनद उतरल्यावर त्यानें मुलतानाकडे कुच केला. तेथें त्याचा पुतण्या पीरमहंमद पूर्वींच जाऊन

प्रकरण. ७ इ० स० १३९७ राहिला होता. तरी अफगानिस्थानचे उमराव लोक आणि मुख्यत्वेंकरून बतूनेर येथील सुभेदार त्यास येऊन भिडले होते. तैमूर आपल्या पुतण्यास जाऊन मिळाला तेव्हां युद्धांत त्याचा वरचष्मा झाला. मग बतनेर म्हणून

बतनेर घेतले जो किल्ला घेण्यास अशक्य असें बहुत करून सर्वांनीं मानलें होतें; तो प्रथम घेण्याचा निश्चय ठरला. तथापि तो सर करण्याकरितां वहिवाटलेले केवळ दहा हजार लोक घेऊन तो गेला. तेव्हां किल्ल्यांतील लोकांस त्याचे लोक थोडे आहेत हें पाहून धीर आला; मग त्यांनीं बाहेर येऊन त्यांस लढाई दिली. परंतु मोंगल लोकांच्या स्वारांचा तडाका त्यांस सोसवना म्हणून ते शहरांत शिरले. त्यांबरोबर मोंगल

त्याचा अडाणीपणा लोकांनीं शहरांत शिरून आंतील कोट खरीज करून सर्व आपलेंसें केलें. नंतर त्यानें आपल्या पुतण्याशीं ज्यांनीं पराकाष्ठेचें शत्रुत्व दाखविलें होतें त्यांपैकीं पांचशें लोकांचीं डोकीं उडवावीं म्हणून हुकूम केला. तेव्हांही तो किल्ला हिंदूंच्या ताब्यांत होता. ते लोक तैमुराचें तें घोर कृत्य पाहून मरूं किंवा मारूं असा निश्चय करून जिवावर उदार झाले. मग त्यांनीं लागलीच त्या जाग्यास आग लाविली आणि आपलीं बायकामुलें मारून, शत्रूचा जितका नाश करवेल तितका करून मरूं अशा निश्चयानें ते प्रशस्तपणीं पुढें घुसले. त्यांपैकीं एकही उरला नाहीं. त्यांनीं हजारों मोंगल लोक पाडले, आणि नंतर आपण मेले. तो नाश पाहून तैमुरास मोठा

क्रोध आला आणि त्यानें जो सांपडेल तो मारावा अशी आज्ञा केली.

प्रकरण ७
इ० स० १३९७

मग तैमुरानें आपलें सर्व सैन्य जमा करून दिल्लीकडे चाल केली. आणि वाटेनें जात असतां जो देश लागला तो लुटून उद्ध्वस्त केला. त्यानें इतर ठिकाणीं कोणतें कल्याण केलें असेल तें असो, परंतु हिंदुस्थानास त्याच्या घोर कर्मांचा व भीतीचा मात्र अनुभव आहे. त्याजवळ युद्धदास म्हणजे बंदींत ठेवलेले लोक पुष्कळच झाले. त्यामुळें वाटेनें जाण्यास हरकत पडूं लागली, व न जाणो हे आपणावर उठतील अशी भीतिही त्यास उत्पन्न झाली. मग त्यानें सर्वांची कत्तल करून टाकावी अशी घोर आज्ञा केली. तेव्हां लागलींच एक लाख मनुष्यांचीं डोकीं भुईवर पडलीं असें म्हणतात.

दिल्लीवर चाल.

भयंकरकत्तल

महमूद चाळीस हजार पायदळ व दहा हजार स्वार घेऊन दिल्लींत राहिला आणि त्यानें वेशी लावून टाकिल्या. तेव्हां तैमुरास असे भय पडलें कीं जर आपल्या शत्रूनें मोठें सैन्य घेऊन बंदोबस्ताच्या व बळकट ठिकाणीं राहण्याचा निश्चय केला तर त्यास वेढा घालणें फार कठीण पडेल. निदान तो पुष्कळ दिवस राहून फार नाश होईल. मग त्याला समरांगणांत आणून फसविण्याकरितां त्यानें आज्ञा दिली कीं थोडेसेच लोकांनीं अघाडीस यावें व आम्ही भ्यालों आणि बलहीन आहों असें बळेंच दाखवावें, व शहरांतील फौजेनें बाहेर येऊन एकदम हल्ला केल्यास लागलेंच पळावें. अशा तऱ्हेची तजवीज योजीली. तो मुसलमान त्याच्या

प्रकरण ७
इ० स०
१४००.

ह्या कपट पाशांत सांपडून बाहेर निघाला आणि त्यानें हजारों हत्तींसुद्धां सारी सेना लढाईच्या बेतानें उभी केली. रणभूमीवर जय मिळविणें तैमूर ह्याच्या स्वाधीन होतें. त्याचे लोक लढाया करून घटलेले व कसाले काढणारे होते. तसल्या लोकांची केवळ मेंगे व उगीच कल्होळ करणारे अशा लोकांशीं गांठ पडली. तेव्हां एक्याक्षणांत त्यांची फळी फोडून त्यांस शहराच्या वेशीपर्यंत पळवून लावून पाठलाग केला. तेव्हां बादशाहा पळाला तो गुजराथेकडे गेला, व त्याचें शहर तैमुराचें

दिल्ली घेतली

स्वाधीन होऊन तेथें रखवालीस तैमुराची फौज राहिली. नंतर जो अनर्थ झाला त्यांत तैमुराकडे किती दोष होता ह्याविषयीं इतिहास कर्त्यांचीं मतें निरनिराळीं आहेत. मोंगल राजाच्या पदरचे लोक निश्चयानें सांगतात कीं तो विजयी तैमूर आपल्या लश्करास मेजवानी करण्याच्या उत्साहांत होता, इतक्यांत शहरांतून मोठ्या ज्वाळा वर चालल्या आहेत असें पाहून तो चकित झाला, तथापि ह्याविषयीं असें सांगतात ( व हेंच फेरिस्ता नामें इतिहास कर्ता खरें असें मानतो व त्याचें मानणें सयुक्तिक आहे. ) कीं त्याच्या शिपाई लोकांपैकीं कित्येकांनीं शहराच्या लोकांवर जुलूम केला. तेव्हां त्यांनीं कांहीं शिपाई मारले. नंतर तैमुरानें ती मोठी राजधानी जशी पाहिजे तशी लुटावी असा हुकूम दिला. तेव्हां त्या दुर्दैवी हिंदूंची कुतर ओढ होऊन त्यांनीं आपल्या बायका मारिल्या आणि मग ते शत्रूवर चालून गेले. परंतु युद्धाच्या कामांत त्या अशिक्षित लोकांचा प्रयत्न मोंगल लोकांच्या लढाऊ

शिपायांच्या पुढें व्यर्थ गेला. त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. मग लवकरच रस्त्यांतून रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या आणि थोडीशी लढाई झाल्यावर तेथील शेंकडों लोक त्या उद्ध्वस्त शहराच्या कोटाच्या बाहेर धरून नेले.

प्रकरण ७.
इ० स०
१४१३

तैमूर हा कोणत्या हेतूमुळें गेला हें बराबर समजत नाहीं. परंतु अयोध्या व बंगाला ह्या उत्तम प्रांतांकडे पुढें नजातां गंगेच्या वरले बाजूचे देशांत कुच करून हरिद्वाराजवळ गंगेस पोहोंचला, नंतर त्यानें एकाएकीं परत जाण्याचा निश्चय केला आणि हिमालय पर्वताच्या खालच्या टेंकड्यांनींच चालता झाला व जात असतां तेथील शूर लोकांशीं निकराचीं युद्धें करावीं लागलीं. त्यामुळें वाटेनें सर्वत्र रक्तपात झाला. लाहोर येथें बंड झालें होतें तें मोडून तो पुनः सिंधुनद उतरून गेला आणि ज्या स्वारींत बिजाजेट ह्याचा पराजय करून आरोमान (तुर्कस्थानचे लोक) ह्यांचें राज्य उदयास येत होतें तें कांहीं वेळपर्यंत आपल्या ताब्यांत आणिलें.

तो हिंदुस्थानांतून पुढें गेला.

तो हिंदुस्थानांतून गेल्यानंतर येथें त्याचा अधिकार असला तरी फार थोडा असेल. त्याच्या नांवानें नाणीं पाडीत असत, आणि येथील राजे नांवानें मात्र त्याच्या ताब्यांतले असें मानीत, परंतु इतर गोष्टींचा विचार करून पाहतां त्यानें जी स्वारी केली तिच्या योगानें राज्यांत एक राजा नाहींसा होऊन अव्यवस्था मात्र झाली व ती सर्व देशांत तशीच कांहीं दिवसपर्यंत राहिली. दर सुभ्याचे सुभेदार आम्ही स्वतंत्र आहों अ-

प्रकरण ७. इ० स० १४१३

सें कांहीं काळपर्यंत बोलूं लागले, आणि दिल्ली तर कांहीं वेळपर्यंत लोकांनीं सोडिली होती, तेथें पुनः लोक येऊन राहूं लागले. आणि तें शहर पहिल्या राजाच्या हातून जाऊन दुसऱ्याच्या हातीं लागलें. महंमूद कांहीं वेळपर्यंत राज्यकारभार सोडून सुखवासी गृहस्थाप्रमाणें राहिल्यानंतर बादशाहाची पदवी आपण घ्यावी ह्याकरितां पुन्हां प्रयत्न करूं लागला. परंतु सन १४१३ पर्यंत राज्यामध्यें बंदोबस्त नव्हता. मग त्या वर्षी महंमूद मरण पावला आणि खिजर म्हणून मुलतानास वैसराय म्हणजे राजप्रतिनिधि होता त्यानें राज्य बळकाविलें, आणि तैमुराचा मी प्रतिनिधि असें म्हणोन तोच राज्य चालवूं लागला. तेव्हां कांहींसा बंदोबस्त झाला. त्या सुभेदारानें शहाणपणानें व हुशारीनें कारभार केला आणि राज्यांत नेहमीप्रमाणें बल व कारभार चालविण्याची पद्धति ह्यांचा प्रादुर्भाव होऊं लागला. त्या राज्याखालीं बंगाला, गुजराथ, अथवा दक्षिण हे देश घ्यावे असा पुढें यत्न झाला नाहीं. हें खचीत, परंतु त्याखालीं दिल्ली, आग्रा, व मध्य हिंदुस्थानांतील इतर प्रांत हे मोडतच होते आणि मुलतान व लाहोर हे देखील ह्याच्याच ताब्यांतले असें खचीत नव्हतें तरी ते त्याखालीं मोडत.

त्याच्यामागून जे राजे झाले ते

त्यांच्या मागून आतां जे राजे झाले त्यांच्या कारकिर्दींत सांगण्यासारख्या गोष्टी थोड्याच होत्या. मुबारिक ह्यानें तेरा वर्षें पर्यंत सौम्यतेनें व शहाणपणानें राज्यकारभार केल्यानंतर त्याला त्याचे वजिरानें मारेकऱ्याक-

डून मारून टाकिलें. पांचवा महंमद प्रकरण ७.
आणि दुसरा अल्ला ह्यांनीं सरासरी इ० स० १४१३
राज्य केलें. तेव्हां राज्याचा लय बहुतकरून होत चाललाच होता. तितक्यांत बिलोली ह्या पराक्रमी पुरुषानें अडतीस वर्षेपर्यंत तें राज्य बळकावून कारभार केला. त्याचा मुलगा पहिला शिकंदर हा गादीवर बसला आणि बापाचें नांव त्यानें राखलें, परंतु दुसरा इब्राहिम हा त्याचे मागें गादीवर बसला तो शूर व कडक होता, तरी लोकांची त्यावर प्रीति नव्हती म्हणून हिंदुस्थानावर जी आणीबाणीची वेळ आली तेवेळेस जशी असावी तशी त्याची तयारी झाली नाहीं.

तैमूर मरण पावल्यानंतर त्याचा गुणी मुलगा शाहराक हाही मेला. नंतर त्याचे विस्तृत राज्याचे निरनिराळे लहान लहान भाग झाले. त्यांतील दूरदूरचे प्रांतच निराळे झाले इतकेंच नाहीं. परंतु टानसाक्षी याना एथील मूळच्या राज्याचेही तुकडे तुकडे झाले; त्याकरितां त्याचे निरनिराळे वंशज आवेशानें भांडले. कोकान म्हणजे फरघना एथील मुलूख एक सुंदर खोरें असून बहुत करून पर्वतांनीं वेष्टिलेलें आहे व परजगसारतीस याला हिच्या वरच्या बाजूचे लगत तो पसरलेला आहे, तो तैमूर ह्याचा निपणतू बाबर नामें मुलगा बाराच वर्षांचा होता त्याला वारसाच्या हक्कावरून मिळाला. पुढें तो बाबर आशिया खंडांतील सर्व राजांमध्यें बहुतकरून अद्वितीय झाला. तो त्या खंडांत देश जिकण्याविषयीं बाहादर होता, आणि राज्यें बाबर.
जिकण्याच्या व गमावण्याच्या कामांत त्यानें आपलें सर्व आयुष्य घालविलें. देवादिकांचे

प्रकरण ७
इ० स०
१४१३

त्याचे अद्वितीय पराक्रम.

जसे पराक्रम वर्णिले आहेत त्यांचे प्रमाणें ह्याचे पराक्रम होते. कधीं त्याच्या ताब्यांत सर्व मुलूख असेच लागलेंच असें होई कीं ह्याला बसावयास जागा किंवा रहावयास झोंपडी ही मिळत नसे; त्याचे स्वाधीन आज मोठी फौज आहे व उद्यां तर शंभर लोक सुद्धां मिळत नसत. एकदां तो आपल्या देशांतून बाहेर निघाला आणि पाहतो तों दोनशें चाळीस लोक मात्र राहिले. तेव्हां त्याणें जें आशियेंतील छावणीचें मुख्य स्थान, व जेथें बंदोबस्ताकरितां मोठी फौज ठेवली होती, अशा समरकंद शहरावर हल्ला करण्याचा निश्चय केला. मग मध्यरात्रीं भिंतीला शिड्या लावून तो आंत उतरला आणि आपल्या मित्रांचे साहाय्यानें शहर जिंकून जयजयकार शब्द केला; आणि त्याचें इतकें भय उत्पन्न झालें कीं तेथील शबियनी नामें राजा पळून गेला आणि त्यानें आपली राजधानी व सर्व राज्य बाबराच्या ताब्यांत दिलें. त्यानें तें राज्य बराच काळपर्यंत केलें. पुढें त्याला ह्या मुलखांतून व दुसऱ्या राज्यांतून हांकून लावल्यानंतर कोणताही देश आपल्या ताब्यांत नाहीं असें त्यानें पाहून काबुलांत लढाई करावी असा निश्चय केला. त्या देशांत राजा नव्हता ह्यामुळें ह्याची

काबुलावर हल्ला

कीर्ति मोठी व पराक्रम मोठा म्हणून हा जातांच लोकांनीं त्याचा उत्सुकतेनें सत्कार केला. व त्यांस असें वाटलें होतें कीं राज्याच्या वारसांमध्यें कलह होऊन जी अव्यवस्था झाली आहे ती ह्याच्या हातानें मोडेल व कज्जे बंद होतील. ह्याच का-

रणामुळें कंधाराहून त्यास बोलावणें झालें. त्यावर पुढें एक मोठें बंड झालें परंतु त्यानें त्यांतील पांच उमराव ए- कामागून एक आपणाशीं युद्धास बोलावून त्यांस मा- रून टाकिलें. तेव्हां शत्रूंच्या सैन्याचीं मनें अशा री- तीनें फिरलीं कीं तें पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें आणि बंडवाले लोक लागलेच वश झाले.

प्रकरण ७ इ० स० १४१३

बाबर ह्यानें काबुलांत आपलें राज्य स्थापित क- रून हिंदुस्थानाच्या हद्दीवर आणि सिंधुनदावरील दे- शांत कित्येक स्वाऱ्या केल्या. तथापि त्यानें अलं- कारिक भाषण केलें आहे त्याप्रमाणें म्हटलें असतां असें, कीं निश्चयाच्या रिकिबींत पाय ठेवण्याच्या व बादशाहा- चें सिंहासन आपणास मिळावें म्हणून यत्नकरूं लाग- ण्याच्या पूर्वीं बराचवेळ गेला. त्यानें तेरा हजारच घो- डेस्वार घेऊन दिल्लीवर स्वारी केली. तेव्हां इब्राहिम दिल्लीचा बादशाह एकलक्ष घोडेस्वार व हजार हत्ती ह्यांनिशीं लढाईस आला. परंतु पर्वतांत राहाणारे क- साले काढणारे, शूर आणि लढाईच्या कामांत वाकब- गार अशा लोकांपुढें त्याचे सैन्याचें कांहीं चाललें नाहीं. मुसलमान लोकांस लढाईची युक्ति माहित नव्हती. त्यांचें सैन्य एके रांगेनें उभें राहिलें, मग मोंगल लोकां- च्या तोफांचा मार चालला, तेव्हां त्यांची लागलीच धांदल होऊन गेली. तथापि बादशाह मोठ्या शौर्यानें आपले निवडकस्वार घेऊन जातीनें पुढें आला आणि त्यानें शत्रूंच्या मध्यभागावर हल्ला केला. तेथें बाबर व बादशाह ह्या दोघांचेंच बहुत- करून युद्ध चाललें. त्यांत बादशाह पड-

त्याला राज्य मिळालें.

प्रकरण ७. इ० स० १४१३ 

ला आणि त्याचें सैन्य पळालें आणि बाबर हा सन १५२६ त दिल्लीच्या तक्तावर बसला.

अफगानी म्हणजे पठाणी वंश संपला.

हा पुरुष मरतांच पठाणी वंश म्हणजे त्या वंशांतील एका मागून एक जीं घराणीं झालीं तीं संपलीं. हिंदुस्थानांत ह्या वंशांतील लोकांनीं ३०० वर्षें राज्य केलें तरीं ज्या घराण्यांतील तीन पुरुषांनीं सारखें राज्य केलें असें घराणें एकही नव्हतें. अफगानिस्थान आणि तार्तार ह्या देशांतून गुलाम विकत घेतलेल्या पुरुषांस बादशाहाचे कृपेनें मोठे अधिकार मिळाले. नंतर राजद्रोह व मोठीं घोर कर्मे करून त्यांनीं राज्य संपादिलें असे पुष्कळ राजे झाले. ह्या काळांत हिंदुस्थानाची जशी दुर्दशा होती तशी दुसऱ्या कोणत्याही देशाची नव्हती; कारण ह्या देशांतील लोक दासांचे दास झाले होते व त्यांच्या सर्व धर्मास व कायदे वगैरे सर्व गोष्टींस प्रतिकूळ अशा दुरभिमानी परकीय लोकांनीं ह्यांस पादाक्रांत करून टाकिलें होतें. तथापि कोठें कोठें थोडीं युद्धें झालीं व कधीं कधीं कांहीं वेळपर्यंत राज्य नीट रीतीनें चाललें नव्हतें. ह्या गोष्टी खेरीज करून हिंदुस्थानांत ह्या वेळेंत राज्यकारभार चांगला चालला होता व या देशाची भरभर असून हा सुखी होता. ही गोष्ट मोठी आश्चर्याची आहे.

**प्रकरण समाप्त.**

# प्रकरण ८.

## औरंगजेबापर्यंत मोंगलांचें घराणें.

बाबर—त्याचा मृत्यु व त्याचे गुण—हुमायून—त्याचे पराक्रम—तो राज्यांतून हांकून लावला—त्याचीं संकटें—शीर बादशाहाची कारकीर्द—हुमायून परत येऊन पुन्हा तक्तावर बसला—त्या मागें अकबर बसला—त्याचीं अचाट कृत्यें—राज्य करण्याची पद्धति—अयीन अकबरी ग्रंथ—गोंव्याहून पोर्तुगीज पाद्री दिल्लीस आले—जहांगिराचें राज्य हाकिन्स आला—सरतामस रोहावकील होऊन आला—मोंगलांचें दरबार—जहांगिरावर बंडें—त्याचा मृत्यु—शहाजहानाचें राज्य—लोदी ह्याचें बंड—शहाजहानाचे मुलगे—राज्यासाठीं त्यांचे कलह—औरंगजेबाचा जय—बापास पदच्युत करून आपण गादीवर बसला.

---

बाबर हा सन १५२६सांत हिंदुस्थानचे गादीवर बसला, परंतु ती गादी निर्भय नव्हती व तिची सत्ता चांगली बसली नव्हती. पठाण जातीचे उमराव आपआपल्या प्रांतांत अम्मल चालवीत असत, ते मोंगल लोकांच्या घराण्यांतील लोकांनीं अधिकार नसतां परदेशांतून येऊन राज्य बळकावलें असें मानीत, आणि हिंदुलोकांमध्यें मोठे शूर असे जे मुख्य मुख्य रजपूत राजे ते त्यांनीं आपल्याकडे करून घेतले होते. तेव्हां पश्चिमेकडे एक लक्ष सैन्य जमा झालें, त्यांत पूर्वींच्या बादशाहाचा भाऊ महमूद हा प्रमुख होता. बाबर बादशाहाची स्थिति अशी आणीबाणी-

इ० सन १५२६.

बाबर त्याचा हिंम्या

प्रकरण ८
इ० स०
१५२६

ची होती कीं, त्याच्या सभोंवतीं शत्रु म्हणजे बाहेरून मित्र परंतु आंतून द्वेषी असे लोक होते व त्यानें पर्वतांत राहणारे जे थोडेसे लोक आपणा बरोबर आणले होते त्या लोकांशिवाय विश्वास ठेवण्याजोगे त्याजवळ कोणीच नव्हते. जेव्हां त्यावर असा प्रसंग गुजरला, तेव्हां त्याचे लोकांची पांचांवर धारण बसली. त्याच्या धैर्यवान सरदारांपैकीं कित्येक सरदार देखील काबुलास परत चलावें, निदान सिंधुनदावरील मुलखांत चलावें,असें म्हणूं लागले. परंतु येवढें मोठें राज्य लढाई केल्यावांचून सोडावें असें त्या धीरवान पुरुषाच्या मनांत येईना आणि उलटा त्यास राग आला. त्यानें साफ सांगितलें कीं ज्यांत कीर्त्ति आहे ती गोष्ट केली पाहिजे. आणि त्याला आवेश येऊन ( तोच आवेश त्याच्या अनुयायी लोकांस आला ) ह्मणाला, ज्या अर्थी मृत्यु टळणार नाहीं त्या अर्थी धैर्यानें तोंडाशीं तोंड देऊन असावें ह्यांत भूषण आहे. मृत्यूच्या भयानें मागें सरून दुःखानें आणि गैर अब्रूनें कांहीं वर्षें वांचावें त्यांत अब्रू नाहीं. कारण, मेल्यावर कीर्तीशिवाय काय राहणार आहे ? 'ह्याविषयीं त्यानें शहानामा म्हणून फारशी भाषेंत महाभारतासारखा ग्रंथ आहे त्यांतील कांहीं बयता म्हणून दाखविल्या.

धर्माचें वजन

बाबर ह्यानें असें पाहिलें कीं शत्रूच्या सेनेंत हिंदुलोक पुष्कळ आहेत. मग त्यानें आपल्या लोकांस धर्माची उत्कंठा दाखवून त्यांपासून आम्ही धर्माकरतां मरूं अथवा जय मिळवूं अशी शपथ खुराणावर हात

ठेवून घेतली. त्याच्याच आचरणांत अशा कांहीं गोष्टी होत्या कीं मुसलमानी धर्माचा अभिमान धरून युद्ध करण्यास तो योग्य नव्हता. परंतु आजपासून मी मद्य पिणार नाहीं असा त्यानें नियम केला. पूर्वीं तो मद्य फारच पीत असे. त्यानें आपले मद्य पिण्याचे सोन्याचे सुंदर पेले मोडून त्याचे तुकडे करून गरिबांस दिले.

प्रकरण ८
इ० स०
१५२६

बाबर ह्यानें आपल्या लोकांचें मन योग्यवेळेस पाहिजे तसें वळवून लढाईचा बंदोबस्त केला. त्यांत त्याचें अद्वितीय सामर्थ्य दिसून आलें. शत्रूचे शूर परंतु चांगले शिकविलेले नव्हत असे घोडेस्वार पुष्कळच होते आणि त्याच्या तर सडे घोडेस्वारांच्या टोळ्यामात्र होत्या. ते स्वार रणांत युद्ध वगैरे करण्याच्या कामापेक्षां लढण्याच्या व पाठलाग करण्याच्या कामास योग्य होते. त्याचें मुख्य सेनाबळ म्हटलें तर बंदुका मारणारे लोक व तोफखाना हें होतें. असें सैन्य हिंदुस्थानच्या लढाईत आजपर्यंत पूर्वीं बहुतकरून आणीत नसत. पुढल्या बाजूस तोफा लावून त्या सांखळदंडांनीं एकास एक बांधल्या तेव्हां शत्रूस भिंतीप्रमाणें दिसल्या. त्यामागें पायदळ उभें करून मध्यें मध्यें घोडेस्वार उभे केले होते. दुसरे दिवशीं सकाळीं पठाण लोकांचें सैन्य पुढें सरसावलें आणि आपल्या दोन्ही बाजू पुढें वाढवून समोरच्या लहानशा टोळीस वेढा घातला. परंतु त्यानें आपल्या बंदुका व तोफा ह्यांच्या योगानें शत्रूंनीं सुमारें तीन प्रहरांत जे जे हल्ले केले ते ते परतविले. श-

लष्करांतील मोठें चातुर्य

प्रकरण ८
इ० स०
१५२६

वरीं शत्रूचे हल्ले पुनः पुन्हा मागें परतून लावल्यामुळें त्यांचें धैर्य खचलें व लोक थकून गेले असें पाहून बाबरानें आपल्या सेनेंतील निवडक दोन टोळ्या जमा केल्या आणि एकदम शत्रूवर हल्ला केला तेव्हां शत्रूच्या सर्व सेनेचा टिकाव लागला नाहीं.

शत्रूचें पलायन.

मोठे मोठे प्रसिद्ध सरदार त्या रणभूमीवर मरून पडले. बाकीचे लोक पळून गेले. ह्याप्रमाणें जरी हा कट अगदीं मोडला तरी तैमुराचे ह्या वंशजास जें मोठें राज्य प्राप्त झाले होतें त्याविषयीं तो निर्धास्त होता असें नाहीं. तो राज्य करीत असतां काबुलांत व तशींच हिंदुस्थानांत बंडें उठलीं आणि शेवटीं पांचच वर्षें बादशाह म्हणून राज्य कारभार करून तो सन १५३० त मरण पावला.

बाबर सर्वांत उत्तम अथवा पराक्रमी होता असें कदाचित् नसेल, परंतु हिंदुस्थानांत जे राजे झाले त्या सर्वांत बाबराप्रमाणें गुणी कोणीच नव्हता असे म्हटलें असतां चालेल.

बाबराचे गुण.

त्याचें शौर्य मोठें होतें, आणि त्यानें पराक्रमाचीं जीं कित्येक कृत्यें केलीं तीं त्याच्या प्रख्यात पूर्वजांनीं जीं कामें केलीं त्यांपेक्षां देखील मोठीं होतीं असें मानलें आहे. तथापि दुसऱ्याशीं मिळून धैर्याचीं कामें करण्याचे गुण त्याच्या आंगीं विशेष असत, परंतु पुढारी होण्याचे नसत असें दिसतें. त्याचा जितके वेळ जय झाला तितकेवेळ बहुतकरून पराजयही झाला व पुष्कळ वर्षेंपर्यंत तो जितकीं लवकर राज्यें मिळवी तितकींच लौकर गमावी. परंतु त्याच्या कारकिर्दीच्या

प्र० ८ इसवी १५३० सरदारपणा

शेवटीं लष्करी खात्यांत त्याचें शहाणपण पक्कें झालें आणि हिंदुस्थानांत ज्या मोठ्या मोठ्या लढाया झाल्या त्यांत तो केवळ सरदाराप्रमाणें वागला. शिकारींत व दांडपट्टा खेळण्याच्या कामांत त्याचें शारीर बळ व कसरत हीं दोन्ही अगदीं अलौकिक होतीं असें वर्णन केलें आहे. तो कविता करण्यांत व वाद्यें वाजविण्यांत वस्ताद होता. आणि टीका नामें ग्रंथांत त्यानें आपल्याच चरित्राच्या गोष्टी वर्णिल्या आहेत. त्या ग्रंथाचें सुंदर भाषांतर दाक्तर लिडन आणि अर्स्किन ह्यांनीं केलें आहे. जरी त्याला शास्त्रीय विचार करण्याची संवय होती असें दिसत नाहीं, तरी त्याची बुद्धि फार शोधक होती, व ज्या ज्या गोष्टी त्याच्या समक्ष घडत त्यांचा विचार करण्याची इच्छा त्यास पराकाष्ठेची असे असें दिसतें. त्या ग्रंथावरून आशियेंतील दरबारच्या व लष्करच्या चमत्कारीक रिती दिसून येतात. न्यायीपणा वगैरे जे उत्तम गुण त्याच्या आंगीं होते असें म्हणतात त्याविषयीं फारच संशय येतो. त्याचा स्वभाव प्रीतिकर, उदार, आणि निष्कपटी होता, आणि जरी रणांत आपल्या लोकांच्या चालीप्रमाणें त्यानें कांहीं घोर कर्म केल्यामुळें त्याचे आचरणास कलंक लागला तरी भूतदया व सौम्यता हे गुण त्यानें आपल्या हाडवैरी शत्रूशीं देखील पुष्कळवेळ पराकाष्ठेचे दाखविले. लढाईचे कायद्याप्रमाणें पाहिलें असतां शेंकडों व्यापारी लोकांचा माल त्यानें लुटून आपली जरूरीची गरज करून घेतली असती तर त्यास अधिकार होता. परंतु अशा वेळेसही

प्र० ८ त्यानें त्यांचें रक्षण केलें. ह्यावरून
इ० स० तो न्यायी व स्वभावानें उदार होता
१५३० असें दिसतें. राजानें जिकडे तिकडे
बंदोबस्त राखून आपल्या देशाच्या सुधारणेकडे लागणें व लोकांचें सुख वाढवणें ही आनंदाची गोष्ट आहे, व ही गोष्ट पठाणी घराण्यांत पूर्वीं गुलाम असून जे राजे झाले त्यांनीं देखील केली असें वारंवार आढळतें. परंतु बाबर स्वभावानें चांगला असून ह्या गोष्टीकडे लागला असें कोठेंच दिसत नाहीं. ही गोष्ट खेरीज आहे कीं त्याचें राज्य वगैरे निश्चित झालें नव्हतें म्हणून परोपकारी व ज्या गोष्टीस चोहोंकडे स्थिरता पाहिजे त्या गोष्टीकडे लक्ष देण्यास त्यास रिकामपण नव्हतें. तथापि त्याचा स्वभाव कलहखोर असे, व राज्यें मिळवून आपण थोरपणा मिळवावा म्हणून तो नवीन बेतकरी, त्यामुळेंच बहुतकरून त्याचे राज्यांत नेहेमी गर्दी असे. जरी त्यानें एकदा मद्यपिणें अगदींच सोडून दिलें, तरी तो पुढें अतिशय मद्य पिऊं लागला. व एकवेळ त्यानें आपले चैनी सोबती मिळवून एक मद्यपिण्याचा गोंधळ घातला, त्याचें वर्णन केलें आहे तें ऐकून आंगावर शहारा येतो. असल्या दुर्गुणांनीं त्याचें आयुष्य क्षीण झालें, परंतु राज्य कारभारांतून त्याचें लक्ष उडालें असं कधीं झालें नाहीं.

बाबर मेल्यानंतर त्याचें राज्य हुमायून नांवाच्या
बाबराच्या पु- त्याच्या पुत्रास प्राप्त झालें. त्या राज्यांत
ढील राजा. दंगे वगैरे फार असत. तो प्रीतिकर व
गुणी असे. तो कांहींशा विलक्षण परंतु चांगल्या अशा गोष्टीं विषयीं रसिक असे. तो मुख्यत्वें-

करून ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाकडे नेहमी लागला होता. त्या काळीं त्या देशांत ज्योतिषशास्त्रांत फलग्रंथ पुष्कळच मिसळले होते. त्यानें सात दिवाणखाने लोकांची भेट घेण्याकरितां तयार करून त्यांस निरनिराळीं ग्रहांचीं नांवें दिलीं होतीं. मंगळाच्या दिवाणखान्यांत लष्करी लोकांची, बुधाच्या दिवाणखान्यांत चिटणीस व न्यायाधीश ह्यांची आणि चंद्राच्या दिवाणखान्यांत वकील कवि आणि मुशाफर ह्यांची तो भेट घेत असे. ह्या मौजेच्या गोष्टी एकीकडे ठेवून राज्यकारभारांतील आवश्यक कांहीं कामें करणें प्राप्त झालें असतां तो त्या कामास ही तसाच योग्य होता, असें दिसून येतें. बहादूर ह्यानें गुजराथेंतील राज्य मिळविलें होतें त्याशीं ह्याला लौकरच लढाई करावी लागली. पूर्वीं चितूर येथील मूर्तिपूजक राजाशीं हुमायून युद्ध करीत असतां त्यानें गुजराथच्या त्या राजास कांहीं उपद्रव न देतां धर्मबुद्धीनें म्हणजे तो मुसलमान धर्माचा होता म्हणून तसेंच ठेविलें, ही त्याची चूक होती. तरी पुढें तो इतकें मोठें सैन्य घेऊन आला, व त्यानें अशा पराक्रमानें लढाई चालविली, कीं बहादूर ह्यास, रणामध्यें तोंड देऊन शत्रुशीं युद्ध करवेना, म्हणून त्यास गुजराथेंत पळून जावें लागलें. नंतर तो पनी नांवाच्या किल्ल्यांत आपला खजीना ठेवून आपण आमदाबादेस पळून गेला. तो किल्ला बहुतकरून कोणाचे हातीं लागणार नाहीं असें मानलें होतें. तथापि त्या तरुण बादशाहा-

प्रकरण ८

इ० स. १५३०

फलग्रंथांतील ज्योतिष.

गुजराथेंतील बहादूरनामें राजाचा पराभव झाला

प्र० ८ इसवी सन १५३० नें आपली निवडक फौज घेऊन ज्या पर्वतावर तो किल्ला होता त्याच्या उभ्या खडकांत लोखंडाचे खिळे रोंवून वरचढून हल्ला केला आणि किल्ला घेतला. तें पराक्रमाचें कृत्य तैमूर अथवा बाबर ह्यांनीं जे पराक्रम केले त्यांप्रमाणेंच होतें, असें प्रसिद्ध आहे. त्याचा पहिल्या लढाईत अशा प्रकारचा जय झाल्यावर आपलें राज्य बंदोबस्तानें चालून त्यांत भरभर होईल, असें त्याला वाटलें. परंतु लौकरच कामरान व हिंदाल ह्या उभयतां त्याच्या बंधूंनीं त्याला त्रास दिला. त्याचा अ-

बंड. तिशय सौम्यपणा व गरीबपणापाहून त्याच्या बंधूंनीं त्या विषयीं दुष्ट बेत धीटपणानें केले. त्यांच्या हुकमांत सर्व सेना होती म्हणून एकामागून एक ते मुख्य अधिकाराविषयीं दावा सांगूं लागले. असे कलह लागल्यामुळें त्यावेळचा बंगालचा सुभेदार शीरखान पठाण जातीचा सरदार मोठें सैन्य घेऊन हुमायून यावर चालून आला. तेव्हां राज्यांत जिकडे तिकडे गोंधळ असल्यामुळं पाहिजे तितकें सैन्य जमा करवेना. मग हुमायून पराजित होऊन आग्र्यास गेला. त्याचे बंधु आपले ऐकमत्य नसल्यामुळें राज्याचा अगदींच नाश होण्याचा सुमार आला आहे असें पाहून बादशाहा भोंवतीं जमले. तरी त्यांचीं मनें असावीं तशीं शुद्ध नव्हतीं. बादशाह आपले सैन्यांत नवीन भरणा

बादशाहाचा अगदीं पराजय; करून शीरखानावर चालून गेला; परंतु त्याचा पुन्हा अगदीं पराजय झाला; आणि आपली राजधानी सोडून देऊन हिंदुस्थानाच्या सीमेवरील लहान लहान रा-

जांपाशीं त्यास आश्रा मागणें प्राप्त झालें. तथापि त्यापदच्युत झालेल्या बादशाहाविषयीं इमानी असे थोडेच निघाले. कितीएका दरबारांत आश्रा न मिळाल्यामुळें त्याला पळून जाणें भाग आलें. नंतर मी तुझ्याशीं स्नेहानें वागेन व तुला साहाय्य करीन म्हणून मलदेवराजा त्यास म्हणत होता त्यापाशीं आश्रा मागण्यास गेला. परंतु त्या दुष्ट पुरुषानें आपणास धरून शत्रूंच्या स्वाधीन करण्याचा निश्चय केला आहे असें आढळल्यावर त्या बादशाहास असें वाटलें कीं आपले राहिलेले थोडे लोक आहेत ते घेऊन पश्चिमेकडील मैदानांतून पार सिंधु नदाच्या तिरावर आतां गेलें पाहिजे. मग तो तिकडे जात असतां जशीं संकटें त्यास भोगावीं लागलीं तशीं आशियेंतील पराकाष्ठेच्या हतभाग्य राजास देखील बहुतकरून भोगावीं लागलीं नसतील. त्याचा घोडा तहानेनें व्याकूळ होऊन व श्रम पुष्कळ झाल्यामुळें आंग टाकून मरण पावला. तेव्हां त्या सार्वभौम राजास दुसरा घोडा मिळेना. शेवटीं एकास्वारानें आपल्या आईस तूं खालीं उतरून आपल्या राजास घोडा दे असें सांगितलें. वाटेनें पाणी नसल्यामुळें फारच ते लोक व्याकूळ झाले. नंतर पुष्कळ दुःख सोसल्यावर ते एका विहिरीपाशीं आले; तींत पाणी पुष्कळ होतें. परंतु त्यांपाशीं पाणी काढण्यास एकच लोटा होता, म्हणून तो भरून काढल्यावर इतके लोक त्यावर जाऊन पडले कीं दोरी तुटून लोटा आंत पडला, त्याबरोबर कितीएक लोक खालीं डोके वर पाय होऊन विहिरींत बुडाले.

प्र० ८
इसवी सन १५३०

अतिशय दुःख.

प्र० ८ इसवी सन १५३०

मध्यें मध्यें पिछाडीच्या लोकांस जे शत्रु अगदीं जवळ येऊन भिडले होते, त्यांना पुष्कळ वेळांमागें फिरून हटवून लावणें प्राप्त पडलें. पश्चिमेकडील मैदानाच्या पलिकडचे बाजूचे तिरावर अमरकोट म्हणून शहर आहे तेथें जाऊन पोहोंचण्याच्या पूर्वीच त्यांपैकीं पुष्कळ लोक मरण पावले. अशा ह्या संकटाच्या प्रसंगीं बादशाहास कोणी येऊन सांगितलें कीं बादशाहजादी प्रसूत होऊन पुत्र झाला. जो पुढें अकबर म्हणून आशिया खंडांत मोठा पराक्रमी व कीर्तिमान होऊन गेला. परंतु तशा वेळेस तसेंच तें बाळ टाकून त्याला पुढें पळून जाणें भाग पडलें. मग एका विश्वास घातकी सरदारास तें सांपडलें त्यानें तें कामरान म्हणजे बादशाहाचा भाऊ व हाडवैरी ह्याच्या स्वाधीन केलें.

इराणच्या बादशाहानें सत्कार केला.

हुमायून पळत पळत इराणास गेला तेव्हां तेथील बादशाह शाहतमस्य ह्यानें मोठा समारंभ करून सत्कारानें बादशाहास आपल्या नगरांत आणून ठेविलें व बादशाहाचे पदवीचीं जीं बाहेरील चिन्हें तीं देखील त्याचीं तशींच ठेवलीं. त्या देशांत शयी धर्मखरा मानीत असत. तो धर्म ढोंगीपणाचा होता तरी पतकरण्याचें कबूल केल्यावर हुमायुनास त्याचें गेलेलें राज्य मिळविण्याकरितां दहाहजार लोक इराणच्या बादशाहानें कुमकेस दिले. नंतर प्रथम तो काबुलांत आला. तो प्रांत त्याचा भाऊ कामरान ह्यानें बळकावला होता. तेथें उभयतांचें युद्ध झालें. नंतर कंधारास त्यानें वेढा घातला. तें शहर लौकरच त्याच्या हस्त-

गत होऊन मोठें सैन्य, जमा करून पुन्हः काबुलावर गेला. तेथें त्याचा भाऊ त्याची वाट पहातच होता. तो पोहोंचल्यावर त्याचा मुलगा अकबर ह्यास कामरान ह्यानें एक चिते सारखें कांहीं चिन्ह करून गांवकुसाच्या भिंतीवर बांधून ठेवलें होतें. ह्यावरून असें सुचविलें कीं शहरावर हल्ला करण्याकरितां तूं पुढें येशील तर तुझ्या मुलाचा शिरश्छेद होईल. हुमायून ह्यास तें पाहून पराकाष्ठेचें दुःख वाटलें. परंतु कठोर अंतःकरण करून म्हणाला कीं हल्ला करण्याचा तर माझा निश्चयच आहे. जर तूं असें दुष्ट कर्म करशील तर मी तुझा नाश करीन, अशा रीतीनें पुष्कळ ह्यानें धाक घातला; मग त्या दुष्ट पुरुषानें जसें मनांत आणिलें होतें तसें केलें नाहीं. व त्याचे लोकांनीं पलायन करण्यास आरंभ केला. हुमायुनानें वेशींतून आंत शिरून आपल्या मुलास आलिंगन दिलें आणि तो पुन्हा पहिल्याप्रमाणें राजा झाला. त्याच्या भावानें जरी त्याला निरंतर त्रास दिला, तरी त्यानें त्या शहरांत नऊ वर्षें राज्य केलें, आणि आपल्या भावास पुष्कळ वेळां संकटांत आणून शेवटीं अगदीं त्याचा पराजय केला.

प्र० ८ इसवी सन १५३०

पुन्हा राज्य मिळालें.

शीरखान ह्यानें राज्याचा निर्विवाद धनी होऊन चोहोंबाजूस आपलें राज्य वाढविलें, व त्यानें राज्य शहाणपणानें आणि चांगल्या रीतीनें चालविलें, हें पाहून मोंगल लोकांतील इतिहास कर्त्यांस आश्चर्य वाटतें. ह्याचें कारण इतकेंच कीं त्यानें तें राजद्रोह करून मिळ-

शीरखान.

प्र० ८ इसवी सन १५३० विलें होतें. परंतु तो पठाण वंशाचा होता ह्या कारणानें बाबराच्या घराण्यास तो थोडेंच मानीत असें. वाटसरूंच्या सोईकरितां त्यानें जसे मोठे बंदोबस्त केले तसे पूर्वीच्या राज्यांत उदाहरणास देखील कोणी केले नव्हते. वाटसरूंच्या सोईचीं कामें हिंदुस्थानांत राजासच बहुतकरून करावीं लागतात. हिंदुस्थानांत पूर्वपश्चिम म्हणजे गंगेपासून सिंधु नदीपर्यंत एक सारखा मोठा रस्ता बांधला होता व त्याच्या दोहोंबाजूंनीं फळझाडें लावलीं होतीं. दरएक कोसावर एकेक विहीर खणली होती व दरएक मुकामावर धर्मशाळा बांधल्या होत्या. तेथें सरकारी खर्चानें वाटसरूंची सर्व सोय होत असे. त्याच्या राज्यांत अन्याय होत नसे; जिकडे तिकडे बंदोबस्त होता. असें राज्य करण्यांत पांच वर्षें होणार तों तो मरण पावला. तेव्हां ती गोष्ट सर्वांच्या दुःखास कारण झाली.

सद्गुणराज्य.

त्यामागें सेलीम हा गादीवर बसला.

त्याचा पुत्र सेलीमनामें होता तो बापाच्या गादीवर नऊवर्षें पर्यंत बसला होता. परंतु त्याप्रमाणें त्यास शहाणपण किंवा सामर्थ्य हीं नव्हतीं. तो मेला तेव्हां त्याचा वारस अल्पवयी होता. म्हणून महंमद आणि इब्राहिम ह्यांनीं थोडीं वर्षें राज्य केलें. त्या वेळेस राजाच्या घराण्यांत कज्जे लागून व उमराव राजप्रतिनिधि ह्यांनीं बंडें केल्यामुळें राज्यांत जिकडे तिकडे गोंधळ होऊन गेला. तेव्हां हुमायुनाच्या मित्रांनीं त्यास खात्रीनें सांगितलें कीं जर तूं मोठें सैन्य घेऊन दृष्टीस पडलास तर हें फुटाफुट झालेलें राज्य एकदम तु-

ड्या हातीं लागेल. हुमायून हा अझुनही काबूलच्या गादीवर कायम झाला नव्हता, म्हणून तसें करण्यास त्यानें बरेंच मागें पुढें केलें. परंतु त्यानें शेवटीं पंधरा हजार घोडे जमवून तो सिधुनदाकडे चालून आला. तेथें त्याचा उत्तम मतीचा सरदार बैराम आपले वाकबगार लढाऊ लोक घेऊन कंधाराहून येऊन त्यास मिळाला.

प्र० ८ इसवी सन १५३०

तें सैन्य सिधुनद उतरल्यावर लाहोरचा सुभेदार तारतारखान ह्याची प्रथम गांठ पडली, तेव्हां बैरामानें त्यावर अकस्मात् हल्ला करून त्याचा पराजय केला. दिल्लीस पठाण जातीच्या उमराव लोकांनीं दिल्लीच्या गादीवर शीरखीनाचा पुतण्या शिकंदर नामें बसविला. तो बुद्धिवान् आणि शूर असून त्यांवर अधिकार करण्यास योग्य होता. त्यानें ऐंशीं हजार लोक जमा केले आणि तो शत्रुंशीं युद्धास गेला. मग त्या उभयतांचें युद्ध तें राज्य मिळविण्यास जसें व्हावें तसें मोठ्या निकराचें झालें. मोंगलांकडे हुमायून आणि बहिराम ह्यांनीं चतुरपणानें व क्रूरपणानें युद्ध चालविलें. परंतु मुख्यत्वेंकरून त्यांत अकबरानें मोठें शौर्य दाखवून नांव गाजविलें. तो त्या वेळेस पुरता तेरावर्षांचा देखील नव्हता. तें पाहून सेनेंतील लोकांच्या मनांत हें बहुतकरून मनुष्याचें सामर्थ्य नव्हे असें आलें. शेवटीं पठाणी फौज दाणादाण होऊन अगदीं पळून गेली व शिकंदर हिंदुस्थानचा उत्तम मुलूख सोडून उत्तरेकडील पर्वतांत पळून गेला.

तारतारखानाशीं युद्ध.

अकबराचें शौर्य.

प्र० ८
इसवी सन
१५३०

हुमायून बापाच्या गादी वर बसला

हुमायून मग दिल्लीस आला आणि बापाच्या गादीवर बसला. त्याचा आणि त्या गादीचा तेरावर्षें वियोग होता. पुढें त्या गादीवर तो बसला इतकेंमात्र झालें कारण बसल्यापासून एकेवर्षाचे आंतच वाड्यांत संगमवरी दगडाचा जिना होता त्यावरून उतरत होता तों पायनिसरून पडला. आणि त्याचें आंग इतकें ठेंचलें कीं तो थोडे दिवसांत मरण पावला. तो राजा शूर, लोकांस आवडत्या गुणाचा, आणि विद्वान होता. त्याच्या जन्मांत त्यास संकटें भोगावीं लागलीं, त्याचे उदयही झाले, त्याप्रमाणें आशियेंत कदाचित् कोणत्याच राजाचें झालें नसेल. ह्याचें कारण त्याचा अतिशयित सौम्यपणा होता. तो आपल्या भावाशीं योग्य नसतां सौम्यपणानें वागला, हेंच मुख्य कारण झालें. फेरिस्ता नामें इतिहास कर्ता असें देखील म्हणतो कीं जर त्याच्या आंगीं वाईटपणा म्हणजे कडकडीतपणा असता तर तो ह्या पेक्षांही मोठा राजा होता. हें खचीत आहे कीं आशियेंतील राजांच्या इतिहासांत क्रूर कर्में फारच भरलीं आहेत; त्याविषयीं सबब सांगतात कीं सौम्य राजा असला तर राज्य नीट चालणार नाहीं. हे ह्या उदाहरणावरून स्पष्ट ध्यानांत येतें. यूरोपखंडांत असा नियम ठरून गेला आहे कीं स्थावर माल वडील मुलास व त्याचे वंशजास मिळतो व तो नाहींसा झाला तर धाकट्या मुलास मिळतो. तसा नियम आशियेंतील लोकांत नाहीं. म्हणून राजकुळांतला कोणी पुरुष आपल्याकडे कांहीं लोक मिळवील किंवा लोकांची प्रीति संपा-

दील तर तो गादीवरील राजास हांकून देऊन राज्यपद आपण घेईल असा संभव आहे. प्र० ८ इ० स० १५३०.

हुमायुनाच्या मागें सन १५५६ त अकबर राज्य करूं लागला. त्यानें ५१ वर्षें राज्य केलें. हिंदुस्थानांत पराक्रमी आणि शहाणे जे राजे झाले त्या सर्वांत ह्याप्रमाणें पराक्रमी व शहाणा कोणीच निघाला नाहीं. अकबर गाद्यावर बसला. त्याला ह्या मोठ्या राज्याचा अधिकार प्राप्त झाला तेव्हां तो तेराच वर्षांचा होता, म्हणून त्याचे राज्यांत फार विघ्नें आलीं. देशांत जिकडे तिकडे बंडें उठलीं. तीं बहुतकरून जे बडे लोक कांहीं प्रांतांविषयीं अधिक हक्क असल्यामुळें भांडत होते त्यांनीं उठविलीं होतीं—तीं बंडें पठाण जातीचे उमराव, रजपूतराजे, आणि कधींकधीं त्याचेच बिथरलेले अम्मलदार उठवीत. ह्या शत्रूंशीं त्यानें युद्धें केलीं त्यांत बुद्धि व शौर्य हीं दृष्टीस पडलीं. तें जातीचें शौर्य मोठ्या सेनापतीच्या पेक्षां एकांगी सरदारास योग्य होतें हें खचीत आहे. बंगालचे बंडखोर लोकांशीं युद्ध करण्यास जात असतां मध्यें गंगानदी लागली ती उतरून जाण्यास त्यापाशीं कांहींच साधन नव्हतें व ती उतरण्याविषयीं तर तो अगदीं उतावळा झाला होता. तेव्हां एकाएकीं आपले निवडक शंभर घोडे पलीकडचे काठीं नेले आणि जवळचे प्रांतांतील थोडे लोक जमाकरून तो हल्ला करण्यास नीट चालता झाला. शत्रु तर मोठा प्रवाह मध्यें आहे म्हणून आपणास कांहीं भय नाहीं असें मानून बिनघोर नाच तमाशे मेजवान्या ह्यांच्या गर्दींत होते; म्हणून बा-

प्र० ८
इ० स०
१५३०

बंगाल्यांतील बंडवाल्यांचा पराजय

दशाहाच्या आगमनाचे वेळेस तंबूर वाजत होते त्यांचा शब्द एकाएकीं कानीं पडला, तेव्हां ते घाबरे होऊन त्यांची त्रेधा झाली. नंतर लौकरच त्या सेनेचा घोटाळा होऊन गेला. असें आशियेंत नेहमी होत असतें. अकबर लागलाच बंडाचा पुढारी जो जीमन ह्याच्या तंबूंत जोरानें शिरला, तेव्हां जीमन ह्यानें शौर्यानें युद्ध केल्यावर मरण पावला. मग त्याची सर्व सेना मुख्य अधिकारी नसल्यामुळें शत्रूचे थोडे लोक असतां ही पळून गेली ती पुन्हा जमली नाहीं.

मोंगलसरदारांचें बंड.

दुसरेवेळेस अशी बातमी आली कीं कित्येक मोंगल सरदारांनीं गुजराथेंत बंड उठविलें आहे व त्यांनीं तेथील राजधानी अहंमदाबाद तिला वेढा घातला आहे. तत्क्षणींच त्यानें आग्र्याहून दोनहजार स्वार तिकडे रवाना केले आणि मागाहून आपली निवडक टोळी घेऊन तो गेला. तो दररोज चाळीसकोस चालून आठवडा होऊन कांहीं दिवस होतात तों लढाईच्या ठिकाणीं जाऊन पोहोंचला. शत्रूचे चार ( बातमीदार ) विचारूं लागलें कीं हें सैन्य कोणाचें आहे तेव्हां कोणीं सांगितलें कीं हें राजाधिराजाचें आहे. नंतर ती बातमी लष्करांत गेली तेव्हां बंडवाल्यांस तो ईश्वरी चमत्कार वाटून ते पळून जात होते, परंतु मोठ्या संकटानें राहिले, मग

त्यांचा अगदीं पराजय.

त्यांस रणांत जाणें भाग पडलें. नंतर लागलीच लढाई होऊन त्यांचा पराजय झाला व त्यांचा सेनापति सांप-

डला. अकबर आपले शिपाई शत्रूच्या पाठीस लागले असतां दोनशें लोक घेऊन एका टेंकडीच्या उंच माथ्यावर उभा राहिला होता. इतक्यांत शत्रूच्यानें जे पांच हजार घोडे मुख्य लढाईत आणवले नव्हते ते आपणाकडे चालून आले असें अकबराच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याचे सरदार ह्यावेळेस मागें जावें दुसरा उपाय नाहीं असें सांगूं लागले,परंतु अकबरानें ती अपकीर्तीची गोष्ट न ऐकून आपले तंबूर वाजविले आणि आपले थोडे लोक असतां ही मोठ्या सेनेची अघाडीची टोळी आहे अशा आवाईनें ते युद्धास गेले. त्यायोगें शत्रूचें सैन्य फसून पळालें. तेव्हां कितीएक कोस पर्यंत बादशहाचे लोक त्यांच्या पाठीस लागले. त्याच दिवशीं बादशाह अहंमदाबादेंत शिरला आणि शेंवटीं बंड अगदींमोडून टाकलें. दुसऱ्या एक्या प्रसंगीं दीडशेंच घोड्यानिशीं बादशाहानें एक्या मोठ्या टोळीच्या पिछाडीच्या लोकांवर हल्ला केला आणि कांहींशी सर केली. तेव्हां सर्व लोक इतके विस्मित झाले कीं ते भिऊन चोहोंकडे पळाले. नंतर त्याला बंगाल्याचा सुभेदार दाउद ह्याशीं लढाई करण्याची वेळ आली. तेव्हां बादशाहानें त्यास तुझेंमाझें दोघांचें युद्ध होऊंदे असें धडधडीत सांगितलें. तेव्हां सुभेदार लढाईत बादशाहाशीं तोंड न देतां गुपचूप नाहींसा झाला.

प्रकरण ८ इ० स० १५६५.

हीं कृत्यें सेनेच्या नियमास अगदीं अनुसरून नव्हतीं, व ज्याची प्रजा पांच कोट व सैन्य मोठें अशा राजास अयोग्य अशीं होतीं. तथापि हिंदुलोक व आशियेंतील सर्व लोक ह्यांच्या मनावर ह्या अद्भुत गो-

अकबराच्या पराक्रमाच्या कृत्यांची गणना.

प्रकरण ८
इ० स०
१५६५

ष्टींचा ठसा इतका विलक्षण होतो कीं कांहीं एकादें चमत्कारिक कृत्य असलें पुरे म्हणजे त्याचें वर्णन ते अतिशयोक्तीनें करतात. अशी त्यांस संवयच आहे. ह्यामुळें अकबरानें हिय्याकरून पराक्रमाचीं जीं मोठीं कृत्यें केलीं त्यायोगानें त्या सर्व लोकांच्या दृष्टीनें त्याचे गुण दुर्ज्ञेय व तो ईश्वरी अंश आहे असे वाटे. ह्यायोगानें शत्रूचीं मनें खचून जात. व ह्या कारणानेंच त्याला मोहिमेच्या समयीं बेतानें व अकलेनें लढाई करून जय मिळविण्यापेक्षां निश्चयानें व साहसानें जय मिळविणें भाग पडे. ह्याप्रमाणें त्यानें मध्यभागच्या प्रांतीं जिकडे तिकडे बंदोबस्त व अबादानी राखली होती, इतकेंच नाहीं. परंतु बंगाल, गुजराथ, आणि दक्षिणेचा कांहीं भाग हस्तगत करून मुसलमान राजांच्या ताब्यांत पूर्वीं कधीं जो मुलूख होता तो बहुतेक त्यानें आपल्या ताब्यांत आणला.

त्याचे ग्रंथ करण्याचे श्रम.

त्यानें मोठे उपयोगी जे ग्रंथ केले त्यांत अईन अकबरी म्हणून एक ग्रंथ आहे त्यांत राज्यांची सर्व पाहणी आपण व आपला बुद्धिमान व ज्ञानी प्रधान अबुलफजर ह्यानें केली ती सविस्तर लिहिली आहे. त्यांत राज्य व राजाधिकार ह्यांविषयीं आणि बहिरी ससाणें बाळगणें व तित्तिरपक्षी धरणें अशा हलक्या धंद्यापासून राज्यांतील मोठाल्या कामापर्यंत धंदे ह्या सर्वांविषयीं प्रत्येक गोष्टीचें इत्थंभूत वर्णन केलें आहे. कांतर तो बढाईनें सांगतो कीं मी विश्रांती करितां पारध करतों त्यांत देखील आपल्या कामदारांत कोणाचा स्वभाव कसाआ-

हे हें ध्यानांत आणतों. निरनिराळ्या प्रांतांची लांबी रुंदी व कोठेंकाय उत्पन्न होतें ह्याविषयीं हिशेब लिहून ठेविले आहेत. तेतर फारच उपयोगी आहेत. ते कागदपत्र जमाबंदी नीट रहावी म्हणून मुख्यत्वेंकरून जमविले होते असें दिसतें. ह्यांत अकबर असें लिहितो कीं माझ्या पूर्वींच्या राजांनीं लोकांपासून जे कर घेतले ते बहुतेक मी सोडिले तथापि त्याला जो कर मिळत असे तो कमी होता असें नाहीं अकबर जमिनीच्या सर्व उत्पन्नापैकीं एकतृतीयांश जमीनीचा सारा म्हणून घेत असे. तो असें लिहितो कीं पूर्वीं हिंदुराजांच्या कारकिर्दींत ते राजे जमिनीच्या उत्पन्नाचा षष्ठांश मात्र घेत असत. आणि इराणांतील राजे एक दशांश घेत असत. परंतु तो म्हणतो कीं त्यावेळच्या सरकारांत रयतेवर दुसरे पुष्कळ हक्क असत, ते देण्यास लोकांस फार संकट पडे. अकबरानेंतर जमिनीच्या उत्पन्नावरील कर खेरीजकरून सर्व कर सोडून दिले. त्यानें कर सोडून दिले त्यांपैकीं डोईपट्टी, मजूरदार, व मासे धरणारे कोळी ह्यांवरील पट्टी, हरएक झाडावरील बैलावरील, व गुरें विकलीं असतां शिंगोटी म्हणून कर द्यावालागत असे तो, असे कर होते. व ज्या करांमुळें व्यापार नीट चालण्यास प्रतिबंध होत असे ते किंवा गरीब लोकांस देण्यास फार संकट पडे ते सर्व त्यानें बुडविले. जरी लोकांपासून पुष्कळ उत्पन्न मिळत असे तरी त्याची वसुलाची रीति बहुतेक लोकांस बरीच सुखावह झाली असें दिसतें.

प्रकरण ८ इ० स० १५६८

रयतेस अवडती कारकीर्द.

नं. 60

प्रकरण ८
इ० स० १५६८.

मोंगलांच्या दरबारीं पाद्री आले.

अकबराच्या कारकिर्दीत युरोपियन पाद्रीलोक धर्माच्या उद्देशानें मोंगलांच्या दरबारीं येऊन पोहोंचले. अमक्याच धर्मावर अकबराचा अभिमान असे असें दिसत नाहीं. परंतु मनुष्यांमध्यें निरनिराळ्या धर्मामुळें निरनिराळे भेद झाले आहेत व कोणाचे पूजेचे व श्रद्धेचे कायमकार आहेत ह्या सर्वांविषयीं माहिती व्हावी म्हणून त्याला फार उत्कंठा होती असें दिसतें. म्हणून पृथ्वीवरील दूर देशाहून नवीन लोक आले आहेत व त्यांचा धर्म हिंदुस्थानांतील धर्मापेक्षां निराळा आहे असें ऐकिल्यावर त्यांची भेट घ्यावी व त्यांशीं संभाषण करावें असें त्यास वाटलें. नंतर त्यानें पोर्तुगीज लोकांस गोंवें येथें एक पत्र रवाना केलें आणि त्यांत विनंती लिहिली होती कीं कांहीं पाद्रीलोकांनीं आपलीं धर्मपुस्तकें घेऊन इकडे यावें व ते आले असतां त्यांची उत्तम प्रतीची मानमान्यता होईल. तेव्हां युरोपियन लोकांस मोंगलांचें नांव ऐकूनच भिती वाटत असे. परंतु जे धार्मिक पुरुष हें कामकरण्यास निवडले होते त्यांनीं निश्चय केला कीं असा समय आला आहे हा भयानें टाळूंनये. मोंगलाच्या दरबारीं गेलें असतां कदाचित् पुढें फार चांगले परिणाम होतील. संन १५६८ त डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या तारखेस अक्काविवा, मान्सरेट, आणि एन्रिकस असे तिघे पाद्री सुरतेस येण्याकरितां निघाले.

त्याशहरास पोहोंचल्यावर ते पाद्री बादशाहाचे स्वारांनिशीं प्रथम तापीनदी उतरून नंतर नर्मदा उतरले

नंतर मांडू शहरावरून पुढें गेले. तें शहर मोडलें होतें तरी त्या शहराचा परिधि चोवीसकोसांचा होता त्यावरून तें पृथ्वीवर मोठेंच शहर होतें असें वाटलें. मग ते उज्जनी म्हणून मोठें शहर आहे तेथें आले. ते वाटेनें जात असतां वाणी लोकांच्या वेड्या वेड्या चाली त्यांच्या दृष्टीस पडल्या. ते लोक कोणताही जीव मारीत नसत व मरत असला तर पाहत नसत. ते दुखणें करी व म्हातारपणानें जख झालेले आपले लोक ह्यांची तजवीज करीत नसत तरी नानाप्रकारचे पक्षी व पशु ह्यांकरितां त्यांनीं मोठमोठाले दवेखाने घातले होते. पोर्तुगीज लोकांच्या एक्या कामदारानें पुष्कळ कुत्रीं जमवून ह्याबदल मला खंडणी न दिली तर मी ह्यांस मारून टाकीन असा धाक घालून पुष्कळ पैसा त्या लोकांपासून काढला. त्या पाद्रींनीं दरदर शहरांत ज्या बायका सती गेल्या होत्या त्यांचें स्मरण राहण्याकरितां निरनिराळ्या आकारांची आणि तऱ्हांचीं थडगीं व दीपमाळा बांधल्या होत्या त्या पाहिल्या. त्या पाद्रीलोकांचें रूप व पोशाक विलक्षण पाहून कधींकधीं लोक त्यांचा अपमान करीत व खदखदा हांसत, परंतु मोंगलांचे लोक त्यांच्या रक्षणार्थ होते त्यांनीं त्यांस कांहीं इजा होऊं दिली नाहीं. त्यांनीं गंगेहून क्षौर पूर्वक स्नानें वगैरे करून जाणाऱ्या पुष्कळ यात्रेकरूंच्या टोळ्या पाहिल्या. शेवटीं फेब्रूआरी महिन्याचे १९ सावे तारखेस ते पाद्री आले. त्यांच्या सन्मानार्थ घोडेस्वार, उंट, व सांडणी आल्या होत्या. त्यांनीं मोठ्या

प्रकरण ८ इ० स० १५६८.

वाणीलोकांच्या विलक्षण गोष्टी.

प्रकरण ८
इ० स०
१५६८.

सन्मानानें त्या पाद्रींस त्यावेळेस फत्तेपूर येथें बादशाह राहत होता तिकडे नेलें.

अकबरानें पाद्रीलोकांचा सत्कार केला.

ते तेथें पोहोंचल्यावर लागलीच अकबरानीं त्यांची भेट घेतली. तेव्हां ते लिहितात कीं तो सुमारें पन्नासवर्षांचा होता. त्याचा रंग गोरा व त्याच्या तोंडावरून तो बुद्धिवान् होता असें दिसून आलें. त्यानें त्यांचा फार चांगला सत्कार केला. तो त्यांस जो पाहिजे तो पदार्थ व पैसा देखील देत होता. परंतु ते कांहींच घेईतना तेव्हां त्यास ते फारच थोर आहेत असें वाटलें. त्यांनीं एक क्रूस बादशाहास दाखविला. तेव्हां त्यानें निष्पक्ष पातानें व सन्मानानें गुडघे टेंकले व मस्तक नम्रकरून दंडवत घातलें. तात्पर्य मुसलमान, क्रिस्ती, व हिंदू ह्या सर्वांच्या चालीप्रमाणें त्यानें पूज्यत्व बुद्धि दाखविली. वर्जिन मेरीची मूर्ति अलंकार वगैरे घालून भूषित केली होती ती ह्यापाद्रींनीं अकबरास दाखविली, तेव्हां तो ती पाहून दिपून गेला आणि ती साक्षात् आदिमायेची प्रतिमा आहे असें म्हणाला, ह्मणून वर्णिलें आहे. परंतु ती मूर्ति पाहून तो दिपून गेला ह्या विषयीं त्याच्या स्वभावावरून संशय वाटतो. त्या पाद्रींनीं बैबल म्हणजे धर्मपुस्तक चार भाषेंत लिहिलेलें बादशाहापाशीं दिलें तेव्हां त्यानें नमन करून तें शिरसा वंद्य केलें.

बैबलाचा सत्कार.

नंतर त्यांनीं विनंती केली कीं आमचा मुल्ला ( म्हणजे मुसलमान धर्मांतील विद्वान. ) ह्याबरोबर धर्मसंबंधी वाद चौघांदेखतां व्हावा येवढें आमचें मागणें आहे. तें लागलेंच मान्य झालें. आणि ते पाद्री असें सांगता-

त कीं आम्हीं जों प्रमाणें सांगितलीं त्यां वर त्यांचानें कांहींच उत्तर करवलें नाहीं, परंतु हेंही कबूल करणें भाग आहे कीं आमच्या वादानें ज्या शत्रूंच्या डोळ्यां-वर अज्ञानाचीं पटलें आलीं होतीं त्यांच्या मनावर कां-हींच ठसा उठला नाहीं. तथापि बादशाहानें उघड सांगितलें कीं तुमचा वादविवाद पाहून माझें समाधान झालें. आणि त्याच्या बोलण्यावरून असेंही दिसलें कीं शेवटीं हा आपला धर्म सोडून आमच्या धर्मांत येईल. परंतु महिन्यांचे महिने निघून चालले तरी त्यानें पूर्वी प्रमाणेंच अनुवृत्ति राखली होती. व निरनिराळ्या स-बबा सांगून कोणत्याही गोष्टीचा निकाल करणें टाकलें. शेवटीं दरबारच्या एका गृहस्थानें घरगुती रीतीनें त्या पाद्रींस खचित् सांगितलें कीं तुम्हीं व्यर्थ आशा बाळ-गीत आहां. बादशाह तेवढ्यानेंच संतुष्ट आहे कीं आ-पल्या दरबारीं नानातऱ्हेचे व नाना मतांचे लोक, त्यां-त मुख्यत्वेंकरून तुमच्या सारखे चमत्कारीक व अपूर्व लोक राहत आहेत. तुमचा धर्म स्वीकारावा हें त्याच्या स्वप्नांत देखील नाहीं. ही गोष्ट खचित आहे कीं त्या पाद्रींनींच कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत त्यांवरून अ-सा संशय येतो कीं बादशाह त्यांची थट्टा वगैरे करून आपणास रंजवावें म्हणून त्यांस ठेवून घेत होता. बा-दशाहानें त्यांस असें कळविलें कीं कुराण हातीं घेऊन एक मोठा आमच्या धर्मांतील विद्वान भट्टींत उडी घाल-ण्यास कबूल आहे आणि जर त्याला किं-वा त्याच्या पुस्तकाला कांहीं झालें नाहीं तर आमचा धर्म तुमच्या धर्मापेक्षां चांगला

प्रकरण ८ इ० स० १५६९.

धर्मखरा पाहाण्याची नवीन रीत.

प्रकरण ८
इ० स०
१५६८

हें सिद्ध होईल, त्यापक्षीं तुह्मी ही आपलें धर्मपुस्तक घेऊन असे करा म्हणजे काय तें समजेल, तेव्हां त्या धर्माध्यक्षांस ईश्वरी शक्ति आपल्या ठिकाणीं आहे असा ते बहाणा करीत होते म्हणून त्यांस ती गोष्ट ऐकून नाहीं म्हणणें कठीण पडलें. मग त्यांनीं बादशाहास खात्रीनें सांगितलें कीं पुष्कळवेळां धर्माविषयीं संभाषण झालें, त्यांत आम्हीं जीं प्रमाणें दाखविलीं त्यांवर तुमच्यानें उत्तर देखील झालें नाहीं व त्यांचें पुन्हा उपपादन करण्यास आम्ही सिद्ध आहों असें असून आम्हीं अयुक्तिक व ज्यांत धोका मोठा अशा कृत्यानें सत्य गोष्टीचा निर्णय करावा हा अन्याय आहे. मग दुसरी सभा झाली तींत पूर्वींच्या प्रमाणेंच शेवट झाला, परंतु अकबरानें पुन्हा पहिली गोष्ट काढली कीं जर तुम्हांपैकीं एकजण मागाहून उडी टाकण्याचें वचन देईल, तर पहिल्यानें मौलवी उडी टाकील. व त्यानें असेंही सुचविलें कीं हा मौलवी अशा मोठ्या गोष्टी सांगत आहे, त्याची परीक्षा पाहण्याकरितां हें म्हणणें आहे त्यापक्षीं तुम्ही कबूल व्हा. परंतु त्यांनीं विचार करून शहाणपणानें निश्चय केला कीं अशा संशयित गोष्टीवरून धर्माचा निर्यण करणें नीट नाहीं. मगही मौज पाहण्याविषयीं बादशाहाची निराशा होऊन व नवीन गोष्टीकडे प्रीति फार असते, तीही हे जुनेंझाल्यामुळें कमी होऊन बादशाह त्यांची भेट घेण्याचें मानसिक करूं लागला. शेवटीं काबूल व बंगाल येथें बंडें उठलीं तेव्हां त्याचें लक्ष त्यांकडे लागलें आणि हा

धार्मिक पुरुषांची त्यास अगदींच विस्मृति पडली. मग आतां आपलें येथें राहण्याचें प्रयोजन नाहीं असें पाहून ते पाद्री सन १५८३ चे मे महिन्यांत गोंव्यास परत गेले.

प्रकरण ८
इ० स०
१५९१
पाद्री गोंव्यास परत गेले.

सन १५९१ त त्यानें पुन्हा पाद्रीलोक पाठवावे म्हणून बोलावणें पाठविलें, ते लोक पूर्वीच्याच वाटेनें गेले व त्यांचा आदर सत्कार होऊन पूर्वींच्या प्रमाणेंच शेवटीं त्यांच्याकडे दुर्लक्ष झालें. तेथें ते लोक फारदिवस राहिले नाहींत. पुढें चारवर्षें गेल्यावर त्याला तीच इच्छा पुन्हा झाली मग त्यानें पुष्कळ वचनें देऊन व कृपेचे लेख लिहून पत्रें पाठविलीं. तेव्हां गोंवें येथील सरकाराच्यानें तिसऱ्यानें ही ती गोष्ट नाकबूल करवेना. त्यावेळेस बादशाहाचें दरबार लाहोरास होतें म्हणून त्या पोर्तुगीज लोकांस दमन येथें जाऊन त्यावाटेनें खंबायतास पोहोंचून नंतर पश्चिमेकडील मोठे मैदानांतून जाणें भाग पडलें. वर सांगितलेल्या शहराजवळ त्यांनीं वीस हजार लोक भागीरथीस चालले होते ती यात्रा पाहिली व त्यांची गंभीर आणि संभावितपणाची वर्तणूक पाहून हे मोठे योग्य आहेत असें त्यांस वाटलें. ते त्या मैदानांतून गेले तेव्हां त्यांबरोबर सोबतीला चारहजार उंट, पुष्कळ घोडेस्वार, आणि पायीं चालणारे शेंकडों लोक होते. ते पाद्री ३३० कोश त्या भयाण व रुक्ष प्रदेशांतून गेल्यावर लाहोरास गेले. तें शहर फार मनोहर होतें असें म्हणत असत. मग बादशाह तेथील नदीमध्यें

पाद्री दुसऱ्यानें गेले.

भागीरथीची यात्रा.

प्रकरण ८ एकबेट होतें त्यांत राहत असे, त्या
इ० स० ठिकाणीं त्यालोकांस नेलें. तेव्हां बाद-
१६०५ शाहानें त्यांचा फारच आदर सत्कार केला. वर्जिन मेरीची मूर्ति बुत्थ्या अलंकार वगैरे घालून अशी भूषित केली होती कीं, ती पूर्वींच्या पेक्षां ही सुंदर दिसली. ती पाहून अतिशयित आनंदाचीं व आश्चर्याचीं भाषणें त्याच्या तोंडांतून आलीं. अकबराला द्रव्याची गरज लागली तेव्हां मुसलमानांच्या कबरा फोडण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं त्यावरून तो मुसलमान धर्माचा पक्षपाती नव्हता असें दिसून आलें. तेव्हां ह्यांस आपला धर्म बादशाह स्वीकारील अशी जास्ती आशा लागली. तरी ही तो सूर्याची पूजा लक्ष लावून करी, तें पाहून त्यांचें धैर्य खचलें. ते त्यास असादेखील दोष लावतात कीं तो आपणास ईश्वरी अंश मानीत असे, हा त्याचा मूर्खपणा होता. दररोज प्रातःकाळीं तो खिडकींत बसे आणि शेंकडों लोक खालीं येऊन दंडवत घालीत, तें तो पाही. लहान रोगीमुलेंही त्याचा आशीर्वाद घेण्याकरितां येत असत. परंतु आशियेंत सन्मान देण्याची चाल पराकाष्ठेची आहे ती न समजून त्याची ते पूजा करतात असें त्या पाद्री लोकांस वाटलें. आपला उद्देश सिद्धीस जात नाहीं असें समजून ते पाद्री बादशाह दक्षिणेंत लढाई चालली होती तिकडे जावयास निघाला ती संधी साधून सेनेबरोबर कांहीं मजला पर्यंत सोबतीनें जाऊन गोंव्यास गेले.

सन १६०५ यांत अकबर मृत्यु पावला, त्यानें

एकावन वर्षें राज्य केलें. त्याचा सेलीम नामें एकच पुत्र राहिला होता तो गादीवर बसला व तो पुढें पराक्रमी होईल असें दिसत होतें. त्यानें कांहींशा बढाईनें आपणास जहांगीर ( संपूर्ण जग जिंकणारा ) असा किताब घेतला. कित्येक मोठ्या लोकांनीं त्याचाच मुलगा खुस्रू म्हणून होता त्यास जहांगिरास काढून गादीवर बसवावें असा बेत केला, परंतु त्यांचा कट व्यर्थ होऊन त्या राजपुत्रास बापास शरण जाणें भाग पडलें, मग त्यास क्षमा केली. तथापि पुढें लौकरच नवीन लोक त्यास मिळाल्यावर सेनेच्या जोरानें पुन्हा यत्न करून पहावा असें त्यास धैर्य आलें. तरी बादशाहास मारेकऱ्याकडून मारवावें अशी मसलत कोणी सांगितली, तेव्हां त्यानें रागानें त्या मसलतीचा तिरस्कार केला आणि तो म्हणाला कीं लढाईकरून दैवाची परीक्षा पाहीन. परंतु बापास मारून कलंक लावून घेऊन राज्यावर बसणार नाहीं. इतकी त्याची अजूनही बापावर भीति होती. पहिल्यानें दिल्ली व आग्रा ह्यांच्या मधील देश त्यानें उद्ध्वस्त केला. हा त्याचा कांहींसा जय झाला. परंतु बादशाहाचे मोठे सैन्यानें त्यास गांठल्यावर तो लाहोरास पळून गेला. त्या शहराजवळ त्याची अगदीं दाणादाण होऊन तो सिंधुनदांतून जात असतां सांपडून कैदी झाला. खुस्रूला त्याच्या बापापुढें नेलें तेव्हां त्यानें आपला अपराध कबूल केला; परंतु आपणाकरितां दुसऱ्याचें नुकसान

प्रकरण ८
इ० स० १६०५.

अकबराच्या मागून त्याचा पुत्र गादीवर बसला.

सेलिमाला काढण्याचा बेत.

प्रकरण ८
इ० स०
१६०६

न व्हावें म्हणून' ज्या मजकुरानें त्याचे साग्ये सांपडतील असा मजकूर त्यानें कांहींच कबूल केला नाहीं. ही गोष्ट त्याच्या मनांत चांगली आहे असें ठसलें होतें. तथापि त्याला एक्या लहानशा कोठडींत सक्त कैदेंत ठेविलें होतें व दररोज त्याचे जिवलग मित्र व एकनिष्ठ चाकर ह्यांस पराकाष्ठेचे हाल करून मारून टाकीत हें पहावयास त्याला नेत तेव्हां त्यास अतिशय दुःख होई. दहावर्षांनंतर तो कैदेंतून सुटला. परंतु त्याचा भाऊ शहाजहान ह्यानें मारेकऱ्याकडून लागलेच त्यास मारविलें.

जहानगिरानें जें घोरकर्म करून राज्य करण्यास आरंभ केला, तें कर्म दुर्दैवानें कांहीं गोष्टी एकदम घडून आल्यामुळें त्यास करणें भाग पडलें. तार्तरी देशची एक तरुण स्त्री दिल्लीस कोणी आणली होती. ती त्या देशाजवळच्या मैदानांत जन्मली होती व गरिबाच्या पोटची खरी परंतु मोठ्या कुळांतली होती. ती दिल्लीस आल्यावर मोठी झाली. ती हिंदुस्थानांतील सर्वस्त्रियांत उत्तम व गुणी अशी मानली होती.

नूरमाहाल.

तिला म्हरआलूनिसा (स्त्रियांचा सूर्य) असा किताब होता. परंतु पुढें तिला नूरजहान व कधींकधीं नूरमहाल असें म्हणत असत. राज्यावर बसण्याचे पूर्वी बादशाहाचे दृष्टीस ती पडली तेव्हां तो तिच्या सौंदर्यानें दिपून गेला व तिला ही राजा आवडला होता. परंतु शीर अफूकन नामें तुर्कलोक मोठा अम्मलदार होता त्यानें तिला मागणी घातली होती त्यामुळें त्या उभयतांचा संबंध झालाच होता. तो तुटण्या सारखा

नव्हता. अकबरानें आपल्या पुत्रास ती प्रकरण ८
आवडली असें जाणलें होतें.— तरी इ० स०
ज्यानें मागणी घातली होती त्याशीं १६०६
लग्न होण्यास हरकत न व्हावी म्हणून आग्रह धरला, ही गोष्ट स्तुत्य केली खरी ; तरी तींत शहाणपण केलें असें नाहीं. पुढें तो मुलगा राज्यावर बसतांच त्यानें आपली दुष्ट इच्छा पुरविण्याकरितां शीर अफूकन ह्यास ठार मारावें अशी तजवीज काढली. तथापि शीर अफूकन इतका शूर व लोकांस प्रिय होता कीं त्याच्यानें त्यास उघडमारून टाकवेना. मग पराकाष्ठेची नीच युक्ति करणें त्यास भाग पडलें. त्यानें अशी युक्ति केली कीं शीर अफूकन ह्याची वाघाशीं व हत्तीशीं कांहीं प्रसंग आणून झोंबी लाविली. तींत तो मरावा असें मनांत होतें; परंतु दोहोंवेळेसही तो आपल्या अलौकिक बळानें झटून पार पडला. शेवटीं कुतुब म्हणून एक वडा लोक होता त्यानें मी तुझ्या प्रतिस्पर्ध्यास मारून टाकतों असें कबूल करून बादशाहापासून बंगालचा सुभा आपणाकडे करून घेतला. शीर अफूकन ह्यास मारण्यास चाळीस मारेकरी झटत होते. तितक्यांचें ही कांहीं चालेनासें करून टाकल्यावर त्यावर हल्ला करण्याकरितां लहानसें सैन्य घेणें अवश्य पडलें. मगदेखील शीर अफूकन ह्यानें मोठा पराक्रम करून आपला शत्रु कुतुब हत्तीवर आपल्या मुख्य वडेलोकांसहवर्तमान बसला असतां मारून टाकला. व शीर अफूकन ह्यावर जेव्हां भाले चोहोंकडून पडले तेव्हां तो जेर होऊन पडला. अशी निंद्यगोष्ट झाल्यावर जिची बादशाहास आवड होती ती सुंदरी स्त्री दैवास आलें तें

प्रकरण ८
इ० स.
१६०८

भोगण्यास निमुटपणें सिद्ध झाली. परंतु बादशाहाच्या स्वभावास हें निद्यकर्म अनुरूप नव्हतें म्हणून त्याला त्याकर्माविषयीं इतकें वाईट वाटलें कीं चारवर्षेपर्यंत त्यानें तिचें तोंड पाहिलें नाहीं, आणि राजवाड्याच्या एका कोंपऱ्यांत तिला ठेवलें होतें, व तिच्याकडे तो जात नसे. शेवटीं तिनें कांहीं युक्तीनें बादशाहाचे मनांत प्रीति उत्पन्न केली. नंतर ती अगदीं पट्टराणी झाली. तिचे सर्व नातलगलोक राज्यांतील पहिल्याप्रतीच्या मोठ्या कामावर झाले, आणि तिच्या बापास मुख्य वजिराचें काम मिळालें. हीं गोष्ट चांगली झाली कीं त्या अधिकारास जे गुण पाहिजेत ते सर्व त्याच्या आंगीं होते. तो मोठ्या जागेवर चढला म्हणून कोणाचे मनांत हेवा उत्पन्न झाला नाहीं, आणि जहानूगीर ऐषआरामांत चूर होऊन काम पहात नसे, तरी हिंदुस्थानांत बंदोबस्त त्यावेळेस चांगला होता असें वर्णिलें आहे.

ह्या राजाचे कारकिर्दींत दोनवेळ इंग्लिश पाद्री

इंग्लिश पाद्री लोक.

ह्याचे दरबारीं गेले, त्यांनीं जें वर्णन केलें आहे त्यावरून बादशाहाचे दरबाराविषयीं आशियेंतील इतिहास कर्त्यांच्या डौली व पोकळ लेखांपेक्षां कांहींसा बराबर मजकूर समजतो.

कपतान हाकिन्स.

सन १६०७ तांत कपतान विलियम हाकिन्स ह्यास इंग्लिश कंपनीनें कपतान किलिंग ह्या साहेबाबरोबर हिंदुस्थानाशीं व मुख्यत्वेंकरून मोंगलांच्या मुलखाशीं व्यापाराचा आरंभ करण्याकरितां पाठविलें होतें. हाकिन्स हा सोकोत्रा एथें किलिंग ह्यास सोडून सन १६०८ त आगस्त

महिन्याचे २४ वे तारखेस सुरतेस ये- ऊन पोहोंचला. मग लागलीच तेथील सुभेदाराची भेट घेतली. परंतु त्याला असें कळून आलें कीं माक्रिब्रखान म्हणून राजप्रतिनिधि खंबायत येथें राहतो त्याला लिहून पाठविल्याशिवाय आपला माल खुष्कीवर आणण्याची परवानगी मिळणार नाहीं. मग तिकडे लागलाच हलकरा पाठविला, तरी पर्जन्य पुष्कळ असल्यामुळें व नद्यांस पूर येऊन उतार मोडल्यामुळें वीस दिवसपर्यंत उत्तर आलें नाहीं. इतके दिवस लोटल्यावर माल खुषकीवर आणावा म्हणून व त्याखेपेस विकावा व विकत घ्यावा अशी आज्ञा मिळाली; परंतु अशी ही सूचना मिळाली कीं राजाचे हुकुमाशिवाय वखार बांधूनये, किंवा निरंतर वसाहात करूनये; व ह्या गोष्टींची आग्र्यास गेलें असतां बहुतकरून परवानगी मिळेल. तेथून त्या शहरास जाण्यास दोनमहिन्यांपेक्षां कमी दिवस पुरते- ना. जेव्हां तो माल खपूं लागला तेव्हां तेथील व्यापारी लोकांस पराकाष्ठेची काळजी उत्पन्न झाली, असें दिसून आलें. ते आपणांमध्यें बोलत तेव्हां ह्या नवीन प्रतिस्पर्द्धी लोकांपासून जे भयंकर परिणाम होतील त्यांविषयीं विचार करीत. त्या व्यापारी लोकांस पोर्तुगाल येथील जेस्वित जातीचा एक गृहस्थ धर्मसंबंधी व व्यापार संबंधी इंग्लिशांशीं शत्रुत्व असल्यामुळें त्यांचा नाश करण्याकरतां पराकाष्ठेचा यत्न करण्यास सहाय झाला. एकेदिवशीं हाकिन्स ह्यास असें वर्तमान कळलें कीं आपल्या दोन होड्या गलबतांपासून

प्रकरण ८
इ० स० १६०८

प्रतिस्पर्द्धी लोकांचा हेवा.

प्रकरण ८ इ० स० १६०८. कांठाकडे येत असतां पोर्तुगीज लोकांनीं धरल्या. नंतर त्यांच्या अधिकाऱ्यानें इंग्लिशांकडून ह्या जुलमाच्या कृत्याविषयीं कान उघडणीचें पत्र आल्यावरही उत्तर पाठविण्याची मेहेरबानगी केली नाहीं, परंतु तोंडानेंच पत्र आणणारापाशीं ग्रेटब्रिटनचा राजा मासे धरणारांचा स्वामी आम्हांस माहीत आहे व त्याचे ताब्यांत एक लहानसें क्षुल्लक बेट मात्र आहे असें निरेचें भाषण केलें. पुढें हाकिन्स ह्याची व त्या लोकांच्या एके कामदारांची गांठ पडली, तेव्हां ही वर्तणूक फार अयोग्य केली असें हाकिन्स ह्यानें सांगितलें; नंतर त्यानें उत्तर केलें कीं ते समुद्र पोर्तुगाल देशच्या राजाच्या ताब्यांत आहेत व त्यापासून परवानगी घेतल्याशिवाय तेथें व्यापार करण्याचा कोणासही अधिकार नाहीं. मग हाकिन्स ह्यानें त्यास एकदम रागानें तिरस्कारयुक्त जबाब केला आणि आपल्या वरिष्ठ अंमलदारास जाऊन सांग असें सांगितलें, व द्वंद्वयुद्धास ये असा निरोपही पाठविला, परंतु तो त्यानें मान्य केला नाहीं. इकडे त्या होड्या व त्यांवरील बंदिवान केलेले लोक आणि माल हीं सर्व गोंव्यास पाठवून दिलीं; आणि त्या इंग्रेजास असें समजलें कीं हिंदुलोकांच्या अधिकाऱ्यापाशीं आपली दाद लागण्याची आशा नाहीं. मग त्याला असें खचित वाटलें कीं इतके दिवस जो विलंब केला तो शत्रूंनीं आपलीं गलबतें जमवावीं आणि जुलूमकरून आपले उद्देश पूर्ण करावे ह्याकरितां लावला. ते लोक हाकिन्स ह्याला धरावें म्हणून दडून बसले होते व घर फोडून

विषयीं पोर्तुगिजांनीं तिरस्काराचें भाषणकेलें.

आंत शिरण्यास पहात होते व त्यालाही शहरांत आपलीं कामें करण्याकरितां जाववेना, कारण आपणाला मारून टाकतील असें त्याला भय होतें. शेवटीं माक्रिबखान जातीनें आला,परंतु इंग्लिशांचें नुकसान भरून न देतां व त्यांचा बंदोबस्त नकरितां त्यांच्या मालापैकीं जोजो पदार्थ हावासा वाटला तो उचलून आपल्याच इच्छेनें वाटेल तें मोल देऊन घेतला, अशाप्रकारें आपणास त्यानें रंजविलें; व मोल दिलें तें पराकाष्ठेचें कमी असून बराबरही दिलें नाहीं.

प्रकरण ८
इ० स० १६०८

अशीं दुःखें सोसल्यानंतर हाकिन्स ह्यानें निश्चय केला कीं माक्रिब ह्यानें सांगितल्याप्रमाणें आग्रा येथें जाऊन साक्षात् मोंगलाची भेट घ्यावी; परंतु हा गेला असतां आपणाविषयीं खरीं गाऱ्हाणीं सांगेल असें समजून माक्रिबखान हाकिन्स ह्याचें जाणें नव्हावें म्हणून यत्न करूं लागला. त्यानें रस्त्यानें त्याला गांठून अडवावें अशा बेतानें थोडे लोक त्याबरोबर दिले असें म्हणतात. परंतु दुसरे कांहीं शिपायी आपल्यापदरचा पगार देऊन हाकिन्स ह्यानें ठेविले व दक्षिणच्या प्रतिनिधीच्या सरदारास अर्ज केल्यावरून त्यानें कांहीं अफगान जातीचे शूर स्वार हाकिन्स ह्याकडे पाठवून दिले. तथापि वाटेनें जात असतां त्याच्या गाडीवाल्यानें दारू प्याल्यानंतर त्या धुंदींत कबूल केलें कीं हाकिन्स ह्यास मारून टाकावें म्हणून कांहीं लोकांनीं बेत केला आहे त्यांत मी आहें. त्या कुटांत त्याचा दुभाषीही होता असें पुढें कळलें, नंतर त्या गाडीवा-

हाकिन्स मोंगलाची भेट घेण्याचा बेत करतो.

प्रकरण ८
इ० स०
१६०९

त्यास कैदकरून हाकिन्स साहेब बऱ्हाणपूर येथें मोंगलांचा सुभेदार होता तेथें आला, त्यानें त्याचा फार सत्कार करून आग्र्यास त्याची रवानगी केली. तो सन १६०९ त एप्रील महिन्याच्या १६वे तारखेस तेथें पोहोंचला. तो आपणाला बिऱ्हाडाकरितां जागेची चौकशी करीत होता इतक्यांत बादशाहानें घाईनें बोलावणें पाठविलें म्हणून पोशाग घालण्यास देखील वेळ सांपडला नाहीं. तो तसाच बादशाहाच्या वाड्यांत गेला. तेव्हां जहांगीर आपल्या सिंहासनावर बसला होता. त्यास त्यानें आपलें पत्र दिलें तें व त्यावरील मोर्तब हीं लक्ष लावून बादशाहानें कांहींवेळपर्यंत पाहिलीं. मग एक म्हातारा जेस्वित तेथेंच होता, त्यास तें पत्र वाचण्यास सांगितलें. त्यापुरुषानें तें पत्र वाचून त्यांतील मजकूर वाईट लिहिला आहे असें सांगितलें.

चांगला सत्कार.

परंतु बादशाह हाकिन्स ह्यास तुर्की भाषा येत आहे असें पाहून त्याशीं त्याभाषेनें संभाषण करूं लागला; त्या संभाषणानें बादशाहास फार आनंद झाला. त्यानें हाकिन्स ह्यास सांगितलें कीं दररोज आमच्या वाड्यांत येत जा. तो जाई तेव्हां बादशाह त्यापाशीं यूरोपांतील निरनिराळ्या देशांविषयीं व वेस्त इंदिज ह्या बेटांविषयीं गोष्टी काढून पुष्कळ वेळ विचारपूस करीत असे. तीं बेटें नाहींत असें त्यास कोणीं सांगितलें होतें म्हणून त्यास त्यांविषयीं संशय असे असें दिसतें. त्यानें सांगितलें कीं माक्रिबखानानें तुम्हांशीं गैरवर्तणूक केली ह्याविषयीं माझी खात्री झाली; आतां व्यापाराकरितां जेंजें अवश्य असेल तें तें द्यावें असा साफ हुकू-

म पाठविला आहे. नंतर जहांगिरानें त्या कपतानास आग्रहकरून सांगितलें कीं मी आपला वकील यूरोपास पाठवीन तोंपर्यंत तुम्ही हिंदुस्थानांत रहावें व तुमच्या तैनातीस चारशें घोडे व कांहीं मुलूख देतों. त्यानें अशी ही खात्री केली कीं, तुम्हांस तीस हजार रुपयांवर मिळकत आमच्या चालीप्रमाणें होईल. तेव्हां हाकिन्स ह्यानें मनांत विचार केला कीं ह्यागोष्टीपासून आपल्या यजमानाचें ( कंपनीचें ) कल्याण होऊन आपणास ही फायदा होईल त्यापक्षीं बादशाहाचें म्हणणें मान्य करावें. मग इतकें देऊन तुमचें लग्न करून देतों म्हणून बादशाह पाठीस लागला. इतकें कबूल करून त्याप्रमाणें घडलें. आतां बादशाहाची ही गोष्ट कबूल न करणें हें नीट नाहीं असें जाणून मनांत नव्हतें तरी हाकिन्स ह्यानें कबूल केलें. तथापि त्यानें ख्रिस्ती धर्मांतल्या शिवाय बायको करणें माझ्या मनास नीट दिसत नाहीं असें सांगितलें. ही सुटून जाण्यास वाट ठेवली होती. कारण त्यास खचित वाटत होतें कीं ह्या देशांत अशी स्त्री सांपडणार नाहीं. परंतु बादशाहानें इतका शोध केला कीं त्यानें तशीच एक नवरी पैदा करून आणली तेव्हां तिशीं लग्न करीत नाहीं असें कपतानाच्यानें म्हणवेना. हा विवाह लागल्यानंतर पुढें तो विवाह कायद्याप्रमाणें झाला नाहीं असें इंग्लंडांतील लोकांस समजलें, तरी त्या स्त्रीचा त्यानें त्याग केला नाहीं, आणि तो असें स्पष्ट सांगतो कीं ह्यासंबंधापासून मला फार सुख झालें.

प्रकरण ८ इ० स० १६०९

त्याचें लग्न व स्थापिक वस्ती.

प्रकरण ८.
इ० स० १६०९

हाकिन्स याचें वजन

आतां हाकिन्स ह्यावर बादशाहाची प्रीति पूर्ण झाली होती. म्हणून ह्याला असेन्शन गलबत सुरतेस येत आहे अशी बातमी कळतांच तुमच्या देशच्या लोकांस व्यापार करण्यास परवानगी आहे अशी सनद सोन्याच्या शाईचे शिक्यासुद्धां बादशाहापासून घेण्यास कठीण पडलें नाहीं. मग हाकिन्स ह्यास समाधान वाटण्याचें कारण असें झालें कीं, कित्येक लोकांनीं पुष्कळच गाऱ्हाणीं सांगितल्यावरून त्याचा मुख्य वैरी माक्रिबखान ह्यास दरबारीं बोलावून आणून बादशाहानें त्याची सर्व मालमत्ता सरकारांत घ्यावी अशी शिक्षा केली, तो माल इतका होता कीं त्यांतून उत्तमउत्तम पदार्थ निवडून आपणास घ्यावे असें काम दररोज दोनमहिने चाललें होतें. तेव्हां हाकिन्स ह्यानें कित्येक पदार्थ दाखवून सांगितलें कीं महाराज आपणास नजर पाठविण्याकरितां हे मींच दिले होते, परंतु आपणास पोहोंचते झाले नाहींत.

बादशाहाचें कृपेंत फेर.

बादशाहाच्या कृपेचा अगदीं कळस होऊन गेला होता, ती कृपा ह्यावेळेपासून कमी होऊं लागली. माक्रिबखान ह्याची सर्व मालमत्ता हिरून घेतल्यानंतर पुन्हा बादशाहाची त्यावर कृपा झाली व त्यानें आपला अधिकार घ्यावा, परंतु मागेंपुढें विचार पाहून वर्तणूक ठेवावी असा हुकूम दिला; तरी त्यानें तेथून जाण्याच्या पूर्वीं आपल्याच्यानें करवलें तितके इंग्लिशांचें हरएक प्रकारें बुद्ध्या वाईट केलें. बादशाहाच्या सभोंवतीं असणारे

उमराव, मुत्सद्दी व मुख्यत्वेंकरून जे- प्रकरण ८
स्वित लोक हे सर्व परदेशचे व परधर्माचे इ० स०
लोकांनीं येऊन बादशाहापाशीं वजन १६०९.
पाडलें आहे तें कमी करावें म्हणून, माक्रिबखा-
नास मिळाले. जहांगीर ह्यास त्यांनीं असें सांगितलें
कीं ह्यापरकी लोकांस आपल्या बंदरीं व्यापार करूं दि-
लातर पोर्तुगीज लोकांस अगदीं त्रास येईल आणि ते
लोक इंग्लिशांपेक्षां फारच शक्तिमान व संपत्तिवान आ-
हेत. तेच आपलीं बंदरें सोडतील इतकेंच नाहीं परंतु
दुसऱ्या लोकांचें येणें बंदकरण्यास ते समर्थ आहेत.
हीं कारणें सांगून त्यांनीं ज्याचें पाणी व तेजउत्तम व
तितका मोठा कोठें मिळावयाचा नाहीं असा गुलाबी
रंगाचा एक हिरा बादशाहास नजर दिला. तेव्हां त्याचे
मनांत पक्कें भरून तो रागानें म्हणाला इंग्लिशांनीं इतः
पर येऊंनये. असें झाल्यावर माक्रिबखान पुन्हा ति-
रावर इंग्लिशांस येऊं देऊंनये असा हुकूम घेऊन बा-
दशाहापासून निघाला. हाकिन्स ह्यासमयीं पुढें उभा
राहिला नाहीं. त्यानें आपल्या शत्रूस जाऊं दिलें
आणि त्या कटांतील लोकांच्या मनांतील आपणावि-
षयीं दुष्टभाव कांहींसा कमी झाला तेव्हां संधी साधून
कांहीं नजर घेऊन बादशाहाकडे गेला हाकिन्स
( त्यानजरेस खेळणें असें नांव त्यानें दिलें ह्याची श-
आहे ) नंतर आपल्या व्यापारापासून हाणपणा-
बादशाहाच्या राज्यास फार नफा होईल ची वर्तणू-
असें दाखवून वजिरानें आज्ञापत्र लिहून क.
तयार करावें म्हणून हुकूम घेतला. त्यापत्रांत पूर्वींप्र-
माणेंच कलमें इंग्लिशांस अनुकूळ असावीं असेंही झा-

प्रकरण ८
इ० स०
१६८३

लें होतें." ही सर्व बातमी शत्रूच्या मंडळींत लागलीच चोहोंकडे पसरली व ताबडतोब माक्रिचखान ह्याकडे जासूद रवाना झाला, व इतकी जलदी केली कीं आज्ञापत्रावर बादशाहाचा शिक्का होऊन तें त्याच्या हातीं जावें इतक्यांत कोणीं त्याला सांगून तें तसेंच ठेवविलें. पुढील कृत्यांवरून बादशाहाची चंचळ बुद्धि व मनाचा

बादशाहाची अस्थिर बुद्धि.

हलकेपणा हीं पूर्वीप्रमाणेंच दिसून येतात, ही फार दुःखाची गोष्ट आहे. हाकिन्स ह्याचा मित्र दरबारीं असे, किंवा समय चांगला साधे, किंवा मोठा नजराणा नेऊन देई, तेव्हां आपल्या इच्छा सर्व पूर्ण होतात असें त्यास वाटे, परंतु त्यात्या वेळेस त्याचे शत्रु इतकी त्वरा करीत कीं त्याचा बेत सर्व उलटून टाकीत." इतकाळ हाकिन्स ह्यास अब्दुल हसन नामें मुख्य प्रधान जो त्याचा हाडवैरी होता, त्यानें फार त्रास दिला; तो दरबारांत तांबडे कठडे लावून एक जागा केली होती तेथें आंत ह्याला येऊं देतनसे. ती जागा प्रतिष्ठितलोक बसण्याची असे, तेथें इतर लोकांस येऊं देत नसत, व बादशाहाशीं बोलण्याचे प्रसंग नेहेमी तेथेंच येत. आणि त्या प्रधानाच्यानें हाकिन्स ह्यास उपजीविकेसाठीं जीजमीन दिली होती ती अगदीं जरी बंद करवली नाहीं तरी त्यानें ती जेथें बंडें फारच होत म्हणून वसूल आला तरी थोडाच यावा अशा ठिकाणीं देण्याची तजवीज केली. इंग्लिशांचा सरदार अडीचवर्षें निष्फल तेथें राहिल्यानंतर कंटाळून निघून जाण्याचा त्या-

हाकिन्स ह्यास त्रास दिला.

नें निश्चय केला. मग सन १६११ त नोवेंबरचे दुसरे तारखेस तो व्यापार संबंधी हक्क निश्चित करून घेतल्या वांचून व फारतर काय, परंतु आपल्याराजाचे नांवें पत्र देखील मिळविल्यावांचून चालता झाला. ह्याचें कारण असें झालें कीं, पूर्वी अब्दुल हसन म्हणाला होता कीं तुझ्या क्षुल्लक राजास पत्र लिहावें हें मोंगल बादशाहाच्या मोठेपणास अयोग्य आहे तें ऐकून त्यास पराकाष्ठेचा राग आला होता.

प्रकरण ८ इ० स० १६११.

नंतर थोड्याच वर्षांनीं विलायतेंत असें ठरलें कीं हिंदुस्थानांतील व्यापाराचीं वगैरे कामें चांगलीं चालावीं म्हणून थेट राजाकडून वकील तेथें पाठवावा व त्याबरोबर नजरा मोठाल्या द्याव्या व त्याचा अशा प्रकारें डौल असावा कीं तो पाहून आशियेंतील डौली मोंगलराजांच्या मनावर ठसा होईल. त्याप्रमाणें सन १६१५ त जान्युआरीच्या २४ वे तारखेस सरटामस रो ह्याची रवानगी झाली. व त्याजबरोबर पेपरकार्न व लायन ह्या नांवांचीं दोन गलबतें दिलीं. त्यांवर कपतान पेटन आणि कपतान वौटन ह्यांस मुख्य नेमिलें. तो आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यानें जाऊन सकोत्रा येथें गलबतें कांहीं वेळ नांगरल्यावर सप्तंबर महिन्यांत सुरतेस येऊन पोहोंचला तेथें मोठ्या समारंभानें ८० हत्यारबंद लोकांनिशीं गलबतावरून उतरला. अधिकारी लोक तो जातअसतां नानातऱ्हेनें त्यापासून पैसा काढीत व त्याचा पाहिजेतसा झाडा घेत. परंतु

बादशाहाकडे इंग्लिशांनीं वकील पाठविला.

प्रकरण ८ इ० स० १६१५.

मी मोठ्याराजाचा वकील आलों आहें, माझा झाडा वगैरे घेऊंनये असें त्यानें सांगितल्यावर पुष्कळ ठिकाणीं त्याची सुटका झाली. तो नोवेंबरचे १५ वे तारखेस बऱ्हाणपूर येथें आला.

सरटामस रो बऱ्हाणपुरास येऊन पोहोंचला.

नंतर बादशाहाचा दुसरा मुलगा पूर्वज नामें तेथें होता त्याची मोठें दरबार होऊन भेट झाली. तेथें तो बादशाहाचा प्रतिनिधि म्हणून अधिकार चालवीत असे. परंतु वास्तविकसत्ता खानचन नामें सेनापतीची होती. त्याउभयतांचे भेटीचें वर्णन केलें आहे कीं तो बादशाहाचा मुलगा जसें नाटकांतील राजे बसतात त्याप्रमाणें उंच ठिकाणीं जाऊन बसला होता. इंग्लिशांचें वकिलानें वरतीजाऊंका असें पुसल्यावर त्यास सांगितलें कीं तुर्कांचा बादशाह किंवा इराणचाराजा ह्यांची ही तेथें जाण्याची योग्यता नाहीं. इंग्लिशांचे वकिलानें मीं कोठें बसावें म्हणून विचारल्यावर त्यास जबाब झाला कीं, ह्या सभेंत कोणीच मनुष्य कधीं बसला नाहीं. मग सरटामस ह्यास बादशाहाचे पुत्रानें सांगितलें कीं लौकरच मी एकांतीं भेट घेण्यास तुला बोलावीन. परंतु त्यास ज्या नजरा दिल्या त्यांत दारूच्या कुप्यांची पेटी होती. तींतील दारूचेंपान त्यानें केल्यावर त्याला जें म्हणाला होता त्याची अगदीं शुद्ध राहिली नाहीं.

बादशाहा त्यावेळेस अजमीर येथें राहत होता म्हणून रो साहेब रजपूत लोकांच्या मुलखांतून तेथें चालता झाला. वाटेनें जात असतां चितोरचें स्थान पाहून त्यास सा-

अजमीरास गेला.

ल्हाद आश्चर्य वाटलें व तें शोभिवंत व चमत्कारिक थडग्याप्रमाणें दिसलें असें तो लिहितो. तेथें शंभरांवर देवळें, मोठाले उंच महाल, आणि हजारों घरें त्याच्या दृष्टीस पडलीं, तीं उंच खडकावर शहर होतें तेथें होतीं. परंतु त्यावेळेस शहर अगदीं उद्ध्वस्त झालें होतें. दिसेंबर महिन्याचे तेविसावे तारखेस सरतामस रो हा अजमिरास पोहोंचला, परंतु संन १६१६ व ज्ञानेवारीचे दहावे तारखेपर्यंत तो दरबारांत गेला नाहीं. तेदिवशीं दरबारांत जाऊन बादशाहाची गांठ घेतली. त्यानें राजाचें पत्र व नदराणे त्यास दिले आणि त्याचा आदर जसा मनापासून झाला तसा तुर्क देशच्या किंवा इराणच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही वकिलाचा त्या दरबारीं कधींही झाला नव्हता. दुसऱ्या भेटीच्या वेळेस व पुढेंही ह्याला सर्व दरबारच्या लोकांपेक्षां बादशाहाजवळ बसण्यास जागा नेमली होती; आणि सुरतेस व अहमदाबादेस इंग्लिशांचा व्यापारांत काय नाश झाला तो सांगावा अशी आज्ञा मिळाल्यावर सर्व गाऱ्हाणीं त्यानें निवेदित केलीं. मग त्यानें सर्व गोष्टींचा बंदोबस्त करतों असें खात्रीनें सांगितलें. पुष्कळवेळ त्या चक्रवर्ती राजाच्या व वकिलाच्या भेटी झाल्या. तेव्हां घरगुती व थट्टेचीं देखील भाषणें त्या उभयतांचीं झालीं. सरतामस ह्यास व्यर्थ वाटलें होतें कीं आपण सांगितलेल्या सर्व गोष्टी प्राप्त होतील. परंतु लौकरच त्याला कळून आलें, कीं पूर्वीच्या ज्या लोकांनीं हाकिन्स ह्याला संकटें भोगावयास लाविलें तेच द्वेषीलोक

प्रकरण ८ इ० स० १६१५.

त्याचा चांगला आदर.

प्रकरण ८
इ० स०
१६१६

माक्रिबखा-
नाचें दुष्टत्व
आणि वजन.

आपणास प्रतिकूळ आहेत. इंग्लिशांचा हाडवैरी जो माक्रिबखान तो दरबारीं हांताच व पूर्वींचा प्रधान जाऊन त्याचे जागीं असिफखान नामें प्रधान त्या वेळेस झाला होता, त्याचा व चरम नामें जहांगिराचा पुत्र ज्याला शहाजहान असें पुढें म्हणूं लागले, ह्याचा आश्रय माक्रिबास होता. असे प्रतिपक्षी मोठे लोक असतां व ते बादशाहांचे चंचल मनांत नेहेमी भलतें भलतेंच भरून देत असतां त्या वकिलानें टिकाव तरी कसा धरला हें मोठें आश्चर्य आहे. परंतु शेवटीं वकिलानें युक्तीनें व दृढनिश्चयानें झटून जरी जितके वाटले होते व देतों म्हणून बादशाह म्हणाला होता तितके हक्कांची नाहीं, तरी त्यानें कितीएक हक्कांची सनद मिळविली. येत ब्रितनच्या राजाचे नांवें पत्रही बादशाहानें दिलें, त्यावर अलकाब लिहिला होता कीं " न्याय व कीर्ति ह्यांचा सागर, सत्कुलीन, आणि लष्करी कामांत लहानाचा मोठा झालेला राजा. "

दरबारच्या
रीतीं विषयीं
विचार.

सरतामस तेथें राहत असतां त्यास दरबारचे समारंभ व डामडौल पाहण्याचा प्रसंग चांगला येत असे. त्या प्रमाणें दरबार मनुष्याचे दृष्टीस दिपविणारें कधींच कोणी बहुतकरून पाहिलें नसेल, तरी त्या डौलाप्रमाणें चांगल्या रितीभाती व सभ्य संप्रदाय फारच थोडे होते. तेथील सर्व कारभार पराकाष्ठेचे उघड असत, व तें दरबार लोकांस फार आवडतही असे. बादशाहानें आपलें सर्व आयुष्य राजकारभारांत घालविलें असें म्हटल्यास

चिंता नाहीं. प्रातःकाळीं तो एके खिड- कीशीं येई. तिच्या पुढें मोठें मैदान असे, त्यांत शेंकडों लोक जमत अ- सत, त्यांस तो भेट देई. दोन प्रहरीं पुन्हा त्याच ठिका- णीं येई, तेव्हां मोठाल्या जनावरांच्या, त्यांत मुख्यत्वें करून हत्तींच्या लढाया लाववून ती मौज पाही, आणि तिसरे प्रहरीं तो दरबारांत बसे. तेथें ज्या लोकांस का- मानिमित्त भेट घ्यावयाची असे त्यांची भेट नेमानें घे- ई. पुनः रात्रीं आठवाजतां भर दरबारांत येई. त्याला गजलखाना म्हणतात. तेथें तो त्याचे गळ्याचे ताईत असे जे आव- डते लोक असत त्यांशीं मुख्यत्वें मौजेच्या मनोरंजक भाषणांत वेळ घालवी. दरबारांत राज्याच्या सिंहास- नाभोंवतीं दोन कठडे असत, त्यांपैकीं आंतल्या कठ- ड्याचे दालनांत वकील लोक, राज्यकारभार कर- णारे लोक, आणि पहिल्या प्रतीचे बडेलोक, बसण्या- ची जागा असे. दुसऱ्या कठड्याचे दालनांत दुस- ऱ्या प्रतीचे लोक बसत, आणि तेथून पुष्कळ अंतरा- वर मोठी उघड लांब रुंद जागा इतर लोकांस बसण्यास केली होती. तेथें इतर लोक बसत; तथापि त्यासर्वांस बादशाह चांगला दिसत असे. ह्या नित्यक्रमाची संवय बादशाहास पूर्ण लागली होती व एक दिवस देखील अ- जारी नसला किंवा मद्यपान केलें नसलें तर दरबारांत आल्यावांचून राहत नसे. आणि तसा प्रकार अस- ल्यास दरबारांत सांगून पाठवीत असे. परंतु लागोपाठ दोन दिवस गैरहजिरी तर कोणत्या ही कारणानें होत नसे. राज्य संबंधी सर्व कागद व कायदे हीं दोन्ही दर

प्रकरण ८
इ० स०
१६१६.

राजकीय
डौल व बेत

प्रकरण ८
इ० स०
१६१६.

रोज लिहीत व थोडासा नेमलेला पैसा दिला असतां वाचूं देत, अशा कारणानें ते प्रसिद्ध होत. ह्या रीतीनें हरएक गोष्ट व ठराव लागलाच सर्व लोकांस समजे; आणि राजाच्या पराकाष्ठेच्या गुप्त मसलती व त्या बदलण्याचीं कारणें हरएक लबाड मनुष्यास कळून त्यांविषयीं ते घाटाघाट करून राजास दोष लावीत, असें सरतामस ह्याच्या दृष्टीस पडलें; तेव्हां जरी तो इंग्लिश होता ( इंग्लिश लोकांत राज्य कारभार प्रसिद्धपणें चालतो हें सर्वांस माहीत आहे ) तरी त्यास त्रास आला.

दरबारची संपत्ति.

त्या प्रवासी मनुष्यास मेजवानीच्या व चैनीच्या प्रसंगीं कित्येकवेळां मोंगलांचे दरबारचा समारंभ पाहण्याचे आणखी प्रसंग आले. त्या दरबारास शोभा मुख्यत्वें करून जे पुष्कळ हिरे तेथें होते त्यांची असे. ते त्या बादशाहानें नजराणा घेऊन, व विकत घेऊन, व लुटून आणून चोहोंकडून बुद्ध्या जमा केले होते. मोठ्या सणाच्या दिवशीं बादशाहाचे अंगावर हिरे, मोत्यें, आणि माणकें, इतकीं असत कीं त्यास त्यांचें ओझें होई. हत्ती स्वारीच्या वेळेस वगैरे बाहेर निघत तेव्हां त्यांवरील सामान सोन्याचा सुंदर मुलामा दिलेलें असून त्यांच्या गंडस्थळांवर रत्नांचे उंची दागिने असत.

बादशाहाचा गोट.

बादशाह कोठें लढाईस गेला होता तेव्हां त्याच्या तंबूंची जी रांग लागली होती तिच्या भोंवती पावकोश जिचा घेर होता अशी कनातींची एक भिंतच घातली होती. तें पाहून तर तो वकील अगदींच दिपून गेला. बडे लोकांच्या तंबूचे फार सु-

दर आकार व त्यांस नानाप्रकारचे रंग होते. तो म्हणतो कीं तें सर्व ठिकाण सुंदर व मोठ्या शहराप्रमाणें दिसत होतें, तसें मी कधींच पाहिलें नाहीं व तसें पाहण्यास सांपडणारही नाहीं. हा सर्व डौल असून त्या दरबारीं सभ्य संप्रदाय व विद्येची वगैरे अभिरुचि हीं अगदींच दिसत नव्हतीं. बादशाहाच्या वाढ दिवशीं त्याचा मुख्य खेळ असा होता कीं माणकांनीं भरलेली एक पेटी व दुसरी सोन्याच्या व रुप्याच्या बदामांनीं अशा दोन पेट्या असत त्यांतून तो बदाम व माणकें आपले उमराव जमवून भूमीवर फेंकी; मग त्या श्रेष्ठ दरबारचे मोठाले उमराव जमिनीवर पडून तीं घेण्याकरितां, पोरें जशीं साकर फुटाणे वेंचण्याकरितां झोंबतात तसें झोंबत असत. दुसऱ्या एका प्रसंगीं बादशाह एके पारड्यांत उंची पोशाक घातलेला असा बसवून दुसऱ्या पारड्यांत पहिल्यानें रुपये घालून तुळा केली, मग सोनें आणि रत्नें, नंतर उंची वस्त्रें आणि मसाल्याचे पदार्थ आणि शेवटीं धान्य, पीठ, आणि लोणी हीं घालून तुळा केली. त्या दरबारी लोकांची थट्टा मस्करी झाल्या नंतर मद्यपान पराकाष्ठेचें होऊन मग ते जात असत.

प्रकरण ८
इ० स० १६१६.

क्षुल्लक खेळ

बादशाहाची तुळा.

ह्या दोघां मुशाफर लोकांनीं जहांगिराचें वर्णन केलें आहे तें आशियेंतील ग्रंथ कर्त्यांनीं त्याची जी फार स्तुति केली आहे तिशीं बहुतकरून अगदीं जमत नाहीं. त्याचा स्वभाव कृपाळू व तो वशकरून घेण्यास सुलभ व मनाचा अगदीं हलका आणि बुद्धीचा चंचळ असा

बादशाहाचा स्वभाव.

प्रकरण ८
इ० स०
१६१६.

होता. हे गुण एकत्र झाल्यामुळें तो त्या मोठ्या बादशाहीचा कारभार नीट चालविण्यास बहुतकरून योग्य नव्हता. सरतामस ह्यानें त्याचे वर्णन केलें आहे तें बराबर दिसतें, तो म्हणतो कीं बादशाहाचा स्वभाव इतका सौम्य होता कीं पाहिजे तो त्यावर अम्मल चालवीत असे, तो वाईट स्वभावाचा असता तर पुरवतें, परंतु हें तर अगदींच वाईट. त्याची न्यायशीलता उत्तम आणि तो मुख्यत्वेंकरून अन्यायाचा द्वेषी असे. ह्या गुणांविषयीं दौसाहेबानें त्याची फारच प्रशंसा केली आहे. ती कांहींशी संशयात्मक दिसतें, कारण ज्या लोकांवर गुन्हा येऊन त्यांची मालमत्ता सरकारांत घेत ती आपल्याच कारणीं तो लावी. बादशाहानें मात्रिबखान ह्यास अपराधी असें ठरविलें व त्याची सर्व मालमत्ता जप्त केली; व पुढें पुन्हा त्याला पूर्वीप्रमाणें अधिकार दिला व पूर्ण भरंवसा ठेवून मोठ मोठ्या गोष्टींमध्यें त्याचें संमत घेऊन त्याप्रमाणें चालूं लागला; ह्या दोन्ही गोष्टी विरुद्ध असून त्यानें केल्या हा चमत्कार आहे. बादशाह एकाद्या भिकारी फकिरास खाकेंत हात घालून उठवी व दोन दोन घटका त्याशीं संभाषण करी व शेंकडों रुपये शेवटीं त्यास देई. अशा रीतीनें तो फकिरांची सेवा करी ही गोष्ट धर्म बुद्धीनें करी किंवा कांहीं मतलबानें करी हें जाणणें फार कठीण आहे.

भीतींतल्या स्त्रीचें वजन.

ह्या सार्वभौम राजास मरणाचे पूर्वी कांहीं वर्षे पराकाष्टेचें दुःख भोगावें लागलें व नूरजहान हिच्या करतां त्यानें शेवटीं आपला नाश करून घेतला, तीच स्त्री ह्या

प्रकरण ८ इ० स० १६२०

दुःखाचें कारण होती. ह्या सुंदर परंतु हट्टी स्त्रीनें तो अगदीं आपलासा करून टाकला, त्याच्या मनांत भलतेंच भरवून दिलें, आणि त्याचे परम मित्र होते त्यांशीं वांकडें पाडलें. आपल्या नवऱ्याच्या कुटुंबांतील वडील घरीं राज्य जाऊं न देतां आपलाच पुत्र शारियर ह्यास गादीवर बसविण्याकरितां ती झटत आहे, असें लोकांस पक्कें वाटलें व त्यांस असें वाटण्यास आधार नव्हता असेंही दिसत नाहीं. आणि निदान हेंच कारण काढून बादशाहाच्या मुलां पैकीं शहाजहान ह्या पराक्रमी पुत्रानें मोठें बंड केलें. त्यानें दक्षिणेंत लढाई करून जय मिळविला म्हणून त्याची फार कीर्ति व वजन लोकांत झालें होतें. त्या राजपुत्रानें आणखी एक अपराध करून गादीवर बसण्याचा मार्ग साफ केला. तो असा, कीं, त्याचा वडील भाऊ खुस्रू नामें होता व ज्यानें जहांगिराच्या राज्यकारकिर्दीच्या आरंभीं बंड करून धाक बसविला होता त्यास बादशाहानें बंदींतून सोडून शहाच्या स्वाधीन केलें होतें, परंतु एके दिवशीं सकाळीं खुस्रूच्या प्रिय स्त्रीनें तंबूंत जाऊन पाहिलें तों पति रक्तानें भरून पडला आहे असें दृष्टीस पडलें. मग तिनें पराकाष्ठेचा शोक केला, त्यामुळें लष्कर व शहर हीं व्याकुळ झालीं. शहाजहान त्या ठिकाणीं जाऊन त्यानें पराकाष्ठेचा विलाप केला. तेव्हां त्याविषयीं वहीम प्रथम कोणाच्या मनांत आला नाहीं. परंतु त्याच्या बापाची व सर्व लोकांची खात्री झाली कीं ह्या खुनाचें पाप ह्याचे माथां आहे.

शहाजहानाचें बंड.

प्रकरण ८
इ० स०
१६२०.

मोहोतबखान.

ह्या प्रसंगीं बादशाहावर मोठा धोक्याचा समय गुदरला होता, तरी मोहोबतखान नामें त्याचा खरा मित्र व विश्वासू चाकर होता, त्यानें उत्कंठेनें झटून राजाचें संरक्षण केलें; व त्यानें आपल्या शौर्यानें बंडखोर जो शहाजहान त्याशीं युद्ध करून पुष्कळ वेळ जय मिळविले. तो बादशाहाचा पुत्र प्रथम गुजराथेंत मग बंगाल्यांत गेला आणि तेथें त्यानें नवीन सैन्य कित्येक ठिकाणीं जमविलें. तरी मोहोवत ह्यानें त्याचा पाठलाग केला आणि शेवटीं त्यास पुरे पुरेसेंकरून आपलें कांहीं चालणार नाहीं अशी त्याची निराशा करून टाकली. हा सेनापति आपण जी चाकरी केली तीस योग्य अशी बादशाह कृतज्ञता दाखवील अशा आशेनें दरबारीं परत आला आणि पाहतो तों बादशाहाची वृत्ति अगदींच फिरलेली दृष्टीस पडली. नूरजहान ही जहांगिराचे मनांत नेहेमी दुष्ट कल्पना आणून देत असे. तिनें इतर शत्रूंशीं मिळून असें त्याचे मनांत पक्कें ठसविलें कीं आपणास पदच्युत करणाऱ्यांचे कटांत मोहोबतखान शिरला आहे. वास्तविक म्हटलें तर तो राज्याचा रक्षण करणारा व सद्गुणी होता. लौकरच मोहोबतखान ह्यास दरबारीं काय प्रकार झाला होता तो समजला; तेव्हां दरबारीं यावें असा बादशाहाचा हुकूम आला असतां त्यानें निश्चय केला कीं तेथें जाऊन आपला नाश करून घेऊंनये. आपण रितिपूर येथील किल्यांत जाऊन रहावें हें बरें. पुष्कळ वेळां बादशाहाचें बोलावणें आल्यावर तो शेवटीं राजधानीस जावयास निघा-

ला. त्यानें आपणा बरोबर आपल्या जिवास धोका नव्हावा म्हणून पांच हजार घोडेस्वार शूर रजपूत लोक रक्षणास पुरत अशा बेतानें घेतले होते. परंतु लाहोराजवळ बादशाहानें तळ दिला आहे असें त्यानें पाहिलें. तो तंबू जवळ गेला तेव्हां बादशाहानें सांगितलें कीं तूं लूट मिळविली व वसूल जमा केला त्या द्रव्याचा हिशेब देईस तोंपर्यंत पुढें येऊंनको. अशा रीतीनें त्याशीं अगदीं अयोग्य वर्तणूक केली. मोहोबत सद्गुणी खरा परंतु अभिमानी होता, ह्यामुळें त्याला पराकाष्ठेचा राग येऊन त्यानें खरोखरी धटाई करण्याचा बेत केला व लागलेंच त्याप्रमाणें केलें. बादशाहाच्या सेनेचा कूच लाहोराकडे झाला तेव्हां दुसरे दिवशीं ती सेना जेहलम नदीचा पूल उतरून पार गेली आणि बादशाहास कशाचें भय नव्हते. म्हणून तो आपले दरबारचे थोडे लोकांनिशीं मागेंच राहिला होता. मग मोहोबत ह्यानें आपले रजपूत लोक घेऊन झपाट्यानें चाल केली आणि पुलावर बंदोबस्ताकरितां एक टोळी ठेविली व दुसरी टोळी घेऊन तो आपल्या धन्याच्या तंबूकडे वेगानें गेला. मोहोबतखान तेथें गेल्यावर स्वार लोक खालीं उतरविले आणि त्यांपैकीं पांचशें लोक चिलखत घातलेले घेऊन तंबूंत शिरला, तेव्हां त्याचें तोंड उतरलें होतें, परंतु त्याच्या मनाचा दृढ निश्चय होता. तेव्हां बादशाहा जवळचे उमराव लोकांनीं प्रथम कांहीं प्रतिबंध केल्यासारखें केलें, परंतु जे शिपाई लोक त्यांवर चालून गेले होते ते पुष्कळ आहेत असें पाहून ते लागलेच वश झाले. मो-

प्रकरण ८
इ० स० १६२५.

मोहोबत ह्याचा हिय्या.

प्रकरण इ० स० १६२५

होबत ह्यानें कांहीं वेळ शोध केल्यावर जहांगीर 'आपल्या नाहण्याच्या तंबूंत होता, तो त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां बादशाह मोठ्यानें ओरडून लागलाच म्हणाला, "मोहोबतखाना तुझ्या मनांत काय आहे?" नंतर त्यानें उत्तर केलें "माझ्या शत्रूंनीं मला मारण्याकरितां कट केला आहे, व त्यांच्या कुभांडामुळें मी नाइलाज होऊन स्वामींनीं माझें रक्षण करावें म्हणून मी आपणास शरण आलों आहे." "तूं हत्यारबंद लोक मागें उभे केले आहेत ह्याचें कारण काय?" असें बादशाहानें विचारल्यावर त्यानें उत्तर केलें कीं, "माझें व माझ्या कुटुंबाचें रक्षण होईल अशी खात्री त्यांनां पाहिजे आहे. ती घेतल्याशिवाय ते परत जाणार नाहींत." जहांगिरानें तुला मारण्याचा वगैरे बेत केला नाहीं असें सांगून त्याचें सांत्वन केलें. तेव्हां मोहोबतखान म्हणाला कीं आपली पारध करण्याची वेळ झाली व घोडा तयार आहे. बादशाह मनांत समजला आणि जें प्राप्त झालें तें भोगल्यावांचून उपाय नाहीं असें जाणून चालता झाला. त्याबरोबर मोहोबतखानानें मोठ्या शूर रजपूत लोकांचा पाहरा दिला.

जात बादशाह सांपडला.

तिकडे नूरजहान ही आपला भाऊ असिफखान नामें मुख्य वजीर ह्या सुद्धां सेनेचा मुख्य भाग घेऊन नदीचे पलीकडे गेली होती; त्या अभिमानी राणीस तिच्या नवऱ्यावर जें संकट पडलें होतें ते कळल्यावर तिला किती राग आला असेल व तिची काय त्रेधा झाली असेल हें सहजच

राणीचा राग.

ध्यानांत येईल. सर्वांनीं विचार करू- प्रकरण ८
न जसें होईल तसें होवो परंतु मोहो- इ० स०
तबखान ह्यावर हल्ला करून बादशाहास १६२५
सोडविण्याकरितां जिवावर उदार होऊन यत्न करावा
असा निश्चय केला. तथापि रजपूत लोक लढाई करि-
त असतां त्यांशीं तोंड देऊन मध्यें मोठी नदी उतरून
जावयाची होती. परंतु त्या राणीनें आपल्या लोकांस
उत्तेजन देण्याकरितां हत्तीवर बसून तुमुल युद्ध चाललें
असतां पाण्यांत उभी राहून आपल्या हातानें बाण सो-
डून चार भाते रिकामे केले. ती ज्या हत्तीवर बसली हो-
ती त्याचे तीन महात मरण पावले, आणि तिची तरुण
मुलगी बरोबर होती तिचे बाहूस जखम लागली. रज-
पूत लोकांनीं तर कांहीं टोळ्या तिराशीं पोहोंचल्या ते-
व्हां त्यांवर हल्ला केला. आणि एका मागून एक अ-
शा साऱ्या जिंकून टाकल्या. शेवटीं सर्वांत शूर असा
एक उमराव पुढें होऊन एक मोठी टोळी घेऊन तिरावर
निरनिराळ्या ठिकाणीं उतरला. तें सैन्य शत्रूच्या पि-
छाडीवर येऊन पडलें. तें बादशाहाच्या तंबू जवळ मा-
रीत मारीत गेलें, त्या तंबूस शेंकडों बाण येऊन लागले
होते आणि बादशाहा भोंवतीं ढाला ठेवून त्याच्या जिवा-
चें मात्र खबरदारीनें रक्षण केलें होतें, परंतु मोहोबत
खानें शेवटीं लढाई सुरू करून जय मिळ-
विला. नूरजहान राणी लाहोरास पळू- मोहोबत
न गेली, मग जहांगिरानें पत्रें पाठविल्या- ह्याचाजय.
वर त्याच्या लष्करांत जाऊन रहावें असें
तिला वाटून ती तेथून आली. असा प्रकार असतां त्या
विजयी पुरुषानें तिला मारून टाकण्याचा बेत कसा के-

प्रकरण इ० स० १६२५.

ला हें बराबर समजत नाहीं. त्यानें त्याविषयीं बादशाहाचा लेख देखील जुलमानें घेतला. तेव्हां त्या कारस्थानी राणीनें प्रार्थना केली कीं माझे दैवीं आलें तें भोगण्यास मी सिद्ध आहें,

राणीचीयुक्ति.

परंतु प्रभूची आणि माझी एक वेळ भेट व्हावी. ती विनंती मोहोबत ह्यानें कबूल केली, परंतु त्यानें एक आट घातली कीं माझे समक्ष भेट घ्यावी. ती तंबूंत जाऊन आपल्या पतीपुढें मुकाट्यानें उभी राहिली, तेव्हां दुःखामध्यें तिला अधिक शोभा येऊन तिचें सौंदर्य फारच विलक्षण दिसूं लागलें. बादशाहाच्या नेत्रास तत्क्षणीं अश्रु आले, आणि त्यानें आपल्या प्रिय राणीस जीवदान द्यावें म्हणून इतक्या उत्सुकतेनें मोहोबतखानाची प्रार्थना केली कीं त्या विजयी सरदारास गहिवर येऊन त्यास बादशाहाचें बोलणें मान्य करावें लागलें.

मग मोहोबत ह्यानें बादशाहास काबुलांत नेलें, व त्याचा पराकाष्ठेचा मान राखून व दरबाराचा डामडौल नीट ठेवून साधारण राज्य कारभार त्याकडून करविले. शेवटीं त्यानें बादशाहापासून मी पुढें तुझ्यावर कृपा ठेवीन व तुझे सर्व अपराध माफ आहेत अशा प्रकारचीं मोठालीं वचनें घेऊन आपला अधिकार सोडून दिला. आणि बादशाहास निष्प्रतिबंध केलें, आणि आपण काम सोडून बेकार होऊन राहिला. ह्यावरून त्याची स्वहितावर नजर नव्हती हें स्पष्ट दिसून आलें. परंतु त्यानें हा अतिशयित भलेपणा केला म्हणून त्यास भय प्राप्त

मोहोबत ह्याचा थोरपणा.

झालें. बादशाह त्याचे अपराधांची क्षमा करता येवढेंच नाहीं, तर तो ते विसरला देखील असता, हें खरें आहे. परंतु त्याची बायको नूरजहान मनांत रागानें जळत होती. तिनें लौकरच मोहोबत ह्याचा जीव घ्यावा असें सांगण्यास आरंभ केला. परंतु बादशाहास कांहीं

प्रकरण ८
इ० स०
१६२५.

तिचीसूड उगविण्याची बुद्धी.

न्याय बुद्धि होती तीमुळें रागानें तिचे सांगण्याचा त्यानें तिरस्कार केला. मग तिनें विश्वासघातानें आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां कट करण्यास आरंभ केला. तिचे बेत जहांगिरास कळल्यावर त्यानें ज्याला मारण्याचा उद्देश होता त्यास ती बातमी कळविली. व त्याशीं असेंही कबूल केलें कीं मी तुझें रक्षण करावें असा तुझा हक्क आहे, परंतु माझें सामर्थ्य नाहीं. ह्या वरून स्पष्ट दिसतें, कीं मोहोबत ह्यास पळून जाण्याशिवाय दुसरा उपाय राहिला नव्हता. आणि जो मनुष्य थोड्याच दिवसांपूर्वी येवढे राज्याचा खरा स्वामी झाला होता तो आपली सर्व मालमत्ता सोडून देऊन पळत सुटला. नूरजहान राणीनें ती मालमत्ता लागलीच जप्त केली आणि तो नाहींसा झाल्यावर अल्पबुद्धीनें बादशाहाचें मन अगदीं आपल्या हातांत ठेविलें. तो सरदार बंडखोर आहे असें जाहीर करून त्याचें शीर जो कोणी आणून देईल त्यास अमूक बक्षीस मिळेल असें प्रसिद्ध केलें. आणि सर्व प्रांतांतून हुकूम फिरविला कीं त्या मनुष्याचा पक्का शोध करावा.

आसिफ त्यावेळेस प्रधान होता, त्यास आपल्या

प्रकरण ८
इ० स०
१६२५.

गृहिणीचा जुलूम व सरकाराकडून पाठी लागून जे तिनें भलतेच उपाय करविले ते त्यास आवडले नाहींत. तथापि तिच्या पुढें कांहीं उपाय करण्यास त्यास सुचेना.

आसिफ व मोहोबत खान ह्यांची भेट

एके दिवशीं रात्रीं अंधकार पडल्यावर त्यास कोणी कळविलें, कीं अगदीं वाईट पोशाग केलेला मनुष्य आला आहे, तो आपली भेट घेण्यास इच्छितो. मग त्यानें पाहिलें तों जो सरदार नुकताच हिंदुस्थानाचा राजा झाला होता, तो पुढें येऊन उभाराहिला आहे. हें पाहून त्यास आश्चर्य वाटलें व गहिवर आला. ते एकीकडे खोलींत गेले आणि आसिफ ह्यानें त्यापाशीं कबूल केलें कीं बादशाहाच्या स्त्रीचा हा जुलूम आहे. व तो तर पराकाष्ठेचा नरम आहे. मग मोहोबत ह्यानें सांगितलें कीं राज्याचे बंदोबस्तासाठीं पराक्रमी पुरुष आणण्याचा मार्ग हाच आहे कीं शहाजहान ह्यास गादीवर बसवावें. शहाजहान ह्याचा मोहोबत हा पुष्कळ वर्षेंपर्यंत खरोखरी शत्रु होता. आसिफ ह्यानें कांहीं विचार करून त्याचे म्हणणें मान्य केलें आणि राजपुत्रास लागलेंच पत्र पाठविलें. परंतु कित्येक गोष्टींमुळें तो बेत तेव्हां तसाच राहिला. शेवटीं बादशाह दुखण्यास पडल्यामुळें त्या बेताची गरज नाहींशी झाली. त्यास दम्याचें दुखणें होतें तें काश्मीर येथें राहिल्यावर तेथील थंड हवेमुळें पराकाष्ठेचें अधिक होऊन तो सन १६२७ त नवंबर महिन्याचे नववे तारखेस मृत्यु पावला.

जहांगिराचा मृत्यु

त्याच्या कीर्तीविषयीं लोकांस संदेह आहे.

जहांगिराचे शहाजहान आणि शारियर असे दोनच पुत्र होते. त्यांत शारियर ह्यास राज्य द्यावें असें त्यानें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें, परंतु मोहोबत आणि आसिफ ह्यांनीं शहाजहानास गादीवर बसविण्याची तर्तूद लागलीच केली, आणि तो दक्षिणेंतून येऊन पोहोंचण्याचे पूर्वींच त्याचा प्रतिस्पर्धी शारियर ह्यास जिंकून बंदींत ठेवून त्याचे डोळे काढले. तो नवीन बादशाह आपल्या नगरांत येऊन पोहोंचल्यावर लागलेंच त्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्यापासून आपणास भय नसावें म्हणून पराकाष्ठेचे घोर उपाय योजिले, त्यानें आपल्या भावांसच नाहीं, तर आपले पुतणें जितके जिवंत होते त्यांस देखील मारविलें. मग त्याच्या अथवा त्याच्या मुलांच्या आंगांत जें रक्तवाहत होतें त्या शिवाय तैमुराच्या रक्ताचा बिंदु देखील राहिला नाहीं. आशियेंत पूर्वीं झालेलीं उदाहरणें आहेत त्यांवरून आंगावर शाहरे आणणाऱ्या अशा ह्या अनर्थाचें दुःख कमी असें वाटेल, तथापि जरी आशियेंतील दरबारांत भाऊ बंदकीच्या द्वेषामुळें निरंतर नाश होत आले, तरी हिंदुस्थानांत असें दुष्ट कर्माचें उदाहरण पूर्वीं आढळलें नव्हतें. जहान ह्यास देखील वाटलें, कीं हें माझें उदाहरण घेऊन जरी मजविषयीं नाहीं तरी निदान माझ्या मुलांबाळांविषयीं कोणी ह्याप्रमाणें वर्तणूक करतील. व त्याप्रमाणें पुढें घडून तीच चाल त्याला कांहींशी प्रतिबद्धक झाली. राज्याचा हक्क सांगणारा लागलाच दुसरा एकजण नवीन निघाला, त्यामु-

प्रकरण ८
इ० स० १६२७

शहाजहान

पराकाष्ठेचीं दुष्ट कर्में

प्रकरण ८
इ० स०
१६२७.

ळें तत्कालच धोक्यापासून देखील तो सुटला नाहीं. लोदी नामें मोठा शूर व धैर्यवान उमराव होता. तो हिंदुस्थानांतील पठाणी बादशाहांच्या वंशांतील

लोदी याची स्पर्धा.

आपणास जाणून अभिमान बाळगीत असे. तो दक्षिणेंतील सेनेवर अधिकारी होता. तो त्या अधिकारावर असतां शहाजहानाशीं विरुद्ध असे व राज्याची गादी रिकामी झाल्यावर त्यानें शारियर ह्याशीं मिळून शहाजहान आग्र्यास जात असतां वाटेंत अडथळा केला व त्याचा अपमान देखील केला. नवीन राजा शहाजहान ह्यानें त्याशीं युद्ध करण्यास सेना रवाना केली आणि शरण आल्यास तुला अधिकार देऊं वगैरे उदारपणाचा निरोप सांगून पाठविला त्यासमयीं लोदी ह्यानें आपलीं शस्त्रें ठेविलीं आणि शरण आला. तेव्हां माळवा येथें त्याची नेमणूक झाली; तेथून बादशाहाचे दरबारचा हुकूम आल्यावर तो राजधानींत गेला. तथापि त्याची प्रथम भेट झाली तेव्हांच बादशाहानें इतका त्याचा अपमान उघड रीतीनें केला कीं त्याजवरून त्याचा नाश करण्याचा विचार होता असें दिसून आलें. तेव्हां लोदी ह्याच्या अजमत नामें पुत्रानें तरवार देखील उपसली. त्या प्रसंगीं दरबारांत मोठा दंगा झाला. तितक्यांत तो उमराव आपल्याघरीं मोठ्या त्वरेनें गेला, आणि तें घर लढाई करण्याजोगें बळकट होतें ह्मणून तीनशांपेक्षां कांहीं अधिक इतके लोक घेऊन दरवाजे लावून आंत राहिला. ह्याप्रमाणें त्याच्या भोंवतीं श-

दरबारीं त्याचा अपमान.

त्रूनें गराडा दिला तेव्हां तो मध्यें सांपडला व आपल्या जिवावर बेतली आहे असें त्यास दिसलें त्या वेळेस त्याचा घोंटाळा होऊन भलतेच विचार मनांत येऊन त्याचें चित्त स्वस्थ नाहींसें झालें. अकस्मात बायका ज्या ठिकाणीं बसल्या होत्या तेथून किंकाळी ऐकूं आली. तेव्हां तो धांवून आंत शिरला आणि पाहतो तों रक्ताचा पाट चालून त्या बायका रक्तानें भरल्या आहेत असें दृष्टीस पडलें. ह्याचें कारण कीं पुढें आपणास दास्य भोगावें लागेल, व आपली बेअब्रू होईल ह्या भयानें त्यांनीं आपल्या छातींत तरवारी खुपसून घेतल्या होत्या. हिंदुस्थानांतील बायकांचा अशा प्रकारचा इमानीपणा थोडेवेळ दिसून आला असें नाहीं. मग तें पाहतांच तो अगदीं वेड्यासारखा झाला आणि त्यानें लागलेच आपले दोन पुत्र बरोबर घेऊन घोड्यांवर बसून आपल्या लोकांस तंबूर वाजवीत मागून चालविलें आणि आपण जातीनें असें ओरडत होता कीं मी आपल्या जाण्याच्या वेळेस वाद्यांच्या नादानें ह्या जुलमी पुरुषास जागें करीन, परंतु परत आलों म्हणजे त्यास थरथरां कांपावयास लावीन. मग शहाजहानाचे लोक लागलेच मोठ्या आवेशानें त्याच्या पाठीस लागले; परंतु चंबलनदीचा प्रवाह त्यावेळेस सपाट्यानें चालला होता व मोठ्या पर्जन्यामुळें पाणी फुगलें होतें म्हणून लोदी ह्यास जाण्यास मोठी अडचण आली. नाहींतर त्यानें आपल्या पाठलाग करणारे लोकांस लांब पाठीमागें टाकलें असतें. जेव्हां शत्रूच्या पुष्कळच लोकांनीं त्यास गांठ-

प्रकरण ८ इ० स० १६२७

तो धिटाईनें पळाला.

प्रकरण ८
इ० स०
१६२७.

सुटका.

शहाजहान
ह्याशीं युद्ध
करण्याचाकट.

लें तेव्हां नदींत उडी टाकणें त्यास प्राप्त पडलें. तो पोंहून पलीकडचे कांठीं गेला, परंतु त्याचे लोकांपैकीं पुष्कळच लोक बुडून मेले. त्यांत त्याचा प्रिय-पुत्र अजीम तोही बुडाला. तथापि तसाच पुढें दक्षिणेंत येऊन त्यानें उघड बंड केलें. त्यानें आपल्या पक्षांतले लोक जमा केले व त्या खेरीज गोंवळकोंडें व विजापूर येथील राजे मोंगलांच्या सत्तेंत फार दिवस राहून त्रासले होते ते मोंगलांशीं लढण्याकरितां कटांत घेतले. मग शहाजहान ह्यास पराकाष्ठेचें भय पडून तो लढाईचे ठिकाणीं घाईनें आला, परंतु त्याला जातीनें रणांत जाण्याचें नीट वाटेना व एका सरदारास सर्व सेनेचा अधिकार देण्याचा धीर होईना. तेव्हां त्यानें इरादत्त खानास एकटोळी व इतर सरदारांस दुसऱ्या टोळ्या देऊन निरनिराळ्या ठिकाणीं हल्ला करण्यास शत्रूंच्या एकत्र झालेल्या सेनेवर पाठविलें. लोदी ह्यास कटांतील लोकांचा मुख्य सेनापति नेमलें होतें त्यानें इतक्या शौर्यानें व युक्तीनें युद्ध प्रसंग चालविले कीं त्यापुढें शहाजहानाचे सर्व प्रयत्न निष्फल झाले. मग त्याचा फारच पाणउतारा झाला शेवटीं त्यानें लढाईचा सर्व कारभार आसिफ ह्याच्या स्वाधीन केला. तो पहिल्याप्रतीचे कीर्तीचा व अकलेचा पुरुष होता. त्याचें नांव ऐकूनच जे कटांमध्यें होते त्यांस पराकाष्ठेचें भय पडून ते लागलेच परत गेले. मग त्या बंडांतील मुख्यानें आपलें जातीचें मात्र सैन्य घेऊन

आसिफ ह्यास
मुख्य अधि-
कार दिला.

लढाई करून दैवाची परीक्षा पाहण्याचा निश्चय केला. परंतु दैव प्रतिकूळ झालें. गोंवळकोंड्याचा राजा तत्क्षणीं बादशाहाशीं तह करूं लागला आणि तहांतील पहिलें कलम आपणास धरून स्वाधीन करण्याविषयीं होईल असें जाणून लोदी हा त्याचे मुलखांतून लागलाच बाहेर गेला. शहाजहान ह्यानें हिंदुस्थानांत जाण्यास जे घाट लागतात ते सर्व बंद करण्याविषयीं यत्न केला. तथापि तो पळत असतां सर्व उपाय टाळून आपले जे निवडक लोक हरएक संकटांत इमानानें वागले त्यांस घेऊन माळवा प्रांतीं गेला. तेव्हां बादशाहानें लागलाच आपला एक सरदार अबदला नामें दहा हजार स्वार देऊन त्याचा पाठलाग करण्याकरितां पाठविला. लोदी पळत असतां त्यावर हल्ले पुष्कळवेळ झाले तेव्हां तो निर्बल झाला, शेवटीं शत्रूंचें मोठें सैन्य अगदीं भिडलें असें पाहिलें व त्याचा वडील पुत्र महंमदअजाज हा आपलें रक्षण व्हावें म्हणून झटत असतां युद्धांत पडला असें दृष्टीस पडलें. त्याचे लोक तीस राहिले होते व शत्रूच्या लोकांनीं तर त्यास अगदीं वेढिलें. तेव्हां पार पडण्याची तर त्यास आशा देखील राहिली नाहीं. मग शत्रूची मोठी टोळी आपणावर चालून आली असें पाहून त्यानें आपले इमानी लोक हांकमारून एके ठिकाणीं जमविले. आणि इतक्या संकटाच्यासमयीं मला न सोडतां इमानानें राहिलां, हे माझ्यावर तुमचे उपकार आहेत, व ह्याविषयीं मी तुमचा फारच आभारी

प्रकरण ८
इ० स० १६२७.

लोदीचें पलायन व पाठलाग.

प्रकरण ८
इ० स०
१६२७.

आहे, असें बोलून त्यानें शेवटलें मागणें मागितलें की माझे पक्षाचा नाश होणार हें खचित. तर इतःपर हा पक्ष न धरतां ज्यानें त्यानें आपला जीव वांचविण्याची तजवीज करावी. मग त्याचें भाषण ऐकून त्यांस रडें कोसळलें आणि त्यांनीं साफ सांगितलें कीं शेवटपर्यंत आपली जी वाट होईल तीच आमची असा निश्चय आहे. तेव्हां त्यानें माझ्या मागून चला अशी खूण मुकाट्यानें करून आपल्या घोड्यास टांचामारून शत्रूवर चाल केली. तों त्याच्या छातींत गोळा लागून तो पडला

लोदी पडला

तेव्हां त्याचे शूर तीस असामी सोबती होते तेही त्याभोंवती पडले. ती बातमी शहाजहानानें ऐकिली तेव्हां त्यास पोटांत मावेना इतका हर्ष झाला. आपला प्रतिस्पर्धी पडला खरा परंतु त्याचा पराक्रम केवढा व त्यानें किती संकटें भोगलीं ह्याविषयीं विचार त्याचे मनांत यावा तो कांहींच आला नाहीं.

ह्या रीतीनें बादशाहाचें राज्य सुरक्षित झाल्यानंतर

बादशाहाचा
न्यायीपणा
व दृढता.

ज्यांनीं घोर कर्में व जुलूम करून राज्य घेतल्यावर न्यायानें व मजबुतीनें तें राज्य चालविलें, त्या राजांच्या ओळींत ह्याची गणना व्हावी असें ह्यानें राज्य केलें. बादशाह स्वभावानें निष्ठुर होता, व तो आपल्या अभिमानी कारभारी लोकांवर दाब ठेवून प्रजेवर जुलूम न व्हावा म्हणून झटत असे. त्याला आसिफखान व मोहोबतखान ह्यांच्या शहाणपणाच्या उपदेशाचें साहाय्य पुष्कळ मिळत असे, हें खचित आहे. आणि तो कधीं क

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

धीं मोहोबत ह्याचा मत्सर करी तथापि त्यानें त्याला कामावर ठेवलें होतें. कधीं कधीं बादशाह कडक ठराव करी तेव्हां हे दोघे मध्यस्थी करून कांहीं नरम करीत. मुख्यत्वेंकरून बुंदेलखंड येथील राजास ठार मारावें असा त्यानें हुकूम केला असतां तो त्यांनीं फिरविला. जेव्हां मोहोबत त्या अपराधी राजास मारूंनये म्हणून पक्ष धरून भांडला तेव्हां राजानें जीवदान दिलें इतकेंच नाहीं, तर सर्व हक्क पहिल्याप्रमाणें देऊन त्यास ठेविलें. तो मुसलमानी धर्माविषयीं जरी अगदीं निरभिमानी होता तरी एकेवेळेस हिंदुलोकांच्या भजनपूजनाच्या पुष्कळ विलक्षण चाली पाहून त्यास इतका संताप आला कीं तो त्या धर्माचे लोकांस बुद्ध्या गांजूं लागला. परंतु ते लोक आपल्या शास्त्रांतील सांगितलेलीं कर्मे करण्याविषयीं मोठ्या उत्कंठेनें झटत तें पाहून पुढें त्याची चूक त्याच्या ध्यानांत आली, आणि त्याच्या घराण्यांत दोहों धर्माविषयीं मोकळीक ठेवण्याची चाल असे तीच रीति त्यानें चालू केली.

प्रकरण ८ इ० स० १६२७

धर्माविषयीं मोकळीक

जर परदेश जिंकण्याचे समय असते तर कदाचित ती कीर्ति आपणास मिळावी असें शहाजहानास वाटलें असतें. परंतु त्याचें राज्य त्यावेळेस इतकें वाढलें होतें व त्याचे सर्व शत्रु इतके लांब होते कीं तसले बेत चालविण्यास पुष्कळ गैरसोई सोसाव्या लागत्या. तथापि त्यानें दक्षिणेंत सेना नेल्या आणि तेथील राजे पूर्वापेक्षां दीन व आपल्या हातांतले करून टाकले. त्यानें कंधार व

त्याचीं लष्करी कृत्यें

प्रकरण ८
इ० स०
१६५०.

बलख ह्या प्रांतांवर हीं सैन्यें पाठविलीं. कंधार प्रांत हा हिंदुस्थानाच्या पश्चिम सीमेवर आहे, व दुसरा वायव्य सीमेवर आहे. परंतु ह्या दूर व पहाडी देशांत लढाई चालविण्यास संकट पडलें, व इराणचे राजे आब्बस आणि सेफी ह्यांच्या कडक अमलामुळें त्या भागीं निरंतर सत्ता स्थापणें असंभविक झालें. त्यानें पूर्वेकडील असाम हा अडाणी लोकांचा प्रांत आपल्या राज्यास जोडला, परंतु त्याच्यापासून फार लाभ न होतां तो निरंतर राहील हें ही खचीत नव्हतें.

इमारती बांधण्याची प्रीति.

हिंदुस्थानांत जेथें जेथें सुंदर व दिव्य अशा इमारती शोभत आहेत त्यांत ज्या उत्तम त्या ह्याच राजानें बांधल्या आहेत. नवी दिल्ली (नवीन वसविलेली दिल्ली) येथें तो राहूं लागला, म्हणून त्याचे नांवावरून शहाजहानपूर असें नांव त्या शहरास ठेविलें; तेथें त्यानें तांबड्या बळकट दगडांचा वाडा बांधला आहे. बिशप हेबर ह्या साहेबाच्या जे पराकाष्ठेचे उत्तम वाडे दृष्टीस पडले त्यांपैकींच हा होता असें तो म्हणतो. व मास्को येथें करॅम्लिन (तांबुसरंगाचा खनिज पदार्थ) ह्याचे इमारतीपेक्षां ती फार चांगली आहे. मुख्यत्वेंकरून तिचा दरवाजा फारच शोभिवंत केला आहे. जुंमामशीद म्हणून ह्याच शहरांत एक दरगा आहे त्याप्रमाणें दुसरा कोठेंच नाहीं. परंतु ह्या सर्व त्याच्या इमारतींपेक्षां ताज महाल म्हणून जहांगिरानें आपल्या नूरजहान नामें प्रिय राणीची मोठी कबर आग्रा एथें बांधली ती सर्वोत्तम आहे. ती संगमवरी शुभ्र पाषाणाची बांधून

आंत रत्नें बसविलीं आहेत. ती कबर चौकोनी असून १९० यार्ड घेराची आहे, तिजवर सत्तर फूट व्यासाचा उंच कळस त्या इमारतीच्या मध्यावर आहे, ती इमारत एका उंच चौथऱ्यावर आहे, त्या भोंवतीं मोठी बाग केली आहे. ती कबर बांधायास पाऊणकोट रुपये लागले असें म्हणतात, व ती इमारत सर्व राज्यांत उत्तम असें सर्वांनीं मानलें आहे. प्रकरण ८ इ० स० १६५०.

ह्याचें राज्य वीसवर्षांपेक्षां अधिककाळपर्यंत सुरळीत व भरभराटीचें चाललें होतें. त्याचे उत्तम प्रधान आसिफ व मोहोबत हे मरण पावले, परंतु त्यामुळें इतकेंच झालें कीं तो राज्य कारभारांत फारच मन घालूं लागला. तेव्हां तो कारभार असा करीत असे कीं तो पाहून सर्व लोक खुष असत. त्यास चारपुत्र होते. त्यांचे गुण व सदाचरण हीं चांगलीं असत, त्यामुळें लोकांनीं देवांप्रमाणें मानण्यास व सार्वभौमराजाच्या सिंहासनावर बसले असतां तें शोभिवंत करण्यास ते योग्य होते. असे पुत्र असल्यानें त्याचे सुखास पार नाहींसा झाला. बादशाह आणि त्याचे पुत्र ह्यांचीं मनें अगदीं एक व निष्कपटी असत. म्हणून त्यानें सर्वांस मोठालीं कामें सांगितलीं होतीं; तीं ते शहाणपणानें व अब्रूनें करीत होते. परंतु ते आपल्या वयांत आले तेव्हां परस्परांच्या मनांत मत्सर उत्पन्न न होऊंदेणें हें असंभाव्य होतें. प्रत्येकाच्या मनांत बाप मेला असतां राज्यपद मिळविण्याकरितां लढाया कराव्या लागतील असे विचार येऊं लागले; व अशी

भरभराटीची कारकीर्द.

कुटुंबांतील मत्सर.

प्रकरण ८
इ० स०
१६५०.

गोष्ट झाली असतां आपणांस राज्य किंवा थडगें ह्या दोहोंतून एक प्राप्त होईल असें प्रत्येकास पूर्वींच वाटलें. दारा म्हणून बादशाहाचा आवडता मुलगा होता त्याला वृद्धपणीं आपल्या जवळ ठेवून राज्य मिळावें असें त्यानें नेमलें होतें. त्या कुटुंबांत त्याप्रमाणें भला कोणीच नव्हता. त्यानें दरबारच्या लोकांची स्वेच्छेनें पाहिजे तसें आचरण करण्याची चाल असते ती आपणास लावून घेतली नाहीं, तो रिकामा वेळ विद्यासंपादण्याकडे लावी, परंतु कामांत घाई करणारा व धसक्या असा होता. सुजा नामें पुत्र विषयी होता परंतु सौम्य आणि शूरही असे. त्याच्या ताब्यांत बंगालचा सुभा होता. मुराद हा डौली गर्वी आणि धैर्यवान असे. त्यास लढाई आणि धोके ह्या कामांत आनंद वाटत असे. त्याचा अधिकार गुजराथेंत होता. अद्यापि चौथा पुत्र सांगण्याचें राहिलेंच आहे. त्याचें नांव औरंगजेब तो गुणाविषयीं आपल्या भावांपेक्षां अगदीं निराळा होता. अथ-

औरंगजेब.

वा राजांच्या आंगीं नेहेमी गुण आढळतात त्यांहून निराळ्या गुणांचा होता. औरंगजेब हा मनाचा खोल व सुखाचा तिरस्कार करणारा व जसा एखादा आपल्याच श्रमानें हलक्या स्थितींतून उंच पदवीस चढण्यास पराकाष्ठेचा उद्योग करतो त्याप्रमाणें हा आपला उद्योग व कारभार चित्त लावून नेहेमी करीत असे. ह्याप्रमाणें वर्तणूक त्यानें राखिली होती. दुसऱ्या एका गोष्टीनें त्याच्या उद्योगाचें व पुढें ज्या गोष्टी झाल्या त्यांचें रूपच निराळें झालें. अकबराच्या घराण्यांतील राजे आम्हीं मुसलमानी धर्माचे

आहों असें तोंडानें बोलत देखील न- सत. परंतु त्यांच्या सेनेंतील लोक व बडेलोक धर्मांचा बाणा बाळगीत अ- सत. धर्म हा शास्त्रीय वादाचा विषय आहे असें मुख्यत्वें समजून ते त्याविषयीं खबरदारी न घेतां उदासीन होते, व आपल्या प्रजेंतील लोकांस धर्मामुळेंच एकाग्र्यास वाढविणें हें न होऊं देण्याविषयीं झटत असत; औरंगजेबानें तर मुसलमानांचा धर्म कडक बाळगला होता. त्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें अगदीं नेमानें वागत असे आणि आपणास साधु आणि फकीर अशी पदवी मिळाली असतां मोठ्या राजाच्यापेक्षां अधिक अब्रू होईल व त्या पदवीविषयीं माझी फार इच्छा आहे असें तो स्पष्ट बोलत असे. त्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांचा द्वेष त्यानें आपणच करून घेतला. परंतु त्याचे पूर्वज धर्माविषयीं उपेक्षा करीत ही निंद्य गोष्ट सोडून सेनेंतील अधिकारी मुसलमानी धर्माचे होते त्यांशीं धर्माचे कामांत तो मिळाला होता. ह्यामुळें त्या सरदारांस आनंद झाला. लढाया करण्याची मुख्य भूमि दक्षिण देश होती तेथें सेनेचा अधिकार ही पुष्कळ वर्षें त्यानें केला होता. ह्मणून पूर्वींच्या राजांपेक्षां त्या जवळ चांगले शिकलेले लोक होते व त्या राजांपेक्षां युद्धाच्या कामांत तो प्रवीण झाला होता.

प्रकरण ८ इ० स० १६५०.

मुसलमान धर्माची भक्ति.

हा प्रकार फार दुःखदायक व अशुभसूचक होता. तरी बादशाहास एकाएकीं फारच दुखणें आलें तें न येतें तर फार काळ पर्यंत राहिला असता असें वाटतें. बाद-

बादशाहाचें दुखणें.

प्रकरण ८
इ० स०
१६२०.

शाह कित्येक दिवस बेशुद्ध होऊन पडला होता व तो बरा होईल असें कोणास ही वाटत नव्हतें. मग त्याच्या हुकुमावरून दारा ह्यानें लागलाच राज्य कारभार आपल्या हातीं घेतला. आणि जसा तो गादीवरच आहे अशा बेतानें त्यानें कारभार चालविला. तेव्हां मुख्यत्वेंकरून त्यानें आपल्या भावांविषयीं मनांत मत्सर आहे असें दाखविण्याजोगीं कृत्यें केलीं. तीं अशीं कीं, त्यानें त्यांस पत्रें वगैरे पाठविण्याचें बंद केलें. त्यांचे कागद मध्येंच धरावे आणि त्यांच्या पक्षाचे जे उमराव होते त्यांस राज्याच्या हद्दीपार घालवावें असें मांडलें. ह्या प्रमाणेंच द्वेष त्याच्या बंधूंच्या मनांत होताच, परंतु ही गोष्ट त्याणें केल्यामुळें त्यांनीं लवकरच ह्याशीं द्वेष आरंभिला व त्यांस तसें करण्यास कांहींशी सबब झाली. जरी हरएक तऱ्हेनें बंदोबस्त केला होता तरी बाप दुखणाईत आहे असें वर्तमान त्यांस लागलें व तो मरण देखील पावला असें कोणीं त्यांचे मनांत संशयित भरविलें. तेव्हां त्यांनीं लागलीच जी वर्तणूक आरंभिली ती वैभव प्राप्त व्हावें असें मनांत धरून केली नाहीं, परंतु आपले जातीचें रक्षण व्हावें म्हणून आरंभिली आहे असें ते सांगत. बंगाल्यांत सुजा ह्यानें आपलें लष्कर प्रथम चालू केलें. आणि नंतर लवकरच गुजराथेंत मुराद होता त्यानें औरंगजेबास आलिकडील झालेली हकीकत लिहून पाठविली व आपल्या भावाचे जे उद्देश उघड दिसत होते ते सिद्धीस जाऊं नयेत म्हणून मजकडे येऊन मीळ असें बोलावणें केलें तें त्यानें लागलेंच मान्य केलें.

इकडे शहाजहान हा बराहोईल असें कोणासही वाटत नव्हतें परंतु तो चांगला बरा झाला. मग दारा ह्यानें राज्य कारभार माघारा बापाच्या स्वाधीन केला. हें त्यानें पुत्रधर्मास अनुसरून फार योग्य केलें. त्याच वेळेस ही बातमी सुजा ह्यास कळविली व बादशाह मेला असें समजून जे उपाय त्यानें केले ते बंद करावे असा मजकूर ही त्यास लिहून पाठविला, परंतु तें सुजा ह्याचे हातीं राहिलें नाहीं. त्याच्या मनांत आपणास राज्य असावें असें जळत होतें व त्यानें त्या सांगण्यावर अविश्वास दाखविला व बादशाहानें आपल्या हातानें जीं पत्रें लिहिलीं तीं खोटीं केलीं असें देखील तो म्हणाला. तथापि पुढें गंगेच्या कांठीं त्याची दाराचा पुत्र तरुण व मोठा बुद्धिवान सालिमन नामें होता त्याशीं गांठ पडली तेव्हां युद्धांत त्याचा अगदीं पराजय होऊन त्यास मोंगीर येथील किल्ल्यांत जाऊन दरवाजे बंद करून राहणें प्राप्त पडलें. तेथें त्या भोंवतीं बादशाहाच्या फौजेचा दाट वेढा पडला. इकडे असें चाललें असतां दक्षिणेंतून सेना आली तिनें ह्याच्यापेक्षां भयंकर प्रकारचीं कृत्यें केलीं.

प्रकरण ८
इ० स० १६५०.
तो बरा झाला.

त्याच्या पुत्राचें बंड.

औरंगजेब विलंब न करितां भावाचें बोलावणें मान्य करून जितकी सेना मिळाली तितकी घेऊन त्याला मिळण्याकरितां घाईनें निघाला. परंतु मुराद हा आपला प्रतिस्पर्धी आहे व त्याच्या मनांतही आपणाविषयीं सुजाप्रमाणें वाईट येण्याचा संभव आहे असें समजून त्यानें हरएक खोटें व त्याला चढविण्याचें भाषण केलें तें त्या-

प्रकरण ८
इ० स०
१६५२.

स स्वभावानें मोकळ्या मनाचा व भोळा होता म्हणून खरें वाटलें. औरंगजेब बोलत असे कीं हिंदुस्थानच्या गादीस मुराद हाच योग्य आहे असें मला वाटतें व लोकांनीं त्यास ह्याकरितां बोलाविलें आहे, आणि मीं स्वस्थ एकांत ठिकाणीं जाऊन बाकीचें आयुष्य धर्माचा विचार करण्यास लावावें हीच माझी इच्छा आहे तरी त्यास राज्य मिळण्याकरितां साहाय्य करणें हें मला भूषण वाटतें. ज्यास औरंगजेबाची माहिती होती तो असल्या भाषणानें फसला असता असा मनुष्य कदाचित् हिंदुस्थानांत नसेल परंतु मुराद ह्याचा भोळवटपणा व मीपणा इतका होता कीं असें भाषण केल्यास आपल्या भावाच्या मनांत देखील येणार नाहीं. अशी औरंगजेबाची खातरी झाली होती. मग दोघां राजपुत्रांची सैन्यानिशीं स्वारी नर्मदेच्या कांठीं आली.

औरंगजेबाचा जय.

ती नदी उतरून जाऊन त्यांनीं जश्वंतशिग म्हणून रजपूत जातीचा सरदार बादशाहाच्या पदरीं चाकरीस होता तो पुष्कळ स्वार घेऊन युद्धास आला, त्याचा अगदीं पराजय केला.

बादशाहाचें धैर्य खचलें.

शहाज़हान ह्यास ह्या गोष्टी कळल्यावर पराकाष्ठेचा खेद झाला. त्यास त्या बंडाचें भयंकर स्वरूप कळून आलें, आणि त्यांस धाक पडला कीं, परिणाम कोणताही होवो, परंतु माझा चुराडा झाल्यावांचून बहुत करून राहत नाहीं. मग त्यानें पुढें जो वारस होणार त्याचें रक्षण होण्याकरितां आपलें सर्व सामर्थ्य खर्चिलें व त्या बरोबर रणांत मी जातीनें येतों असें देखील बोलून

दाखविलें. परंतु त्याचा हा बेत रहित करविला, ही गोष्ट फार वाईट झाली. सैलमन ह्यास सुजाशीं चांगलीं कलमें कबूल करून तह करावा असें सांगणें गेलें व ज्यापासून फारच धोका होणार त्या शत्रूवर लागलेंच जावें, अशी आज्ञा पाठविली. आणि दारा ह्यास साफ हुकूम गेला कीं, मोठी कुमक घेऊन त्याची वाट पाहत बसावें. त्याप्रमाणें त्या राजपुत्रानें आपले एक लक्ष घोडेस्वार घेऊन चंबला नदीच्या कांठानें सुरक्षित ठिकाणीं ठेविले, तें ठिकाण आग्र्यास जाण्याच्या वाटेच्या टप्यांत होतें व आपल्या लष्करा भोंवतीं त्यानें मोठाल्या मोरच्यांची रांग लावली होती. जेव्हां बंडवाले लोक चालून आले तेव्हां त्याप्रमाणें ठेवलेलें तें सैन्य पाहून त्यांस बरेंच संकट पडलें. मुराद हा स्वभावानें आवेशी होता. तो म्हणाला कीं सैन्याची फळी फोडून जावें, परंतु ही गोष्ट औरंगजेबाच्या दूरवर विचारास नीट वाटली नाहीं. औरंगजेबानें पर्वतांतून एक वाट आहे तिनें गेलें असतां शत्रूस आपलें ठिकाण फिरवावें लागेल अशी बातमी समजल्यावर शत्रूस फसविण्याकरितां लष्कर आहे असें मात्र दाखवून आपला उद्देश सिद्धीस नेला आणि आग्र्यावर स्वारी केली. तेव्हां बादशाहाचा प्रतिनिधि तेथें असे त्यास तें नगर सोडून जावें किंवा युद्ध करावें ह्या दोन गोष्टींतून एक करणें भाग पडलें. परंतु तो स्वभावानें धैर्यवान असे म्हणून युद्ध करणेंच त्याला बरें वाटलें. ज्या लढाईनें मोंगल बादशाहीचा जो काय परिणाम व्हावयाचा त्याचा निकाल झाला ती

प्रकरण ८
इ० स० १६५२.

दाराचें सैन्य.

निकराचें युद्ध

प्रकरण ८
इ० स०
१६५८

हीच लढाई होय. हिचें वर्णन इतिहास कर्त्यांनीं फारच घोटाळा करून लिहिलें आहे व दिसण्यांत आशियेंतील लोकांच्या चालीप्रमाणें त्यांत अतिशयोक्ति असल्यामुळें अगदींच अस्पष्ट झालें आहे. ते असें लिहितात कीं उभयपक्षांचे सेनेचा जय पराजय पुष्कळ वेळ झाल्यानंतर दोन्ही सेना रणभूमी सोडून पळाल्या. दारा हा हजार घोडे घेऊन व औरंगजेब शंभर घोडे घेऊन रणांत राहिला तेव्हां औरंगजेबास अगदींच आशा नाहींशी झाली. इतक्यांत ज्या हत्तीवर त्याचा भाऊ बसला होता तो मागें हटला व त्या सरदारास उतरावें असें वाटून तो उतरला त्यामुळें त्याच्या सेनेंतील लोक भयाभीत झाले. मग त्याचा अगदीं पराजय झाला. ह्या

त्या लढाईचें घोटाळ्याचें वर्णन.

लढाईंत ज्या खरोखरी मोठ्या गोष्टी घडल्या त्यापुढें लिहितों. व ह्यांपेक्षां अधिक घडल्या नाहींत असें ही म्हणतात. सैन्याच्या मुख्य दोन टोळ्या होत्या त्या मुराद आणि औरंगजेब ह्यांच्या हुकुमांत होत्या. मुराद दाराच्या समोर होता त्यावर अशा जोरानें हल्ला केला कीं मुरादानें पराकाष्ठेचे झटून श्रम केले तरी त्याच्या सैन्याची फळी फुटून खुद्द त्याला जखम लागली, आणि त्याच्या जिवावर गुदरली. इतक्यांत त्याचा साह्यकारी औरंगजेब ह्यानें फार निकराचें युद्ध केल्यानंतर ज्या सेनेशीं लढत होता तिचा अगदीं पराजय करून ती पळवून लावली. मग गरका घालून तो दुसऱ्या बाजूच्या लोकांस साह्य करण्यांकरितां आला. तेव्हां त्यानें पुन्हा लढाई करून पूर्ण जय मिळविला.

त्या दोघांचीं सैन्यें आग्र्यावर चालून गेलीं तेथें मुराद ह्यास जखमा लागल्यामुळें तो निजून राहिला हें औरंगजेबास पराकाष्ठेचें सोईचें झालें; तेव्हां सर्व अधिकार ह्याचेच हातीं आला. त्यानें प्रथम खबरदारी केली कीं सोलेमान ह्याच्या सेनेंत फितूर करावा. म्हणून एक गुप्त दूत पाठविला आणि हें काम सिद्धीस नेण्यास त्याला प्रयास पडला नाहीं. आशियेंतील लोकांची प्रबल पक्षाकडे जाण्याची नेहेमींची चाल आहे त्याप्रमाणें तेच फितूर होऊन औरंगजेबास मिळाले. असें म्हटल्यास चिंता नाहीं. नंतर त्यास आपल्या बापास स्वाधीन करून घेण्याची काळजी पडली. हें कृत्य कठीण व नाजूक होतें. कारण ज्या वाड्यांत शहाजहान राहत होता त्या वाड्यास तटबंदी होती म्हणून तो वाडा वेढा घातला असतां फार दिवसपर्यंत हस्तगत होणार नाहीं, असें वाटत होतें. ह्याशिवाय पुत्रानें बापावर हल्ला करणें वाईट आणि तो राजा लोकांस प्रिय असून त्यास सर्व लोक सन्मान देतात. ह्याकारणानें लोक आपला द्वेष फार करतील असें त्यास वाटत होतें. ह्याकरितां एकाद्या युक्तीनें आपला उद्देश सिद्धीस न्यावा हें औरंगजेबास नीट वाटलें: परंतु जो पुरुष कपटांत नेहेमीं वागलेला व मनुष्यास फसविण्याच्या सर्व रीति ज्यास माहीत अशाशीं त्याची गांठ पडली होती. तथापि युक्तिकरून पहावी असा निश्चय करून त्यानें बादशाहाकडे जासूद पाठविला. त्या बरोबर मी हल्लीं ज्या स्थितींत पडलों आहें तिचें पराकाष्ठेचें मला दुःख

प्रकरण इ० स० १६५२

सुलेमानाच्या सेनेंत फितूर.

प्रकरण ८
इ० स०
१६५२

वाटत आहे व माझी आपणावर प्रीति आहे आणि मी प्रजाधर्मांत तत्पर आहें अशी खातरी असावी म्हणून पत्र पाठविलें. ह्या पत्रांतील मजकुरावर शहाजहानानें थोडाच विश्वास ठेवला, तथापि त्यानें त्याचा रंग पाहण्याचा निश्चय करून आपल्या लाडक्या जहानरा नामक कन्येस बंधूची भेट घेण्याकरितां व खरोखरी मजकूर काय आहे तें पक्कें समजण्याकरितां पाठविलें. ती पहिल्यानें मुराद ह्याकडे गेली तेव्हां त्यानें ती दाराच्या हिताविषयींच अगदीं तत्पर आहे असें जाणून तिचा सभ्य चालीप्रमाणें देखील मान ठेविला नाहीं. मग ह्या राजकन्येस राग येऊन ती आपल्या पालखींत बसली आणि घाईनें छावणींतून बाहेर चालली होती इतक्यांत औरंगजेबाची गांठ पडली तेव्हां पराकाष्ठेच्या कृपाळूपणानें मान पूर्वक त्यानें सलाम केला आणि तूं मला पत्र वगैरे पाठवून कांहींच वर्तमान कळविलें नाहीं असें तिशीं बोलून तिला आपल्या तंबूंत घेऊन गेला तेथें त्यानें कबूल केलें कीं अविचारानें त्वरा करून मीं जी वर्तणूक केली तीविषयीं माझे मनांत पराकाष्ठेचा पश्चात्ताप झाला आहे आणि झाल्या गोष्टीचें कोणत्याही उपायानें निराकरण कसें होईल ही मला काळजी लागली आहे. त्यानें दाराचा पक्ष स्विकारण्यास मी राजी आहें असें देखील बोलून दाखविलें. तो म्हणाला दाराच्या पक्षांत अगदींच हर्शील नाहीं म्हणून मी आतां निरुपाय आहें. ह्याप्रमाणें बोलल्यावर जहानरास दारा-

जहानरा बादशाहाची कन्या.

औरंगजेबाची मतलबी वर्तणूक.

विषयीं त्यावेळेस ज्या सरदारांच्या मनांत चांगलें वाटून त्याचा पक्षध- रून राहिले होते त्यांचीं नांवें सांगावीं व त्यापाशीं सामग्रीकाय आहे त्यासर्व गोष्टी उघड करा- व्या असें तिच्या मनांत वाटलें; तेव्हां तिनें आपल्या भावास अतिशयित उपयोगाच्या पुष्कळ गोष्टी कळवि- ल्या. त्यांपासून पुढें त्यानें आपणास पूर्ण फायदा क- रून घेतला. नंतर त्यानें उघड सांगितलें कीं माझें स- र्वांशीं समाधान झालें. आतां तुझे सर्व उद्देश सिद्ध क- रण्यास सहाय होईन. त्यानें असेंही सांगितलें कीं दोन दिवसांत बादशाहाच्या चरणापाशीं पश्चात्ताप पावलेला पुत्र येईल हें खचित सांगतों.

प्रकरण ८ इ० स० १६५६.

मग जहानराही आनंदाची बातमी घेऊन आ- पल्या बापाकडे धांवत आली. परंतु बा- दशाहानें त्या बोलण्यावर पूर्ण भरंवसा ठेविला नाहीं. तथापि औरंगजेब आप- णास भेटण्यास येण्याचा खचित बेत करीत आहे असें पक्कें मानून त्यानें निश्चय केला कीं त्याला आपलासें करण्याची संधी चांगली आहे, तर तसें करावें. त्याला समजलें नाहीं कीं कितुराच्या कामांत आप- ल्यापेक्षां निपुण अशा पुरुषाशीं मी हा खेळ चालवि- ला आहे. त्या औरंगजेबानें गरिबीचा निरोप पाठविला कीं ज्यांकडे अपराध असतो ते निरंतर भीत असतात व मा- झ्या सारिख्याच्या अपराधाची क्षमा कशी होईल तें माझ्या मनांत येत नाहीं. तर माझा पु- त्र महंमद ह्यास पूर्वीं थोडे शिपाई लोक घेऊन वाड्यां-

बादशाहाचा बेत.

औरंगजेबाचें अधिक चातुर्य.

प्रकरण ८
इ० स०
१६१६.

त येण्याची आज्ञा द्यावी, न दिल्यास माझी खात्री होण्यास दुसरा उपाय नाहीं. शहाजहानाचा कल आपला उद्देश सिद्धीस नेण्याकडे इतका होता व तो निरोप त्यास इतका खरा वाटला कीं तें कबूल करण्यास त्यानें अनमान केला नाहीं. मग तो तरुण मुलगा आंत शिरला आणि मनापासून त्याचें स्वागत झाल्यावर त्यानें आपले लोक सोईच्या ठिकाणीं ठेवले. परंतु त्यानें लौकरच पाहिलें कीं बादशाहाचे पुष्कळ लोक, ज्या ठिकाणीं उभे राहिले असतां संशय उत्पन्न होईल अशा ठिकाणीं भराभर जाऊं लागले. मग त्यानें बादशाहास जाऊन सांगितलें कीं आपल्या लोकांच्या वर्तावरून माझ्या मनांत शंका आल्या वांचून राहत नाहीं. तर ते लोक वाड्यांतून न काढल्यास मी बापास आतां हा मजकूर कळवीन म्हणजे तो भेटीस येण्याचा बेत बहुत करून रहित करील. मग त्या वृद्ध मनुष्यास तें देखील खरें वाटून आपला उद्देश सिद्धीस नेण्यांत कांहीं जरी तोटा झाला तरी करीन असा त्यानें निश्चय करून मान्य केलें कीं शिपाई लोकांनीं वाडा सोडून जावें. तेव्हां अर्थातच महंमद आणि त्याचे लोक हे त्या वाड्याचे मालक त्यानेंच केले. नंतर अशी बातमी खचित समजली कीं औरंगजेब आपल्या घोड्यावर बसून लवाजमा बरोबर घेऊन येत आहे. बादशाह पराकाष्ठेचा आनंदित होऊन सिंहासनावर बसून आपले बेत व आशा पूर्ण होतील म्हणून वाट पाहत होता. पुढें त्यास लौकरच समजलें कीं आपला पुत्र भेटीस नयेतां अकबरा-

बादशाहाचें कृत्य.

च्या कबरेकडे पूजा वगैरे करण्याकरितां चालता झाला. ह्या गोष्टींत आपली खचित हेलना केली असें जाणून त्यानें महंमदास रागानें विचारलें कीं अशा वर्तणुकेनें औरंगजेबाच्या मनांत तरी काय आहे? मग त्यानें विचार करून उत्तर दिलें कीं, माझ्या बापाच्या मनांत आपणास भेटण्याचें नव्हतें. मग तूं येथें कां आलास असें विचारल्यावर महंमदानें सांगितलें कीं बाले किल्ला ताब्यांत घेण्याकरितां आलों. तेव्हां शहाजहानाला समजलें कीं मींच समुद्रांत उडी घातली. मग त्यानें व्यर्थ आपली निंदा व अभद्र भाषणें ह्यांचा सपाटा चालविला. त्यानें शांतपणानें विचार केल्यावर महंदास पुन्हा बोलावणें पाठविलें आणि आपलीं दुःखें वर्णून पराकाष्ठेची प्रार्थना करून पाठीस लागला कीं मला तूं मोकळें कर म्हणजे मी हिंदुस्थानची बादशाही तुला देईन असें वचन देऊन म्हणाला कीं सेनेवर व लोकांवर माझें इतकें वजन आहे कीं तुला भय होऊं देणार नाहीं. महंमद क्षणभर करूंनकरूं अशा विचारांत आहे असा दिसला. परंतु मग खोलींतून त्वरेनें बाहेर पडला. पुढें पुष्कळ विनवणी बादशाहानें केली ती त्यानें ऐकली नाहीं.

प्रकरण ८

इ० स० १६५८

शाहाजहान ह्याचा निरर्थक राग.

आतां औरंगजेबास मुराद ह्याची मात्र वाट लावणें राहिलें व जरी तो जखमा बऱ्या होऊन आग्र्यास गेला होता, व सेनेचा अधिकार त्यानें घेतला होता तरी त्यापासून फारसें भय ह्यास नव्हतें. औरंगजेबानें आपल्या भावास

मुरादाचा नाश.

प्रकरण ८
इ० स०
१६५८.

तूं बरा झालास म्हणून मी फारच अ-नंदी झालों असें बोलून त्यास बादशाह म्हणून खुरनिसात केली आणि म्हणाला कीं आतां माझ्या इच्छा सर्व पूर्ण झाल्या कारण कीं आपल्या पूर्वजांच्या सिंहासनावर तुझ्या सारखा योग्य पुरुष बसविण्यांत मला यश आलें. माझ्या मनांत तर मक्केस यात्रा करण्यास जावें येवढेंच आहे. धर्माकडे आपला सर्वकाळ लावावा ह्या हेतूनें त्यानें प्रथम यात्रा करण्याचा बेत केला. मुराद ह्यानें कांहींसा आग्रह त्यानें न जावें म्हणून केल्यासारखें दाखवून जाण्याचें मत दिलें आणि मनांत म्हणाला कीं आतां आपला भाऊ स्वेछेनें यात्रेस जात आहे ही सुखाची गोष्ट आहे. औरंगजेबानें अशी नक्कल करून तींत आपल्या बेताप्रमाणें मनोरथ सिद्धीस नेला. नंतर मुराद ह्याचा नाश करावा म्हणून गुप्तपणानें तयारी चालविली होती; आणि लौकरच तो उद्देश इतका उघड झाला कीं त्या भोळ्या मुरादास देखील खरें वाटून तो फसेनासा झाला. त्याचे मित्रांनीं त्याची खात्री केली कीं मक्केस जाण्याविषयीं तयारी होत आहे ती हिंदुस्थानाचें राज्य घेण्या पुरती आहे व शिपाई लोकांस बक्षिसें पुष्कळ देऊन औरंगजेब त्यांची प्रीति संपादित आहे, सारांश आपल्या रक्षणाविषयीं बंदोबस्त करण्यास विलंब लावूनये असें त्यांनीं सांगितलें. शेवटीं त्यास तें सर्व समजून त्यानें आपल्या भावाशीं विश्वास घात करण्याचे उपाय चालविण्याचा निश्चय केला. त्यानें त्यास मोठा समारंभ करून मेजवानीस बोलाविलें ते-

औरंगजेबाचा मतलब

व्हां हरएक पदार्थ त्याला मारण्याकरितां तयार केला होता; परंतु औरंगजेबाच्या तीक्ष्ण नजरेस कांहीं पदार्थांविषयीं संशय दिसून आला. मग तो एकाएकी दुखण्याचा बहाणा करून घाईनें कोणाच्या मनांत संशय नयेऊं देतां चालता झाला. पुढें लौकरच मुराद ह्यास मेजवानीस औरंगजेबानें बोलाविलें तें त्यानें तर मान्य केलें. तेव्हां पहिल्या प्रतीचे वाद्यें वाजविणारे व हिंदुस्थानांतील सर्वोत्कृष्ट रूपवतीतरुण स्त्रिया बुद्धया जमविल्या होत्या. औरंगजेबानें आपली धार्मिक बुद्धि एकीकडे ठेवून ह्याविषयीं राजास चैन करण्याकरितां व यथेच्छ वागण्याकरितां बोलाविलें. त्याप्रमाणें फसून मुराद मोहित झाला आणि ऐषारामाखालीं यथेच्छ आहार विहार केल्या नंतर तंबूंत निद्रिस्त झाला. नंतर औरंगजेबानें आपले कांहीं लोक जे वाईट बरें हा विचार न करितां सांगितल्याप्रमाणें करतील असे होते त्यांस पाठविलें, त्यांनीं आंत जाऊन त्यास बांधण्यास आरंभ केला तों तो जागृत झाला आणि त्याची तरवार एकीकडे नेऊन ठेवली होती ती आणा असें ओरडत त्यानें सुटण्याकरितां जोरानें प्रयत्न केले. इतक्यांत त्याच्या भावानें पडदा उचलून मोठ्यानें भाषण केलें कीं तूं शरण यावें किंवा मरावें ह्यादोन गोष्टीं शिवाय तिसरी गोष्ट नाहीं, आणि जर अडथळा करील तर लागलाच मारून टाका असा हुकूम ही दि-

प्रकरण ८
इ० स०
१६५८

त्याला मारण्याचा बेत निष्फळ झाला.

मुरादाचा शेवट.

प्रकरण ८
इ० स०
१६५८

ला. मुराद मोठ्यानें निंदेचीं भाषणें बोलून मारब्धीं होतें त्यास वश झाला. मग लागलाच त्यास बंदीवान करून आग्र्यास घेऊन गेले.

ह्या प्रमाणें सर्व अडथळे काढून टाकल्यावर औरंगजेबानें विचार केला कीं बादशाहीचें छत्र आपल्या शिरावर धरण्यास आतां वेळ चांगली आहे. तथापि त्याच्या बोलण्यास व तो एकीकडे जाऊन पारमार्थिक विचार करी व प्रपंचापासून अगदीं विरक्त असे ह्या गोष्टींस तें अगदीं विरुद्ध म्हणून त्यास राज्याभिषेक करून

औरंगजेब गादीवर बसला.

घेणें फारच कठीण पडलें. तेव्हां अशी युक्ति केली कीं आपल्या मित्रांनीं येऊन आग्रह करावा कीं तूं लोक हिताकरितां आपले धार्मिकपणाचे निश्चय व स्वस्थ असणें हीं सोडून द्यावीं आणि जें अवश्य प्राप्त झालें त्यांत दुःख असलें तरी तें पतकरावें हें तुला योग्य आहे. मग अशा प्रकारचें मित्रांचें भाषण त्यानें योग्यकाळीं मान्य केलें असें दाखविलें. तरी तो आपल्या पूर्वींच्या आचरणास इतका लगटून राहिला कीं राज्याभिषेकाचा संस्कर होण्याच्या वेळेस मोठा समारंभ करण्याची चाल असे तो करूं दिला नाहीं. परंतु लोकांच्या गर्जना बादशाह बंदींत होता त्याच्या कानीं पडल्या तेव्हां त्यास पक्कें वाटलें कीं कांहीं तरी आपला नाश करण्याचा निश्चय ठरला आहे. त्यानें जहानरा

बादशाह कैदी

हीस सांगितलें कीं तूं जाऊन काय आहे ह्याचा शोधकर; परंतु लागलीच ती माघारी बोलावली. त्यास वाटलें कीं न जाणो दाराचें शीर कापून लोकां-

च्या दृष्टीस पडावें म्हणून नेत असतील प्रकरण ८
तें तिच्या दृष्टीस पडेल, तरी तिला इ० स०
लौकरच बातमी लागली. मग तिनें १६५८
खरी गोष्ट काय होती ती बादशाहास सांगितली. तेव्हां तो हतभाग्य राजा उठला आणि मुकाट्यानें खोलींत जाऊन आपल्या डोकीवर मुगुट होता त्याकडे नदर लावून म्हणाला. हा नांवाचा मुगुट राहिला आहे तो घेऊन जा;-परंतु थांब हा दिला असतां औरंगजेबाचा हक्क कबूल केल्याप्रमाणें होतें. नंतर तो पुष्कळ वेळपर्यंत विचार करीत उभा होता. शेवटीं म्हणाला, जहानरा, हा नवीन बादशाह राज्यावर अगोदर बसला, त्यानें इतर दुष्टकर्में करून हे उच्च पद मिळविलें त्यांत बापाला मारून टाकतां म्हणजे नीट होतें. इतक्यांत कोणीं सांगितलें कीं औरंगजेब गादीवर कोणत्या कारणांनीं बसला तें सांगण्याकरितां महंमद आंत येण्याची परवानगी मागत आहे; परंतु तो पदच्युत झालेला बादशाह रागावून म्हणाला कीं, बापास पुत्रांनीं पु- रागाचें भाषण.
ष्कळ वेळां पदच्युत केलें आहे. परंतु बापास संकटकाळीं अपमानाचें भाषण बोलणें हें औरंगजेबा करितांच राखून ठेवलें होतें. बादशाही त्या बंडखोर पुरुषानें आपल्या हातीं घेतली ह्याचीं कारणें आपणास मोठेपणा मिळावा ह्याशिवाय काय आहेत! त्याची कारणें ऐकलीं असतां त्याची वर्तणूक न्यायास अनुसरून आहे असें कबूल केल्याप्रमाणें होईल.

औरंगजेबानें धिट्टपणानें व त्याचे महत्वाकांक्षी स्वभावामुळें जें करणें अवश्य पडलें तें केलें म्हणून त्याच्या मनांत तें फार खात होतें व आपली वर्तणूक

प्रकरण ८
इ० स०
१६५८

नीट आहे असें म्हणण्यास खरोखरी कांहींच साधन नव्हतें, ह्या कारणामुळें जें बोललें असतां नीट वाटणार नाहीं तसलें भाषण करण्याचा आग्रह धरला नाहीं. त्यानें आशियेंतील पहिल्या प्रतीच्या पराक्रमी राजास फसविलें आणि जिंकिलें. तेव्हां त्याचे इच्छेचा कळस झाला. मग त्यानें वाईट काम वगैरे कांहीं केलें नाहीं व आपला बाप आपल्या बंदींत मोठ्या बंदोबस्तानें ठेविला होता तरी त्याचा मान राखून अब्रूनें त्याशीं वर्तणूक केली.

आठवें प्रकरण समाप्त.

# प्रकरण ९.

## औरंगजेबाची कारकीर्द.

दारा व सुजा ह्या औरंगजेबाच्या भावांनीं त्यास अडथळा केला. सुजाचा पराजय-दाराचा युद्धांत पाडाव आणि मृत्यु-औरंगजेब ह्याचा पुत्र महंमद ह्यानें फितूर केला तेव्हां त्याला हस्तगत होणें भाग पडलें-सुजाचा मृत्यु-शहाजहानाशीं औरंगजेबाची वर्तणूक-त्याची कारकीर्द-मोंगल सरकारच्या न्यूनगोष्टी-बर्नियर ह्यानें सांगितलेल्या कथा-इराणच्या लढाईचें भय-फकिराचें बंड काबुलांतील दंगा-दक्षिण जिंकली-मराठ्यांच्या सत्तेचा प्रादुर्भाव-शिवाजीचे पराक्रम-त्याचा मृत्यु आणि गुण-संभाजीची कारकीर्द व मृत्यु-मराठ्यांचे फौजेचें वर्णन-औरंगजेबाचा धर्माभिमान-त्याचा मृत्यु व गुण-शाह आलम-शीकलोक-त्यांच्या वृद्धीस प्रतिबंध-शाह आलमाचे गुण व मृत्यु-बादशाहीविषयीं भांडणें-सयद लोक-निजामउल्मुल्क आणि सादतखान-नादीरशाहाची स्वारी-दिल्लीवर हल्ला-बादशाहींत चोहोंकडे धांदल-अफगान लोकांची स्वारी-ते व मराठे ह्या उभयतांच्यामध्यें कलह पानिपत येथील लढाई-मोंगलांचें घराणें अगदीं तुच्छ झालें.

---

औरंगजेबाची अवस्था.

हिंदुस्थानच्या गादीवर औरंगजेब बसला होता; परंतु त्याचे भाऊ दारा व सुजा जिवंत होते, व त्यांच्या ताब्यांत मोठालीं सैन्यें होतीं. तोंपर्यंत त्याला आपण निर्भय आहों असें वाटत नव्हतें. दारा फार गुणी असे व श-

प्रकरण ९
इ० स०
१६५८

हाजहानानें बादशाही त्यासच नेमली होती, ह्या गोष्टीमुळें त्याचें पराकाष्ठेचें भय होतें, व ह्या नवीन बादशाहानें प्रथम त्याचा समाचार घेण्याविषयीं यत्न चालविला. दारानें मागें लाहोरास जाऊन आपल्या शत्रूच्यापेक्षां पुष्कळ लोक जमा केले होते. तथापि त्यांत नवीन भरलेले लोक मुख्यत्वेंकरून होते म्हणून त्यांस आपल्या भावाच्या वहिवाटलेल्या लोकांशीं युद्धास आणण्यास तो भीत असे. म्हणून तो सिंधुनदाचे पलीकडे गेला; परंतु तसल्या अवस्थेंत व तसल्या लोकांनिशीं परत जाणें हें खरोखरी पराजयापेक्षां कमी अनर्थ कारक होतें असें नाहीं. त्याचे लोक एखादा पदार्थ विरघळतो त्याप्रमाणें होत होत नाहींसे होत गेले. आणि तो ठठ्ठा येथें पोहोंचला तेव्हां त्याबरोबर इमानी थोडेच लोक राहिले होते.

दारापळून गेला.

त्यावेळेस औरंगजेब मध्यें न थांबतां दाराच्या पाठीस अगदीं नाश करी तोंपर्यंत लागता तर शहाणपणाची गोष्ट झाली असती; परंतु त्याचा भाऊ सुजा मोठी सेना घेऊन बंगाल्याहून येत आहे अशी बातमी कळल्यामुळें त्याचें पुढें येण्याचें बंद करणें अवश्य पडलें. तो येऊन पाहतो तों अलाहाबादेजवळ तो प्रतिस्पर्धी फार बंदोबस्तानें राहिला होता; परंतु त्यानें आपल्याच लोकांच्या धैर्यावर व श्रमावर विश्वास ठेवून त्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला तथापि त्या दिवशीं लवकरच रजपूत लोकांच्या टोळ्या जुलमानेंच त्या बरोबर आल्या होत्या त्या रण

सुजानें चाल केली.

सोडून पळून गेल्या व त्यांच्या पिछाडीवर हल्ला देखील करूं लागल्या, म्हणून मोंगल लोक एकटे पडले त्यामुळें लवकरच त्यांस शत्रू अगदीं येऊन भिडले. ज्या हत्तीवर औरंगजेब बसला होता त्या हत्तीस गोळा लागला तेव्हां तो गुडघे टेंकून बसला, नंतर बादशाहानें उतरण्याच्या बेतानें रिकाबींतून आपला एक पाय काढला,-परंतु हिंदुस्थानांतील लढाईंत राजा आपल्या युद्धगजावर बसून मध्यें असतो आणि भोंवतीं सेना लढत असतात म्हणून त्याचा वजीर जम्लानामें होता तो ओरडून मोठ्यानें म्हणाला तुम्ही आपल्या तखतापासून उतरत आहां. तें ऐकून बादशाह त्या बोलण्याचा अर्थ व सत्यता जाणून पुन्हा पहिल्या ठिकाणीं बसला आणि हत्तीचे पाय देखील सांखळदंडानें त्या ठिकाणीं बांधून टाकले. त्यानें चिलखत आंगावर घातलें होतें हें खरें तरी त्यावर शत्रूचे बाण व बरच्या येत असतां तसें रहावें लागलें. तें शौर्याचें कृत्यपाहून त्याचे लोकांस धैर्य येऊन ते एकत्र जमले आणि जिवावर उदार होऊन मोठ्या कष्टेंकरून त्यांनीं शत्रूस मागें हटविलें. सुजानें आपला हत्ती हीनबळ झाला असें पाहून जी चूक त्याच्या प्रतिस्पर्ध्यानें टाळली तीच चूक केली. ती अशी कीं, हत्तीवरून उतरून घोड्यावर बसला. तो राजाचा हत्ती रिकामाच मागें चालला हें पाहून सर्व सेनेच्या मनांत भय उत्पन्न झालें. आणि शेवटीं दाणादाण होऊन ती सेना पळूं लागली. ते-

प्रकरण ९
इ० स०
१६५८

औरंगजेबाची आणिबाणीची वेळ

सुजापळाला.

प्रकरण ९ इ० स० १६५८

ऱ्हां राजानें मोंगीर येथील बळकट किल्ल्यांत शिरून प्रस्तुतकाळीं आपला जीव निर्भय केला.

त्या पराजित शत्रूस कांहीं विसावा देणें औरंगजेबास पुन्हा भाग पडलें. कारण दारा ठठ्ठा येथें पोहोंचल्यावर सिंधुनद पुन्हा उतरून मोठ्या मैदानांतून गुजराथेंत आला आणि तेथील सुभेदार आपणाकडे वळवून घेतला. त्या सुभेदाराची कन्या मुराद ह्याला दिली होती, मग दारा बरीच सेना जमवून राजपुताना ( रजपूत संस्थानें ) येथें गेला व तेथील अजमीर नामें राजधानी जवळ पराकाष्ठेच्या बळकट ठिकाणीं भोंवतालीं खंदक खणून राहिला. औरंगजेब घाईनें तेथें आला तों तेथें आपल्या भावानें ज्या ठिकाणाच्या माऱ्यांत असपासची जागा होती अशा ठिकाणीं तळ दिला आहे असें पाहून त्यास धाक पडला. व त्याला राग येऊन त्यानें लढाईस पुढें यावें म्हणून ह्यानें आपल्या लोकांस त्या बेतानें उभें करून दाखविलें व त्यांनीं स्थळ सोडावें म्हणून बुद्ध्या त्यांचा अपमान देखील करून पाहिला; परंतु त्या राजपुत्रानें तीं सर्व कृत्यें शहाणपणानें लक्ष्यांत आणलीं नाहींत. तथापि बादशाह युक्तींनीं निरंतर भरला होता; त्यानें नवीन युक्ति काढली. ती अशी कीं, त्याच्या लष्करांत ज्या दोन सरदारांनीं मुख्यत्वेंकरून सोलीमान ह्याची सेना फितवून आणली ते होते; त्यांकडून बापास पत्र लिहवून त्याची खात्री केली कीं ते सरदार आपला

दाराची कुमक

त्याचें बळकट स्थान.

औरंगजेबाचें कपट.

पक्ष सोडून गेले ह्याचें कारण आपला अमंल कडक फार इतकेंच होतें. परंतु आतां पुन्हा मिळण्यास ते इच्छितात; त्यांनीं असें ही लिहिलें कीं जर अमुक्या वेळेस अमुक दरवाजा आपण उघडा ठेवाल तर आम्ही आपले सर्व लोक घेऊन आंत येऊं आणि आपल्या आज्ञेंत वागूं. दाराचे वृद्ध व फार शहाणे मंत्री होते त्यांनीं असें केलें असतां कोणता धोका प्राप्त होईल व औरंगजेबाचा कावा कसा असेल ह्याचा नेम नाहीं ह्याविषयीं सुचविलें परंतु व्यर्थ. दारा अविचारी, भोळा आणि दुराग्रही असे. त्यानें आपलें सैन्य असें केलें असतां वाढेल आणि तें शत्रूच्यापेक्षां फारच मोठें होईल अशा धोरणानें तो मोहित झाला मग नेमलेल्यावेळीं दरवाजा उघडा ठेवला, तेव्हां ते सरदार आंत घुसले आणि लौकरच औरंगजेबाची सर्व सेना मागून आंत शिरली. तें कपट त्यास कळलें, परंतु त्यावेळेस कळून उपयोग नाहींसा झाला. तरी त्यानें शौर्यानें लढाईकरून पाहिली परंतु व्यर्थ. तेव्हां त्याचा अगदीं मोड होऊन त्यास आपलें अवशेष राहिलेले अगदीं थोडे लोक घेऊन पळून जाणें भाग पडलें. तो गुजराथेंतील राजधानींत आपणास आश्रय मिळेल अशा आशेनें त्या शहराकडे गेला, परंतु तेथील सुभेदारानें आंत येण्याची परवानगी दिली नाहीं. मग त्याचे अवशेष राहिलेले थोडे लोक कायते मराठ्यांची एक टोळी होती, त्यांनीं तो गतश्री झाला असें पाहून लष्कर लुटण्याची संधी साधली. त्यांनीं बायकांच्या तंबूंत जें द्रव्य लपवून ठेवलें होतें त्याशिवाय कांहीं

प्रकरण ९ इ० स० १६५८

दाराचा अगदीं मोड.

प्रकरण ९
इ० स०
१६५९

एक ठेवलें नाहीं. नंतर दारास कोणतीही तयारी केल्यावांचून गुजराथेंतील मैदानांतून हाल भोगीत उत्तरेकडे जावें लागलें. तेव्हां त्यानें दुःखें भोगली तीं त्याचा पूर्वज हुमायून ह्यानें तोच दुःखाचा प्रवास केला तेव्हां जीं भोगलीं त्यांपेक्षां फारच होतीं. वाटेनें त्याच्या इमानी लोकांपैकीं कांहीं लोक अगदीं थकून व तृषाक्रांत होऊन सूर्याचें ऊन जाळीत आहे अशावेळीं एकामागूनएक खालीं पडून मरण पावले जे थोडे लोक राहिले होते ते घेऊन तो ठाट्टा येथें जाऊन इराणांत तसाच पुढें गेला असता, व तेथें त्याचा चांगला मान वगैरे झाला असता असें वाटतें; परंतु त्या प्रसंगीं त्याची प्रिय स्त्री नादिरबाना ही मरण्यास टेंकली आणि परकी लोकांमध्यें तिला टाकून मरूं देणें हें त्याच्या मनास बरें वाटेना. तेव्हां शेजारीं जिहानखान नामें राजा होता त्यानें आश्रा द्यावा म्हणून तो गेला, हें ही कृत्य अविचाराचें व दुर्दैवाचें होतें, तो राजा जुलमी व घातुक असे. त्याला पूर्वीं शहाजहानानें दोनवेळ मारून टाकण्याविषयीं हुकूम केला होता. परंतु त्याच्या मुलानें मध्यस्थी केल्यामुळें त्याचे अपराध माफ केले होते. तेथें दारानें आपल्या बायकोचे शेवटले संस्कार केले. हें कृत्य आपल्या हातानें झालें एवढें त्यास समाधान वाटले. परंतु तो जाऊं लागला तेव्हां पाहतो तों कांहीं शिपाई लोकांनीं आपल्या भोंवतीं गराडा घातला मग त्यांनीं त्यास धरून खान-

जहानखान ह्यानें आश्रय द्यावा म्हणून पाहतो.

जहान नामें बादशाहाचा सेनापती पाठलाग करीत त्यावेळेस येऊन भिडला होता त्याचे स्वाधीन केलें. शेवटीं प्रारब्धीं आलें तें टळत नाहीं असें पाहून त्यानें पराकाष्ठेची धैर्याची वर्तणूक केली व वाटभर शांतपणानें व संभावितपणानें राहिला. त्यानें आपल्या अद्भुत दुःखावर कविता रचून दुःखितमनाचें सांत्वन केलें. मग त्याला दिल्लींतून गाढवावर बसवून चिंध्या पांघरावयास देऊन नेलें. परंतु ह्या गोष्टीपासून परिणाम काय होईल हें औरंगजेबास कळलें नाहीं. कारण दिल्लींतील हजारों लोकांनीं जो पूर्वीं शूर व उत्तम राजा होता त्यास असा विलक्षण अवस्था प्राप्त होऊन त्यास त्याचा पुत्र सुंदर व धैर्यवान व ज्याच्या प्रारब्धीं अशी अनर्थाची गोष्ट पाहण्याची होती, अशा पुत्रास जवळ बसवून मारायास नेतांना पाहिलें तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून अश्रु धारा चालल्या व त्या जुलमी पुरुषास त्यानें शाप दिले. दारास धरून देणारा विश्वास घातकी जिहान घरीं जात असतां वाटेनें मारिला गेला आणि सर्व शहरांत बंड होण्याचा बेत दिसला तेव्हां बादशाहास वाटलें कीं आपण जी दुःखाची गोष्ट करणार आहों ती लवकर संपविली पाहिजे. मग रात्रीं मारेकरी पाठविले त्यांच्या घावानें तो दुर्दैवी भाऊ, होता तितका प्रयत्न केल्यानंतर, मरण पावला; आणि बादशाहाच्या युक्तीनें शहरांत जो दंगा झाला होता तो नाहींसा झाला.

प्रकरण ९
इ० स० १६५९
कैदेंत घातला.

विश्वास घातक्यास मारलें.

आतां सुजाची मात्र वाट औरंगजेबास लावावया-

प्रकरण ९
इ० स०
१६५९

सुजावर
स्वारी.

ची राहिली होती. सुजा ह्यानें हिकडे वर लिहिलेला प्रकार चालला असतां ती संधी साधून आपली विस्कळलेली फौज एकत्र जमविली होती. परंतु ती पासून औरंगजेबास भीति वाटत नव्हती. म्हणून तीवर आपला मुलगा महंमद आणि जम्ला नामें वजीर ह्यांची रवानगी केली असतां पुरे असें त्यास वाटलें. तथापि ह्या स्वारींत जी गोष्ट होईल असें वाटत देखील नव्हतें, ती गोष्ट घडून ह्या स्वारीचा मोठा चमत्कार झाला. तो असा, औरंगजेबाचा महंमद नामें पुत्र तरुण व शूर होता, त्याची फार दिवस सुजाच्या मुलीशीं मागणी घातली होती, तीवर तो पराकाष्ठेची प्रीति करीत असे, आणि जरी गेल्या दंग्याच्या वगैरे वेळेस तो पहिली प्रीति विसरला होता तरी, त्या राजकन्येनें आपल्या बापाविषयीं पत्र त्यास ह्या प्रसंगीं लिहिलें. त्यायोगानें पुन्हा त्याची प्रीति उत्पन्न झाली. मग त्यानें निश्चय केला कीं बापाची सेना सोडून आपल्या चुलत्याचा पक्ष धरावा; व त्यानें औरंगजेबाप्रमाणें लढाया करून राज्य मिळवावें असा बेत आपल्या मनांत धरला होता. ही गोष्टही असंभाव्य असें वाटत नाहीं. नुकतीच राज्यक्रांति झाली तींत ह्यानें पराक्रम केला होता व ह्याचा आजा राज्य देण्यास तयार होता म्हणून हा फार चढला होता, व हा वारंवार बढाईनें म्हणत असें कीं आपाला मींच राज्य मिळवून दिलें; तो आपले ठिकाणीं समजला कीं मीं गेलों म्हणजे मागून सर्व सेना मजकडे येईल आणि सुजाचें सैन्य व हें सैन्य मिळून इतकें जबरदस्त होईल

प्रकरण ९ इ० स० १६५०.

कीं कोणताही प्रतिबंध आला तरी चिंता नाहीं. मग तो आपली मंडळी घेऊन मौजेकरितां म्हणून गंगेमध्यें नावेंत बसून गेला. तो परत आला नाहीं. शिपाई लोकांस कळल्यावर प्रथम फारच चलबिचल झाली. परंतु जम्लानें आपल्या शहाणपणानें व धैर्यानें त्यांचीं मनें यजमानाकडे राखलीं आणि कोणास ही जाऊं दिलें नाहीं. हा प्रतापी पुरुष सुजाकडे जाऊन मिळाला तेव्हां त्यानें त्याचा पराकाष्ठेचा मान ठेविला आणि त्यांचा लग्न समारंभ मोठा झाला. नंतर सुजा आपले लोक घेऊन लढाई देण्यास गेला. महंमद आघाडीच्या रांगेंत उभा राहिला आणि जेव्हां समोरून स्वारांची निवडक टोळी येऊं लागली, तेव्हां ती आपणास मिळण्याकरितां येत आहे असें त्यास वाटलें, परंतु व्यर्थ तिनें येऊन मोठा हल्ला केला आणि लौकरच त्याची ती भ्रांति घालविली. तो व त्याचा चुलता हे दोघे मोठ्या पराकाष्ठेच्या शौर्यानें लढले. परंतु त्यांचे बंगाली नामर्द लोकांशीं जम्लाच्या वहिवाटलेल्या लोकांचे युद्ध झालें तेव्हां त्यांचा टिकाव लागला नाहीं मग जम्लाचा पूर्ण जय झाला. तेव्हां महंमद पराकाष्ठेच्या संकटांत पडला आणि त्याच्या बापाच्या हिकमतीमुळें त्याच्या प्राणावर प्रसंग गुदरला. औरंगजेबानें त्यास पत्र लिहिलें. त्यांत मी सासऱ्याचा पक्ष सोडून येण्याचा बेत केला आहे अशा तऱ्हेचें त्याचें पत्र

त्याचा बेत

महंमदानें बापाचा पक्ष सोडला.

प्रकरण ९
इ० स०
१६६०.

जमेस धरून त्याचें नांवें बळेंच उत्तर पाठविलें. त्यानें असा बंदोबस्त ठेविला होता कीं तें उत्तर सुजाचें हातीं जावें त्याप्रमाणें गेलें. नंतर सुजाच्यामनांत वहीम उत्पन्न झाला तो महंमदानें मी पत्र पाठविलें नाहीं असें शपथ वाहून सांगितलें तरी जाईना, सुजानें त्याला उपद्रव दिला असें नाहीं, परंतु त्यास सांगितलें कीं आपली बायको घेऊन बंगाला सोडून तुला गेलें पाहिजे. तेव्हां सर्व हिंदुस्थान त्या निर्दय बादशाहाच्या ताब्यांत होतें. म्हणून महंमदास त्यास शरण गेल्यावांचून दुसरा उपाय नव्हता. औरंगजेब बादशाहाचा विश्वास ज्यांनीं त्यास एकवेळ फसविलें त्यांवर पुन्हा होत नसे. मग लागलेंच महंमदास पकडून ग्वाल्हेर एथील बळकट किल्यांत पाठविलें. तेथें तो सात वर्षांनीं मरण पावला. तोंपर्यंत तो नेहेमीं मनांत झुरत असे. सुजा आरेकान प्रांतीं पळून गेला व तेथील राजानें विश्वासघात केला तेव्हां तो व त्याचें सारें कुटुंब मरण पावलें. दाराचा पुत्र सोलिमान कैदेंतून हिमालय पर्वतांत लपून बसण्याकरितां पळाला होता तेथें तो सांपडला. ह्या प्रकारें औरंगजेबास कोणी प्रतिस्पर्धी राहिला नाहीं.

औरंजेबाची-हिकमत.

महंमदास कैदेंत ठेवलें.

बादशाही गेल्यानंतर शहाजहान आठ वर्षें वांचला तोंपर्यंत त्याच्या महत्वाकांक्षी पुत्रानें जरी पूर्वीं दुष्ट कर्में केलीं होतीं तरी त्यानें पदच्युत झालेल्या व बंदींत पडलेल्या राजाच्या अवस्थेस अनुरूप त्याचा सन्मान

शहाजहानाचे शेवटले दिवस

व बंदोबस्त चांगला राखिला, ह्यावरून त्याचा कांहींसा चांगलेपणा व योग्यता दिसते हें सांगितलें पाहिजे. त्याचा हतभाग्य बाप रागानें व गर्वानें बोले, तेव्हां त्या झपाट्यांत जें बोले तें देखील तो सोशी. एकदां औरंगजेबानें आपला पुत्र अकबर ह्यास दाराची मुलगी द्यावी म्हणून विनंती सांगून पाठविली; त्याच्या मनांत हा विवाह झाला असतां आपल्या घराण्याविषयीं बडेलोकफार कळकळ बाळगतील असें होतें म्हणून त्यानें ती विनंती केली. परंतु शहाजहान व त्याच्या घरचे लोक ह्या उभयतांहीं ती गोष्ट ऐकिली नाहीं. तेव्हां त्यास पराकाष्ठेचा क्रोध आला. शहाजहानानें उत्तर न देतां सांगून पाठविलें कीं तूं जुलमानें राज्य बळकावलें ह्या अपराधाप्रमाणें तुझा हा उद्धतपणा आहे आणि दाराच्या मुलीनेंच कट्यार बाळगून जवळ ठेवली आहे व ती स्पष्ट म्हणते कीं माझ्या बापास ज्यानें मारलें त्याच्या मुलाशीं लग्न लावण्यापेक्षां मरण शंभर पटीनें बरें, परंतु लग्न पुरवणार नाहीं. हें सर्व बादशाहास कळविलें तेव्हां त्यानें मुकाट्यानें ती गोष्ट सोडून दिली. पुढें त्यानें बादशाहीचें कांहीं जवाहीर देण्याविषयीं बापास दुसऱ्यानें विनती केली. तिचें कारण इतकेंच कीं बादशाहाच्या सिंहासनास शोभा येण्यास तें जवाहीर अवश्य पाहिजे असें त्यास वाटत होतें. तेव्हां शहानें उत्तर सांगितलें कीं जर तूं हें जोरानें घ्या म्हणशील तर ह्यांचें पीठ करण्यास हतोडे तयार आहेत. मग औरंगजेबानें मोठ्यानें सांगितलें कीं त्यांचें जवाहीर त्यांजपाशीं अ-

प्रकरण ९ इ० स० १६६०.

त्याचा अदम्य गर्व.

प्रकरण ९
इ० स०
१६६१.

सूंद्या इतकेंच नाहीं परंतु माझें सर्व त्यांला घेऊन जाऊंद्या. ह्याप्रमाणें औरंगजेबाचा विचारी स्वभाव पाहून त्या वृद्ध

औरंगजेबाचा नेमस्तपणा

बादशाहाच्या मनास इतकें वाईट वाटलें कीं त्यानें त्यांपैकीं कांहीं रत्नें पाठवून दिलीं व त्यांबरोबर पत्र लिहून पाठविलें. त्यांतमजकूर कीं हीं रत्नें तूं घे. ह्यांचा उपभोग इतःपर मीं करावा असा ईश्वरी संकेत नाहीं ह्यांचें धारण करून तूं योग्यतेनें वाग आणि तुझ्या घराण्यास अरिष्टें भोगावीं लागलीं त्यांसारखी कीर्ति तरी चांगली मिळीव. बादशाहाच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या त्या ह्या प्रसंगीं खरोखऱ्याच होत्या. सारांश औरंगजेब निरंतर त्याचा मान राखी व त्याचें सर्व सोसून घेई आणि प्रसंगानुरूप त्यास बुद्धिवाद ही विचारी;ह्या योगानें जरी तो राज्य भ्रष्ट झालेला पुरुष जें प्राप्त झालें तें भोगण्यास खुषी नव्हता तरी तो कांहींसा स्नेहभावानें ह्याशीं वागूं लागला. आपल्या बापाचा अंतकाळ समीप आला आहे अशी बातमी त्यास कळल्यावर त्याच्यानें त्याजवळ जाववलें नाहीं हें खरें, तथापि त्यानें

शाहा मृत्यू पावला

आपला पुत्र शाहआलम् ह्यास पाठविलें. परंतु तो फारच उशिरां येऊन पोहोंचला. बापमेल्यावर हिंदुस्थानचा स्वामी औरंगजेब ह्यानें शोकाचीं खरोखरीं सर्व चिन्हें दाखविलीं आणि आपली बहीण जहानरा ही आजपर्यंत आपल्या हतभाग्य बापास भक्तीनें मिळून राहिली होती तिशीं पुन्हा सख्य करण्याकरितां लागलाच गेला.

पुष्कळ वर्षेपर्यंत मोंगलांचे राज्याच्या गादीवर

औरंगजेब होता; त्याचे कारकिर्दीत हें राज्य पराकाष्ठेचें विस्तृत व गौरव युक्त झालें. तसें कधींच झालें नव्हतें. त्यानें दक्षिणेचीं राज्यें आपल्या ताब्यांत आणल्यावर त्याचे राज्याखालीं बहुतेक हिंदुस्थान व शेजारचे काबूल आणि असाम हे प्रांत आले होते; ह्या मुलखांतील लोक संख्या व संपत्ति रोमन बादशाहीच्या पराकाष्ठेच्या भरभराटीच्या काळच्यापेक्षां बहुतकरून अधिक होती. त्याचे राज्याचा वसूल ३२००००००० बत्तीस कोट रुपये होता, तो यूरोपांतील हल्लीच्या एक दोन मोठ्या राज्यांच्यापेक्षां कमी होता खरा, परंतु त्यावेळेस तितका कोठेंच नव्हता असें दिसतें. त्या राजाची कारकीर्द त्यापूर्वीं अव्यवहित जे राजे होऊन गेले त्यांच्यापेक्षां चांगली होती असें खचीत वाटतें. त्याच्या दरबारीं कांहींसा डौल व अनुपमेय शोभा होती तरी त्याची जातीची वर्तणूक मांजल होती व तो धार्मिक देखील असे.

प्रकरण ९. इ० स० १६६४. औरंगजेबाची कारकीर्द.

पराकाष्ठेचा वसूल.

त्याची उत्तम वर्तणूक.

त्यानें कोणती ही अव्यवस्था अथवा बेशिस्तपणा आपण केला नाहीं व आपल्या वाड्यांत होऊं दिला नाहीं. प्रातःकाळीं तो न्याय करण्यास दिवाण खान्यांत बसें, तेव्हां अगदीं हलक्या लोकांस देखील जवळ जाण्यास मोकळीक असे, व तो अगदीं निष्पक्ष पातानें व कडक रीतीनें कायद्याप्रमाणें न्याय करी. तो त्यांच्या दुःखाची दाद घेई व आपल्या उदारपणानें त्यांचीं संकटें दूर करी. ह्याप्रमाणें त्याचे पुष्कळ दिवसाचें

प्रकरण ९
इ० स०
१६७०

असें दिसतें.

कारकिर्दीत एकाद्या देशास परदेशच्या यथेच्छ वागणाऱ्या राजाच्या अमलांत सुख व्हावें इतकें हिंदुस्थानास झालें जर मुसलमान लोकांच्या इतिहासांवर आणि इंग्लिश ग्रंथ कर्त्यांनीं त्याचीं वर्णनें मूळ ग्रंथांप्रमाणें लिहिलीं आहेत त्यांवर पूर्ण भरंवसा ठेवला तर आपणास वाटेल कीं अकबर बादशाह गादीवर बसला त्या काळापासून औरंगजेब मरण पावे तोंपर्यंत हिंदुस्थानांत कृतयुग होतें म्हणजे त्या प्रमाणें सुखाचा काळ कोणत्या ही इतिहासांत उपमेस बहुत करून मिळणार नाहीं असा गेला. ही गोष्ट कोणाच्यानें ही नाकबूल करवणार नाहीं कीं त्या सर्व काळभर मध्य हिंदुस्थानांत कांहींशी स्वस्थता व भरभर होती. कारण कीं आपसांतल्या लढाया पुष्कळवेळ झाल्या व कधीं कधीं त्यांचे वाईट परिणाम झाले तरी एक वेळ युद्ध झालें म्हणजे त्याचा शेवट होई व त्यामुळें देश फार उद्ध्वस्त होतनसे.

मुसलमान इतिहास कर्त्यांचीं वर्णनें.

स्वतंत्र सत्ता असल्यापासून वाईट गोष्टी.

तथापि त्या विषयाचा सूक्ष्म रीतीनें विचार केला असतां समजतें कीं तें वर्णन फारच प्रशंसेचें केलें आहे व यथेच्छ राज्य चालविल्यामुळें जीं दुःखें भोगावीं लागतात तीं पुष्कळ दुःखें त्याकाळीं बादशाहीस होतीं. मोंगल बादशाहापासून हें विस्तृत राज्य ब्रिटिश लोकांस प्राप्त झालें तेव्हां जमिनीची लागवड करणारे सर्व लोक इतके भिकारी होऊन गेले होते कीं जमीन कोणत्या प्रकारानें मुळीं लोकांनीं

घेतली होती ह्याचा शोध लावणें बहुत करून असंभाविक आहे. ह्यावरूनच दिसतें कीं त्या इतिहासकर्त्यांनीं केलेली स्तुति खरी नाहीं.

प्रकरण ९ इ० स० १६७०.

औरंगजेबाच्या कारकिर्दींत बर्नेर नामें साहेब एक हुशार व विचारी मुशाफर कांहीं वर्षें हिंदुस्थानांत होता; त्यानें मोंगलांचें राज्य व तें चालविण्याचा प्रकार ह्या विषयीं शोध करण्यास झटून यत्न चालविला होता. त्यानें जें वर्णन केलें आहे तें जो देश न्यायी व निष्पक्षपाती सरकार असतां भरभराट पावतो त्या देशास लागू असण्यापेक्षां जो देश अगदीं भिकेस लागत चालला असतो त्या देशास लागू आहे. तो असें लिहितो कीं राजाच्या मनांत न्याय चालू असावा असें होतें म्हणून मानलें तरी त्याच्या जवळ व सभोंवतीं दिल्ली व आग्रा येथें आणि ह्या नगरांच्या शेजारीं न्याय कदाचित् होत असेल, परंतु खेडे गांवांत व दूरच्या प्रांतांत सुभेदार लोक रयतेस लुटीत व प्रजेचें रक्षण करावें तसें करीत नसत. ते यथेच्छ रीतीनें सत्ता चालवीत व ते अमलदार दुनयेचा नाश करण्यास योग्य होते असें वर्णन बर्नेर ह्यानें लिहिलें आहे. ही गोष्ट दृढ होण्यास कारण दिसतें कीं लोक दरिद्री दिसण्यासाठीं वाईट पोशाग करीत व अनेक प्रकारें भिकारीपणा दाखवीत परंतु ते लोक द्रव्यवान होते असे इतर कारणावरून स्पष्ट दिसतें. लोकांची फिर्याद घेण्यास अदालत नसे, व कायद्याप्रमाणें दाद देण्यास कामदार नसत, व न्याय क-

बर्नेर साहेबाचें वर्णन.

देशाचें रक्षण होत नव्हतें.

प्रकरण ९
इ० स०
१६७५.

रण्याच्या स्वतंत्र सभा नसत. बादशाह स्वतः ज्यालोकांचे वागण्याचे नियम चांगले आहेत अशी कीर्ति होती व खरी स्वामी भक्ति ज्यांचे मनांत होती अथवा राजास ज्या गोष्टींत भूषण त्यांतच आपणास भूषण असें मानीत होते त्या लोकांस पदरीं ठेवीत नसे. त्याचे कामदार बहुत करून ज्यांत अगदीं अर्थ नाहीं असे व गुलाम, अज्ञानी आणि पशु व हलक्या कुळांतील असत. त्यांच्या आंगीं भिकारपणाचा स्वभाव व गुण असत ह्यामुळें ज्या लोकांस अधिकार मिळे ते लोक आपल्या हातीं सत्ता थोडेच दिवस राहणार व तिचाही नेम नाहीं म्हणून सर्व राज्य नष्ट झालें तरी चिंता नाहीं असें समजून द्रव्य मिळविण्याचाच उद्देश ठेवीत.

न्यायाकडे दुर्लक्ष होते ह्याविषयीं प्रमाणें

ह्या घराण्यांतील राजे आपल्या प्रजेच्या हक्काकडे लक्ष देत व न्यायी असत असें प्रसिद्ध आहे तरी बर्नेर ह्यानें कितीएक गोष्टी सांगितल्या आहेत त्या हाकिन्स आणि रो ह्यांचे सांगण्यास पुष्कळ जमतात व त्यांवरून येथील ग्रंथ कर्त्यांनीं जी स्तुति केली आहे तीविषयीं संशय येतो. आशियेंतील ह्या दरबारच्या रिती कांहींशा परिपाठांतल्या देखील आहेत. त्या कांहीं गोष्टी सांगतों

परिपाठांतली गोष्ट.

त्यावरून कळून येतील. एका मनुष्यानें शहाजहानापाशीं फिर्याद केली कीं मी वाण्याचा मुलगा आहें. माझे आईपाशीं दोनलक्ष रुपयांची संपत्ति आहे. परंतु मजवर गैर वर्तणूकीचा दोष ठेवून ती मला अगदीं वांटा देत नाहीं मग बादशाहानें त्या द्रव्याची बातमी ऐकून मोहित

होऊन त्या बाईस बोलावणें पाठविलें, आणि ती आल्यावर उघड दरबारांत हुकूम केला कीं आपल्या मुलास ५०००० रुपये दे आणि सरकारास १००००० रुपये दे आणि येथून निघून जा. तेव्हां त्या बायकोनें मोठ्यानें ओरडून पुन्हा सभेंत जाण्याची परवानगी घेतली आणि हळूच म्हणाली, महाराज, क्षमा मागतें, माझ्या मुलाचा बापाच्या मालावर कांहीं हक्क आहे, परंतु माझा मयत नवरा व्यापारी होता त्याशीं आपलें काय नातें होतें म्हणून त्याचे वारस आपण होतां हें मला समजेल तर बरें होईल. ही गोष्ट शहाजहानास इतकी मौजेची वाटली कीं तीपासून कांहींएक न घेतां तिला जा म्हणून सांगितलें. ह्यावरून तो बादशाह चांगल्या स्वभावाचा असून त्यापाशीं दाद असे. परंतु हिंदुस्थानांतील ग्रंथ कर्त्यांनीं त्याची न्यायाविषयीं स्तुति केली आहे ती न्यायाची समजूत किती हलकी होती तो प्रकार मनांत येतो.

प्रकरण ९ इ० स० १६७५

दुसरी गोष्ट ह्याजपेक्षां ही चमत्कारिक आहे. दिल्लींत कंचनी म्हणून वेश्येप्रमाणें स्त्रिया असत त्या अगदीं सोडल्या नवत्या तरी ह्या दरबारच्या चैनीलोकांस रमविण्याकरितां त्या ठेवल्या असत. बर्नर्द नामें फ्रान्स देशचा वैद्य त्यावेळेस दिल्लींत राहत असे त्यानें त्या स्त्रियांपैकीं एक तरुण स्त्री आपणास मिळावी म्हणून यत्न केला. परंतु तिच्या आईनें तो संबंध नव्हावा म्हणून अडथळा केला व हें तिनें शहाणपणानेंच केलें असें वाटतें. तथापि तो वैद्य संध्याका-

लोकांत मोकळीक किती होती त्याविषयीं

प्रकरण ९
इ० स०
१६७५.

र्‍हीं जहानगीर बादशाहाच्या समाचारास गेला तेव्हां जनान खान्यांत एका स्त्रीस औषध देऊन ती बरी केली होती. त्याबद्दल बक्षीस मिळण्याच्या संधीस त्यानें कंचनीकडे बोट दाखविलें आणि देहेणगी द्याल ती बद्दल मला ती स्त्री द्या म्हणून मागितलें, ती स्त्री शेंकडों जणी बादशाहाच्या अर्जवी स्त्रिया होत्या त्यांपैकीं होती. तें भाषण ऐकून बादशाहास पोटभरून हांसें आलें. मग चाकरास हाकमारून तो म्हणाला. तिला ह्या वैद्याच्या खांद्यावर बसवा आणि ह्यास ती घेऊन जाऊंद्या-असें म्हणतांच त्याप्रमाणें झालें. ती तरुण स्त्री त्याचे लागलीच स्वाधीन केली, मग अन्यायानें मिळविलेली ती स्त्री घेऊन बर्नेर चालता झाला.

बर्नेर ह्यानें मोंगलाच्या सैन्यवर्णन केलें तें.

यूरोप खंडांत, मोंगलांशीं युद्ध करणें म्हटलें म्हणजे फार कठीण, कारण त्यांचें सैन्य जिकण्यास अशक्य व बलाढ्य आहे असें लोकांचे मनांत भरलें होतें, तें घालवण्यास बर्नेर हा पहिल्यानें कारण झाला. त्या सैन्याची संख्या ही फारच अतिशयोक्तीनें पूर्वीं सांगत होते. बादशाहाच्या सैन्यापैकीं केवळ घोडेस्वार हटकून जय मिळविण्यासारखे असत, त्यांपैकीं त्याच्या राहण्याच्या ठिकाणालगत पस्तीसहजार किंवा चाळीस हजार होते, व त्याचे सर्वस्वार म्हटले असतां दोनलक्षांपेक्षां कमीनव्हते. त्याचें पायदळ व राजधानी जवळचा तोफखाना मिळून पंधरा हजार लोक

प्रकरण ९
इ० स०
१६७५.

सैनेबरोबरचे फारचलोक.

होते. त्याचें असंख्यात बाजारबुणगें फौजेंत मोडत असे त्यांत मुख्यत्वें चाकर लोक अन्नाची बेगमी करून ठेवणारे लोक कांहीं तंबू वगैरे वाहणारे इतर एक किती धान्य व गुरें संभाळणारें आणि शिपाई लोकांस व अंमलदारांस जें लागेल तें देणारे, हे असत हे फौजे मागून चालणारे लोक इतके होते कीं बादशाहाचें सैन्य कूच करी तेव्हां सर्व दिल्ली व आग्रा हीं त्याबरोबर जात असें म्हटलें असतां चिंता नाहीं, आणि वास्तविक पाहतां हीं शहरें लष्करी लोकांचेच गोट होते असें मानण्यास हरकत नाहीं आणि खरोखरी लष्कराचे तळ तंबू असून मध्यें मध्यें रस्ते व बाजार व्यवस्थित असल्यामुळें, हलणारी शहरेंच आहेत असें म्हटलें असतां चालेल. ह्या लढाऊ लोकांचे गुण बर्नेर ह्यानें ह्या पेक्षांही वाईट वर्णिले आहेत. तो म्हणतो कीं ते लोक नेहेमीं मोठ्या शौर्यानें लढत हें खरें परंतु ते कवाईत शिकलेले नव्हते म्हणून पुष्कळ वेळां दहशत एकाएकी पडून ते अगदीं हुकूम मानीनातसे होत. त्यास असें वाटत होतें कीं वीसहजार किंवा पंचवीसहजार लोक घेऊन कोंडी व हुरेण नामें नामांकित सरदार होते त्यांच्या सारखा एकादा सरदार ह्या रानटी लोकांस सहज पादाक्रांत करून टाकील. पुढें त्याचें हें अनुमान ब्रिटिश लोकांच्या ताब्यांत हिंदुस्थान आलें ह्या विषयींच्या इतिहासांतील पुढील गोष्टीवरून अगदीं खरेंसें ठरलें आहे.

ह्या राजाच्या कारकिर्दींत परदेशाविषयीं इतिहासां-

प्रकरण ९
इ० स०
१६८३.

त लिहिण्यासारखें इतकेंच झालें कीं ह्या नवीन राजास अब्बस नामें इराणचा राजा आशिया खंडांतील राजांमध्यें लढाऊ व बलाढ्य होता. त्याशीं लढाई करावी लागेल असें भय पडलें व त्या लढाईपासून मोठा धोका झाला असता.

इराणाशीं कलह होण्याचें भय.

दौ नामें ग्रंथकार एथील इतिहासकर्त्यांप्रमाणेंच ह्या लढाईचें कारण असें लिहितो कीं ह्या दोन्ही राजांमध्यें परस्पर पत्र व्यवहार झाला त्यावेळेस चिटनिसानें चूक केली. त्यानें त्यावर पत्ता अशा अर्थाचा लिहिला होता कीं हें पत्र जगत् प्रभु ह्याकडून इराण देशचे स्वामीस दिजे. अशा पत्त्याचें पत्र पोहोंचल्यावर अब्बस ह्यास मोठा क्रोध आला, हिंदुस्थानच्या बादशाहानें समजूत केली व अपराध पदरांत घेऊन माफी मागीतली तरी ती न मानून लढाईची तयारी केली असें म्हणतात. असली चूक झाली असें संभवत नाहीं व तो राजा अक्कल चांगली असून राजनीतीप्रमाणें वागणारा होता अशी कीर्ति आहे. व त्यावेळेस तो वयानें मोठा असतां असल्या क्षुल्लक कारणावरून येवढें मोठें भयंकर युद्ध करण्यास प्रवृत्त झाला असेल ह्या विषयीं थोडाच संभव दिसतो. त्यानें हें एक निमित्त केलें असावें, परंतु त्याच्या मनांत हिंदुस्थानच्या गादीवर राजा होता तो कायम झाला नव्हता व त्यानें वाईट उपायांनीं गादी मिळविली तें न आवडून लोकद्वेष करीत आहेत ह्याकारणांनीं हा देश जिंकून आपलें राज्य वाढवावें असें आलें असावें. त्याचे मनोरथ पूर्ण होतील असें वाटण्यास पुष्कळ कारणें झालीं. दिल्लीच्या

दरबारांतील मोठाल्या उमरावं ( बडे- लोक ) ह्यांपैकीं कित्येक इराणी कुळांतले होते. कित्येक पठाणी म्हणजे अफगानी वंशांतले ही होते. त्यांस आपल्या देशांतील राजे दिल्लीस राज्य करीत होते ती आठवण होऊन फार दुःख होत असे. अब्बस आपल्या पदरच्या इराणी कुळांतल्या बडेलोकांशीं पत्रव्यवहार चालविण्याचे बेतांत आहे व आपला वजीर ( मुख्य प्रधान ) ह्यास देखील फितावण्यास झटत आहे असें औरंजेबाच्या मनांत येण्यास कारण झालें. तें असें कीं, तो वजीर त्या कुळांतला होता. औरंगजेबास आपण पेंचांत सांपडलों असें वाटलें. कारण ते बडेलोक पुष्कळ होते व त्यांची सत्ता मोठी होती. त्यांशीं उघड वैर करावें तर आपल्या जिवावर गोष्ट येईल, असें त्यास वाटत होतें. त्यानें प्रधानास व इतर बडेलोकांस विचारलें तेव्हां त्यांनीं ती गोष्ट अगदीं नाकबूल केली. मग ह्या गोष्टीचा निकाल होऊन सर्वांस बरें वाटलें. तथापि बादशाहाची काळजी दूर झाली नाहीं. शेवटीं अशी बातमी कळली कीं, अब्बस ह्यास दुखणें लागून रोगाची उपेक्षा झाल्यामुळें तो राज्याच्या सरहद्दीवर लष्करांत मरण पावला. नंतर त्याची ती काळजी नाहींशी झाली. अब्बस ह्याचा सेफी नांवाचा नातू गादीवर बसला त्यानें आशियेंत राज्याची गादी रिकामी झाली म्हणजे अव्यवस्था होते व ती पासून नेहेमीं दुःखें भोगावीं लागतात, ह्यांचा विचार दूरवर पाहून परदेशांत लढाई करून अधिक त्रास भोगून-

प्रकरण ९
इ० स० १६८५.

तो एकाएकीं मरण पावला.

प्रकरण ९ ये, असा निश्चय केला, आणि लागलाच
इ० स० नह ठरविला.
१६८६.

येथें हसण्याजोगी एक गोष्ट घडली, जीमुळें औरंगजेबास धोका प्राप्त झाला होता ती सांगणें

धोक्याचें हसण्याजोगें कारण.

अवश्य आहे. मारवाड देशांत रजपूत लोकांच्या मुलुखांत बिस्तामिया नामें एक वृद्ध स्त्री देवाची भक्त होती. तिनें आपल्या उदारत्वानें पुष्कळ गोसांवी व हिंदुधर्मांतील इतर बैरागी वगैरे जमा करून शेवटीं त्यांची सेनेसारखी जमात केली आणि ते लोक घेऊन तिनें तेथील राजाचा व हलके सरदारांचा पराजय केला. शेवटीं सुमारें वीस हजार सैन्य जमवून ती बादशाहाचे नगरावर चालून

बिस्तामिये चेजय.

गेली. तेव्हां लोकांच्या वेड्या समजुतीमुळें सर्वांस दहशत पडून सर्वत्र तिचा जय होत चालला होता. ती पराकाष्ठेचे वाईट पदार्थ मिसळून अन्न तयार करी, तें आपल्या लोकांस खावयास देई. त्यामुळें लढाईच्या दिवशीं तिचे लोक अदृश्य होतात मग अर्थातच त्यांस कोणाच्यानें प्रतिबंध करवणार असा लोकांचा विश्वास बसला होता. ह्याप्रमाणें तिचे लोक जय मिळवीत बहुतकरून आग्र्याच्यावेशीजवळ गेले, तेव्हां ह्या बादशाहीचे स्वामी आम्ही आहों असें ते मानूं लागले. आणि आपल्या वरील मुख्य स्त्रीस ती हिंदुस्थानाची राणी असें म्हणूं लागले. तेव्हां बादशाहाच्या सैन्यास देखील दहशत पडली. मग बादशाहास फार भय पडलें व त्याची खातरी झाली कीं केवळ मनुष्याच्या शक्तीनें येवढ्या सैन्याशीं युद्ध करून फल होणार नाहीं. बा-

दशाह मुसलमानी धर्माचा अभिमानी असे म्हणून त्याच्या सेनेच्या दृष्टीनें तो साधुच होता. त्यानें कागदाच्या तुकड्यांवर धर्मसंबंधी कांहीं वाक्यें लिहून ते तुकडे भाल्याच्या टोकांवर चिटकाविले आणि ते भाले सैन्याच्या बिनीस चालविले आणि त्यानें आपल्या लोकांस खातरीनें सांगितलें कीं आतां तुमच्या शत्रूचे जादूपासून तुमचें कांहीं होणार नाहीं. अशा रीतीनें भयाचें निवारण झाल्यावर ते लोक फार होते म्हणून लागलाच त्यांनीं हल्ला करून गोसांवी मंडळीची दाणादाण करून त्यांस पळविलें आणि बहुतेकांचे तुकडे तुकडे करून टाकले.

प्रकरण ९ इ० स० १६८६.

औरंगजेबाची युक्ति.

ह्या बादशाहाच्या कारकिर्दींत पुन्हां एकदां काबुलांत बंड उठलें. तेव्हां त्यानें लागलाच तो सपाट देश जिंकला. परंतु तेथील लोकांस आपल्या ताब्यांत ठेवण्याविषयीं त्यानें यत्न केला नाहीं. ही गोष्ट शहाणपणाची केली. त्याचा मोठेपणा मिळविण्याचा उद्देश इतकाच होता कीं, दक्षिणेंतील गोवळकोंडें व विजापूर हीं राज्यें अगदीं आपल्या ताब्यांत आणावीं. तीं राज्यें त्याच्या पूर्वजांनीं व गादीवर बसण्याच्या पूर्वी त्यानें जातीनें देखील वारंवार लढाया करून त्यांत जय मिळवून बलहीन केलीं होतीं. तथापि त्याची बरीच सत्ता राहिली होती.

काबुलांत बंड झालें.

ही स्वारी कलहामुळें व आणखी पुष्कळ कारणामुळें घडली नाहीं, शेवटीं सन १६८६ त औरंगजेबाचे अठ्ठाविसावे वर्षी त्याची सर्व सेना तीन दिशांनीं दक्षिणेंत आली.

दक्षिणेवर स्वारी.

प्रकरण ९
इ० स०
१६८६.

शाहआलम नामें युवराज होता त्यानें लढाईची तयारी चालविली . आणि गोवळकोंड्यास वेढा घातला. तेव्हां तेथील राजानें अगदीं दीनपणानें कांहीं गोष्टी कबूल करून तह करावा म्हणून प्रार्थना केली. मग त्या गोष्टी औरंजेबानें आपलें सर्व सैन्य विजापुराकडे नेण्यास नीट पडेल म्हणून कबूल केल्या. विजापूरच्या राजानें गोवळकोंड्यांतील राजापेक्षां निकरानें युद्ध केलें. परंतु पुढें सेनेंतील लोकांत फिसाद होऊन ते सेना सोडून गेले. नंतर त्या शहरासभोंवतीं गराडा घातला शेवटीं अन्नाचा दुकाळ पडून तेथील राजास हस्तगत होणें प्राप्त पडलें. शिकंदर अद्दिलशाहा मोठ्या पराक्रमी घराण्यांतला शेवटला राजा होता तो औरंगजेबाच्या हातीं सांपडला. पुढें त्या विजयी पुरुषानें गोवळकोंड्याचें राज्य पूर्ण जिंकावें म्हणून सेना पाठविली तेव्हां त्याचा पुत्र शाहआलम ह्यानें तुम्ही तह मोडून फौज पाठवितां हा विश्वासघात आहे. म्हणून पुष्कळ कान उघडणी केली तीमुळें त्याचा त्यावर राग झाला आणि त्यानें त्यास बंदींत टाकलें. त्या शहरास सात महिने वेढा घातल्यावर फितुरानें तें हातीं लागलें, आणि तेथील राजा आबान हुसेन ह्याची पराकाष्ठेची अप्रतिष्टा झाल्यावर तो कांहीं दिवसांनीं मरण पावला. ह्याचे मरणानें राजाचें दुसरें नराक्रमी कूळ समाप्त झालें.

विजापूर हस्तगत झालें.

गोवळकोंडें घेतलें.

परंतु ज्या गोष्टीनें औरंगजेबाच्या सर्व कारकिर्दीस फेर पडला ती सांगण्याची अझून राहिली आहे. ती

प्रकरण ९ इ० स० १६८६.

अशी कीं मराठ्यांच्या सत्तेचा प्रादुर्भाव झाला. त्यांची सत्ता आरंभीं अगदीं थोडी होती तरी पुढें तिच्यामुळें मोंगलांच्या मोठ्या राज्याची उलटा पालट होऊन गेली; फारतर काय ते लोक हिंदुस्थानांत आपला वरचष्मा असावा म्हणून ब्रिटिश लोकांशीं देखील भांडूं लागले.

मराठ्यांच्या शक्तीचा उद्भव.

दक्षिण हिंदुस्थानाचे वायव्य दिशेस महाराष्ट्र देश आहे, तो देश मिस्तर ग्रांट डफ साहेबाच्या म्हणण्याप्रमाणें एक लक्ष दोन हजार चौरस मैल आहे व तेथील वस्ती साठ लक्ष आहे. त्यांत सह्याद्रीचे व विंध्याद्रीचे पुष्कळ फांटे आले आहेत व त्यांत माळवा खानदेश औरंगाबाद, आणि विजापूर ह्या प्रांतांपैकीं पुष्कळ भाग मोडतात. दक्षिण व उत्तर हिंदुस्थान येथील मोठाल्या मैदानांपेक्षां तो सर्व प्रदेश फार निराळा दिसतो. तो उंच व उखरवाखर आहे; तेथें वाऱ्यास फिरण्यास प्रतिबंध होत नाहीं व ती जमीन पर्वत चोहोंकडे असून त्यावर सपाट झाली आहे. तेथें नद्या व ओढे वगैरे पुष्कळ आहेत. असा देश असल्यामुळें तेथें मोंगलांच्या स्वारांस तोफा वगैरे जड सामान घेऊन जाण्यास कठीण म्हणून तो देश सरासरीच त्यांच्या ताब्यांत होता. प्रत्येक पर्वतावर व किल्ल्यावर लहान लहान राजे होते ते विजापूर येथील बादशाहास बाहेरून मात्र मान देत आणि आपण त्यांच्या हाताखालचे म्हणवीत. तथापि मुसलमान लोकांत लढाया निरंतर होत व गादीवरील राजा मेला म्हणजे त्याचे वारस आपसांत गादीकरतां भांडत म्हणू-

ह्या देशाचे वर्णन.

प्रकरण ९ इ० स० १६२५.

न जो पुरुष धिट्ट व पूर्वापार सर्व धोरण समजणारा असून पुढारी होण्याजोगा असे त्यास स्वतंत्र राज्य स्थापण्याचे पुष्कळ प्रसंग येत. असा पुरुष शिवाजी होता त्यानें मराठ्यांचें राज्य प्रथम स्थापिलें.

हा शूर पुरुष आरंभीं फार संपत्तिवान वगैरे नव्हता, तरी तो हलक्या कुळांतला नव्हता. त्याचा पणजा

शिवाजीचे घराणें.

बाबाजी भोंसला म्हणून उदेपूर येथील राणा (राजा) ह्याचा पुत्र होता, त्या राण्याचें कूळ हिंदुस्थानांत अत्युत्तम व शुद्ध असें सर्वांनीं गृहीत आहे; तसें कूळ दुसरें नाहीं. परंतु त्याची आई हलकी होती ह्यामुळें त्यास तो कलंक वाटून त्यानें आपला जन्मदेश सोडला आणि इतर दरबारीं आपणास प्रतिष्ठा व चाकरी मिळावी म्हणून तो पाहूं लागला. मग खानदेशचे एका राजाचे पदरीं चाकरीस राहून त्यानें मोठी पदवी मिळविली व पुण्याचे जवळ जमीनदारी संपादिली. त्यावेळेस पुणें हें लहान खेडें होतें. परंतु पुढें त्याच्या वंशांतील पुरुषांची भरभर होऊन त्या खेडेगांवाची मोठी राजधानी झाली. त्याचा

त्याचा पुत्र मालोजी

मुलगा मालोजी ह्यानें एका मराठ्या सरदारापाशीं राहून कीर्ति संपादिली. नंतर त्या सरदारानें मालोजीचा पुत्र शहाजी ह्यास आपली मुलगी दिली. पुढें शहाजी आपल्या सासऱ्याशीं भांडून विजापूरचे राजाचे सेनेंत चाकरीस राहिला; तेव्हां तंजावर व करनाटक येथें त्याला चाकरी सांगितली. तो तिकडे असतां त्यानें आपला पुत्र शिवाजी ह्यास त्याच्या आईपाशीं ठेवलें होतें. त्याचा कारभारी

दादोजी कोंडदेव पुण्यास असे. त्यानें जो पुढें मोठा योद्धा निघाला अशा ह्या पुरुषास लहानपणीं शिकविण्याची मेहेनत फार घेतली. जें लिहिणें व वाचणें हें डोंगरांत राहणारे मराठे तुच्छ मानतात तेंच त्यानें त्यास शिकविलें असें नाहीं, तर दांडपट्टा वगैरे शिपायास जें कसब असावें तें व पूर्वींच्या राजांच्या गोष्टी व श्लोक सुभाषित हें सर्व शिकविलें. त्यानें हिंदुधर्माप्रमाणें वागणूक त्याकडून ठेवली होती. शिवाजीचें वय १७ वर्षांचें झालें तों त्याचा स्वभाव अचाट उद्योग करण्याचा असल्यामुळें तो स्वारीस निघाला. त्यानें शेजारच्या दऱ्यांत राहणारे मावळे लोकांची टोळी जमवून लढाया करण्यास व लुटण्यास आरंभ केला. असला धंदा आशियेंतील अर्धवट शहाणे लोक बहुत करून चालवितात. तेव्हां दादोजी कोंडदेवापाशी त्याच्या वर्तणुकेविषयीं लोकांनीं गाऱ्हाणीं सांगितलीं. मग ती वर्तणूक वाईट अशा तऱ्हेचा पुष्कळ उपदेश त्यानें केला व तसें सांगणें त्यास योग्यच होतें. परंतु असें सांगतात कीं तो शिवाजीस तसें करण्याविषयीं गुप्तपणानें उत्तेजन देत असे. तसल्या कामास शिवाजी फार योग्य आहे व तशीं अचाट कामें केलीं असतां हा मोठे पदवीस चढेल असें ही दादोजीच्या मनांत कदाचित् वाटत असेल.

प्रकरण ९
ई० स० १६२५.

त्यानें कांहीं लोक जमा केले.

त्यावरून शिवाजीनें मोठेपणा मिळविण्याचा आपला क्रम चालविला. आणि जेथें बहुत करून गमन

प्रकरण ९.
इ० स०
१६४०.

होणार नाहीं असा तोरणा किल्ला त्यानें घेतला. तेव्हां विजापूरचे राजास हें त्याचें प्रथम भय पडलें. परंतु पूर्वींच्या पेक्षां अधिक खंडणी देईन असें सांगून शिवाजीनें त्याची मैत्री करून घेतली. नंतर तो एका मागून एक किल्ले घेऊं लागला व नवे बांधूं लागला. तेव्हां त्या राजानें त्यास पुन्हा तूं करतोस हें वाईट वगैरे रीतीनें बोध केला व त्याचा बाप शहाजी ह्यास ही सांगितलें कीं तूं आपल्या मुलाचा बंदोबस्त कर, नाहीं तर तुला बंदींत ठेवूं. तेव्हां शिवाजीचें कृत्य मला माहीत नाहीं व जें तो करतो तें नीट नव्हे, ह्याप्रमाणें त्यानें शपथ वाहून सांगितलें. तरी तें खरें न मानून त्यास बंदींत घातलें. तेव्हां तें शिवाजीस कळल्यावर आपल्या बापावर आपण असा प्रसंग आणला असें जाणून त्यास मोठें संकट पडलें. तथापि आपला चालविलेला क्रम सोडून त्यास बंदींतून सोडवावें हें नीट वाटेना. मग त्यानें शहाजहान ह्यास बापास सोडविण्याविषयीं अर्ज केला. कारण शिवाजी आपणास शहाजहानाच्या अधिकारा खालचा जमीनदार म्हणवीत असे. मग त्या पराक्रमी पुरुषाच्या मध्यस्थीनें शहाजी बंदींतून सुटला. जेव्हां औरंगजेब विजापुरावर लढाई करण्यास आला तेव्हां शिवाजी आपणास मोंगलांचे पदरचा असें, पूर्वींप्रमाणें म्हणवीत होता म्हणून अशा ह्या विलक्षण प्रसंगीं शिवाजीनें उगीच बसावें हें देखील उपयोगी होतें म्हणून मोंगलांनींही त्याचा सर्व मुलूख कांहीं उपद्रव न देतां त्या-

शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला.

शिवाजीचा प्रऊपणा.

कडे ठेविला. परंतु ते उभयतां राजे निकराचे युद्धांत अगदीं गढून गेले आहेत असें पाहून त्यानें जसा जसा प्रसंग आला त्याप्रमाणें त्या उभयतांचा ही मुलूख घेण्यास व लुटण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. शेवटीं हिंदुस्थानाच्या गादीवर ज्या युक्तींनीं औरंगजेब बसला, त्या युक्ती सिद्धीस नेण्याकरितां त्यानें लढाई तहकूब केली. मग त्याचे ते ब्रेत चालले होते तोंपर्यंत शिवाजी मुलुखाची लूट वगैरे करीत होता तो क्रम बंद करण्यास अर्थातच औरंगजेबास अवकाश सांपडला नाहीं. तथापि ह्या नवीन पराक्रमी पुरुषास विजापूरच्या राजाशीं लढाया करणें भाग होतें. त्या दरबारी त्यास बंडखोर असें पुष्कळ दिवसांपासून मानीत होते परंतु हल्लीं त्याचा अगदीं नाश करावा म्हणून त्या सरकारानें आपला सर्व प्रयत्न चालविला. तेव्हां शिवाजीनें धिट्टपणानें निश्चय केला की सेनेच्या बलानें व हिकमतीनें शत्रूशीं तोंड देऊं.

प्रकरण ९ इ० स० १६४०.

विजापूरचे राजाशीं वैर.

विजापूरचे राजाचें सैन्य अफसुलखान नामें विख्यात सरदार होता तो घेऊन त्या बंडखोरास लौकर जिंकीन अशा प्रतिज्ञेनें चालून आला. तेव्हां शिवाजीनें आपली सर्व शक्ति खचून ह्यांतून पार पडलें पाहिजे असें जाणून सांगून पाठविलें कीं मी शरण येण्यास तयार आहें. परंतु मजकडून वास्तवीक अपराध घडल्यामुळें एकदम माझ्यानें तुम्हांपुढें येववत नाहीं. येण्याला फार भय वाटतें. नंतर त्यानें युक्तीनें आपल्या शत्रूकडून असें

शिवाजीची नीचहिकमत.

प्रकरण ९ इ० स० १६६०.

ठरविलें कीं त्या उभयतांनीं एक एक मनुष्य घेऊन अमुक ठिकाणीं एकमेकांस भेटावें. ही भेट होणार असें समजून पूर्वीं शिवाजीनें आपले किल्ल्याचे पुढील रानांत आपले हत्यारबंद लोक गुप्त रीतीनें जिकडे तिकडे ठेवले. मगआपण आंगांत चिलखत चढवून त्यावर रुभरी घायघोळ डगलें व डोकीस पोलादीटोपी घालून आपल्या पांघरुणाखालीं खंजीर व कटार अशीं शस्त्रें लपवून घेतलीं. नंतर पाहतो तों अफसुलखान दीडहजार लोक घेऊन जवळ येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां

अफसुलखान जाऊनपोंहचला.

शिवाजीस बरें वाटलें. अफसुलखान त्या लोकांस दूर ठेवून कांहीं अंतरावर नेमलेल्या स्थानीं एक मनुष्य बरोबर घेऊन गेला. इकडे शिवाजी जसा कोणी एकादा मोठ्या कामास जातो त्याप्रमाणें कांहीं धर्मांतील कृत्यें करून व आईच्या पायां पडून तिचा आशीर्वाद घेऊन चालता झाला. नंतर दिसण्यांत शस्त्र जवळ नाहीं व पुढें जाण्यास फार भीत आहे व वारंवार मागें पाहत आहे असें बेतानें तेथें गेला. शेवटीं पुढें सरून त्यानें अफसुलखानाचे गळ्यास मिठीघालून भेट घेतली. तेव्हां त्याचे हातांत वाघनखें होतीं तीं त्याच्या शरीरास बोंचलीं. त्याच क्षणीं त्या विजापूरकराच्या सरदारानें आपली तरवार उपसून त्या विश्वासघातकी पुरुषाच्या मस्तकावर घाव घातला परंतु त्याच्या पागोट्याखालीं पोलादी शिरस्त्राण होतें त्यामुळें त्यास घाव लागला नाहीं. मग शिवाजीनें त्या-

च्या उरांत कटार खोचली तेव्हां तो अ- गर्दा मूर्छित होऊन पडला. मग शिंग वा- जवितांच तो शब्द ऐकून मराठ्यांचे लो- क आपल्या गुप्त ठिकाणापासून निघाले आणि अफ़ुलखानाच्या रक्षणास जे आले होते त्यांवर एकाएकीं धांवले. तेव्हां त्यांस दहशत पडून भयानें ते पळून गेले. आशियेंतील सैन्यें त्यांचा अधिपति अस- ला तर मात्र त्या भोंवतीं जमून उभीं राहतात आणि तो पडल्यावर त्यांचें सर्व धैर्य खचतें; अशी वहिवाट आहे तीप्रमाणें शत्रूंचे शिपाई चोहोंकडे फांकल्यावर शिवा- जीस पाहिजे तसें करण्यास मोकळीक सांपडली. मग पुष्कळ प्रदेश जिकीत जाऊन तो विजापूरचे राजधानी- च्या वेशीपर्यंत झपाट्यानें पोहोंचला. त्यानें त्या संधींत मुख्यत्वेंकरून कोंकणपटी आपल्या ताब्यांत घेतली. आणि प्राचीन लोक ज्यास चांचे लोकांचा किनारा म्ह- णत तें कोंकण हातीं आल्यावर सर्व किनाऱ्याची कि- ल्ली जो पन्हाळगड तो हातीं आला. नंतर शिवाजी- स आरमार तयार करण्यास फार सोय झाली, आणि देश जिकण्यास व लुट- ण्यास शक्ति आली. विजापूरच्या रा- जानें आपलें सैन्य नवीन भरून ह्या बं- डखोरावर पुष्कळ लोक पाठविले, तेव्हां शिवाजी- ची पराकाष्ठेची दशा झाली, परंतु तो तितके वेळां संक- टांतून सुटून गेला आणि शेवटीं त्यानें तह ठरविला, त्यांत पुष्कळ पहाडी देश शिवाजीच्या ताब्यांत राहिला

प्रकरण ९
इ० स० १६२७.
विजापूरचे सरदारास मारले.

पन्हाळा कि- ल्ला शिवाजी- नें घेतला.

प्रकरण ९
इ० स०
१६२७.

व त्या वेळेस पन्नासहजार पायदळ आणि सातहजार स्वार इतकें सैन्य त्याजवळ होतें.

इकडे औरंगजेबानें आपसांत लढाया करून व राजद्रोह करून मोंगलांची गादी संपादिली, व तीविषयीं कोणी उपद्रव देणारा नाहींसा झाल्यावर त्यानें हिंदुस्थान येथील पूर्ण सत्ता आपणास असावी असा निश्चय केला.

औरंगजेबाचा मुलूख जिंकण्याचा बेत.

हा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां औरंगजेबास शिवाजीची सत्ता फार वाढत होती ती बंद करणें अवश्य पडलें. त्यानें ह्या कामाकरितां आपलें चांगलें बंदोबस्तानें नेमलेलें सैन्य बरोबर देऊन षाईस्तेखान नामें उमराव पाठविला. त्या नवीन सरदारानें कांहीं वेळपर्यंत लढाया चालविल्या, त्यांत त्याची फार सिद्धि झाली, त्यानें पुष्कळ किल्ले घेतले व त्या पराक्रमी पुरुषाची मुळची जागा पुणें तें हीं घेतलें. तेव्हां त्या संकटकाळीं शिवाजीनें एक मोठें पराक्रमाचें कृत्य केलें. तें असें कीं, तो आपले विश्वासूक शिपायांची एक टोळी निवडून त्यांनिशीं षाइस्तेखानाच्या वाड्यांत शिरला. असें वाटतें कीं मोंगलांचा कोणी सरदार षाइस्ते खानाचा मत्सर करीत असे तो शिवाजीस अनुकूळ होता म्हणून वाड्यांत त्याचा प्रवेश झाला असावा. ते लोक टिकाव घेऊन स्वयंपाक घरांत दांडगाईनें गेले, मग तेथून माजघरांत इतक्यात्वरेनें ते घुसले कीं त्या सरदारास बाहेर पडण्यास वेळ सांपडला नाहीं. तो बाहेर पडूं लागला इतक्यांत त्यावर घावघातला. तो लागून त्याच्या हाताचें एक बोट तुटलें, व त्याचा पुत्र मारला गेला. त्याला जा-

तीनें ह्या अनर्थाचें इतकें भय पडलें व त्याचेच अंमलदार त्याविषयीं इतका मत्सर करूं लागले कीं, त्यानें परत जाण्याचा हुकूम आणविला; नंतर कांहीं वेळपर्यंत मराठ्यांशीं लढाया तहकूब राहिल्या.

प्रकरण ९
इ० स० १६६०.
षाइस्तेखान परत गेला.

मग कांहीं काळ मध्यें गेला, तितक्यांत शिवाजीनें आणखी एक पराकाष्ठेचें अचाट काम केलें तें असें, कीं त्यानें सुरत लुटली. तें शहर त्यावेळेस मुख्य उतार पेंठ होती व पृथ्वीवर सर्वांहून त्या शहरांत संपत्ति फार होती असें म्हटल्यास चिंता नाहीं. तें शहर मोठें व तेथें संपत्ति पुष्कळ ह्या समजुतीनें त्या शहराभोंवतीं लहानसा मातीचा कोट बांधून तेथील लोक निर्भय राहिले होते असें दिसतें. ती भिंत शिवाजीच्या लोकांस प्रतिबंध करण्याजोगी देखील नव्हती. शिवाजी वेष पालटून तीन दिवसपर्यंत शहरांत फिरत होता व त्यानें हल्ला कोठें करावा व लुटण्यास योग्य काय हें पाहून ठेविलें असें कित्येक ग्रंथकार म्हणतात. नंतर त्यानें लागलीच लष्कराच्या दोन टोळ्या करून वसई आणि चौल ह्या दोन मोठ्या ठिकाणांस वेढे घालण्यांत तीं सैन्यें गुंतलीं आहेत असें दाखविलें. मग एकाएकीं आपले मुख्य लोकांस वसईस लहान टोळ्या ठेवून मागें या अशी आज्ञा केली व जे लोक तेथें राहिले त्यांस सांगणें होतें कीं दिवे पुष्कळ लावावे व गलबला करावा व ज्या तऱ्हेनें मोठें सैन्य आहे असें दिसेल ती तजवीज करावी. इकडे अकस्मात मराठ्यांची सेना सुरतेस जाऊन शहरांत शिरली ते-

कपटाचे वेढे.

प्रकरण ९ इ० स० १६६० — त्व्हां तीस कोणी अडथळा ही केला नाहीं. तेथील सुभेदार किल्ल्यांत जाऊन बसला आणि इंग्रज व डच लोक तर आपापल्या वखारींत राहिले तेव्हां अर्थातच ती विजयी सेना सर्व शहरांत फिरून जो मौल्यवान पदार्थ हातीं लागला तो घेत तीन दिवसपर्यंत तेथें होती. त्यावेळेस पैसा, रत्नें, आणि इतर किंमतवार पदार्थ लुटले ते सर्व मिळून दहा लाखांचा माल सांपडला.

एकाएकीं शिरला

ह्याप्रमाणें औरंगजेबास हलक्या सरदारापासून अधिक अधिक रागाचीं कारणें होत चालल्यामुळें व त्याचे प्रयत्न व्यर्थ झाल्यामुळें मोठा क्रोध येऊन त्यानें पराकाष्ठेचा यत्न करून शिवाजीचा चुराडा करून त्यास मारून टाकावें असा निश्चय केला. मग तो हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यानें मोठें सैन्य देऊन मिरजा राज नामें शूर सरदार होता त्याची रवानगी केली. तो सरदार त्याकाळीं पहाडी देशांत लढायाकरून वाकबगार झाला होता. शिवाजीस त्या सरदारासमोर युद्धांत तोंड देण्याचें सामर्थ्य अगदीं नव्हतें. ह्यामुळें त्या नवीन सरदारानें लवकरच एकामागून एक किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. तेव्हां शिवाजीस जिवावरची दशा प्राप्त झाली तशी पूर्वी कधींच प्राप्त झाली नव्हती. शेवटीं जेथें खजीना ठेवला होता व जेथें कुटुंब राहत असे त्या पुरंदर किल्ल्यास त्यानें वेढा घातला. तो किल्ला अगदीं वेढून टाकल्यावर शिवाजीला तो वेढा उठवील अशी आशा देखील राहिली नाहीं. तेव्हां त्यानें आता जे

औरंगजेबाचा निश्चयाचा यत्न.

होईल तें होवो असा निश्चय करून आपला पक्ष सोडून दिला आणि मिरजा राजा ह्या सरदारापासून, तूं वश झालास तर तुला दिल्लींत सुरक्षित ठेवूं व तुझा तेथें चांगला मान राखूं, असें वचन घेतल्यावर शिवाजी मोंगलांच्या स्वाधीन झाला नंतर औरंगजेब आपणास पहिल्या प्रतीच्या वडे लोकांच्याप्रमाणें मान देईल अशा खातरीनें त्याच्या दरबारीं गेला, परंतु पाहिलें तों बादशाहानें बुद्धिपुरःसर अपमान केला व केवळ दुसऱ्या प्रतीच्या लोकांप्रमाणें आपणास ठेवलें. तेव्हां त्याचा फारच पाणउतारा झाला. कितीएक सभ्य इतिहासकर्त्यांच्या वर्णनांवर भंरवसा ठेविला असतां असें समजून येतें कीं औरंगजेबाच्या कन्येनें पडद्याच्या आंतून शिवाजी तरुण परकी पुरुष पाहिला तेव्हां तिच्या मनांत त्याविषयीं इच्छा उत्पन्न झाली, तें वर्तमान शिवाजीच्या कानीं आल्यावर तिशीं लग्न व्हावें म्हणून बोलाचाली चालविली. तेव्हां बादशाहास पराकाष्ठेचा राग येऊन तें बोलणें नाकारलें; ह्या चमत्कारिक गोष्टीविषयीं जे शोधक इतिहास कर्ते आहेत ते म्हणतात कीं अशी गोष्ट खरी असें अगदीं म्हणवत नाहीं, परंतु वर लिहिलेलें कारण नसलें तरी हें खचीत आहे कीं निदान आपल्या भोंवतीं पाहरा आहे व आपणास गैर अब्रूनें कैदी करून ठेविलें आहे असें शिवाजीस वाटून तो समजला कीं ज्याच्या हातीं मी आहें त्याचे डाव मज प्रमाणेंच खोल आहेत. मग तो आपली सुटका होण्याकरितां सर्व बुद्धि खर्चून

प्रकरण ९
इ० स० १६७०.

शिवाजी त्याच्या स्वाधीन झाला.

त्याचा अपमान.

प्रकरण ९
इ० स०
१६७०

कल्पना काढण्यास झटूं लागला. त्यानें वेड्याचें सोंग घेऊन आपणावरील पाहरेकरी लोकांची शंका नाहींशी करून मेवामिठाई भरून नेण्याकरितां मोठाले करंडे असत त्यांत आपण व आपला पुत्र उभयतां बसून त्यानें ते युक्तीनें शहराबाहेर एके ठिकाणीं नेवविले. मग तेथें रूप पालटून एका वाईट तट्टावर बसून पुढें मथुरेपर्यंत कोणास वहीम न नयेतां तो गेला. तेथून त्या संधीस काशीस व जगन्नाथास गेला. मग जगन्नाथाहून तो हैदराबादेकडून शेवटीं आपल्या जन्म भूमीकडे आला; तेव्हां त्याचे पूर्ण इमानी व शूर लोक पुन्हा त्याजवळ जमले.

त्याच्या सुटण्याचें फल.

शिवाजीनें लागलाच देश लुटण्याचा व जिकण्याचा क्रम चालविण्यास पुन्हां आरंभ केला. तेव्हां मोंगलांशीं पक्कें वैर पडलें, परंतु औरंगजेब इराणांतून सेना येऊन तिनें त्याचें लक्ष व्यापल्यामुळें व पठाण लोकांनीं बंड केल्यामुळें त्रासला होता म्हणून त्यानें पुष्कळ वर्षेंपर्यंत शिवाजीकडे लक्ष दिलें नाहीं. व शिवाजी त्याच्या राज्यापैकीं डोंगरी प्रांत मात्र लुटीत असे. पुढें शिवाजी अर्थातच पश्चिम किनाऱ्यावर लूट वगैरे बहुतकरून प्रतिबंध नहोतां आपली सत्ता वाढवीत चालला. त्यानें पुन्हा सुरत लुटली. आणि तिसऱ्या वेळेस तो आंत शिरला नाहीं तरी त्या शहरांतून पुष्कळ पैका जमा करून नेला. राजापुरावर त्यानें हल्ला केला, तेव्हां इंग्लिश लोकांची वखार लुटून दहा हजार होन

पुन्हा लुटण्यास आरंभ केला.

पुन्हा सुरत लुटली.

नेले. परंतु ते पुढें परत दिले. सिंहगड प्रकरण ९ म्हणून डोंगरी किल्ला आहे तेथें बहुत इ० स० करून कोणाचा प्रवेश व्हावयाचा नाहीं १६७० असें मानीत, तो शिवाजीच्या प्रतिकूलकाळीं नुकताच अन्नाचा तोटा पडेल म्हणून शत्रूनें घेतला होता परंतु धैर्यवान् अशा त्याच्या हजार मावळे लोकांनीं त्याच्या अत्यंत उंच ठिकाणीं दोऱ्यांनीं चढून हातांत तरवारी घेऊन युद्ध करीत करीत तो किल्ला हस्तगत केला. शिवाजी परत आल्यानंतर लागलाच त्यानें राजा असा किताब आपणास घेतला आणि आपल्या नांवाचें नाणें पाडविलें. मग आपल्या लोकांत डौल दिसावा व आपली इच्छा पूर्ण करावी म्हणून त्यानें राज्याभिषेक करविण्याचा निश्चय केला. त्या समारंभाच्या वेळेस एक्या पारड्यांत शिवाजी व दुसऱ्या पारड्यांत सोनें घालून त्याची तुळा केली असें पुष्कळ संस्कार केले. ब्राम्हणास पुष्कळ मोठ मोठ्या देणग्या दिल्या ह्या योगानें ह्या कृत्यास व किती एक राजकीय समारंभास फार शोभा आली.

राजा ह० किताब धारण केला.

ज्या वर्षीं राज्याभिषेक झाला त्यावर्षीं शिवाजीला दुखणें लागलें, तेव्हां आठ महिनेपर्यंत तो अगदीं निजून होता. परंतु बरा झाल्यावर त्यानें पूर्वींच्यापेक्षां मोठमोठ्या लढाया करण्यास आरंभ केला. गोंवळकोंडें म्हणून संस्थान अगदीं दक्षिणेस लांब एके बाजूस आहे. तेथें त्याच्यानें जावणार नाहीं असें वाटत होतें. परंतु एकाएकी बाराहजार स्वारांपेक्षां कांहीं जास्ती इतके

गोंवळकोंडें ह्यावर हल्ला.

प्रकरण ९ इ० स० १६८० मराठे स्वार घेऊन त्यानें त्या शहरास वेढा घातला आणि एकाएकीं हल्ला करण्यास शहरांत घुसला. तेव्हां शहराचा कोणताही बंदोबस्त करण्यास वेळ सांपडला नाहीं. मग तें शहर लुटूंनये म्हणून तेथील अधिकाऱ्यानें शिवाजीस पुष्कळ खंडणी दिली. मोठी खंडणी.

मग तो आपले कांहीं लोक घेऊन आंत शिरला तेव्हां तेथील बादशाहाच्या बरोबरीनें सभेंत बसला. त्यानें आपल्या खंडणीपैकीं कांहीं कमी न करतां मोंगललोक आपणाशीं युद्धास आले असतां तुम्हीं व आम्ही युद्ध करण्यास एक असूं हा करार देखील करून घेतला असें दिसतें. पुढल्या वर्षीं विजापूरच्या राज्यांतून तो करनाटकांत गेला. तेथें नवीन मुलूख पुष्कळ सांपडला.

करनाटकांत स्वारी.

त्यानें जिंजी, वेलोर, व दुसरे बळकट किल्ले गोंवळ कोंडच्या राजाच्या नांवाभें घेतले. परंतु त्यांवर आपले जातीचे शिबंदी लोक बुद्ध्या ठेविले. नंतर त्यानें एके बाजूस मद्रासच्या जवळच्या मुलुखापर्यंत व दुसरें बाजूस श्रीरंगपट्टणापर्यंत देश जिंकिला, तेथून परत आल्यावर त्यानें मुंबई घेण्याचा धाक घातला व अगदीं घेतली देखील असती, परंतु दिलीरखान नामें बादशाहाचा सरदार होता त्यास शिवाजीचा पुत्र संभाजी इकडील राजांच्या चालीप्रमाणें फितूर होऊन मिळाला होता. त्या सरदाराशीं युद्ध झालें त्यांत शिवाजीचा पराजय होऊन त्यास आपल्या राजधानीस रायगड येथें परत जावें लागलें. नंतर संभाजीचें व त्याचें ऐक्य

त्याचा पुत्र सोडून गेला.

होऊन तो पुन्हा निघाला आणि पु- प्रकरण ९
ष्कळ फिरत जाऊन बऱ्हाणपुराजवळ इ० स०
शत्रूचे लोक खजीना आणीत होते १६८०
त्या लोकांवर पडून त्यांस लुटलें. मग त्वरेनें आपल्या शहरास परत सुरक्षितपणें आला, परंतु वाटेच्या पराकाष्ठेच्या दगदगीमुळें व पूर्वीं पुष्कळवेळां स्वाऱ्या करून हाल भोगले होते त्यांमुळें त्याच्या फुप्फुसांमध्यें दाह होऊन सन १६८० तं एप्रिल महिन्याचे पांचवे तारखेस तो मरण पावला. तेव्हां त्याचें वय त्रेपन्न वर्षांचें होतें. तो मृत्यु पावला ही बातमी औरंगजेबाला कळली तेव्हां त्यास पराकाष्ठेचा आनंद झाला असें दिसलें. तथापि शिवाजी मोठा बुद्धिवान व हिंदुस्थानांतील जुनीं सर्व राज्यें बुडविण्यास जी झटत असतां त्यानें बुद्धिबळानें माझी मोठी व व्यवस्थित अशा सेनेस न जुमानतां नवीन राज्य स्थापण्याचा पाया दृढ घालून राज्य संपादिलें अशी औरंगजेबाची खात्री होऊन तें त्यानें उघड कबूल केलें, हा त्याचा थोरपणा होय.

तो मरण पावला.

शिवाजीचें वर्णन निरनिराळ्या तऱ्हेचें केलें आहे, तथापि आम्हांस एकंदर विचार करून पाहिलें असतां असें दिसतें कीं, तीं वर्णनें कांहीं अतिशयच त्याच्या चांगलेंपणाविषयीं केलीं आहेत. आशियाखंडांत अथवा अडाणी देशांत जी वर्तणूक साधारण दिसून येते तशी त्याची वर्तणूक होती. परंतु विद्याचारसंपन्न लोकांमध्यें बहुत करून तशी आढळणार नाहीं. त्या देशांत एक पुरुष

शिवाजीचा स्वभाव.

प्रकरण ९
इ० स०
१६८०

राजा, सरदार, पेंढारी, किंवा नाईक अथवा ह्यांतून पाहिजे त्याप्रमाणें जशी वेळ पडेल त्याप्रमाणें वर्तणूक करितो: तसे शिवाजीनें प्रसंगानुरूप आपले गुण बरोबर प्रगट केले, व तसें वागण्यांत शिवाजीनें फारच हुशारी दाखविली, आणि त्याच्या हिकमती व एकाएकीं केलेले हल्ले ह्यांचें वर्णन मनोरंजनार्थ पुष्कळांनीं अतिशयोक्तीनें केलें आहे; त्यामुळें त्याचें नांव हिंदुलोकांस फार प्रिय झालें आहे. परंतु त्याचे उद्देश व त्यानें ते सिद्धीस नेण्यास जे उपाय योजिले ते ह्या दोहोंचा विचार केला असतां तो मोठा शहाणा व राजनीतींत निपुण होता असें म्हणवत नाहीं. सदाचरणाविषयीं विचार केला असतां तर ज्या पुरुषानें आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां कोणतेंही कर्म करण्यास दिक्कत घेतलीच नाहीं, अशा पुरुषास सदाचारी म्हणणें फार कठीण आहे, आणि त्याचे ठायीं धर्मबुद्धि व अब्रू किती असली तरी तो कोणतेंही एकादें मोठें कृत्य करण्यास हरकत येत असल्यास त्यांकडे लक्ष देत नसे. तो उगीच पाहिजे त्याचा दुष्टपणें प्राण घेत नसे, ही गोष्ट इकडील राजांच्याठायीं असणें हें स्तुतीस कारण आहे खरें परंतु कोणाचा प्राण घेण्यानें आपला उद्देश सिद्धीस जाईल असें त्यास वाटे तेव्हां तो प्राण घेतल्यावांचून राहत नसे. त्याला मोठें राज्य प्राप्त झाल्यावर चोहोंकडे चांगला बंदोबस्त असता तर त्यानें देश लुटले आणि पळत असून लढाया केल्या

त्याची लोभ बुद्धि.

त्याचें आचरण.

ह्यामुळें जीं दुःखें लोकांस भोगावीं लागलीं त्यांचा त्यानें लोकांचें कल्याण व रक्षण करण्याची रीति चालवून विसर पाडला असता, परंतु तसें करण्यास त्याला बरोबर समय आला नाहीं. त्याचा पोषाग वगैरे साधा आणि वर्तणूक नेमस्तपणाची असे. तो आपल्या लोकांशीं घरगुती प्रमाणें उघड मन करून वागणूक करी आणि जरी जवळ पाहरा किंवा दुसरा कांहीं बंदोबस्त नसला तरी त्यापासून भय होणार नाहीं असें त्यास वाटे. तो हिंदुधर्मांतील व्रतें वगैरे कडकडीत पाळीत असे व धर्माच्या कामांत उत्सुक आणि पराकाष्ठेचा अभिमानी असे. तो केवळ इहलोकीं फायदा करून घेण्याकरितां उगीच धर्माचें दंभ दाखवीत असे, असें कोणी म्हणतील, परंतु जरी मोठेपणा मिळण्यास तें एक कारण झालें खरें तरी तेवढ्याच करितां तो धर्म पाळी असें म्हणतां येत नाहीं. त्यानें जे लोक आपल्या धर्माचें शत्रुत्व करीत त्यांशीं द्वेष करण्याचा बाणा बाळगला, व शेवटीं औरंगजेबाप्रमाणें धर्माभिमानानें इतर धर्माचे लोकांस गांजूं लागला होता.

प्रकरण ९
इ० स० १६८०.
त्याचा साधेपणा.

शिवाजी मरण पावला व त्याचें वय ही फार झालें नव्हतें ह्यामुळें मराठ्यांच्या पक्षास फारच धोका आला. हिंदुस्थानांतील राजांच्या नेहेमींच्या वहिवाटीप्रमाणें राज्याकरितां संभाजीला आपल्या भावाशीं कलह करावा लागला. नंतर मोंगलांची मोठी सेना येऊन त्याशीं लढाईचा प्रसंग झाला आणि बापासारखा पराक्रमी तो अ-

संभाजी गादीवर बसला.

प्रकरण ९. इ० स० १६८५

सल्यामुळें त्यानें तिचा पुष्कळ नाश करून तीस हटवून लावलें. तथापि औरंगजेबानें पुढें लौकरच आपली सर्व सेना आणून दक्षिण अगदीं जिंकून टाकावी असा बेत केला.

लष्करी गुण.

औरंगजेबाची दक्षिणेवर स्वारी.

त्यानें विजापूर आणि गोंवळकोंडें येथील राज्यें प्रथम घेतलीं असें आम्हीं पूर्वीच सांगितलें आहे. कारण तीं राज्यें फार वर्षें त्याशीं बांकून राहिलीं होतीं. नंतर त्यानें आपलें सर्व लष्कर मराठ्यांशीं युद्ध करण्यास आणून मराठ्यांप्रमाणेंच नानातऱ्हेच्या युक्तिकरून त्यांस औरंगजेब त्रास देऊं लागला. औरंगजेबानें चोहोंकडें आपले बातमीदार ठेविले होते, त्यांपैकीं एकानें येऊन सांगितलें कीं संभाजी कांहीं क्रीडा करण्याकरितां निघाला आहे. ( संभाजी फार विषयी असे ) व त्या बरोबर बहुतकरून कोणी नाहीं, तेव्हां त्यानें आपल्या शिपायांची एक टोळी त्यास धरण्याकरितां पाठविली. मग त्यांनीं एकाएकीं जाऊन त्याला धरून बंदीवान केलें. बादशाहाची वृत्ति दुष्ट असे, त्यानें संभाजीस नेतांच आतांच

संभाजीस धरलें व मारलें

ह्यास मारून टाकावें असा नेहेमीं प्रमाणें हुकूम केला व असें ही सांगतात कीं संभाजीनें ज्या वेदना मरण समयीं मोठ्या धैर्यानें सोसल्या त्या पाहून आपले नेत्र तृप्त करावें म्हणून देखील तो गेला होता. संभाजीची अशी दशा झाल्यावर मराठ्यांचा ऱ्हास होतो असें सर्वांस वाटलें. परंतु राजाराम नामें संभाजीचा भा-

ऊ लागलाच करनाटकांत गेला आणि प्रकरण ९
जिंजी म्हणून किल्ला होता त्याच्या आ- इ० स०
धारानें आपलें सर्व सैन्य त्यानें त्या १६८५
भोंवतीं जमा केलें. तो किल्ला बहुत- त्याचा भाऊ.
करून घेण्यास अशक्य असा होता.
लढाई चोहोंकडे चाले म्हणून मध्यें मध्यें विघ्नें होत. ह्यामुळें तो किल्ला घेण्यास बादशाहाच्या सेनेस पुष्कळ वर्षे लागलीं. तेथें हा प्रकार चालला असतां मराठे लोक आपल्या पहाडी मुलकांत पुष्कळ जमा झाले आणि त्यांनीं औरंगजेबानें नवीन घेतलेल्या विजापूर व गोवळकोंडें ह्या दोन संस्थानांवर हल्ले केले व खानदेश माळवा, आणि वराड, ह्या जुन्या मुलुखांवर सुद्धां स्वाऱ्या केल्या.

ईश्वरी संकेत असा होता कीं शंभर वर्षांहून कांहीं अधिक वर्षेंपर्यंत मराठ्यांच्या सेनेचें हिंदुस्थानांत फार प्राबल्य व्हावें व त्यांनीं जें पाहिजे तें करावें. त्यांच्या सेनेंत मोंगलांच्या प्रमाणें मुख्यत्वेंकरून घोडेस्वार होते. परंतु त्यांची व्यवस्था मात्र निराळ्या तऱ्हेची केली होती. मोंगलांच्या स्वारांच्या अंगावर बळकट चिलखतें असत व ते मोठाल्या घोड्यांवर बसत. त्यांतील सरदार लोक हत्तीवर असत, आणि त्या भोंवतीं स्वारांचा कोटाप्रमाणें गराडा असे. ही सेना मध्यहिंदुस्थानांतील सपाट प्रदेशीं व दक्षिणेंत ज्या प्रदेशीं डोंगर नाहींत तेथें जाई, तेव्हां तीपुढें कोणताही अडथळा राहत नसे; परंतु महाराष्ट्र देशांत डोंगर पुष्कळ तरी त्यांवरून घोडे चालणार ना-

मराठ्यांची सेना.

त्या देशाचे वर्णन.

प्रकरण इ० स० १६८५

हींत इतके ते उंच अथवा फार खडकाळ नाहींत. तथापि तोफा वगैरे सामान ज्यापाशीं पुष्कळ अशा स्वारांस लढाई करण्यास पाहिजे तितकी जागा येथें नाहीं; म्हणून येथील लोकांनीं आपले देशांत जसें असावें तसें व आपल्या चालीस योग्य असें सैन्य जमा केलें. त्यांत लहान व चपळ घोडे होते, व स्वारांचे कपडे हत्यारें वगैरे सामान हलकें असे. ह्या कारणानें मराठे लोकांस कुच करून पुष्कळ मुलुखाचा सप्पा उडवून शत्रूंस नसांपडतां परत जाण्यास सोय पडे. परंतु समोर उभे राहून लढाई करण्यास ते योग्य नव्हते. त्यांच्या सेनेंत कांहीं पायदळ असे, त्यांपैकीं कित्येक लोकांपाशीं तोड्याच्या बंदुका व कित्येकांपाशीं बाण असत, परंतु त्या लोकांचें साधारण आवडतें हत्यार म्हटलें तर भाला व त्यांजवळ लहानशी तरवार आणि ढाल हीं असत. दरवर्षास बरसात संपल्यावर दसऱ्याच्या मुहूर्तानें झेंडा

वार्षिक मोहीम.

उभा करीत. म्हणजे मोहिमेस आरंभ झाला असें सर्वांनीं समजावें. सेनेचा तळ पाडण्याचा वेळेस प्रथम राजाचें किंवा मुख्य सरदाराचें निशाण उभें करून मग दोहों बाजूंनीं अघाडीपासून पिछाडीपर्यंत बाजारचीं दुकानें ओळीनें मांडीत. बाजारचे बाजूचे लगत इतर सरदार आपलीं पतकें उभीं करीत त्यां भोंवतीं त्या त्या सरदारांचे लोक घोडे वगैरे बांधून उतरत. सेना निघे तेव्हां

धान्याच्या बेगमीचा प्रकार.

धान्य वगैरे ह्यांची बेगमी बरोबर नसे, परंतु दरएक घोड्यावर बसणारापाशीं एकेक पडशी असे तींत कांहीं खाण्याची

वगैरे बेगमी असें जें लागेल तें वाटे- प्रकरण ९
नें लोकांवर जुलूम करून घेऊन अ- इ० स०
थवा वनजारी म्हणून शेंकडों व्यापा- १७००.
री लोक लष्कराबरोबर असत ते पुरवती- लूटीचा प्रकार.
ल अशा बेतानें सैन्याचा कूच होई. जरी देश लुटल्यावांचून चालत नव्हतें तरी पाहिजे तितकी लूट घेण्याचा अथवा ज्याच्या हातीं जें लागेल तें त्यानें घ्यावें असा संप्रदाय नव्हता. श्रीमंत लोकांपासून कांहीं नियमानें द्रव्य घेत, आणि जें उत्पन्न होई तें सरकारांत जमा होई. शिपाई लोकांस पुष्कळ पगार मिळे, व तो नियमानें वांटीत नसत हें खरें. परंतु पगाराचा पैसा सांचला तर त्याची फेड करून घेण्याकरितां त्यांस पुष्कळ मोकळीक असे. सेनेंतील फौजेची भरती.
लोक पुष्कळ लूट मिळवितात इतकेंच नाहीं, तर ते इतर लोकांस ही जमा करतात. कारण ज्या लोकांचा स्वभाव आवेशी व अचाट व उद्योगी असे व ज्यांची घराकडे ओढ नसे अशा लोकांस बसावयास घोडा मिळाला म्हणजे पुरे, ते सेना चोहोंकडे फिरे तीस सहजच जाऊन मिळत. ह्याप्रमाणें मराठ्यांचें सैन्य जय झाल्यावांचून ही जितकें पुढें जाई त्याप्रमाणानें तें वाढत असे; आणि एका मागून एक वारंवार पराजय पावे. जी लढाई करावी तींत पराजय होतअसतां आणि आज हा किल्ला गेला व उद्या तो किल्ला गेला असें असतां देखील मराठ्यांच्या सेनेनें खानदेश, माळवा, आणि वराड व मध्यहिंदुस्थानांतील मोठा प्रदेश व्यापून टाकला होता.

प्रकरण ९ इ० स० १७००.

औरंगजेबाच्या उतरत्या वयांत एखादें मोठें संकट त्यास प्राप्त झालें असें नाहीं, परंतु त्याचा अंमल एक सारखा चालला होता तरी त्यानें कितीएक कृत्यें केलीं त्यांत यश आलें नाहीं व त्याचा ऱ्हासकाळ आला तेव्हां त्यास पुष्कळ अपशकुन झाले. ह्याप्रमाणें त्यास चोहोंकडून प्रतिकूळ काळ प्राप्त झाला. तो मुसलमान धर्माचा अभिमानी असे व तो अभिमान उत्तरोत्तर वाढून शेवटीं हिंदूंच्या धर्माचा समूळ उच्छेद करावा म्हणून तो पराकाष्ठेचे जुलूम वगैरे करूं लागला. मथुरा व काशी येथील देवालयें भुईस मिळवून तेथें मशिदी बांधल्या. अमदाबादेंतील देवालय फार दिवसांचें सुंदर बांधलेलें होतें त्यांत गोवध करून तें भ्रष्ट करून टाकलें. असा जुलूम चालविला तेव्हां हिंदुलोकांच्या आंगावर शहारे उठून त्यांस पराकाष्ठेचा त्रास वाटला, तरी त्यांनीं लागलेंच बंड वगैरे केलें नाहीं, परंतु त्या जुलमामुळें मोंगलांचें राज्य नसावें अशी इच्छा लोकांच्या मनांत उत्पन्न होऊन कोणी एखादा सरदार अथवा राजा लढाईचें निशाण उभें करील तर त्यास लागलेंच जाऊन आपण मिळूं असें सर्वांस वाटूं लागलें. औरंगजेबाकडून पुष्कळ जुलूम झाल्यामुळेंच मराठ्यांचें राज्य लौकर वृद्धिंगत झालें, आणि रजपूत लोकांच्या लहान लहान संस्थानिकांनीं बंडें केलीं त्यांत त्यांचा जय झाला. औरंगजेबाच्या मुलांनीं बापाप्रमाणेंच वर्तणूक करण्याचा मानस दाखविला. ते-

औरंगजेबाची अखेरीची वेळ.

धर्माभिमान.

लोकांची प्रीति कमी झाली.

व्हां त्यास अधिक अधिक दुःख हो- प्रकरण ९
त गेलें. महंमद नामें त्याचा वडील इ० स०
मुलगा होता तो पूर्वी बंदींतच मेला. १७००.
त्यानें बंड केलें त्याबद्दल त्यास कैदेंत
ठविलें होतें. औरंगजेबाच्या कारकिर्दी-
च्या आरंभीं त्यास फार दुखणें लागलें

त्यांमुलांमध्यें मत्सर.

होतें, तेव्हांच शाहआलम नामें दुसरे पुत्रानें आपणास राज्य मिळावें म्हणून इच्छा उघडपणें दाखविली होती. त्यानें पुत्र धर्मांत अंतर पाडलें असें नाहीं, अथवा औरंगजेबानें त्याची अप्रतिष्ठा केली ती व्हावी असे त्यानें कांहीं केलें नव्हतें, तथापि पुढें त्या उभयतांच्या मनांतील अविश्वास आणि संशय कधींच गेले नाहींत. अकबर म्हणून तिसरा मुलगा होता त्याची आई मोठ्या कुळांतली होती ह्यामुळें त्याची प्रसिद्धि असे; त्यानें बंड केलें असा त्याकडून अपराध झाला आणि प्रथम मराठ्यांस व मागून रजपूत लोकांस तो जाऊन मिळाला. औरंगजेबाचे दुसरे दोघे मुलगे अजीम व कामबक्ष हे त्याच्या शेवटच्या दुखण्याच्या वेळेस जवळ होते. त्यास पूर्वींच समजलें कीं आपण मेलों म्हणजे लागलाच मोठ्या युद्धास आरंभ होईल आणि शेवटीं आपल्या वंशांतील एक पुरुष खेरीज करून सर्वांचा क्षय होईल. असे भयंकर विचार मनांत चालवून तो फार संकटांत असतां शेवटीं मृत्यूचा समय आला आणि सन १७०७ त वयाच्या चवऱ्याण्णवावे वर्षीं फेब्रुवारी महिन्याचे एकविसावे तारखेस मरण पावला. त्यानें एकूण पन्नास वर्षें राज्य केलें.

त्याचामृत्यु.

प्रकरण ९
इ० स०
१७००.

त्याचे एकंदर गुण.

ह्या विलक्षण बादशाहाचे गुण बरोबर समजण्यास इतिहास कर्त्यास फार कठीण पडलें. त्याचीं घोर कृत्यें फारच उघड आहेत व सहज सर्वांच्या लक्ष्यांत येतील, परंतु त्याची नेहेमींची वर्तणूक पाहतां त्याचे गुण ही पुष्कळ दिसून येतात. न्याय करण्याच्या कामांत तो मेहेनती व निष्पक्षपाती होता. त्याला रागाचा आवेश किंवा मनाची विलक्षण लहर कधीं येत नसे. तो खैरात इतकी करी कीं त्या देण्यास बहुत करून मर्यादा नसे. व तो लोकांच्या कल्याणाकरितां नेहेमीं काळजी फार दाखवी.

त्याची घरगुती वर्तणूक

त्याला विषयोपभोग करण्याचीं सर्व साधनें होतीं व त्याच्या मोठ्या पराक्रमी पूर्वजांनीं पूर्वीं कित्ता घातला होता, तरी त्यास एकपत्नीव्रत असे, व तो अगदीं विरक्ताप्रमाणें वागत असे. त्यानें जन्मभर धर्माविषयीं फार उत्कंठा दाखविली, ती विषयीं जितका खरेपणा आमच्या ध्यानांत येईल तेवढ्या वरून आम्हांस त्याचे गुण कसे होते ह्याविषयीं मुख्यत्वेंकरून मत दिलें पाहिजे. त्याच्या धर्मसंबंधी उत्कंठेविषयीं पुष्कळ संशय येतो. कारण कीं कधीं कधीं तो अतिशयित धर्माचा दंभ दाखवी व त्यानें धर्माच्या मिषानें आपलें वैभव वाढावेलें व दुष्ट कृत्यें देखील केलीं. परंतु तो स्वहित साधण्याकरितां पुष्कळ धर्माचें ढोंग करी तथापि त्याच्या आंगीं धर्माविषयीं मूळचा बराच खरेपणा होता. हें अनुमान खरें म्हणण्यास असें कारण आहे कीं धर्माभिमानामु-

प्रकरण ९
इ० स०
१७००.

धर्मसंबंधी खरेपणाविषयींप्रमाण.

ळें तो हिंदुलोकांस गांजीत असे व त्यामुळें इहलोकीं नुकसान होईल असें त्या बुद्धिमान पुरुषाच्या मनांत खचित आलें असावें. व त्यानें हिंदूंस गांजलें हें फार वाईट केलें. तरी तो ज्या धर्माचा होता त्या धर्मांत इतर धर्माचा क्षय करावा हें आवश्यक आहे त्यामुळें त्याकडे फारसा दोष लाववत नाहीं. तो दुराचरणाच्या केवळ घरांत होता तरी फार नीतीनें वागला, व त्यानें आपणास वैभव प्राप्त व्हावें म्हणून पाहिजे तें कर्म करण्यास दिक्कत धरली नाहीं. परंतु त्या भरांत जीं कृत्यें केलीं तीं त्याचे मनास पुढें फार खाऊं लागलीं. त्यानें आपले आप्त वगैरे जे लोक मारले होते ते त्याच्या डोळ्यांपुढें निरंतर दिसत ह्यामुळें औरंगजेबाचें राज्य पृथ्वीवर सर्वांत मोठें होतें व त्या महान् तक्तावर बसण्यास व तें रक्षण्यास योग्य असे गुण ही त्याच्या आंगीं होते तथापि तो सुखी नव्हता. त्यानें मृत्यु संनिध आला असें पाहून आपल्या मुलांस पत्रें लिहिलीं तीं बाळगून ठेवलीं आहेत. तीं खरींशीं दिसतात, व औरंगजेबानें दुष्ट कर्में करून इहलोकचें हित संपादिलें. मग त्या वैभवाचा अंत होण्याचा समय आला तेव्हां त्यास कसें वाटलें हें दिसून येतें. त्यानें पत्र लिहिलें तें खालीं लिहिल्या प्रमाणें.—

त्यानें पुत्रांस पत्रें पाठविलीं.

वृद्धपण मला प्राप्त झालें व अशक्तपणानें मला व्यापिलें आणि हातपाय वगैरे सर्व अवयवांस सामर्थ्य राहिलें नाहीं. इहलोकीं मी कांहीं घेऊन आलों नव्हतों आणि जसा आलों तसा येथून जाणार. मी कोण आहें आणि

प्रकरण ९ इ० स० १७००.

माझें काय होणार ह्याचें मला ज्ञान नाहीं. जो अल्पकाळ मी घालविला त्याच्या अखेरीस दुःख मात्र उरलें आहे. मी राज्याचें रक्षण किंवा पालन नीट केलें नाहीं. माझा मौल्यवान् काळ व्यर्थ गेला. चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें समजण्याची शक्ति मला होती, परंतु अज्ञान रूप अंधपणामुळें तें मला कळलें नाहीं. — मी ह्या जगांत आपल्या बरोबर कांहींच आणलें नाहीं व येथून नश्वर देहाखेरीज कांहीं एक परत नेत नाहीं. मला सद्गती कशी होईल व कोणत्या यातना भोगाव्या लागतील ह्याविषयीं मला फार भीती वाटते. ईश्वर उदार व परम दयालू आहे अशी माझी पक्की खातरी आहे, तथापि मी जीं कर्में केलीं त्याबद्दल भिती जात नाहीं. परंतु मी गेलों म्हणजे सर्व विचार संपतील. अशक्तपणामुळें माझी कंबर वांकली आणि पायांस चालण्याचें सामर्थ्य नाहीं. जो वारा आला तो गेला, आतां त्याची पुन्हा आशा ही नाहीं. मी शेंकडों दुष्ट कर्में केलीं त्यांबद्दल कोणती शिक्षा भोगावी लागेल तें मला समजत नाहीं. प्रजेचें पालन करणें ईश्वरानेंच माझ्या पुत्रांकडें दिलें आहें. मी त्रासलों म्हणून तुम्हांस, तुमचे आईस, व तुमचे मुलांस ईश्वराचे स्वाधीन केलें आहे. मृत्यूच्या यातना लौकर येत चालल्या आहेत. उदिपुरी नामें तुमची माता माझ्या दुःखाची भागीदार होती ती मजबरोबर मरण्यास इच्छिते, परंतु सर्व गोष्टींचा काळ नेमलेला आहे. आतां मी जातों, मीं चांगलें किंवा वाईट जें कृत्य केलें असेल तें तुम्हांकरितां केलें.

आपला प्राण जातांना कोणीं ही पाहिला नाहीं, परंतु मला मी पाहत आहें.

प्रकरण ९ इ० स० १७००.

औरंगजेब मरण पावल्यावर लागलीच बादशाही-करितां कलहास आरंभ झाला, तथापि लढाई मोठ्या निकराची होईल व पुष्कळ कत्तल उडेल असें वाटलें होतें तसें झालें नाहीं. सर्व मुलांत शाहआलम नागें वडील पुत्र होता त्याचा पक्ष बलाढ्य लोकांनीं धरिला. तो स्वभावानें फारच गरीब व बोलून चालून चांगला होता. त्यानें आपल्या भावांस कितीएक उत्तम प्रांतांचें आधिपत्य देऊं केलें व आणखी देणग्या देण्यास तो तयार झाला. परंतु त्या भावांस मंत्री दुष्ट भेटले व त्यांच्या मनांत आपला मोठेपणा वाढेल तितकें चांगलें असें ही वाटलें. ह्या दोन कारणांवरून लढाई करून पहावी असा त्यांनीं निश्चय केला. मग लढाईत त्या भावांचा पराजय झाला. एकजण रणांत पडला, दुसऱ्यानें आत्म हत्या केली, ह्याप्रमाणें शाहआलम ह्यास दुःख झालें परंतु त्यास घोर कर्म करावें न लागतां राज्य प्राप्त झालें.

शाहआलम ह्याचा शहाणपणाचा विचार.

ह्या बादशाहाचा मुख्य उद्देश दिसतो कीं राज्यांत बंदोबस्त व स्वस्थता ठेवावी. ह्या कृत्याकरितां त्यानें आपले पूर्वींचे राजे जे हक्क भरभरीचे वेळेस घेत असत ते कितीएक सोडून देखील दिले. त्यानें रजपूत लोकांशीं तह केला, त्यांत हंशील इतकें कीं त्या अभिमानी संस्थानी लोकांनीं आम्ही तुमच्या ताब्यांत आहों असें

त्याची शांतपणाची वर्तणूक.

प्रकरण ९ इ० स० १७०० सरासरी कबूल केलें. औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या समाप्तीच्या बरेंच अगोदर मराठ्यांनीं जे प्रांत नेहेमीं लुटीत असावे त्यांच्या वसुलाची चौथाई देऊं करा म्हणजे आम्ही स्वाऱ्या करणार नाहीं असें बोलणें त्यांनीं औरंगजेबापाशीं लाविलें होतें, परंतु त्यांची बंदी करण्याचें सामर्थ्य नव्हतें. तरी त्या अभिमानी बादशाहानें मराठे ही बंडखोर लोकांची टोळी आहे असें समजून त्या बोलण्याचा रागानें धिक्कार केला होता; तथापि शाहआलम ह्यानें सुमार पाहिला कीं मराठ्यांचें पारिपत्य करण्याजोगी तर्तूद होण्यासारखी सोय दिसत नाहीं. मग त्यानें निश्चय केला कीं मराठ्यांचें म्हणणें मान्य करावें. ही त्यानें शहाणपणाची गोष्ट केली असें वाटतें. चौथाई देण्याचें कबूल करण्यांत त्यानें मनांत आणिलें कीं आपल्या उत्तम प्रांतांपैकीं कितीएकांची ह्या लुटारू लोकांपासून मुक्तता होईल. पुढें आणखी कित्येक प्रसंगीं कोणतीही हरकत नव्हती तेव्हां त्यानें लढाईचे कामांत कुशलता व धैर्य हे गुण त्यावेळेस एक नवीन शत्रु बलाढ्य होत चालला होता त्याशीं युद्ध केलें तेव्हां चांगले प्रगट केले.

बेबर बादशाहाचे कारकीर्दींत कांहीं लोकांची केवळ धर्मांतील मत भेदामुळें शीखनामें नवीन टोळी प्रशस्त झाली. तें मत नानक नांवाचे एका पुरुषानें काढलें; तो मनुष्य बोलून चालून गोड, बुद्धिवान्, स्वभावानें शांत, व वेदांती असे. हिंदु व मुसलमान ह्यांमध्यें वारंवार तंटे होत ते पाहून त्याला फार वाईट वाटे. मग त्यानें पर

शीख लोकांचें मूळ.

स्परांचें सख्य व्हावें म्हणून एक नवीन युक्ति योजली. त्यानें दोहों धर्मांतील कांहीं मुख्य मुख्य संस्कार व ईश्वर संकेतानें सर्व गोष्टी होतात आणि जसें करावें तसें पुढें फळ प्राप्त होतें ह्या मुख्य गोष्टी दोहों धर्मांतील ग्रहण करून शिष्य मंडळीस उपदेश करण्यास आरंभ केला, ते शीख लोक. पुढें त्या लोकांस इतर संप्रदायांतले लोक पुष्कळ येऊन मिळाले, तेव्हां त्यांचा जमाव लौकरच वाढला. जरी ते दंगा धोपा न करितां इतर लोकांप्रमाणें चांगल्या रीतीनें वागत व अकबर बादशाहाचे व लागलेच त्याच्या मागून जे बादशाह झाले त्यांच्या विचारी कारकीर्दींत त्या लोकांस काडीमात्र उपद्रव झाला नाहीं. तरी पुढें औरंगजेबाच्या धर्माभिमानामुळें त्यांस फार गांजणूक होऊन ते लोक मुसलमानाशीं हाडवैर करूं लागले. औरंजेबानें त्यांच्या तीगबाहार नामें गुरूस धरविलें व ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत आणून मारून टाकविलें. ह्या दुष्ट कृत्याच्यायोगानें त्या लोकांची वृत्ति व मनें अगदीं फिरून गेलीं आणि गुरु गोविंद म्हणून त्या मारलेल्या पुरुषाचा पुत्र होता त्यानें जन्मभर सूड उगविण्याचा उद्योग चालविला. त्यानें आपल्या सर्व शिष्य मंडळीच्या मनांत तीच गोष्ट भरून दिली, आणि त्यांकडून शस्त्रें धरवून त्यांस स्वार केलें. मग ह्या नवीन जमविलेल्या शिपायांच्या टोळ्या घेऊन औरंगजेबाचे सद्दीचा भर असतां व तो मेहेनतीनें झटत असतां त्याशीं युद्ध करणें गुरु गोविंद ह्यास

प्रकरण ९ इ० स० १७००.

शीख लोकांची वृद्धि.

धर्माबद्दल गांजणूक केल्यापासून तोटा.

प्रकरण ९ इ० स० १७१०.

भाग पडलें, परंतु त्याच्यानें औरंगजेबाचें कांहीं एक झालें नाहीं. त्याच्या लोकांची दाणादाण झाली व त्याचे दोन पुत्र औरंगजेबानें धरून मारून टाकले. तो जातीनें निराश होऊन देश सोडून पळत होता आणि पुष्कळ

गुरुगोविंद त्याचामृत्यु.

हाल भोगल्यावर वेड लागून मेला. तरी त्याच्या अनुयायी लोकांचें धैर्य खचलें नाहीं; उलटें असें झालें कीं त्या दुःखाच्या व अन्याय झाला ह्या समजुतीच्या भरानें ते जिवावर इतके उदार झाले कीं कांहींच विचार नपाहतां जें होईल तें होवो सूड उगवावा असा त्यांनीं दृढ निश्चय केला, मग पुष्कळ वर्षेपर्यंत हिमालयाच्या कडेवरील टेंकड्यांत व गुहांत हिंडत असतां औरंगजेब मेला हें कळल्यावर पुन्हा धैर्य येऊन उत्तरेकडील प्रांतांवर ते चालून आले. तेव्हां त्याचा मुख्य पूर्वींच्या गुरूचा शिष्य बांदा नामें होता, त्यानें ही आपलें नांव गुरु गोविंद ठेविलें. त्यानें जो नाश केला तो सूड उगविण्याच्या बुद्धीनें व अगदीं निर्दयपणानें केल्यामुळें पराकाष्टेचा झाला.

बांदानामें नवीनपुढारी

बांदा हा सर हिंद ह्या मुख्य शहरांत राहत होता, तेव्हां बादशाह सर्व सैन्य घेऊन आपणाकडे येत आहे असें त्यास कळलें. नंतर दाबर नामें हिमालयाच्या कड्यावर किल्ला होता तिकडे तो परत गेला. त्या किल्याकडे जाण्यास ओहोळांतून व कडे तुटले आहेत त्यांच्या मधून मात्र वाट होती. त्या प्रसंगीं इरादत्तखान जवळ होता, त्याच्या वर्णनाप्रमाणें पाहतां तो किल्ला फारच बळकट म्हणून बादशाहानें हल्ला करण्याचें नाकारलें, आणि

उगीच राहून आणि आपण भ्यालों असें समजून शत्रूनें बाहेर यावें अशी तजवीज चालविली. तथापि खानन खान ( मुख्य सेनापति ) मोठा हेकेखोर असे त्यानें एक टोळी घेऊन किल्ला हेरण्याकरितां जाण्याची परवानगी घेतली आणि लागलीच हल्लाकरून किल्या भोंवतालच्या टेंकड्यांतून शत्रूस हांकून लावूं लागला. तें पाहून सर्व सेनेस उत्तेजन आलें आणि हल्ला करण्यास लागलेच सर्व लोक पुढें सरसावले आणि त्यांनीं शत्रूंचा पराजय केला. बादशाह नको नको म्हणत असतां सेनेनें सर्व अडचणींतून पार पडून शत्रूंचा पराजय केला तेव्हां त्यास कांहीं राग आला व कांहीं आनंदही झाला. त्यांनीं शत्रूस बाले किल्ल्यांत हांकून लावलें. मुख्यत्वें करून त्या किल्ल्याच्या वाटा दुर्गम होत्या इतकेंच त्या किल्ल्याचें महत्व होतें म्हणून मोठीशी लढाई होईल असे वाटलें नाहीं. परंतु मग अंधार पडल्यामुळें बादशाहाचा सेनापती सर्व वाटा बंदकरून रात्रभर खडा पाहरा बंदोबस्ताकरितां ठेवून स्वस्थ राहिला. तथापि सकाळीं पाहतो तों चुकून एक लहान बोळ तसाच राहिला होता त्या बोळानें शीख लोकांचा गुरु निघून हिमालयांतील रानांत जाऊन राहिला. पुढें कांहीं दिवसपर्यंत त्यांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु शीखलोकांची शक्ति तशीच राहून पुढें त्यांनीं मोठा पराक्रम हिंदुस्थानांत करावा असा ईश्वरी संकेत होता त्याप्रमाणें झालें.

प्रकरण ९ इ० स० १७१०.

दाबरकिल्यावर हल्ला.

शीखलोक पळाले.

प्रकरण ९ इ० स० १७१०.

शाहआलम ह्याचे गुण.

शाहआलम बादशाहाचा पूर्ण विश्वास इरादतखानावर असून त्याशीं तो स्नेहानें वागत असे. तो लिहितो कीं पूर्वी जे राजे झाले त्यांत ह्याप्रमाणें स्वभावानें चांगला व सर्व कलांत निपुण राजा हिंदुस्थानांत झाला नाहीं. कितीएकांनीं तो फारच उदार असे हा दुर्गुण त्याचे आंगीं होता असें वर्णिलें आहे. परंतु पात्र पाहूनच तो उदार असे. त्याची मुसलमानी धर्मावर फार श्रद्धा असे व तो आपल्या वेदांतांत निपुण असे. तरी त्यानें त्या वेदांताचा अभ्यास करितांना निरनिराळ्या जातीच्या वेदांतांचीं मतें समजून घेऊन व शास्त्र मर्यादेपलीकडे ही विचार करणाऱ्या लोकांच्या (नास्तिकांच्या) मतांची देखील समजूत करून घेतली. नास्तिकांच्या मतांचा विचार करणें कितीएक धार्मिक लोकांस नीट वाटत नाहीं, परंतु तसें त्यास वाटत नव्हतें. मोंगलांच्या घराण्यांतील पुरुष परस्पर मत्सर करीत असत व ह्यामुळें पुष्कळ नाश झाले. परंतु तो मत्सर ह्याच्या वेळेस नव्हता. ह्याला मुलगे व पुतणे व नातू वगैरे मिळून सतरा होते ते ह्याच्या पंगतीस नेहमीं जेवीत व त्यांपैकीं कोणाच्याही मनांत बादशाहाविषयीं दुष्ट वासना आली असें झालें नाहीं. पुढें राज्यास संकटें येणार होतीं तीं निवारण्याजोगें सामर्थ्य त्याच्या आंगीं नव्हतें, तरी सर्व कामांत त्याचा नेमस्तपणा असे. लोक त्यास पूज्य मानीत. ह्या गोष्टीमुळें तीं संकटें बहुशः पार पडलीं असतीं, परंतु पांच वर्षें राज्य केल्यावर मोठें दुखणें ला-

त्याचा चांगला स्वभाव.

गून तो सतराशें बारांत लाहोर येथें ल- प्रकरण ९
ष्करांत मरण पावला. ही गोष्ट फार इ० स०
वाईट झाली. १७१२.

त्याला चार पुत्र होते. ते बाप त्यांचा मृत्यु.
जिवंत असतां प्रीतीनें वागले; परंतु तो मरतांच राज्यासाठीं कलह करूं लागले. मोजउद्दीन हा सर्वांत वडील त्याचा राज्याकरितां
पक्ष जलफुकारखान म्हणून मोठा ब- लढाई.
लाढ्य उमराव होता त्याने धरून इतर तिघांस मारून त्यास राज्य दिलें. मग त्यानें जहांदर- शाह नांव ठेवून राज्य करण्यास आरंभ केला. हा न-
वीन राजा आपल्या पदवीस योग्य तर जहांदरशाह
नव्हताच परंतु लोक सरासरी बरा म्ह- गादीवर बस-
णतील असा देखील नव्हता. तो राज्य ला.
कारभार अगदींच सोडून व्यसनासक्त झाला व दिल्लीच्या शेजारीं नीच रांडा घेऊन रमत रम- त हिंडत असतां लोकांच्या दृष्टीस पडे. बादशाह मना-
चा हलका असे व राज्य करण्याचें ज्ञान त्याचा राज्य
त्यास नसे ह्यामुळें समय असा आला चालविण्यास
कीं त्यावेळेस धिट्ट लोक होते त्यांनीं त्या निरूपयोगी
कारकिर्दींत संधी साधली. अबदुल्ला व पणा व मृत्यु.
हुसेन असे दोन बंधु होते ते आपण स- य्यद म्हणजे महंमदाच्या कुळांतले आहों म्हणून मोठे मानीत; त्यांनीं एक नवीन राजा करून त्याच्या नांवा- नें आपण हिंदुस्थानचा कारभार चालवावा असा बेत योजिला. त्यांनीं फिरोकशीर नामें आजिम उशान म्ह-

प्रकरण ९ इ० स० १७१२.

णून शाहआलम ह्याचे आवडत्या पुत्राचा मुलगा ह्याची योजना केली. मग लौकरच सैन्य जमविलें आणि जलफुकारखान ह्यानें ज्या अयोग्य पुरुषास राज्य दिलें त्याचें रक्षण केलें. तरी थोडावेळ लढाई झाल्यावर त्याचा पराजय होऊन शेवटीं तो व त्याचा यजमान ह्या उभयतांस त्या सय्यदांनीं मारून टाकलें.

फेरोकशीर बादशाह.

ह्याप्रमाणें त्यानें आपल्या पक्षाच्या मनुष्यास राज्य देवविलें, मग ते त्यास आपल्या हाताखालचा असें मानून इच्छेस येईल तसा कारभार करूं लागले; परंतु ते राज्य चालविण्यास समर्थ नव्हते असें नाहीं. बांदा नामें शीख लोकांचा राजा होता तो सिंधुनदाच्या कांठचे देशांत उतरून आला तेव्हां त्या सय्यदांनीं त्याचा पराजय केला. नंतर त्याला धरून पराकाष्ठेचे हाल करून तो मारून टाकला. तथापि त्यांचा वरचष्मा झाला तेव्हां लागलेच मोठाले उमराव कुरकुर करूं लागले. बादशाहास देखील त्यांचा जुलूम वाटूं लागला व पदरचे किती एक लोक होते त्यांनीं आपण स्वतंत्र व्हावें ह्यांच्या ताब्यांत इतःपर नसावें असा उपदेश बादशाहास केला. ह्याप्रमाणें त्याचे कारकिर्दींत सातवर्षेंपर्यंत कट चालले होते. शेवटीं परि-

त्याचीं संकटें व मृत्यु.

णाम असा झालाकीं सय्यदांचा चढ होऊन त्यांनीं बादशाहास मारून टाकिलें. नंतर टिक्क्याला दुसरा धनी करण्याकरितां मोठ्या कुळांतला मनुष्य पाहून राघूसारखा आपल्या हातीं ठेवावा म्हणून धुंडूं लागले. प्रथम त्यांनीं औरंग-

जेबाच्या पणतूस म्हणजे औरंगजेबाचा बंडखोर पुत्र अकबर ह्याचे नातूस राज्यावर बसविलें, परंतु पांच महिन्यांत क्षयरोग लागून तो मरण पावला. मग त्याचा भाऊ रफिउद्दवला ह्यास राज्यावर बसविलें. परंतु तो तीनच महिन्यांनीं मरण पावला. नंतर त्या सय्यदांनीं शाहआलम ह्याचा रुशन अक्तर नांवें नातू होता त्यास राज्यावर बसविलें, तो आपणास महंमदशाह असें म्हणवूं लागला.

प्रकरण ९ इ० स० १७१९. त्याच्यामागील राजे.

हा राजा फिरोकशिराप्रमाणें ज्यांनीं राज्य दिलें त्या दोघांच्या सांगण्याप्रमाणेंच प्रथम वागत असे; परंतु पुढें लवकरच दुसऱ्या मंत्र्यांच्या सांगण्याकडे लक्ष्य देऊं लागला. ते उपदेश करीत कीं तुम्हीं सय्यदांचा जुलूम नसोसतां स्वतंत्रपणानें वागावें. मग हा उद्देश सिद्धीस न्यावा म्हणून कित्येक लोकांनीं कट केला, व त्यांत मिळावें असें बादशाहाचे मनांत भरविलें. त्या उभयतांबंधूंचें आणि निजामउलमुलूक म्हणून बलाढ्य सरदार होता त्याचें वांकडें आलें. त्याचें कारण असें कीं त्या सरदाराच्या ताब्यांत माळवाप्रांत दिला होता तो त्यांची आज्ञा झाली असतांही त्यानें सोडिला नाहीं. मग असा बेत ठरला कीं बादशाहें आणि हुसेन ह्या उभयतांनीं जाऊन त्या हट्टी सरदाराचें पारिपत्य करावें. इकडे त्या सय्यदास मारावें म्हणून बेत चालला होता तो सिद्ध झाला. त्या कटांत तिघे मारेकरी होते, त्यांपैकीं को-

महंमदशाह.

हुसेन ह्यास मारण्याचा कट.

प्रकरण ९ इ० स० १७२०.

र्णीं मारण्याचें काम करावें ह्याविषयीं चिठ्या टाकिल्या तेव्हां त्या तिघांत हैदर नावें एक मनुष्य होता त्याचें नांव आलें. हुसेन पालखींत बसून चालला होता त्यास अर्ज देण्याच्या मिषानें तो मारेकरी जवळ गेला आणि त्याच्या पोटांत अशा युक्तीनें जंब्या खुपसला कीं थोड्याच पळांत तो मरण पावला. तेव्हां आपणास मारण्याचें कारण बादशाह असावा असा वहीम त्यास लाहून बादशाहास मारा असें बोलून तो मरण पावला. तेव्हां त्याचा पुतण्या जवळच होता तो अंतकाळची आज्ञा पाळावी म्हणून कांहीं इमानी शिपाई घेऊन जिवावर उदार होऊन लागलाच बादशाहाकडे गेला, परंतु तसें होऊंनये म्हणून पूर्वींच चांगला बंदोबस्त केला होता. नंतर महंमद घाईनें दिल्लीस गेला, तेथें दुसरा भाऊ सय्यद राहिला होता त्यानें राज्य बळकावण्याचा निश्चय करून नवीन राजा बसवून सैन्य जमा केलें, परंतु महंमदानें त्याचा पराजय करून त्यास कैदी केलें. मग तो विजयी पुरुष जयजयकार करीत नवीन राजाप्रमाणें दिल्लींत समारंभानें शिरला.

महंमदशहाचा जय.

परंतु सर्व सत्ता हातीं येतांच मोंगलांच्या घराण्यांत अयोग्य राजे झाले त्यांच्यां माळकेंत ह्याची गणना झाली. त्याचे शहाणे व अविश्वासू नव्हेत, असे निजामउल्मुल्क व सादतखान असे दोन प्रधान होते. परंतु त्यांचे कडक व सभ्य वर्तणुकीचा त्रास येऊन त्यानें तरुण लोकांच्या सांगण्याकडे लक्ष दिलें. तसले

तो राज्य चालविण्यास अयोग्य.

लोक दरबारांत सहजच पुष्कळ सांपडले,. मग आपलें कांहीं चालत नाहीं व आपला मान राहत नाहीं असें पाहून त्या प्रधानांस राग आला आणि दरबार सोडून दुसरे ठिकाणीं निराळीं राज्यें स्थापावीं म्हणून झटूं लागले. निजामानें दक्षिणेंत राज्य स्थापिलें त्याचे वंशज त्याच नांवानें स्वतंत्र राज्य अजून करीत आहेत व सादतखान ह्यानें अयोध्या प्रांतांत राज्य स्थापिलें व तेथें अजून त्याचे वंशज राज्य करीत आहेत. मराठे हे त्या वेळेस मोंगलांच्या राज्यांत होते व ते त्या आणीबाणीच्या प्रसंगीं बादशाही करितां उघड भांडूं लागले. त्यांनीं गुजराथ व माळवा ह्या प्रांतीं बहुतेक मुलूख व्यापून आग्र्याच्या वेशीपर्यंत देखील जाऊन बादशाहाच्या त्या नगरींतील लोकांस भयग्रस्त केलें. पूर्वींचा प्रधान सादतखान हा बादशाही विषयीं काळजी व अभिमान बाळगीत असे. तो अयोध्या प्रांतांतून आला आणि त्यानें मराठ्यांचा असा पराजय केला कीं तो पाठीस लागता तर त्यांच्या सत्तेचा ऱ्हासच झाला असता, परंतु त्या मूर्ख बादशाहानें आपला आवडता प्रधान जाऊन सेना जमवी आणि लढाईत मुख्य अधिकार घेई तोंपर्यंत लढाई तहकूब असावी असा हुकूम फर्मावला. नंतर सादत ह्यास त्रास येऊन तो चालता झाला. इकडे मराठे स्थिर स्थावर होऊन पुनः जमले आणि त्यांनीं दि-

प्रकरण ९ इ० स० १७२०.

दक्षिण व अयोध्या येथील बरोबरीचीं राज्यें.

मराठ्यांनीं आपला उत्कर्ष व्हावा म्हणून बेत चालविले.

बादशाहाचा मूर्खपणा.

प्रकरण ९ इ० स० १७२०. ल्लीपर्यंत स्वारी करून त्या नगराच्या आसपासचे गांव लुटले आणि पुष्कळ लूट घेऊन माळवा प्रांतीं परत आले. बादशाह मूर्ख व हिंदुस्थानांत लढाया चालल्या होत्या असें असतांही ज्यास्ती असें घडलें कीं दुसरे देशांतून पराकाष्ठेचा मोठा हल्ला मोंगलांचे राज्य मोडकळीस आलेंच होतें त्यावर एकाएकीं आला.

इराणांत नुकत्याच मोठाल्या राज्यक्रांति झाल्या होत्या, व अफगाण लोक हिंदुस्थानच्या आणि इराणाच्या मध्यें पहाडी मुलकांत राहतात ते शूर असत, त्यांनीं इराणांत सोफिस ह्याचें घराणें पूर्वीं बलाढ्य असे तें बुडत चाललें ती संधी साधून त्यांनीं त्या मुलकावर स्वारी करून तेथील सैन्याचा पराजय केला, आणि इस्पहान शहरास वेढा घातला. तें मुख्य शहर त्यांनीं हस्तगत करून हुसेन म्हणून राजा राज्य करीत होता त्यास व त्याचा पुत्र थामस ह्यां खेरीज त्या घराण्यांतील सर्वांस मारून टाकिलें. तो राजपुत्र इराणच्या राज्यांत बहुतेक भागीं उंच प्रदेशांत मेंढके लोक राहत होते त्यांत जाऊन राहिला. ते कसाले काढणारे व शूर मेंढके लोक राजावर निष्ठा ठेवीत व देशाभिमानी असत म्हणून त्यांस पराकाष्ठेचें उत्तेजन येऊन त्यांनीं आपल्या राजाच्या घराण्यांतील शेवटला पुरुष राहिला होता त्याचा पक्ष निश्चयानें स्वीकारिला. मग त्या राजपुत्राजवळ पुष्कळ लोक जमा झाले. ह्याप्रमाणें दिव-

अफगाण लोकांनीं इराणावर स्वारी केली.

इस्पहानशहरास वेढा.

सानुदिवस त्यांचा धाक पडूं लागला. त्या वेतनाशिवाय चाकरी करणाऱ्या मंडळींत नादिर म्हणून एक अल्पवयी सरदार होता त्यानें थामस कौलीखान म्हणजे थामस ह्याचा मुख्य गुलाम हा किताब आपण घेतला आणि आपल्या सामर्थ्येंकरून लवकरच कीर्ति संपादिली, तेव्हां त्या मंडळींत तो मुख्य झाला. पुष्कळ वेळां लढाया झाल्या त्यांत त्याचा जय झाला, शेवटीं त्यानें इस्पहान राजधानी घेतली आणि राज्यांतून शत्रूंस हांकून लाविलें. असा जय वारंवार होत चालल्यावर शिपाई लोकांची भीति थामस ह्यापेक्षां नादिरावर फार बसली. तेव्हां त्या शूर सरदारानें आपल्या हातीं मुख्य सत्ता आहे असें पाहून थामस ह्यास आपल्या ताब्यांत ठेवून सरासरी राजा हें नांव आणि त्याचीं चिन्हें हीं मात्र त्यास ठेविलीं. पुढें त्यानें त्याचे डोळे काढून आपण राजा होऊन बसला व मुळचें नांव तसेंच राखून नादिरशाह असें चालतें नांव ठेविलें.

प्रकरण ९ इ० स० १७३०.

नादिरशाहा सरदार.

इस्पहान परत घेतलें.

त्या नवीन राजास इराणचें राज्य पुरें नवाटून आपल्या अनुयायी लोकांचें शौर्य व ते आपणावर भीति करतात अशी त्याची खातरी असल्यामुळें त्यानें निश्चय केला कीं, शेजारच्या देशांतील मुलूख जिंकावा. त्यानें अफगाण लोकांच्याच मुलखांत स्वारी केली आणि काबुल व कंधार हे देश जिंकून हस्तगत केल्यावर शेवटीं तो हिंदुस्थान-

नादिरशाह.

अफगाण लोकांवर स्वारी.

प्रकरण ९ इ० स० १७३७.

च्या सरहद्दीवर येऊन पोहोंचला. त्यानें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत शिरावें असा माझा बेत नाहीं व मला इच्छाही नाहीं. ह्यासाठीं बहुतेक इतिहास कर्ते त्याचा मोठेपणा वर्णितात; परंतु त्या राज्य बळकावणाऱ्या पुरुषाच्या आंगीं येवढी नीति होती ह्याविषयीं संशय वाटतो. कसें ही असो त्याला हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे निमित्त सांपडण्यास फार दिवस लागले असें नाहीं. त्याचे कितीएक स्वदेशीय लोक त्याच्या राज्यांतून पळून हिंदुस्थानांत येऊन येथील राजाच्या आश्रयानें राहिले होते. तेव्हां नादिरशाह ह्यानें आपला वकील कांहीं शिपाई लोक बरोबर देऊन ते पळून गेलेले लोक मागण्याकरितां पाठविला. त्या वकिलास व त्याच्या सर्व लोकांस जलालाबाद येथील लोकांनीं मारून टाकिलें; महंमद हा गर्विष्ठपणानें मूर्ख लोकांच्या सांगण्यावर लक्ष्य देऊन नादिरशाहानें ह्या जुलमाचें कारण विचारिलें असतां त्याचें समाधान होण्यासारिखें उत्तर देईना. मग तो इराणचा राजा सूड उगवावा म्हणून मनांत जळत होता ह्या कारणानें अथवा ह्यापेक्षां मोठें कारण त्याच्या मनांत एखादें असेल तशा कारणानें तो स्वदेश सोडून येऊन पेशावर आणि लाहोर ह्यांच्या वाटेनें त्वरेनें आला. दिल्लीपासून चार मुकाम दूर होता तेव्हां ती बातमी त्या मूर्ख बादशाहास लागली. नंतर त्यानें घाईनें आपली फौज जमविली आणि सादतखान ह्या बलाढ्य सरदाराची कुमक मिळविली; परंतु सादतखानास शत्रूची बुद्धि व पराक्रम हीं बराबर

महंमदाचा मूर्खपणा.

सादतखान

नकळून तो खंदक खणले होते ते सोडून नादिरशाहाच्या वहिवाटलेल्या लोकांशीं तोंड देऊन युद्ध प्रसंग करण्यास गेला. ही त्याची मोठी चूक झाली. शेवटीं त्या कारणानें त्याचा नाश झाला. हिंदुस्थानांतील लोकांचा पोकळ डौल व नामर्दपणा फार ह्यामुळें त्या दांडग्या धनगर लोकांपुढें लढण्यास येथील लोक अगदीं योग्य नव्हते. ह्यामुळें बादशाहाच्या सेनेची दाणादाण होऊन ती पळत सुटली आणि सेनापति शत्रूंनीं धरला. नंतर पुष्कळ गोष्टी झाल्या त्या इतिहास कर्त्यांनीं स्पष्टपणानें वर्णिल्या नाहींत. असें म्हणतात कीं त्याशीं सादत ह्यानें तह केला, त्यांत दोन कोट रुपये त्याला दिले, असतां त्यानें ते घेऊन राज्य नघेतां स्वदेशास जावें असें नादिरशाहाकडून कबूल करविलें. नादिरशाहास त्या ठरावापासून समाधान झालें असें वाटून बादशाह व निजामउल्मुल्क हे मनांत शंका न धरितां त्याच्या भेटीस गेले. तेव्हां ते अर्थातच त्याच्या हातीं सांपडले तथापि असें सांगतात कीं सादतखानास वाटे कीं मला ह्या चाकरीबदल प्रधानगिरीचीं वस्त्रें मिळावीं. कारण आपला हक्क आहे, परंतु तसें नघडतां निजामास वस्त्रें मिळतील असें जाणून त्यानें दिल्लींतील व राजवाड्यांतील संपत्तीचा पार नाहीं व येथें इतका पैसा असून तुम्हांस दोन कोट रुपये खंडणीबदल दिले हे फार थोडे आहेत अशी बातमी शत्रूस कळविली. आतां, ज्या पुरुषानें इतकें दिवसपर्यंत इ-

प्रकरण ९ इ० स० १७३७.

महंमदाच्या सेनेचीदाणादाण.

सादतखान ह्यानें फितूर केला असा आरोप.

प्रकरण ९
इ० स०
१७३८.

मानानें व संभावितपणानें वर्तणूक केली तो असा विश्वासघात करील असें चांगलें आधारावांचून वाटत नाहीं व दिल्लींतील द्रव्य एकाच विश्वासू चाकरास ठाऊक असेल असें वाटत नाहीं. त्या तहांतील कलमाचा विचार नादिर ह्यानें करून आपल्या हातीं बादशाह व निजाम हे लागावे येवढ्याचकरितां मला तह मान्य आहे आपली दोस्ती असावी अशा त्ऱ्हेनें बोलून दाखविलें असेल असा बहुतेक संभव दिसतो. ते हातीं लागल्यानंतर त्यानें पुढें कूच केलें आणि दिल्लीचा अधिपति झाला ही गोष्ट खरी आहे.

नादिराच्या कल्पनेचें अनुमान.

नादिरशाह त्या राजधानींत शिरला, तेव्हां त्याचा बेत असा दिसत होता कीं दंगा व लोकांवर जुलूम होऊं नये किंवा लूट होऊं देऊं नये ह्याविषयीं बंदोबस्त राखावा. त्याप्रमाणें त्यानें दोन दिवस तसें केलें, परंतु दुसरे दिवशीं रात्रीं नादिरशाह मेला अशी गप्प उडाली ती ऐकून ते हिंदुलोकांस धैर्य येऊन ते लढाई करण्यास तयार झाले व त्याचे कांहीं शिपाई लोक त्यांनीं मारिले. नादिरशाहाचा सेनापति स्वभावानें क्रूर असे, तो सरासरी दबा धरून राहिला होता त्याला ही गोष्ट कळतांच पराकाष्ठेचा क्रोध आला आणि त्यानें हुकूम फरमाविला कीं ज्या घरीं किंवा ज्या बोळांत इराणच्या मनुष्याचें मेत आढळेल तेथें कोणास नवगळतां कत्तल उडवावी. मग दोन प्रहर दिवस येई तोंपर्यंत दिल्लींतील

व्यवस्थेचा बेत.

हिंदूचा अविचाराचा हल्ला.

रस्त्यांतून रक्ताचे पूर वाहिले; नंतर तो विजयी पुरुष शांत झाला. सैन्यावर त्याचा इतका अमल असे कीं त्याचा हुकूम होतांच शिपायांनीं तरवारी मेणांत घातल्या. मग बादशाहाचे खजिने धुंडिले तेव्हां नाणें, उंची वस्त्रें, आणि रत्नें हीं किती सांपडलीं हें सांगितलें असतां खरें वाटणार नाहीं. मोंगल बादशाह प्रथम राज्यावर बसल्यापासून चोहोंकडून वर सांगितलेले पदार्थ जमविले असत. नजराणा घेऊन, विकत घेऊन अथवा दंड म्हणून ह्या तीन प्रकारांनीं महा प्रयत्नानें जमविले होते. खजिन्यांत त्या द्रव्याचा खर्च नसे व परकी राजे लुटतील अशी भीति ही नव्हती अशा सुरक्षित ठिकाणीं ठेवल्यामुळें नेहमीं त्या द्रव्याची वृद्धि मात्र होत असे. त्यावेळेस शत्रूच्या लोकांनीं पसतीस दिवसपर्यंत धाक दाखवून, जुलूम करून, व हर तऱ्हेनें छळ करून त्या राजधानींतील पुरलेलें द्रव्य सर्व लुटून नेलें. इतिहासकर्त्यांनीं त्या इराणच्या राजानें आणि त्याच्या सरदारांनीं जें द्रव्य लुटून नेलें त्याचा अदमास केला आहे. ते म्हणतात कीं तीन कोट वीस लक्ष रुपयांची लूट नेली त्यापैकीं निदान एक द्वितीयांशाचे हिरे व इतर रत्नें होतीं.

प्रकरण ९

इ० स० १७३९.

दिल्लींतील असंख्यांतलूट.

हिंदुस्थान नादिरशाहाच्या मुठींत होतें, तरी तें राखावें म्हणून त्यानें तजवीज केली नाहीं. कारण त्यानें चतुरपणानें आपलें मनांत आणिलें असेल कीं इराण व हा येवढा मुलूख ह्या दोहों ठिकाणचें एक राज्य होणार

हिंदुस्थान सोडिलें.

प्रकरण ९
इ० स०
१७३९

नाहीं. त्यानें काबुल कंधार, आणि सिंधु नदाच्या पश्चिमेकडील प्रांत आपल्या ताब्यांत घेतले व तितकेच पुरेत असे त्यास वाटलें; नंतर मोंगलांच्या गादीवर महंमदास पुनः बसवून उपदेशाच्या चांगल्या गोष्टी सांगितल्या आणि हिंदुस्थानांत किल्ला वगैरे किंवा शिपाई देखील न ठेवितां चालता झाला. तथापि तें राज्य पूर्वींच लयास चाललें होतें, त्यांत हा अनर्थ झाल्यामुळें पूर्वीं लोक त्या गादीचा थोडासा तरी मान ठेवीत होते तो ही ठेवीतनासे झाले. दिल्लीच्या लगत रोहिलखंड म्हणून पहाडी मुलूक आहे तेथें अफगाण जातीचे कांहीं सरदार पळून जाऊन राहिले होते, त्यांनीं तेथील शूर लोकांच्या मदतीनें स्वतंत्र राज्य स्थापिलें व ते बादशाहास जुमानीतनासे झालें. परंतु वजीर आणि अयोध्येचा नबाव ह्या उभयतांच्या पुढें त्यांचें कांहीं चालतनासे हें खरें तथापि अकबराच्या मागून जे बादशाह झाले त्यांच्या कारकिर्दींत नेहमीं दंगे होत म्हणून संधी येईल तेव्हां ती साधण्याविषयीं ते रोहिले तयार होते.

महंमदास पुनः गादीवर बसविलें.

रोहिल खंडांत स्वतंत्र राज्य.

हिंदुस्थानाच्या पश्चिमेकडील लोकांस दिल्लीस येण्यास रस्ता माहीत झाला तो ते विसरले नाहींत. हिंदुस्थानांतून गेल्यानंतर आठ वर्षांनीं नादिरशाहास खुरासान प्रांतीं मसेद एथें तंबूंत असतां मारेकऱ्यांनीं मारिलें. तेव्हां त्यानें राज्य संपादून आपल्या

नादिर शाहास दग्यानें मारलें.

शहाणपणानें व सामर्थ्यानें राखलें होतें; त्या राज्याचे पुष्कळ भाग झाले. अहंमद अबदुल्ला म्हणून नादिरशाहाचा एक सरदार अफगानिस्थानचा राहणारा होता, तो कांहीं शिपाई लोक आपणाकडे घेऊन स्वदेशीं गेल्यावर तेथील राज्य आपण बळकावून आपणास राजा म्हणून प्रसिद्धपणें म्हणवूं लागला. नादिरशाह मरण पावल्यानंतर जो तो सरदार मुलूख बळकावूं लागला. तेव्हां अर्थातच महंमद अबदुल्ला ह्याचें राज्य पक्कें झालें. मग आपल्या देशांत परचक्र येण्याचें भय नाहीं व दंगा वगैरे कांहीं नाहीं आणि लोक शूर असून त्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी करून तें पुष्कळ वेळ जिंकलें आहे असें पाहून नादिराप्रमाणें हिंदुस्थानांत स्वारी करावी असें त्यास वाटूं लागलें. मग सन १७४७ सांत त्यानें सिंधु नद उतरून सरहिंद नामें शहर लुटून तेथील वजिराचा पराजय केला, आणि युद्धांत वजिरास ठार मारिलें. परंतु एकाएकीं कांहीं विघ्नें आल्यामुळें व मुख्यत्वेंकरून दारूची कोठी अकस्मात् उडाल्यामुळें त्याचा उत्साह भग्न होऊन तो परत गेला.

प्रकरण ९ इ० स० १७४७.

अहंमद अबदुल्ला.

ह्या स्वारीनंतर लवकरच दिल्लीचा बादशाह मेला. मग त्याचा पुत्र अहंमदशाह गादीवर बसला. त्यानें थोडेच दिवस राज्य केलें, परंतु त्याचे कारकीर्दींत पुष्कळ परचक्रें आलीं व दरबारचे लोक आपसांत कलह करीत म्हणून राज्यांत नेहमीं दंगे होत असत.

अहंमदशाह गादीवर बसला.

प्रकरण ९ इ० स० १७४७.

बादशाह आणि वजीर ह्या उभयतांचें त्या वेळेस बहुत करून अगदीं जमत नसे. तेव्हां सफदरजंग नांवें एक वजीर असे त्यानें अहंमदशाहास फार गांजलें त्यामुळें त्यानें निजामउल्मुल्क नांवें वजीर १०४ वर्षांचे वया नंतर मरण पावला त्याचा नातू गाजीउद्दीन नामें होता त्यास सफदरजंग ह्याचें पारपत्य करण्यास सांगितलें. गाजीउद्दीन ह्यास अमीरउल् उमराव म्हणजे बडे लोकांत मुख्य असा किताब होता. त्यानें राज्यांतील कारभार पूर्वीं प्रमाणें चांगल्या प्रकारें चालावा म्हणून बराच यत्न केला. पूर्वीं वजिरानें नवीन बादशाह देखील उभा केला होता त्या वजिराचें ह्या सरदारानें पारिपत्य करून त्यास अधिकार सोडून देणें भाग पाडलें. त्यानें जिट (अथवा जाट) ह्या लोकांवर स्वारी केली. हे लोक अगदीं पहाडी प्रांतांत पश्चिमेकडे राहत असत व पूर्वीं अंधाधुंदी होऊन अव्यवस्था झाली होती, त्यावेळेस अगदीं स्वतंत्र झाले होते. ह्याप्रमाणें गाजीउद्दीन लढाईत गुंतला तेव्हां त्याविषयीं बादशाहाच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला; मग बादशाहानें एक्या नवीन आर्जवी मनुष्याचें सांगणें ऐकून त्याशीं त्याला मारण्याची मसलत केली. तथापि गाजीउद्दीन ह्यास मल्हारराव होळकर ह्याची मदत असल्यामुळें त्यानें तो बेत सिद्धीस जाऊं दिला नाहीं, व बादशाहास धरून त्याचे डोळे काढले आणि जाहांदरशाह ह्याच्या पुत्रास तक्तावर बसविलें. त्यास दुसरा आलमगीर हा मोठा किताब दिला. परंतु त्या प्रमाणें त्याचे हातीं सत्ता नव्हती.

राज्यांतील अव्यवस्था.

त्यावेळेस राज्यांत पराकाष्ठेची अव्यवस्था झाली होती व लहान राजास देखील वाटे कीं दिल्लीचें तक्त आपण पादाक्रांत करूं. अफगाण लोकांनीं मुलतान आणि लाहोर हे प्रांत अगदीं जिकून टाकिले. तिकडेस शीख लोकही बळानें व संख्येनें उत्तरोत्तर वाढत चालले होते. जाट व रोहिले ह्यांनीं स्वाऱ्या करून देश लुटण्याचें चालविलें होतें मराठ्यांनीं तर स्वाऱ्याकरून जाजती जाजती मुलूख व्यापून यमुना नदीच्या पलीकडे देखील जाऊन रोहिल खंडांतील मोठें एक ठाणें घेतलें होतें. गाजीउद्दीन ह्यानें आपले आंगीं सामर्थ्य नसतां अविचारानें मुलूख जिकण्याचा यत्न केला ह्यामुळें लवकरच त्यास संकटकाळ प्राप्त झाला. अहंमदअबदुल्ला ह्यानें लाहोरचें संस्थान एक्या अफगाण जातीच्या बायकोस दिलें होतें तिच्या मुलीशीं लग्न करावें म्हणून बोली करण्याच्या मिषानें जाऊन बादशाहाचे वजिरानें तीस धरून कैद केलें आणि दिल्लीस आणिलें. हा जुलूम ऐकतांच त्या अनाडी अफगाण राजास इतका क्रोध आला कीं तो त्याच्या पोटांत मावेना. मग लागलाच मोठ्या सेनेनिशीं त्वरेनें धांवत आला आणि दिल्लींत शिरला तेव्हां कोणीही त्यास प्रतिबंध केला नाहीं. नंतर नादिरशाहाचे प्रमाणें तें शहर लुटून बहुतेक त्यावेळचे प्रमाणेंच नाश केला. नंतर लोकोत्तर एक गोष्ट घडली. ती अशी कीं बादशाहानें त्यास प्रार्थना केली कीं मला माझे वजिरापासून उपद्रव होणार नाहीं असा बंदोबस्त करून ठेवा. त्यानें

प्रकरण ९ इ० स० १७५०.

आलमगीर बादशाह

दिल्ली दुसऱ्यानें लुटली.

प्रकरण ९ इ० स० १७५०.

मला नांवाचा बादशाहकरून ठेविलें आहे. आणि आपणच सर्व अधिकार चालवितो. त्याप्रमाणें अहंमद अबदुल्ला ह्यानें त्याचा बंदोबस्त केला आणि अलमगीर ह्यास एक्या रोहिले सरदाराच्या स्वाधीन ठेविलें. परंतु तो गेल्यावर ते सर्व उपाय निष्फळ झाले. गाजीउद्दीन

गाजीउद्दीन.

ह्यानें पुढें उमदउलमुलूक असा किताब घेतला होता तरी घोटाळा होऊंनये म्हणून गाजीउद्दीन ह्या नांवानेंच त्याचें वर्णन येथें लिहिलें आहे. त्यानें मराठ्यांशीं सख्य करून सहजच बादशाहासुद्धां दिल्ली आपल्या ताब्यांत आणिली. तो दुर्दैवी बादशाह प्रथम जें प्राप्त झालें तें सोसून राहिला होता. परंतु त्यानें शत्रू पक्षांतील लोकांशीं पत्र व्यवहार केला असें कळल्यावर गाजीउद्दीन ह्यानें त्यास मारेकऱ्याकडून मारवून त्याचें प्रेत यमुनेंत फेंकून देवविलें. तथापि गाजीउद्दीन ह्यास जातीनें शेंकडों शत्रू होते, त्यां पुढें त्याचा टिकाव न लागून थोड्याच दिवसांत त्यास जाट लोकांच्या एक्या किल्ल्यांत जाऊन रहावें लागलें.

ह्या राजद्रोही मनुष्याचा विचार अधिक नकरितां

मोंगलांचे राज्याची स्थिति.

इतकेंच साधारण सांगतों कीं मोंगलांच्या गादीचें वजन किंवा मोठेपणा आतां बहुतकरून अगदीं राहिला नव्हता. हिंदुस्थानच्या राज्याकरितां अफगाण व मराठे ह्या उभयतां मध्येंच कलह राहिला होता. मराठ्यांनीं आपले वादी जवळ नाहींत अशी संधी साधून सर्व

प्रकरण ९
इ० स० १७५७.

हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणावें म्हणून मोठा यत्न चालविला. त्यांनीं दक्षिणेंतून पुष्कळ घोडेस्वार आणून शीखलोकांच्या साहाय्यानें आग्रा आणि दिल्ली हे मुख्य प्रांत व्यापून मुलतान व लाहोर हेही प्रांत व्यापिले आणि सिंधुनदाच्या पलीकडे अफगाण लोकांस हांकून लाविलें. परंतु अहंमद अबदुल्ला स्वभावानें कडक नव्हता तरी ते प्रांत हिसकून घेतले हें त्यास नीट वाटेना. मग लागलाच मोठें सैन्य घेऊन तो सिंधुनद उतरून आला, तेव्हां मराठ्यांच्या स्वारीमुळें रागावलेले पुष्कळ संस्थानी होते ते त्याकडे मिळाले. तेव्हां ते मराठे मागें परतले आणि त्यांनीं अफगाण लोकांस प्रथम दिल्ली घेऊं दिली; परंतु ते लागलेच मोठा खंदक खणून तळ देऊन उतरले. तेव्हां महंमदअबदुल्ला ह्याच्यानें त्यांवर हल्ला करवेना. मग मराठेच सामग्रीचा तोटा पडल्यामुळें वेडेपणानें खंदक सोडून बाहेर आले आणि त्यांनीं लढाई केली तींत त्यांचा अगदीं पराजय झाला. त्यांच्या ८० हजार लोकांपैकीं बहुतेक लोक मेले. त्या वेळेस दमाजी शिंदे हे मुख्य सेनापति होते ते पडले; व होळकराचे सैन्यावरही शत्रूनें शिकंदराबादेजवळ हल्ला केला, आणि त्याचा इतका पराजय केला कीं तो होळकर जातीनें थोड्या लोकांनिशीं पळून गेला.

हिंदुस्थानच्या गादीविषयीं दावा सांगणार.

अहंमदअब्दुल्ला दिल्लींत शिरला.

मराठ्यांचा पराजय

हा अपजय झाल्यामुळें मराठ्यांस वाईट वाटलें

प्रकरण ९. इ० स० १७५९.

परंतु त्यांचें धैर्य खचलें नाहीं; मग त्यांनीं पराकाष्ठेचा यत्न करून आपली अपकीर्ति दूर करावी असा निश्चय केला.

नवीनफौज जमा झाली.

एक वर्ष झालें नाहीं तों त्यांनीं एकलक्ष चाळीस हजार फौज जमा केली व त्या फौजेवर पेशव्यांचा भाऊ सदाशिवरावभाऊ ह्यास मुख्य नेमिलें. भाऊ व वजीर आणि जाट लोकांचे नाईक हे मिळून दिल्लीवर चालले. तेव्हां यमुनेचे पात्र फार खोल असून व पर्जन्य काळामुळें पाणी फुगलें होतें ह्यामुळें दोहों तिरांवर अफगाण म्हणजे गिलचे व मराठे ह्या उभयतांच्या फौजा उतरल्या होत्या. जरा नदीस उतार नव्हता, तरी गिलचांचा मुख्य अब्दुल्ला हा मोठा हिय्येदार असे त्यानें यमुना उतरून जावें म्हणून पाण्यांत फौज घातली.

यमुनेंतून मार्ग.

मग त्यानें आंत उतरून सर्व सेना पोहवून नेली. असें अद्भुत कृत्य कधींच कोणीं पाहिलें नव्हतें, तें पाहून मराठ्यांच्या पोटांत दहशत बसली. मराठे तिपट होते, तरी त्यांच्यानें रणांत समोर उभें राहून शत्रूशीं युद्ध करवेना. नंतर ते पानपत येथें सभोंवतीं खंदक खणून आंत तळ देऊन उतरले. पानपत येथें पुष्कळ वेळां लढायां होऊन राज्य कोणी करावें ह्याचा निकाल ( पांडवांच्यावेळेपासून ) झाला आहे. मग खंदक खणून मराठे राहिल्यामुळें अहमदशाह वारंवार नुसत्या फेऱ्या घाली आणि अन्न पाण्याचा पुरवठा जाऊं देईना. शेवटीं त्यानें हिय्या करून शत्रूच्या तळावर हल्ला केला. तेव्हां यश न येऊन त्यास परत जाणें भाग पडलें. तें पाहून मरा-

त्यांस उमेद आली व पूर्वींच्या प्रमाणें धान्याचा वगैरे तोटा झाला होता त्या त्रासानें सदाशिवरावभाऊंनीं पुनः मैदानांत येऊन लढाई द्यावी असा निश्चय केला. त्यांनीं आपला तोफखाना अघाडीस चालता ठेवून ते आपल्या चालीप्रमाणें शत्रूचा सप्पा उडवीत धांवत आले. तेव्हां शत्रूकडील मुख्यानें हे जवळ येत तोंपर्यंत आपल्या लोकांस पुढें जाऊंनये असें सांगितलें. मग ते जवळ येतांच एकदम हल्ला करावा असा हुकूम केला. डोंगरांत हिंडणारे व ज्यांजवळ शस्त्रें थोडीं अशा स्वारांस त्या उत्तरेकडील बलाढ्य घोडे स्वारांपुढें क्षणभर देखील टिकाव धरवेना. प्रथम हल्ला होतांच मराठ्यांची दाणादाण झाली आणि ते अव्यवस्थितपणानें चोहोंकडे पळून गेले. शेवटीं त्यांपैकीं थोडेच लोक दक्षिणेंत परत आले; आणि बेवीस हजार लोक व पन्नास हजार घोडे गिलचांस सांपडले व ह्याखेरीज पुष्कळ लूट सांपडली.

प्रकरण ९ इ० स० १५५९.

सर्व फौजेची एकदम लढाई.

मराठ्यांची दाणादाण.

मग ह्या विजयी अबदुल्लास मोंगलांची दिल्ली येथील गादी रिकामी होती ती घेणें सहज होतें, परंतु ती मोठी गादी मिळावी अशी त्याची इच्छा नव्हती असें दिसतें. तो कदाचित असें समजला असेल कीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे दंगे चालले आहेत व पुष्कळ राजे लढाईच्या बेतांत आहेत आणि हें राज्य आपल्या मुख्य गादीपासून लांब आहे ह्यामुळें घेऊन नफा होणार

मोंगलांची रिकामी गादी,

प्रकरण ९ इ० स० १७५९. नाहीं. सिंधु नदाच्या पश्चिमकांठचे प्रांत आपणास पुरे आहेत. ह्यांहून आणखी मुलुख नको असें वाटून तो कांहीं महिने राहून दिल्ली सोडून चालता झाला; आणि त्यानें तेथील गादीवर दुसरा अलंगीर ह्याचा वडील

आलीगोहर. पुत्र अली गोहर ह्यास बसविलें. तेव्हां मोंगलांचें नांव मात्र राहिलें होतें, पराक्रम अगदीं नव्हता. जो शूर योद्धा निघेल त्याच्या हातीं दिल्ली लागून तो जसें ठेवील तसें रहावें अथवा कैदी व्हावें असा त्या राजपुत्रावर प्रसंग होता तरी लोक त्यास मान देत व मोठा मानीत. ह्या प्रमाणें मोंगल बादशाहीचा ऱ्हास येथपर्यंत कसा होत गेला हें वर्णिलें, आतां यूरोपांतील नवीन लोक येऊन हिंदुस्थानांतील सर्व राज्यांपेक्षां वरिष्ठ राज्य त्यांनीं मोंगलांची गादी मोडून स्थापिलें, त्यांच्या सत्तेच्या वृद्धीचें वर्णन करीपर्यंत वर लिहिलेला इतिहास तहकूब करितों.

प्रकरण समाप्त.